# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२००८.** **दिनांक ०७.०७.२००८**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०७जुलै, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा. नं. एसएसएस -वशी-०४-९६७८-२००८, दि.०१.०७.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ७ जुलै, २००८ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२ | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४ | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५ | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६ | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७ | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा | १०. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर . |
| ११. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी प्रभात

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष,श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री. रमाकान्त गणेश कर्णिक मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री.समि खतीब, यांनी फॅक्सद्वारे कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

**विषय नं.०१ दिनांक २४.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.५५९**दिनांक २४.०५.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**(०१) निर्णय क्र.४१५ १२ (ब)** मध्ये -इयत्ता १०वी या वर्गाची सुधारित शैक्षणिक फी रुपये ३०००/- ऐवजी रुपये ३१,००/- वाचण्यात यावे. (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

**(०२) निर्णय क्र.४२६ मधील शेवटचा परिच्छेद-**

वर नमूद केल्याप्रमाणे HDFC बँकेचा पेमेंट गेटवेसाठी आलेला प्रस्ताव प्रथमतः तीन वर्षासाठी स्विकारुन त्याप्रमाणे त्याच्याशी करारनामा व इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

"वर नमूद केल्याप्रमाणे HDFC बँकेचा पेमेंट गेटवेसाठी आलेला प्रस्ताव स्विकारुन त्याप्रमाणे त्याच्याशी करारनामा व इतर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नमूद केल्याप्रमाणे HDFC बँकेचा पेमेंट गेटवेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव स्विकारण्यात येऊन श्री साईभक्तांना ऑनलाईन देणगी सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी असे ठरले. त्याचप्रमाणे पुढेही इतर नामांकित बँका अगर संस्था यांच्याकडून पेमेंट गेटवेसाठी येणारे सुरक्षित व संस्थानला फायदेशिर असलेले प्रस्ताव स्विकारण्यात येऊन त्यांचाही ऑनलाईन देणगीसाठी उपयोग करुन घेण्यास घेण्यात यावा असे ठरले." (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**(०३) निर्णय क्र.५५० मधील शेवटचा परिच्छेद-**

"उपरोक्त दरधारकांनी सादर केलेले बेंचेसचे नमुने आजचे सभेतील मा.विश्वस्तांनी समक्ष पहाणी केली असता, प्रगती इंडस्ट्रीज,संगमनेर यांचे नमुन पसंत पडले. प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी देऊ केलेल्या मूळ किंमतीत प्रती नग रुपये १००/- प्रमाणे दर कमी केलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना रुपये १९३६.०० + १२.५% व्हॅट प्रती नग या दराने बेंचेस पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. "

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

"उपरोक्त दरधारकांनी सादर केलेले बेंचेसचे नमुने आजचे सभेतील मा.विश्वस्तांनी समक्ष पहाणी केली असता, प्रगती इंडस्ट्रीज,संगमनेर यांचे नमुन पसंत पडले. प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर हे समक्ष उपस्थित होते. त्यांनी देऊ केलेल्या मूळ किंमतीत प्रती नग रुपये १००/- प्रमाणे दर कमी केलेले आहे. **तथापि त्यांनी फक्त २०० बेचेंस पुरवठा करण्याचे मान्य केले.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना रुपये १९३६.०० + १२.५% व्हॅट प्रती नग या दराने **२००** बेंचेस पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा **व उर्वरित २०० बेचेंस खरेदीकामी कोटेशन मागवुन सादर करावे,**असें ठरलें. "

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**(०४) निर्णय क्र.५५७ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडील लिलावात काढण्यात येत असलेल्या वाहनांपैकी एक वाहनांची किंमत ठरवून ती भगीरथ प्रकल्पास देणगी म्हणून देण्यात यावी असे ठरले.

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडील लिलावात काढण्यात येत असलेल्या **वाहनांपैकी मारुती अ‍ॅम्ब्यूलन्स एमएच-१७-के-६६५१ हे वाहन किंमत ठरवून ती भगीरथ प्रकल्पास शासनाची मान्यता घेऊन देणगी म्हणून देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."**

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/अधिक्षक,अभिलेखा कक्ष)

**यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**विषय नं.०२ दिनांक २८.०६.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.५६०** दिनांक २८.०६.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१.संस्थान मालमत्तेची विमा पॉलिसी घेणेकामी आलेल्या कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**०२ संस्थानचे मुंबई कार्यालय इमारत रंगकाम करणेकामी आलेल्या निविदांबाबत**

संस्थानचे मुंबई येथे कार्यालय असून सदरचे कार्यालयाचे दुरुस्ती व रंगकाम सन. १९९९ ला करण्यात आले आहे. सदरचे रंगकामास सुमारे सात ते आठ वर्ष झाल्याने इमारतीचे आतील / बाहेरील भागाचे रंगकाम खराब झाले आहे. या कार्यालयास मुंबई व भारतातील अन्य ठिकाणावरुन येणारे साईभक्त भेट देत असतात व शिर्डी येथील समाधि मंदिरातील माहीती घेत असतात करीता सदरचे इमारतीचे रंगकाम करणे आवश्यक असल्याने सदरच्या कामासाठी आवश्यक असणारा अंदाजे रु. ५,४०,३०७/- मात्र खर्चाचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०५/२००८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या फक्त आतिल भागाचे रंगकाम करुन घेणेत यावे.

त्यानुसार अशा प्रकारचे सध्या संस्थानचे इमारतीना आतिल भागास रंगकाम करणारे ठेकेदार व मुंबई येथील खालील पेंटर / ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले आहे.

**अ) सध्या संस्थान इमारतींना आतिल भागास रंगकाम करणारे ठेकेदार.**

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. ओम साई इंटरप्रायजेस, पुणे |
| ०२ | मे. रंगराज पेटींग कॉन्ट्रॅक्टर, अ. नगर |
| ०३ | मे. अेस डेकोरेटर्स, पुणे |

**ब) मुंबई येथील पेंटर / ठेकेदार**

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| ०१ | संतोष पेटींग वर्क्स, (कुर्ला) मुंबई |
| ०२ | चंद्रशोभा एन्टरप्राईजेस्, मुंबई |
| ०३ | निलम पेंटर, मुंबई |
| ०४ | पवार पेंटर, (व्यंकटेश एंटरप्राईजेस) ,कुर्ला,मुंबई |

तरी उपरोक्त " **अ** " व " **ब** " पेंटर / ठेकेदार यांचेकडून प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत. (निविदा रक्कम अंदाजे रुपये-५,४०,३०७/-)

| अ. नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | संतोष पेटींग वर्क्स, (कुर्ला) मुंबई | निविदा दर | ७.५ % कमी |
| ०२ | चंद्रशोभा एन्टरप्राईजेस्, मुंबई | ३ % कमी | ७ % कमी |
| ०३ | मे. अेस डेकोरेटर्स, पुणे | १५ % अधिक | १० % अधिक |
| ०४ | पवार पेंटर, (व्यंकटेश एंटरप्राईजेस) ,कुर्ला,मुंबई | १५ % | गैरहजर अपूर्ण निविदा |
| ०५ | निलम पेंटर, मुंबई | ४ % | गैरहजर अपूर्ण निविदा |

उपरोक्तपैकी अ.नं. ४ व ५ यांनी निविदा टक्केवारीमध्ये कमी किंवा अधिक असा उल्लेख केलेला नाही त्यामुळे निविदेची निश्चित रक्कम नाही अपूर्ण निविदा, उर्वरित निविदांवर सविस्तर चर्चा

होऊन, अ.नं.०१ चे कोटेशनसादरकर्ते **मे.संतोष पेटींग वर्क्स,कुर्ला,मुंबई यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०३ श्रीसाईबाबा हॉस्पिटल पार्किंगशेड उभारणेकामी आलेल्या निविदांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

दि. १० जानेवारी २००८ रोजी शिर्डी येथे झालेलया मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ०८ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचे वाहनांचे पार्किंग करणेसाठी साईनगर मैदानावर पूर्व अथवा उत्तर बाजूस ३००'x१५' आकाराचे पत्र्याचे शेड तयार करणेकामी लोखंडी पाईप वापरुन पत्र्याचे शेड उभारणेस प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. ४,३७,०००.०० मात्रचे खर्चास व शेडमध्ये दगडाचे सोलींग करुन त्यावर मुरुम टाकणेस तसेच सदरहू काम हे मोठ्या स्वरुपाचे असल्यामुळे संस्थान पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन, एस्टिमेट व निविदा तयार करुन वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून तपशिलवार एस्टिमेट तयार केले असून त्यानुसार रुपये ६,४३,८३७.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. अशा प्रकारे Percentage Rate या धर्तीवर निविदा तयार केल्या होत्या.

त्यानुसार दि. २८/०५/२००८ रोजीचे दै. लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. याकामी निविदा विक्रीचा कालावधी दि. २८/०५/२००८ ते दि. ०६/०६/२००८ पर्यंत ठेवण्यात आला होता आणी दि.१०/०६/२००८ अखेर सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत देण्यात आली होती.

वरीलप्रमाणे शिर्डी येथील कार्यालयातून एकूण तिन निविदा धारकांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | **निविदाधारकाचे नांव व पत्ता** |
|---|---|
| ०१ | मे.एस.एन. गुंजेगावकर, मु.पो.निघोज, ता. राहाता |
| ०२ | मे. वाय.एस.पाटील मु.पो. कोपरगांव |
| ०३ | मे. एम.एस.पाचोरकर, काकासाहेब नगर, ता. निफाड जि. नाशिक |

वरीलपैकी तिनही निविदाधारकांनी सिलबंद निविदा दिलेल्या विहीत मूदतीत सादर केल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | **निविदाधारकाचे नांव व पत्ता** |
|---|---|
| ०१ | मे.एस.एन. गुंजेगावकर, मु.पो.निघोज, ता. राहाता |
| ०२ | मे. वाय.एस.पाटील मु.पो. कोपरगांव |
| ०३ | मे. एम.एस.पाचोरकर, काकासाहेब नगर, ता. निफाड जि. नाशिक (वृंदावन कन्स्ट्रक्शन) |

वरिलप्रमाणे विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या एकूण तीन निविदाधारकांचे लिफाफा क्र. ०१ व लिफाफा क्र. ०२ आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.एस.एन. गुंजेगावकर, मु.पो.निघोज, ता. राहाता | ५८ % अधिक | ५१ % अधिक |
| ०२ | मे. वाय.एस.पाटील मु.पो. कोपरगांव | ८५ % अधिक | अनुपस्थित |
| ०३ | मे. एम.एस.पाचोरकर, काकासाहेब नगर, ता. निफाड नाशिक (वृंदावन कन्स्ट्रक्शन) | ४५ % अधिक | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल पार्किंगशेड उभारणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा या डीएसआर दराप्रमाणे असून त्या **निविदा दरापेक्षा फारच अधिक असल्याने याकामी पन्हाळी पत्रे, स्ट्रक्चरल स्टील इ. साहित्याचे बाजारभावप्रमाणे सुधारित एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार नविन सुधारित डीएसआर दराप्रमाणे फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०४ रुग्णालय विभागासाठी स्वतंत्र लॉण्ड्री विभागासाठी शेड उभारणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे.**

संस्थानचे रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री विभाग सुरु करणेसाठी २०'x३०' साईजचे लॉण्ड्री शेड बांधणेसाठी व त्याकामी येणारा खर्च रक्कम रुपये २,१०,०००.०० मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३१ अन्वये मान्यता मिळाली आहे.

इकडील जा.क्र. ६७१८ दि. ०७ मे २००८ रोजीचे पत्राने स्थानीक दहा ठेकेदारांना कोरे निविदा अर्ज खरेदी करणेसाठी पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार दोन ठेकेदारांनी कोरे निविदा अर्ज विकत घेतले परंतू सिलबंद निविदा जमा करणेसाठी दिलेल्या दि. १५ मे २००८ अखेरचे अतिम मूदतीत एकही निविदा जमा झाली नाही.

इकडील दि. ०४/०६/२००८ रोजीच्या टिपणीनुसार फेर निविदा मागविणेस मान्यता मिळाली. त्यानुसार जा.क्रं. ८४४७ दि. १०/०६/२००८ रोजीचे पत्रान्वये फेर निविदा सादर करणेसाठी स्थानिक दहा ठेकेदारांना कोरा निविदा अर्ज विकत घेऊन दि. १३/०६/२००८ पर्यंत सिलबंद निविदा जमा करण्यास कळविण्यात आले होते. त्यापैकी फक्त दोन ठेकेदारांनी विहीत मूदतीत कोरे निविदा विकत घेऊन सिलबंद निविदा सादर केल्या आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | **निविदाधारकाचे नांव व पत्ता** |
|---|---|
| ०१ | मे. संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज |
| ०२ | मे. तान्हाजी मोरे, वास्तु निर्माण कन्स्ट्रक्शन, शिर्डी |

संस्थान रुग्णालयांसाठी लॉण्ड्री शेड उभारणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या दोन सिलबंद निविदा उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.एस.एन. गुंजेगावकर, मु.पो.निघोज, ता. राहाता | ४९ % अधिक | ४५ % अधिक |
| ०२ | मे. तान्हाजी मोरे, वास्तु निर्माण कन्स्ट्रक्शन, शिर्डी | ५४ % अधिक | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांसाठी लॉण्ड्री शेड उभारणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा या डीएसआर दराप्रमाणे असून त्या **निविदा दरापेक्षा फारच अधिक असल्याने याकामी सिमेंट,पन्हाळी पत्रे, स्ट्रक्चरल स्टील इ. साहित्याचे बाजारभावाप्रमाणे सुधारित एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०५.श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२००८ मंडप उभारणे बाबत**

श्रीसाईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी गुरुवार दि. १७ जूलै, २००८ ते दि. १९ जूलै, २००८ अखेर "श्रीं " चा गुरुपौर्णीमा उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत उत्सव असल्याने मंडपामध्ये पावसाचे पाणी गळणार नाही करीता पत्र्याचे मंडप बांधणे संयुक्तीक होईल. तरी याकामी उपरोक्त प्रमाणे पत्र्याचे छत व सुशोभित कापड व बिछायतीसह खालील प्रमाणे मंडप उभारणी करणे आवश्यक आहे.मंडप / उभारणी व्यवस्था तपशील खालील प्रमाणे करता येईल.

**०१. समाधी मंदिर परिसरातील मंडप**

**मंडप उभारणीचे परिशिष्ट खालील प्रमाणे -:**

मंडप उभारणीसाठी वापरावयाचे साहित्य : भक्कम असे बांबू , लाकडी गोल्टे, बल्ल्या , अथवा लोखंडी फ्रेम स्ट्रक्चर, सुशोभित व स्वच्छ कापड , छताचे करीता पन्हाळी पत्रे, मंडपाचे खांबास खांबोळी , चारही बाजूने आवश्यकतेनुसार ३ अथवा २ फुट उंचीची कापडी झालर इ. सह.

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण** | **मंडपाचा आकार** | | | **मंडपाचा एकुण आकार अंदाजे चौरस फुट** |
|---|---|---|---|---|---|
| | | **लांबी (फुट)** | **रुंदी (फुट)** | **उंची (फुट)** | |
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | अ) समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त<br>ब) सभामंडप | २८४<br>७० | २०<br>७० | १८<br>१८ | ०५६८०<br>०४९०० |
| ०२ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, व्दारकामाई ते नगरव्दार गेटपर्यन्त | ४०० | २० | १८ | ०८००० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ०५० | २० | १५ | ०१००० |
| ०४ | श्री गुरुस्थान मंदिर निंबवक्ष पुर्व बाजूस, दक्षिणोत्तर असा | ०५० | २० | १५ | ०१००० |
| ०५ | श्रीं चे चावडी समोरील मोकळया जागेत | ०४० | २५ | १५ | ०१००० |
| ०६ | लेंडीबागेतील मंडप.<br>लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ लेंडीबागेत<br>नंदादिप मागील बाजूस गेट न. ५ पर्यंत | ०९०<br>०१०० | ४०<br>१० | १५<br>१५ | ०३६००<br>०१००० |
| ०७ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ०६० | ४० | १५ | ०२४०० |
| ०८ | श्री मारुती मंदिर समोर<br>अ) दक्षिण - उत्तर बाजू<br>ब) पूर्व - पश्चिम बाजू | ०५०<br>०५० | ०२०<br>०२० | १५<br>१५ | ०१०००<br>०१००० |
| ०९ | जूना पिंपळवाडी रस्ता दर्शन लाईन करीता | ६५० | १८ | १८ | ०११७०० |
| | | | | **चौ.फूट** | **४२२८०** |

**०२. प्रसादालय परिसर, साईउद्यान, मंगल कार्यालय व पालखी ठिकाणचे मंडप (छताकरीता प्लास्टीक ताडपत्री )**

**मंडप उभारणीसाठी वापरावयाचे साहित्य :** भक्कम असे बांबू , लाकडी गोल्टे, बल्ल्या , अथवा लोखंडी फ्रेम स्ट्रक्चर, छतासाठी पावसाचे पाणी आत येणार नाही करीता जाड ताडपत्री , सुशोभित व स्वच्छ कापड , मंडपाचे खांबास खांबोळी , चारही बाजूने आवश्यकतेनुसार ३ अथवा २ फुट उंचीची कापडी झालर इ. सह.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | | | मंडपाचा एकुण आकार अंदाजे चौरस फुट |
|---|---|---|---|---|---|
| | | लांबी (फुट) | रुंदी (फुट) | उंची (फुट) | |
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | प्रसादालय तिकीट काउंटर समोर जेवण रेलींग पूर्व/ पश्चिम बाजू | १२५ | ०४० | १५ | ०५००० |
| ०२ | जेवण शेड पूर्व बाजू (सुलभ शौचालया समोर) | ०५५ | ०७५ | १५ | ०४१२५ |
| ०३ | प्रसादालय उत्तर बाजूस | ०३७ | २५ | १५ | ००९२५ |
| ०४ | साईप्रसाद नं.०२/ चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | ०६० | १५ | १५ | ०९०० |
| ०५ | पालखीसाठी निर्मळ पिंप्री येथे<br>व शिंगवे नाईक येथे | ०६०<br>०६० | ०४०<br>०४० | १०<br>१० | ०२४००<br>०२४०० |
| ०६ | हॉटेल सस्कृंती समोर पालखी स्वागता करीता | २० | १५ | १० | ००३०० |
| ०७ | व्हीआयपींसाठी प्रसादालय हॉल नंबर ०२ मध्ये पार्टीशन | ०१०० | -- | ०८ | ००८०० |
| ०८ | स्वयंसेवी भोजन कक्ष पार्टीशन | १५० | -- | १० | ०१५०० |
| ०९ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता | ०२० | ०१५ | १० | ०३०० |
| १० | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर | ०१५ | ०१० | १० | ०१५० |
| ११ | प्रसादालय पार्किंग (बिछायत कनातीसह) | ०१५० | ०५० | १० | ०७५०० |
| १२ | लाडू विक्री काउंटर समोर | ०७५ | ०२५ | १० | ०१८७५ |
| १३ | मंगल कार्यालय (बिछायत कनातीसह) | ०७० | ०१५ | १० | ०१०५० |
| १४ | साई उद्यान समोर (बिछायत कनातीसह) | ०६० | ०४५ | १० | ०२७०० |
| १५ | प्रसादालय पुरीसाठी | ०३० | ०१५ | १० | ०४५० |
| १६ | गेट नं. ५ ते दर्शन रांग | ०११० | ०२५ | १२ | ०२७५० |
| १७ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूने | ०४० | ०२० | १२ | ०८०० |
| | | | | चौ.फुट | **३५९२५** |

**०३. साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम) व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लास्टीक ताडपत्री ):-**

**मंडप उभारणीसाठी वापरावयाचे साहित्य :** भक्कम असे बांबू , लाकडी गोल्टे, बल्ल्या , अथवा लोखंडी फ्रेम स्ट्रक्चर, छतासाठी पावसाचे पाणी आत येणार नाही करीता जाड ताडपत्री , सुशोभित व स्वच्छ कापड , मंडपाचे खांबास खांबोळी , चारही बाजूने आवश्यकतेनुसार ३ अथवा २ फुट उंचीची कापडी झालर इ. सह.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | | | मंडपाचा एकुण आकार अंदाजे चौरस फुट |
|---|---|---|---|---|---|
| | | लांबी (फुट) | रुंदी (फुट) | उंची (फुट) | |
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | साईनगर मैदानावर साईभक्तांचे सोयीसाठी मंडप मॅटींनसह | १०० | ०७५ | १० | ०७५०० |
| ०२ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी प्रेकक्षकांना बसणेसाठी मॅटींनसह | २२० | ०४५ | १२ | ०९९०० |
| ०३ | नविन भक्तनिवासस्थान दक्षिण बाजूस पार्किंगचे जागेवर | ३०० | ०४५ | १० | ०१३५०० |
| ०४ | समाधि मंदिर गेट नं. ३ ते वेशीपर्यंत | १०० | ०२० | १२ | ०२००० |
| ०५ | चप्पल स्टॅान्ड करीता | ०५५ | ०१५ | १२ | ०८२५ |
| | | | | चौ. फुट | **३३७२५** |

## ०४. साईनगर स्टेज व्यवस्था. :-

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | एकुण आकार अंदाजे चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | साईनगर प्रांगणात स्टेज व्यवस्था<br>०१. ३०X२० साईजचे स्टेज करीता संस्थानकडे उपलब्ध असलेले स्टॅन्ड वापरुन त्यावर २० एम. एम. जाडीचे प्लायवूड टाकुण स्टेज तयार करणे. व वरिल बाजूने पत्र्याचे छतासह मंडप उभारणी करणे इ. सह<br>०२. १०X२० साईजमध्ये दोन मेकअप रुम तयार करणे.<br>०३. कार्यक्रमासाठी १००० नग खुर्च्या. | ६००.००<br><br>४००.०० |

उपरोक्त तपशिलानूसार गुरुपौर्णीमा उत्सव- २००८ करीता अंदाजे एकुण १,१२,९३०.०० चौ. फुट मंडप उभारणी करणे आवश्यक आहे. परंतू एकाच मंडप ठेकेदारकडे इतक्या मोठया प्रमाणात लोखंडी पन्हाळी पत्रे उपलब्ध नसतात करीता मंदिर परिसरातील मंडपाचे छताकरीता पन्हाळी पत्र्याचे छताचे व प्रसादालय व इतर परिसरातील मंडप छताकरीता सुशोभित कापड व वरिल बाजूस प्लास्टीक ताडपत्री वापरुन मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रुपये १५.६० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता

अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस व उत्सवा निमीत्ताने उभारणेत येणारे डेकोरेशन करीता आवश्यक असणारे बांबू व गोल्टे मंजूर दर असलेले सप्लायर श्री. एम. के. वडतेले, राहाता यांचेकडून भाडेतत्वावर (बांबू रु.०.५० प्रति नग प्रति दिवस, गोल्टे रु. १.५० प्रति नग प्रति दिवस या दराने ) घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३०,०००.०० मात्रचे खर्चास तसेच मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेकामी येणारे रु. १०,०००.०० मात्रचे खर्चास असे अंदाजे एकुण रु. १६.०० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, **त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. त्याचप्रमाणे प्राप्त होणाऱ्या निविदा दिनांक ३.७.२००८ रोजी स्थानिक विश्वस्तांसमक्ष उघडून त्यावर निर्णय घेण्यात यावा,असे ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६ ध्वनिक्षेपण विभागासाठी एल.सी.डी. टि.व्ही. खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.८(६) अन्वये भक्तनिवास दर्शनलाईनमध्ये बसविणेसाठी आवश्यक असणारे सोनी कंपनीचे ३२ इंची ०६ नग व २० इंची ०४ नग एलसीडी टिव्ही खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.४ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशिल | कंपनी व मॉडेल नंबर | मागणी |
|---|---|---|---|
| ०१. | एलसीडी टिव्ही - ३२ इंची | सोनी, केएलव्ही ३२-एस-३१०ए<br>फ्लोरींग व वॉल माऊंटींग ब्रॅकेटसह | ०६ नग |
| ०२. | एलसीडी टिव्ही - २० इंची | सोनी, केएलव्ही २०-जी-३००ए<br>फ्लोरींग व वॉल माऊंटींग ब्रॅकेटसह | ०४ नग |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-ध्वनीक्षेपण/५३७९/२००८ दि.१०.०४.२००८ अन्वये दि.२९.०४.२००८ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | कोहीनुर टेले-व्हिडीओ, दादर,मुंबई |
| ०२. | अनिल इलेक्ट्रॉनिक्स,अहमदनगर |
| ०३. | सोनी वर्ल्ड, नाशिक |
| ०४. | एच.जोशी ब्रदर्स सेल्स प्रा.लि.नाशिक |
| ०५. | जे.पी.इलेक्ट्रॉनिक्स, बोरीवली, मुंबई |
| ०६. | प्रेरणा एन्टरप्राईजेस, मुंबई |
| ०७. | जयंत कमर्शिअल कार्पोरेशन, जळगांव |

उपरोक्त कोटेशनधारकांच्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करणेत येऊन, त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले असता,त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | एलसीडीचे वर्णन | कोटेशनमधील दर | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | कोहीनुर टेले-व्हिडीओ, दादर,मुंबई | ३२ इंची<br>२० इंची | ४२,०००/-<br>२२,०००/-+वहातुक | अनुपस्थित |
| ०२. | अनिल इलेक्ट्रॉनिक्स,अहमदनगर | ३२ इंची<br>२० इंची | ३९,०००/-<br>२२,०००/- | ३९,०००/-<br>२०,५००/- |
| ०३. | सोनी वर्ल्ड, नाशिक | ३२ इंची<br>२० इंची | ४०,५५०/-<br>२२,४००/- | अनुपस्थित |
| ०४. | एच.जोशी ब्रदर्स सेल्स प्रा.लि.नाशिक | ३२ इंची<br>२० इंची | ४३,८६०/-<br>२१,९५०+वहातुक | अनुपस्थित |
| ०५. | जे.पी.इलेक्ट्रॉनिक्स, बोरीवली, मुंबई | ३२ इंची<br>२० इंची | ४०,७००/-<br>२२,५००/- | अनुपस्थित |
| ०६. | प्रेरणा एन्टरप्राईजेस, मुंबई | ३२ इंची<br>२० इंची | ४६,०००/-<br>२३,५००/- | अनुपस्थित |
| ०७. | जयंत कमर्शिअल कार्पोरेशन, जळगांव | ३२ इंची<br>२० इंची | ४०,०००/-<br>२२,०००/- | अनुपस्थित |

आजचे सभेत उपस्थित कोटेशनसादरकर्ते मे.अनिल इलेक्ट्रॉनिक्स,अहमदनगर यांचेशी समक्ष चर्चा केली असता, संस्थानने 32 S-310 A एलसीडी टीव्हीची मागणी केलेली आहे. परंतू सध्या बाजारात KLV-32V-300 A हा सुधारित एलसीडी टीव्ही आलेला आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अनिल इलेक्ट्रॉनिक्स,अहमदनगर यांचेकडून KLV-32V-300 A सुधारित मॉडेलचा ३२ इंची व २० इंची न्युनतम दराने खरेदी करण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**०७** श्री साईलिला नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक अंक छपाई कामाचे कोटेशन उघडून निर्णय घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित " श्री साईलीला" नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक अंक खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे छपाई करणेबाबत व त्यासाठी रु.२५,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या प्रती महिना | वर्षाकरीता छपाई करावयाचे अंक | प्रति अंक अंदाजे छपाई दर रुपये पैसे | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ पाने =३६ पाने | १०,००० नग | ५ अंक | १५.०० | ७,५०,०००/- |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२+४=३६ पाने | १५,००० नग | ५ अंक | १५.०० | ११,२५,०००/- |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १०,००० नग | १ अंक | २५.०० | २,५०,०००/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४=६८ पाने | १५,००० नग | १ अंक | २५.०० | ३,७५,०००/- |
| | | | | एकूण खर्च | २५,००,०००/- |

वरील तपशिलाप्रमाणे " श्री साईलीला" नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक अंक छपाई कामाचे कोटेशन्स मुंबई येथील निवडक प्रेसधारक यादीतील १४ व सन २००६-२००७ व २००७-२००८ चे श्री साईलीला अंक छपाईधारक मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई अशा एकूण १५ प्रेसधारकांना जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/७८७१/२००८ दि.३०.०५.२००८ अन्वये पाठविण्यात येऊन, त्यांना सदरची कोटेशन्स भरुन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१५.०६.२००८ अखेर देण्यात आलेली आहे, त्यानुसार मुंबई येथील १५ प्रेसधारकांपैकी खालीलप्रमाणे मुदतीत ७ सिलबंद कोटेशन्स मुंबई कार्यालयामार्फत दाखल झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई |
| ०२ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस., मुंबई |
| ०३ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०४ | प्रिन्टमन, मुंबई |
| ०५ | ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०६ | सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०७ | ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे " श्री साईलीला" नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक अंक छपाईकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आले असता कोटेशनसादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नाव** | **साईलीला मराठी** | | **साईलीला हिन्दी-इंग्रजी** | | **दसरा विशेषांक मराठी** | | **दसरा विशेषांक हिन्दी-इंग्रजी** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **५०,००० नग** | | **७५,००० नग** | | **१०,००० नग** | | **१५,००० नग** | |
| | | मुंबई छपाई दर | शिर्डी छपाई दर | मुंबई छपाई दर | शिर्डी छपाई दर | मुंबई छपाई दर | शिर्डी छपाई दर | मुंबई छपाई दर | शिर्डी छपाई दर |
| ०१ | परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई | १३.३८ | १३.५६ | ११.६७ | ११.९४ | २३.३७ | २३.८२ | २०.२२ | २०.५७ |
| ०२ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस., मुंबई | १४.७५ | १५.०० | १४.२५ | १४.५० | ३४.२५ | ३४.५० | ३१.७५ | ३२.०० |
| ०३ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | १५.५० | --- | १४.५० | --- | २५.५० | --- | २४.५० | --- |
| ०४ | प्रिन्टमन, मुंबई | १२.१५ | १२.६५ | ११.१६ | ११.६६ | २१.५१ | २२.०१ | १९.७१ | २०.२१ |
| ०५ | ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | **११.४४** | **११.९६** | **१०.३५** | **१०.७१** | **१९.४६** | **१९.९८** | **१७.३६** | **१७.६८** |
| ०६ | सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई | १४.२५ | १४.७५ | १२.७५ | १३.२५ | २४.४० | २४.९० | २२.०० | २२.५० |
| ०७ | ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई | १२.९१ | १३.४५ | १२.३७ | १२.७३ | २२.९० | २३.३५ | २१.३७ | २१.७३ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.,मुंबई यांचे दर अधोरेखीत निम्नतम दर मान्य करण्यात येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**०८ संस्थान प्रकाशित पुनर्मुद्रित पुस्तकांचे छपाई कामाचे कोटेशन उघडणे व निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.१०/०५.२००८ सभेमधील शिफारस व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ मधील निर्णयानुसार संस्थान प्रकाशित खालील पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेस व त्यासाठी रु.६६,००,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसच्चरित | **मराठी** | ५०,००० | ७०.०० | ३५,००,०००/- |
| ०२ | **श्री साईसतचरित्र** | गुजराथी | ७०,००० | ३५.०० | २४,५०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | खापर्डे डायरी | हिन्दी | १०००० | १५.०० | १,५०,०००/- |
| ०४ | एक फकिर की पाठशाला | हिन्दी | १०००० | ५०.०० | ५,००,०००/- |
| | | | | एकूण रु. | ६६,००,०००/- |

वरील तपशिलाप्रमाणे पुस्तके छपाई कामाचे कोटेशन्स ३० निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/७७३९/२००८ दि.२८.०५.२००८ अन्वये पाठविण्यात येऊन, त्यांना सदरची कोटेशन्स भरुन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.१६.०६.२००८ अखेर देण्यात आलेली होती, त्यानुसार खालीलप्रमाणे मुदतीत ६ सिलबंद कोटेशन्स दाखल झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०२ | सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०३ | न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| ०४ | अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे |
| ०५ | निट प्रिंटर्स्, अहमदनगर |
| ०६ | मे. ब्ल्यू बर्ड ( इंडिया ) लि., पुणे |

उपरोक्तप्रमाणे पुस्तके छपाईकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स उघडणेस व त्यातील निम्नतम दरांचे प्रेसधारकांना छपाई कामाचे आदेश देणेस मान्यता असावी.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | साईसच्चरित मराठी (पोथी) २७वी आवृत्ती | साईसच्चरित गुजराथी ११ वी आवृत्ती | खापर्डे डायरी हिन्दी तृतीय आवृत्ती | एक फकीर की पाठशाला हिन्दी २ री आवृत्ती |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ७४.७५ | ३७.२० | १४.६५ | ३८.७० |
| ०२ | सेफ ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ८४.६० | ३३.०० | १९.६० | --- |
| ०३ | न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | ८१.०० | ४१.०० | १५.०० | **३०.००** |
| ०४ | अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे | ६७.४२ | **३२.१५** | १५.०० | ५२.०० |
| ०५ | निट प्रिंटर्स्, अहमदनगर | **६५.४०** | --- | --- | ३६.८० |
| ०६ | मे. ब्ल्यू बर्ड ( इंडिया ) लि., पुणे | ६५.४५ | ३२.२० | **१३.२०** | ४५.७५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त अधोरेखीत निम्नतम दर स्वीकारणेत यावेत. श्रीसाईसच्चरित मराठी छपाईसाठी निट प्रिंटर्स,अहमदनगर यांचे दर रुपये ६५.४० निम्नतम आहेत तथापि त्यांचेकडे या अगोदरच तेलगू चरित्राचे छपाई काम होणे बाकी असल्याने अ.नं.०२ चे दरधारक मे.ब्लू बर्ड (इंडिया) लि.पुणे प्रति नग रुपये ६५.४० ने करुन देण्यात तयार असल्यास त्यांचेकडून छपाई करुन घेण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**०९ नविन प्रसादालय कारंजा उभारणी करणेबाबत.**

नविन श्री साई प्रसादालयाचे समोरील बाजुस लॅन्डस्केपींगचे काम करण्यात आलेले असुन कारंजाचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. मा. व्यवस्थापन उपसमितीची सभा दि.१०/०५/२००८ च्या निर्णयानुसार में रिपंल इंजिनरींग.प्रा.लि.मुंबई यांचे दरपत्रक मान्य करुन त्यांना जा.न. एसएसएस/वशी-बगीचा/७४०८/२००८ दि २१/०५/२००८ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

में रिपल्स इंजिनरींग वर्क्स.प्रा.लि.मुंबई यांनी दि ११/०६/२००८ रोजी प्रोफार्म इनव्हाईस पाठवुन रु.१,२१,१४६.०० या रक्कमेची मागणी केलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीने रु.१,१८,९२१.०० या रक्कमेला मान्यता दिलेली आहे. दरपत्रक हे माहे-फेब्रवारी २००८ मध्ये मागविण्यात आलेले होते. त्यावेळी दरपत्रकात सर्व्हीस टॅक्स २.०६ % धरलेला होता. परंतु शासनाचा सर्व्हीस टॅक्स ४.१२ % झाल्याने रु.२२२६/- (रु दोन हजार दोनशे सव्वीस ) ही रक्कम वाढलेली आहे.

तरी शासनाच्या वाढीव सर्व्हीस टॅक्समुळे वाढलेली **रक्कम रु.२२२६/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**१० वर्ग-४ कर्मचारी निवासस्थानाकडे जाणारा जोड रस्ता डांबरीकरण करणे बाबत**

**अ)** श्री साईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. निमगांव कोऱ्हाळे यांचे मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे ता. राहाता येथील जमिन संस्थानचे वर्ग-४ कर्मचाऱ्याचे निवासस्थान इमारतीचे बांधकामाकरीता खालील अटीवर खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

०१) श्री साईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्या., निमगांव-कोऱ्हाळे यांचे मालकीचे मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता. राहाता येथील गट नं. १६९ क्षेत्र ०१ हेक्टर ६९ आर पैकी अंदाजे हेक्टर ०.६० आर जमीन प्रत्येक आरला रुपये २७,९८९/- (पूर्णांकित रक्कम रुपये २८,०००/-) प्रती आर या भावाने खालील अटींवर खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

अ) श्रीसाईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित, निमगांव को-हाळे यांचेकडे संस्थानला विकण्याच्या जागेव्यतिरिक्त राहीलेल्या जागेतील रस्त्यावर व ओपन स्पेसवर सदरहू संस्था व श्रीसाईबाबा जागेव्यतिरिक्त राहीलेल्या जागेतील रस्त्यावर व ओपन स्पेसवर सदरहू संस्था व श्रीसाईबाबा संस्थान यांची समाईक मालकी राहील.

ब) गट नं. १६९ मध्ये असलेल्या विहीरीचे पाण्यावर संस्थानचा निम्मा हक्क राहील.

क) संस्थानने खरेदी केलेल्या जागेत होणारे नियोजीत रस्ते हे संस्थानचेच मालकीचे राहतील त्यावर श्रीसाईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित, निमगांव को-हाळे यांचा हक्क रहाणार नाही.

ड) संस्थानने खरेदी करावयाच्या जमीनीच्या खरेदी खताच्या वेळेस निम्मी रक्कम चेक व मोजणी झालेनंतर निम्मी रक्कम चेकचे स्वरुपात श्रीसाईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित, निमगांव को-हाळे यांदा देण्यात यावी.

इ) श्रीसाईप्रसाद भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित, निमगांव को-हाळे यांनी खरेदीखत करण्यापूर्वी संस्थेचा ६० आर जमीन खरेदी देणेबाबतचा ठराव तसेच याबाबत सक्षम अधिका-यांची जमीन विकत देणेबाबत रितसर परवानगी हजर करणे आवश्यक राहील.

सदरहू निर्णयानुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

**ब)** संस्थानचे वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बांधकामाकरीता खरेदी करण्यात आलेला प्लॉट हा साईप्रसाद गृहनिर्माण संस्था. मर्या. यांचे प्लाटचे दक्षिण बाजूस असून संस्थानचे प्लॉटमध्ये जाणे येणेकरीता संस्थेच्या अंतर्गत रस्त्याच्या वापर करण्यात येतो. निवासस्थान इमारतीचे बांधकामाकरीता ठेकेदारामार्फत वापरण्यात आलेल्या मटेरीअलची वाहातूक ही सदर रस्त्याने केलेली आहे. सदर रस्त्यांपैकी पूर्व बाजुचे रस्त्याचे कडेने वर्ग-४ कर्मचारी निवासस्थानचे ड्रेनेज लाईनकरीता खोदकाम करुन आर.सी.सी.पाईपची ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेली आहे. आता उपरोक्त गट नं. १६९ मधील संस्थान मालकीच्या जमिनीत वर्ग-४ कर्मचा-यांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानाचे काम पूर्ण झालेले आहे. वर्ग-४ कर्मचारी निवासस्थानचे कामाकरीता ठेकेदारामार्फत मटेरीअल वहातुकीकरीता सदर रस्त्यांचा वापर झाल्याने रस्ते खराब झालेले असल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

दि. ३०/०५/२००८ चे पत्रान्वये श्री साईप्रसाद भाडेकरु मालकी सहकारी गृहनिर्माण संस्थान मर्या. निमगांव को-हाळे यांनी सदर हौसींग सोसायटीचे हद्दीतील अंतर्गत रस्ते पक्के करुन मागीतले असून रस्तेचे कडेला स्ट्रीट लाईट बसवून मिळणेकरीता तसेच संस्थेचे सभासदांना संस्थानमार्फत पिण्याचे पाणी विनामुल्य देण्याची विनंती केली आहे.

**क)** श्रीसाईप्रसाद गृहनिर्माण संस्थेमार्फत तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची रुंदी ६ मीटर असून सदर रस्त्याचे सोलींग व खडीकरणाचा एक थर करुन पूर्ण करण्यात आलेले आहे. वहातुकीमळे सदर रस्त्यावर बरेच प्रमाणात खड्डे पडलेले आहे. रस्त्याचे मजबुतीकरणाकरीता खडीकरण करुन डांबरीकरण करावे लागेल. प्रस्तावीत ०३ मीटर रुंदीचे रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणासाठी जिल्हा दरसुची २००७-२००८ चे अंदाजपत्रकानुसार ६,०८,२४२.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी श्रीसाईप्रसाद गृहनिर्माण संस्थेचे मागणीनुसार इकडील विभगामार्फत आर्किटेक्ट निकम पा. श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर प्लॅन व एस्टीमेट घेवून निविदा तयार करुन घेता येईल,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईप्रसाद गृहनिर्माण सोसायटीबरोबर संस्थानने केलेल्या करारनाम्यात सदर रस्त्यावर संस्थानचा हक्क असलेबाबत खात्री करावी. संस्थानचा हक्क असल्यास तसेच सदर रस्त्याचा वापर संस्थान वसाहतीमधील कर्मचाऱ्यांसाठी होणार असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

११ **नवी दिल्ली, माहितीकेंद्र लिफ्ट (उद्वाहन) बॅक अप सिस्टिम करणे बाबत**

**(अ)** श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांमध्ये उत्तर भारतातील साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या साईभक्तांना संस्थानच्या दैनंदिन पूजा-अर्चा आदि कार्यक्रमाविषयी, संस्थानमार्फत भक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविधी सेवा-सुविधा, देणगी इत्यादीबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याचे उद्देशाने मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर संस्थानचे माहिती सुविधा केंद्र सुरु करण्यात कार्यवाही सुरु आहे. त्या अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १४ ऑगष्ट, २००७ रोजीचे शासन निर्णयान्वये नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे इमारतीमध्ये संस्थानचे माहिती व सुविधा केंद्र सुरु करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. माहिती सुविधा केंद्राचे फर्निचर व अंतर्गत सजावटीचे काम तसेच सदरहू इमारतीस लिफ्ट बसविण्याचे काम ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे. यासाठी आजअखेर रक्कम रुपये २६,८४,३४६.३५ मात्र इतका खर्च करण्यात आलेला आहे.

**(ब)** मा.उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांनी त्यांचेकडील दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे की, महाराष्ट्र परिचय केंद्राचे इमारतीकरीता बसविण्यांत आलेली लिफ्ट माहे ऑगष्ट, २००७ पासून व्यवस्थितरित्या काम करीत आहे. सदरहू लिफ्टचा वारंटी कालावधी माहे, ऑगष्ट २००८ मध्ये संपूर्ण होत आहे. त्याआधी लिफ्टच्या देखभाल दुरुस्तीबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच सदरहू इमारतीस बसविण्यात आलेल्या लिफ्टला बॅकअप सुविधा नसल्याने, वीज पुरवठा खंडीत झालेनंतर त्यामध्ये नागरीक अडकून पडण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. गेल्या काही दिवसांत अशा घटना सातत्याने घडल्या आहेत. वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर लिफ्टमध्ये असलेल्या नागरीकांना बाहेर काढणेसाठी धावपळ करावी लागते, त्यामुळे एखाद्या वेळेस अप्रिय अशी घटना घडू शकते. तरी सदरहू लिफ्टला बॅकअप सुविधा उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केली आहे.

मा.उपसंचालक यांनी त्यांचे पत्रासोबत, अपेक्स एलिव्हेटर्स, नवि दिल्ली यांचे पत्र जोडलेले असून, सदरहू लिफ्टला ॲटोमॅटीक रेस्क्यू डिव्हाईस उपलब्ध करुन देणेसाठी अंदाजे खर्च रुपये १,५०,०००/- मात्र इतका येईल. तसेच सदरहू लिफ्टच्या दुरुस्ती देखभालीसाठी प्रती वर्षी देखभाल दुरुस्ती करारनामा करावा लागेल.

उपरोक्त परिच्छेदात विवेचन केल्यानुसार, नवी दिल्ली येथील माहिती सुविधा केंद्रासाठी बसविण्यात आलेल्या लिफ्टला वीज पुरवठा खंडीत झालेनंतर, लिफ्ट मध्ये अडकलेल्या नागरीकांसाठी ॲटोमॅटीक रेस्क्यू डिव्हाईस उपलब्ध करुन देणेस तसेच त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,नवी दिल्ली येथील माहिती सुविधा केंद्रासाठी बसविण्यात आलेल्या लिफ्टला वीज पुरवठा खंडीत झालेनंतर, लिफ्ट मध्ये अडकलेल्या नागरीकांसाठी ॲटोमॅटीक रेस्क्यू डिव्हाईस उपलब्ध करुन देणेस तसेच **त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू लिफ्ट मा.उपसंचालक,महाराष्ट्र परिचय केंद्र,नवी दिल्ली यांचेकडे हस्तांतरीत करण्यात यावे. त्याचा वेळोवेळी दुरुस्ती व देखभालीचा खर्च त्यांनी करावा. तसेच सदर केंद्र तातडीने सुरु होणेकामी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग नेमण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक आस्थापना)

**१२ गुरुपौर्णिमा उत्सवासाठी फुलांची सजावट करणे बाबत.**

श्री.के.सी.सुब्रामानी राजु बंगलोर यांनी कळविले की, या वर्षी गुरुपौर्णिमा उत्सव दिनांक १७ ते १९ जुलै २००८ या कालावधीत समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करुन बाबांची सेवा करण्याची परवानगी मिळावी ही विनंती केली आहे.

सजावटीचे काम १५ जुलै पासुन सुरु करणार आहे.त्यासाठी त्यांचे १०० कारागीर बंगलोर वरुन दिनांक १५ जुलै २००८ रोजी येणार आहे. त्यांची राहण्याची व जेवणाची सोय संस्थानने करावयाची आहे. फुलांची सजावट करणा-या कारागीरांना मंदिरात ये-जा करण्यासाठी प्रवेश पत्रक मिळावे .फुलांच्या सजावटीचे चित्रीकरण व फोटो काढण्यास परवानगी मिळावी .

गुरुपौर्णिमेला त्यांचे व्ही.आय.पी लोक येणार असल्यामुळे त्यांना १५ एसी रुम व १५ व्ही.आय.पी रुम मिळाव्यात त्यांचे पेमेंन्ट ते देणार आहेत. अशा प्रकारे फुलांची सजावट करुन बाबांची सेवा करण्याची संधी दयावी. पुढिल कामासाठी आपल्या उत्तराची वाट पाहत आहे.असे त्यांनी कळविलेले आहे.

प्रत्येक उत्सवात सजावटीचे काम संस्थानचे खर्चाने समाधी मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करण्यात येते यासाठी अंदाजे रु.१,५०,००० ते रु.२,००,००० खर्च येतो.

गुरुपौर्णिमा उत्सव २००७ साठी श्री साई अन्नपुर्ण ट्रस्ट,बंगलोर यांना व दसरा उत्सव २००७ साठी संत कृष्णदास सेवा समिती ट्रस्ट,मुंबई यांनी समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेसाठी परवानगी (मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने )देण्यात आलेली होती.

**तरी गुरुपौर्णिमा उत्सावासाठी फुलांची सजावट श्री के.सी सुब्रमनी राजु यांच्या कडुन (सजावट) देणगी दाखल करणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**१३ ३० एच.पी.इलेक्ट्रीक मोटार खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

कनकुरी साठवण तलाव येथे शुध्द केलेले सम्पमधील पाणी संस्थान परीसरात पाठविण्यासाठी ३० एच.पी.च्या ०२ मोटारी एका वेळेस व गर्दी कमी असल्यास ५० एच.पी. ची ०१ मोटार चालू करुन पाणी पुरविण्यात येते. ३० एच.पी.च्या ०२ मोटारी पैकी एक मोटार नादुरुस्त झाल्यास गर्दीच्या काळात पाणी कमी दाबाने मिळते. त्यामुळे ५०० रुमकडे पाणी मिळत नाही. ३० एच.पी. च्या मोटारला स्टॅन्डबाय मोटार म्हणून आणखी एक ३०एच.पी.ची मोटार खरेदी करावी लागेल. म्हणजे एक मोटार

खराब झाल्यास तेथे दुसरी मोटार बसवून पूर्ण दाबाने पाणी मिळेल त्याकरीता खालील तपशिलाप्रमाणे मोटार खरेदी करावी लागेल.

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | ओपनवेल सबमर्सिबल पंपसेट, हॉरीझेंटल, मॉडेल- LHS-४३ कंपनी- लुबी, साईज- १५०mm x १५०mm, HP- ३०, कॉस्टआयर्न बॉडी, ३ फेज-४१५ होल्ट, RPM-२८८० | ०१ | ५५,०००/- | ५५,०००/- |
| | | | एकुण | ५५,०००/- |
| | | | +४ टक्के व्हॅट | २,२००/- |
| | | | **एकूण रुपये** | **५७,२००/-** |

तरी वरीलप्रमाणे ३० एच.पी. इलेक्ट्रीक मोटार विहित पध्दतीने कोटेशन मागविणे व निम्नत्तर दराचे कोटेशन्स प्रमाणे इलेक्ट्रीक मोटार खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५७,२००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने यापूर्वी कोटेशन्स मागवून लुबी कंपनीच्या इलेक्ट्रीक मोटार्स खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्याच दराने वरीलप्रमाणे आवश्यक असणाऱ्या ३० एच.पी.इलेक्ट्रीक मोटार्स खरेदी करण्यात याव्यात. पुरवठादाराने पूर्वीच्या दराने न दिल्यास खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत, अशी याउपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**१४ हॅण्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदी करणे बाबत**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत संरक्षण विभागाकडे साई भक्तांचे सुरक्षिततेकरीता चेकींगसाठी हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर ६० नग संरक्षण विभागाकडे देणगी व खरेदी केलेली आहे.

संरक्षण विभागाकडे उपल्बध असलेले हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खालील प्रमाणे.

| अ.नं. | संगणक कोड नं. | तपशिल | कोणाकडुन | बिल नं. | देणगी | नग | किमंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | INS२९२६ | HHMD | रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स नाशिक | - | १७४५४/ ०४.१२.०२ | ०५ | १८०००/- |
| २ | INS२९२७ | HHMD | रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स नाशिक | ६७/ ०२.१२.०२ | - | ०५ | १८०००/- |
| ३ | INS२९३१ | HHMD | रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स नाशिक | ४६२/ ०८.११.०५ | - | ५० | १,५१,८७५/- |

वरील प्रमाणे सर्व हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर संरक्षण विभागाच्या डेडस्टॉक रजिस्टरला असुन त्या प्रत्यक्ष वापरात आहे परंतु नित्याचे वापराने सदरच्या वस्तु ब-याचदा खराब झालेल्या आहे.वेळोवेळी रिलायन्स इलेक्ट्रॉनिक्स नाशिक यांचे बरोबर संपर्क साधुन सदरच्या वस्तु रिपेअर करुन आणलेल्या आहेत. आज मितीसही वरीव पैकी ब-याचशे हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर (HHMD) खराब झालेल्या आहेत.

दिनांक ०७.०४.२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी साईनिवास अतिगृह येथे मिंटीग कक्षात श्री.रामनवमी उत्सव २००८ व होणाऱ्या संभाव्य गर्दीमुळे साईभक्तांना चेक करणेकामी नव्याने हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदी करावे,असे कळविले.

सध्या संरक्षण विभागाकडे असलेले ६० नग हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर नित्याचे वापराने खराब झालेले असुन नव्याने खरेदी कराव्याचे ६० नग हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर खरेदी करण्यासाठी अंदाजे २,१६,०००/- अक्षरी रुपये (दोन लाख सोळा हजार ) मात्र खर्च येईल.

श्रीरामनवमी उत्सव २००८ करीता तातडीने दि.११.०४.२००८ रोजी हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टरचे १० नग व दि.१२.०४.२००८ रोजी ३४ नग हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर असे एकुण ४४ नग हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर रिलायन्स इलेक्ट्रनिक नाशिक यांचे कडून मा.कार्यकारी अधिकारी यांचे आदेशावरुन तातडीने खरेदी करण्यात आलेले असून **एका हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टरसाठी ३,६००/-प्रमाणे ४४ हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टरसाठी १,५८,४००/-खर्च आला असून सदरची रक्कम मे.रिलायंन्स इलेक्ट्रनिक्स,डी १ /२,एम आय डी सी अंबड नाशिक यांचे बिल आदा करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण अधिकारी)

**१५ संरक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे डयुटी गणवेशाबाबत.**

संरक्षण विभाग जा.नं.एसएसएस/वशी०७ए/१६७७१/०६ दि.०५.१२.२००६ नुसार संरक्षण विभागात एकुण १११ कर्मचारी वर्ग ०४ पदावर भरण्यात आलेले आहे.सदरचे कर्मचारी संरक्षण विभागातच ठेकेदारामार्फत कंत्राटी पहारेकरी म्हणुन काम करीत होते.जेव्हा पासुन सदरचे कर्मचारी वर्ग ०४ कर्मचारी म्हणुन संरक्षण विभागात हजर झाले त्यांना संस्थान कडुन अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांना युनिफॉर्म दिलेला नाही.सदरच्या कर्मचाऱ्यांनी जुन्या ठेकेदाराने दिलेल्या युनिफॉर्मवरील ठेकेदाराचे नाव

असलेले शिक्के काढुन कर्तव्यावर तोच युनिफॉर्म वापरतात.कर्मचाऱ्यांकडे ठेकेदाराने दिलेला एकच युनिफॉर्म असुन नित्याच्या वापराने सदरचा युनिफॉर्म खराब झालेला आहे.

जुलै २००७ साली संरक्षण विभागात पूर्वेच्या सर्व कर्मचाऱ्यांना दोन खाकी रंगाचे युनिफॉर्म शिवुन दिलेले होते त्याही कर्मचाराने आतापर्यंत जुने बुट,ब्रेल्ट शोल्डर बॅच कॉपबॅच लाईनयार्ड आतापर्यत वापरत आहे.नित्याच्या वापराने सदरच्या वस्तु हया खराब झालेल्या आहे.

तरी संरक्षण विभागातील १६७ कर्मचाऱ्यांपैकी (१६० पुरुष + ७ स्त्री) यांना खालील प्रमाणे ड्रेस व ड्रेस मटेरियल घेणे अत्यंत गरजेचे आहे.

| | |
|---|---|
| खाकी फुलपॅन्ट व शर्ट प्रत्येकी दोन युनिफॉम = ४९८ मि.कापड उच्चप्रतीचे | पट्टे १६६ नग (१६२ काळयारंगाचे + ४ लालरंगाचे) |
| खाकी रंगाची साडी ८नग | पट्टे बॅच १६६ नग |
| खाकी रंगाचे ब्लाऊज पिस् ८नग | बुट १६७ नग १६३ काळया रंगाचे +४ लालरंगाचे |
| खाकी रंगाचे परकर ८नग | पायमोजे ३३४ नग जोडी |
| बेरिकॅप १५९ नग | लाठी १६७ नग |
| पी कॅप ४ नग | शिट्टी १६६ नग |
| कॅप बॅच १६६ नग | रेनकोट १६७ नग |
| शोल्डर बॅच ३३४ नग | स्वेटर १६७ नग |
| लाईनयार्ड १६६ नग | गमबुट १६७ नग |

तरी वरील प्रमाणे सर्व ड्रेसचे मटेरिअल कापड घेवुन शिलाईसह अंदाजे ९,७५,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचे फिजिकल फिटनेस घेऊन फेरप्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**१६ ध्वनिक्षेपण विभागासाठी एल.सी.डी. प्रोजेक्टर खरेदीबाबत.**

दर उत्सवात स्टेज कार्यक्रमांचे शुटींग मोठया पडदयावर दाखविणेसाठी तसेच मा.व्यवस्थापन समीतीच्या सभेत डेमो दाखविण्यासाठी तोशीबा व बेन्क्यु कंपनीचे दोन एल.सी.डी. प्रोजेक्टर वापरले जातात. दोन्ही प्रोजेक्टर २००५ मध्ये आलेले असून त्यापैकी तोशीबा प्रोजेक्टर खरेदि केलेला आहे. त्याची किंमत ९२,१७४/-रू आहे व बेन्क्यु कंपनीचा प्रोजेक्टर देणगी आलेला असून त्याची किंमत ७५,०००/- रू.आहे. दोन्ही प्रोजेक्टरच्या नेहेमीचे वापरामूळे या दोनही प्रोजेक्टरच्या दिव्यांची प्रकाश झोत टाकण्याची क्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे स्क्रीनवरील चित्र,माहीती स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे सदर प्रोजेक्टरचे लॅंप बदलविणे व सर्व्हीसींग करणे यासाठी पुणे येथील तोशीबा सर्व्हीस सेंटर यांचेकडे दि.०३/०६/२००८ रोजी दोनही प्रोजेक्टर पाठविले होते. तोशीबा सर्व्हीस सेंटरमध्ये दोन्ही प्रोजेक्टर चेक केल्यावर त्यांनी सांगीतले की दोन्ही प्रोजेक्टर सुमारे ०४ वर्षापुर्वीचे आहेत त्यातील लॅंप (दिवा) बदलावे लागतील तसेच एस.एम.डी.बोर्ड, कीट व लेन्सही काही प्रमाणात खराब झालेले आहेत तसेच प्रोजेक्टर मार्फत मिळणारे ब्राइटनेस व कलरही कमी झालेले आहेत. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे खर्च सांगीतला आहे.

१. तोशीबा कंपनीच्या प्रोजेक्टरचा लॅंप बदलने व सर्व्हीसींग यासाठी खर्च सुमारे २७,०००/- रूपये.

२. बेन्क्यु कंपनीच्या प्रोजेक्टरचा लॅंप बदलने व सर्व्हीसींग यासाठी खर्च सुमारे २४,५००/- रूपये येईल तसेच त्यांनी सांगीतले की दिवे बदलवून प्रोजेक्टर किती दिवस चालतील याची गॅरंटी देता येत नाही कारण दिवे बदलले तरी इतर महत्वाचे पार्ट पैकी लेन्स,एस.एम.डी.बोर्ड,कीट इ. बदलनेस वेळोवेळी खर्च येवू शकतो.

हल्ली नव्या प्रोजेक्टरच्या किंमती कमी झालेल्या आहेत, याशिवाय पुर्वी १२०० ल्युमीनर्सचे प्रोजेक्टर मिळत असत हल्ली २००० व त्यापेक्षा जास्त ल्युमीनर्सचे प्रोजेक्टर मिळतात. त्यामुळे प्रकाशाचा झोत पुर्वीच्या प्रोजेक्टरपेक्षा जास्त प्रमाणात पडतो, त्यामुळे मिळणा-या चित्राची क्वॅालीटी पुर्वीच्या प्रोजेक्टर पेक्षाही चांगली मिळते. तसेच ४ ते ६ वर्षे विना तक्रार सर्व्हीस देवू शकतो.हे विचारात घेता जुने प्रोजेक्टर दुरूस्त करण्यापेक्षा नविन एक प्रोजेक्टर खरेदि करणे योग्य होईल.

हल्ली मार्केटमध्ये इतर कंपन्यांबरोबर सोनी कंपनीचेही प्रोजेक्टर मिळतात त्यातील मॉ.नं. VPL EX ५ हा प्रोजेक्टर घेणेस याकामी येणारे अंदाजे रुपये ५५,०००/-खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ध्वनीक्षेपन विभागासाठी आवश्यक असणारा सोनी कंपनीची मॉ.नं. VPL EX ५ हा प्रोजेक्टर साईभक्तांकडून देणगी म्हणून मिळाल्यास स्विकारणेत यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**१७ पाण्याचे पाऊच खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत.**

श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणाऱ्या भक्तांना दर्शन लाईनमध्ये पिण्याचे पाणी पुरविण्याची सोय करण्यात आलेली आहे. दि.१६.०३.२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळ समितीच्या सभेतील निर्णय क्र.२६६ नुसार दर्शन लाईनमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवावी, त्यासाठी आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याचे पाऊच खरेदी करावे, असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार माहे मे-२००८ या महिन्यात साईभक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे आवश्यकतेनुसार दि.१६.०५.२००८ ते दि.३०.०५.२००८ या कालावधीत एकुण ६७,५०० पाऊच खरेदी करण्यात आलेले आहे. त्यासाठी **प्रति पाऊच पिशवीस ७० पैसे प्रमाणे एकुण रु.४७,२५०/- खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-चौकशी व निवासस्थान प्रमुख)

**१८ सन २००८-२००९ करीता खरेदी करण्यात आलेल्या गहू,हरभरा व खिसमिस खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.४४(अ) नुसार सन २००८-०९ करीता गहू (९००० क्विंटल), हरबरा (६०० क्विंटल), मेथी (१.५० क्विंटल) व सफेद तिळ (२ क्विंटल) इत्यादीची खरेदी ही कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरुन जाहिर लिलावाने करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार कोपरगाव व राहाता इत्यादी कृषि उत्पन्न समितीचे मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीत गहू ८९४४.१० क्विंटल व हरबरा ७५७.११ क्विंटल खरेदी करणेत आलेला असून मुळ मंजूरीपेक्षा १५७.११ क्विंटल हरबरा जादा खरेदी करणेत आलेला आहे.

तसेच प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारा १८५ क्विटल खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली व पंढरपूर येथील मोंढयावरुन जाहिर लिलावाने तसेच मे.प्रवरा फळे भाजीपाला व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडून खरेदी करणेस व अहमदनगर येथील शितगृहात ठेवणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार दि.०३.०४.२००८ रोजी मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग, श्रीसुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थितीत अधिक्षक खरेदी विभाग यांनी तासगांव येथील मा.अॅड.आर.आर. पाटील शेतकरी सह. खरेदी विक्री संघ लि., येथील खिसमिसच्या मोंढयास भेट देऊन, नमुने पाहून लिलाव पद्धतीने ८३ क्विंटल ६६ किग्रॅ ९५० ग्रॅम व दि.२२.०५.२००८ रोजी १२६ क्विंटल ७६ किग्रॅ.९०० ग्रॅम खिसमिस केलेला असल्याने एकुण २१० क्विंटल ४३ किग्रॅ ८५० ग्रॅम खिसमिसची खरेदी झालेली आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीचे मोंढयावर चांगल्या दर्जाचा व कमी दरात खिसमिस मिळाल्याने मूळ मंजूरीपेक्षा २५ क्विंटल ४३ किलो ८५० ग्रॅम जादा खिसमिस खरेदी झालेला आहे.

तरी जादा खरेदी करणेत आलेल्या हरबरा व खिसमिसचे खरेदीस व त्याकामी **आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(अधिक्षक,खरेदी विभाग)

**१९ श्री साईभक्तांचे गर्दीचे काळात खरेदी करण्यात आलेल्या खणाच्या पत्रावळीस व समाधी मंदिरासाठीआवश्यक असणारे निको कंपनीचे पाईप, कॅमेरा व इतर साहित्याचे खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत**

अ) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील क्र.४४ नुसार सन २००८-०९ करीता आवश्यक असणारा किराणा माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. प्राप्त निविदामध्ये सत्यनारायण पुजेसाठी व उत्सवामधील प्रसादभोजनासाठी वापरणेत येणारी कच्ची बदाम (प्लेन) पत्रावळीसाठी दर न आल्याने सन २००८-०९ मध्ये पत्रावळीसाठी कोटेशन मागणी करुन आवश्यकतेनुसार पत्रावळ खरेदी करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०३.२००८ मधील क्र.२८७(२) नुसार मान्यता मिळालेली आहे.

संस्थानमार्फत मागील वर्षापासून जोडून येणाऱ्या सुटया व उत्सव आदी कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी भक्तनिवासस्थान, साईनगर परिसर व साईप्रसाद नं.२ च्या बाजुला मंडप उभारणेत येत असून सदरील मंडपात साईभक्तांना स्वयंसेवी भोजन व्यवस्था करणेत येत आहे. त्यासाठी खणाच्या पत्रावळीचा वापर केला जात असल्याने प्रसादभोजनासाठी होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण केले जात आहे.

प्रसादालय विभागाने सार्वजनिक सुटया जोडून येणार असल्याने दि.०८.०३.२००८ चे प्रस्तावाने २५,००० नग व दि.०८.०४.२००८ चे प्रस्तावाने श्री रामनवमी उत्सवासाठी ४०,००० नग खणाच्या पत्रावळीची मागणी केलेली होती. श्री साईभक्तांची अचानक गर्दी वाढल्याने पत्रावळीचे

उत्पादक मे.धरम एंटरप्राईजेस, नाशिक यांचेकडून तातडीने अनुकमे २५,००० नग व ४०,००० नग खणाची पत्रावळी खरेदी करणेत आलेली आहे. माहे मे व जून मध्येही सुटयामुळे गर्दी वाढल्याने २,१०,०००नग अशा एकुण २,७५,००० नग खणाच्या पत्रावळया रु.०.८० पैसे प्रती नग दराने खरेदी करणेत आलेल्या आहेत. तसेच सत्यनारायण पुजेसाठी ५०,००० प्लेन पत्रावळी रु.०.२५ पैसे प्रती नग दराने खरेदी करणेत आलेली आहे. खरेदीकामी एकुण रु.२,३२,५००/- इतका खर्च आलेला आहे. तरी सदरील खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती. तसेच यापुढील उत्सवाचे व गर्दीचे कालावधीत अंदाजे एकुण ५ लाख नग खणाच्या पत्रावळी आवश्यकतेनुसार कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता असावी.

ब) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०१.२००८ मधील निर्णय क्र.१५६ नुसार समाधी मंदिरामध्ये श्री साईबाबांचे मुर्तीसमोर बसविणेसाठी आवश्यक असणारा क्लोज सर्कीट कॅमेरा व किबोर्ड खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७६,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मागविणेत आलेल्या दरपत्रकांतील न्युनतम दराने मे.थर्ड आय सिक्युरीटी सिस्टीम्स, मुंबई यांना जा.नं.७७५१ दि.२८.०५.२००८ अन्वये रक्कम रु.८५,५००/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यामुळे मुळ मंजूरीपेक्षा ९,५००/-जादा खर्च आलेला आहे. तरी सदरील खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

क) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२२.०९.२००७ मधील निर्णय क्र.७५५ नुसार समाधी मंदिरातील बाथरुमचे पाईप खराब झालेले असल्याने त्याठिकाणी नविन पाईपलाईन करणेकरीता आवश्यक असणारे निको कंपनीचे पाईप व इतर साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,२२,७४५/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मागविणेत आलेल्या दरपत्रकांतील न्युनतम दराने निको पाईपाच्या कंपनीचे वितरक मे.सोहोम ट्रेडींग कार्पोरेशन, नाशिक यांना जा.नं.७७४९ दि.२८.०५.२००८ अन्वये रक्कम रु.१,८९,२४६/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यामुळे मुळ मंजूरीपेक्षा ६६,५०१/-जादा खर्च आलेला आहे. तरी सदरील खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

ड) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ मधील निर्णय क्र.६०४ नुसार कनिष्ठ महाविदयालयासाठी आवश्यक असणारे बेंचेस व संगणक खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. तसेच संबंधितांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००७चे सभेत चर्चेसाठी आमंत्रित करणेत येऊन न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

त्यापैकी मे.गुणे इंजिनीअरींग कपनी, पुणे यांना ०१ नग संगणक (सर्व्हर) रक्कम रु.४७,१३८/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला होता.मात्र त्यांनी पुरवठा करणेस नकार दिल्याने त्यांची सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेत येत आहे. तसेच द्वितीय पुरवठाधारक मे.सोहोम ट्रेडींग कार्पोरेशन, नाशिक यांना जा.नं.७५६७ दि.२३.०५.२००८ अन्वये रक्कम रु.५९,३५०/- चा पुरवठा आदेश देणेत आलेला असून पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यामुळे मुळ मंजूरीपेक्षा रु.१२,२१२/-जादा खर्च आलेला आहे. तरी सदरील खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्तप्रमाणे उत्सवासाठी खरेदी करणेत आलेल्या खणाच्या पत्रावळीस, समाधी मंदिरासाठी खरेदी करणेत आलेल्या साहित्यास व कनिष्ठ महाविदयातील संगणकाचे खरेदीस व त्याकामी **आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता तसेच ५ लाख नग खणाची पत्रावळी आवश्यकतेनुसार कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक खरेदी)

२० **श्रीसाईसच्चरित्र सुपर डिलक्स आवृत्तीमधील रेखाचित्रांचे मानधन आदा करणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.१०.२००७ चे सभेतील विषय नं. ३१ निर्णय क्र. ८१४ अन्वये श्रीसाईसच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स आवृत्ती साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार श्री साईसच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स मध्ये २००० प्रती नग रु.२५५/- प्रमाणे मे. ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ ९६३/ २००८ दि.१५.०१.२००८ अन्वये छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

श्रीसाईसच्चरित मराठी सुपर डिलक्स स्वरुपात उत्कृष्ट दर्जाची पोथी छपाई करावयाची असल्याने सदर चरित्रातील अध्यायातील प्रसंगानुसार ५२ रेखाचित्राचे काम श्री. विलासराव महाडिक, मुंबई यांचेवर जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१९११७/२००७ दि.०१.१२.२००७ अन्वये सोपविण्यात होते. श्री विलासराव महाडीक हे मुंबई येथील छायाचित्रकार असून, त्यांनी संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित मराठी गो.र. दाभोळकर उर्फ हेमाडपंत लिखीत पोथीमध्ये सन. २००२ पासून मानधन न घेता पोथीतील प्रसंगानुरुप ५२ रेखाचित्रांचे काम करुन सदरची रेखाचित्रे प्रकाशित करण्यात आलेली आहे.

संस्थान प्रकाशित नव्याने श्री साईसच्चरित मराठी सुपर डिलक्स स्वरुपात उत्कृष्ट दर्जाची पोथी साईभक्तांना उपलब्ध करुन देण्याचे नियोजन असल्याने पोथीत रेखाचित्रे टाकणेकामी श्री विलासराव महाडीक यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१९११७/२००७ दि.०१.१२.२००७ अन्वये कळविलेनुसार त्यांनी ५२ रेखाचित्रे चार रंगात तयार करुन संस्थानला दिलेली आहे. याबाबत त्यांनी त्यांचे दि.१६.०६.२००८ चे पत्रान्वये ५२ रेखाचित्रांचे स्कॅनिंग व प्रेस आऊट व त्याचे वेगवेगळे भाग पोथीतील प्रत्येक अध्ययातील त्या त्या ओव्यांच्या संदर्भानुसार प्रसंगानुरुप छपाई केली आहे, तसेच पोथीसाठी सुयोग्य असे चार रंगाची पार्श्वभूमी व चित्रांना त्यानुसार इफेक्ट दिला असून, प्रत्येक पृष्ठासाठी रु.११००/- इतका खर्च येत आहे. ५२ अध्ययासाठी ५२ रेखाचित्रे असून, याकामीचे एकूण मानधन रु.५७,२००/- (अक्षरी रुपये सत्तावन्न हजार दोनशे) मात्र मिळणेबाबत विनंती पत्र दिले आहे.

तरी श्री साईसच्चरित मराठी सुपर डिलक्स स्वरुपात उत्कृष्ट दर्जाची पोथी छपाईसाठी ५२ रेखाचित्रे रु.११००/- प्रमाणे एकूण मानधन रु.५७,२००/- मात्र श्री.विलास महाडिक, मुंबई यांना अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.विलास महाडीक,मुंबई यांना समक्ष बोलविण्यात येऊन मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेबरोबर चर्चा करुन रेखाचित्रांचे मानधनाबाबत अंतिम निर्णय घ्यावा. तसेच त्यांनी चित्राखाली स्वतःचे नाव टाकले आहे ते काढणेबाबत त्यांना सांगण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

२१ **साठा संपत आलेल्या संस्थान प्रकाशित ऑडिओ सीडी निर्मिती खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित सी.डी./व्हीसीडी उत्पादनासाठी सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रायव्हेट लि. कंपनी, मुंबई यांच्या सी.डी./व्हीसीडी निर्मितीच्या शर्ती/अटी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णय क्र.७१ नुसार मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून वेळोवेळी कायम स्वरुपी संस्थान प्रकाशित सी.डी./व्हीसीडी चे निर्मितीचे कामे करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे.

सध्या स्थितीत खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे ऑडीओ सी.डी. चा साठा १ ते २ महिने पुरेल एवढाच असल्याने त्याची पुनरनिर्मिती करुन घेणे गरजेचे असल्याने, तत्संबंधीत निर्मितीसाठी संबंधीत सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रायव्हेट लि. कंपनी, मुंबई यांनी दि.२१.०६.२००८ रोजी फॅक्सद्वारा पाठविलेले कोटेशन पत्र प्राप्त झाले असून, कोटेशनमधील दर खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| अ.नं. | तपशिल | भाषा | संख्या | मुळ दर | एम व्हॅट | एकूण दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुपाठाचे अभंग ऑडीओ सी.डी. | मराठी | ५,००० नग | २९.५० | १.१८ | ३०.६८ | १,५३,४००/- |
| ०२ | साईबाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी सी.डी.रोम | इंग्रजी | ५,००० नग | २१.०० | ०.८४ | २१.८४ | १,०९,२००/- |
| ०३ | श्री साईसतचरित्र ऑडीओ सीडी (एमपी ३) दोन सी.डी चा एक संच | तेलगू | ५०,००० संच | ५०.०० | २.०० | ५२.०० | २६,००,०००/- |
| | | | | | | एकूण रु. | २८,६२,६००/- |

वर दर्शविलेप्रमाणे **सी.डी. निर्मितीसाठी एकूण रक्कम रु.२८,६२,६००/- मात्र इतका खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

२२ **संस्थान वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागे (Space)बाबत.**

**(अ)** श्री साईभक्तांना संस्थान विषयी माहिती-सेवा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानने स्वतःची अधिकृत वेबसाईट (website) url www.shrisaibabasansthan.org या नावाने दिनांक २१ नोव्हेंबर, १९९८ पासून सुरु केलेली आहे. या वेबसाईटसाठी आवश्यक असणाऱ्या वेबसर्व्हर होस्टींगचे काम Institute of Advanced Studies, Nagpur ही संस्था पाहत असून, संकेतस्थळ सुरळीत सुरु ठेवणेसाठी दिनांक १५ डिसेंबर २००७ ते १४ मार्च २००८ तीन महिन्यांचे कालावधीसाठी People Connect Managed Servers या कंपनीकडे असलेल्या स्वतंत्र वेबसर्व्हरवर संस्थानच्या संकेतस्थळासाठी जागा (Space) भाडेतत्वावर खरेदी करण्यात आलेली आहे. सदर मुदत दिनांक १४ मार्च, २००८ अखेर संपुष्टात आली असल्याने, संस्थानची सध्याची वेबसाईट सुरळीत चालू ठेवणे आवश्यक असल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे सभेचे दिनांक १६ मार्च, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २५१ नुसार Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून वेबसर्व्हरवर जागा एक वर्षाचे कालावधीसाठी भाडेतत्वावर घेणेस व त्यासाठी येणारे रुपये ९६,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून वेबसर्व्हरवर एक वर्षाचे कालावधीसाठी जागा भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीचे दिनांक ०१ एप्रिल, २००८ ते ३० सप्टेंबर, २००८ या सहा महिन्याचे कालावधीचे प्रथम टप्प्याचे एकत्रित बिल रक्कम रुपये ४८,०००/- (अक्षरी रुपये

अठ्ठेचाळीस हजार) मात्रचे बिल Institute of Advanced Studies, Nagpur यांनी बिल क्रमांक १७६ दिनांक ०१ एप्रिल, २००८ नुसार त्यांना अदा करण्यात आलेले आहे.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५२ नुसार संस्थानचे अधिकृत वेबसाईटसाठी श्री अे. आर. नाडकर्णी, मुंबई यांची तज्ञ सल्लागार म्हणून नेमणूक केलेली होती. त्यांनी वेबसाईट डेव्हलप करणे, डिझायनिंग करणे, वेळोवेळी होणाऱ्या तंत्रज्ञानातील बदलांबाबत मार्गदर्शन करणे, आदि. कामांत योग्य सल्ला दिलेला आहे.

श्री.अे.आर. नाडकर्णी, विश्वरुप होल्डींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंटस्, मुंबई यांनी त्यांचे उपरोक्त ई - मेलव्दारे संस्थानचे वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर आवश्यक असलेली जागा [Space] (वेबहोस्टींग) मोफत देण्यास तयार असलेबाबत कळविले आहे. श्री नाडकर्णी यांनी श्री सिध्दीविनायक देवस्थान, मुंबई याचे वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर आवश्यक असलेली जागा [Space]) मोफत दिलेली आहे.

श्री.अे आर.नाडकर्णी यांचेकडून संस्थानचे वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर आवश्यक असलेली जागा (Space) मोफत घेतल्यास संस्थानचा प्रती महिना रुपये ८,०००/- इतका फायदा होणार आहे. म्हणजेच वर्षाला रुपये ९६,०००/- पर्यंतचा फायदा होणार आहे. Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून वेबसर्व्हरवर आवश्यक जागा एक वर्षाचे कालावधीसाठी घेण्यात आलेली आहे. परंतु, त्यांचे ०१ एप्रिल, २००८ ते ३० सप्टेंबर, २००८ या सहा महिन्याचे कालावधीचे अदा करण्यात आलेले असल्याने, ०१ ऑक्टोबर, २००८ पासून वेबसर्व्हरवरील जागा ही आपणास श्री. अे. आर. नाडकर्णी यांचेकडून मोफत घेता येईल. यासाठी संस्थानला कोणताही खर्च करावा लागणार नाही. त्यामुळे श्री. अे. आर. नाडकर्णी, विश्वरुप होल्डींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंटस्, मुंबई यांचेकडून दिनांक ०१ ऑक्टोबर, २००८ पासून संस्थान वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर आवश्यक असलेली जागा (Space) घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे दिनांक ०१ ऑक्टोबर, २००८ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या पुढील दुसऱ्या टप्याचे बिल अदा न करता, **श्री.अे.आर. नाडकर्णी, विश्वरुप होल्डींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंटस्, मुंबई यांचेकडून वेबसाईटसाठी वेबसर्व्हरवर आवश्यक असलेली जागा (Space) घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

२३ **संस्थानचे संपर्क व्यवस्थेसाठी बीएसएनएल ग्रुपमोबाईल सेवेऐवजी एअरटेल कंपनीच्या ग्रुपमोबाईल सेवेचा वापर करणे बाबत**

**(अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापनातील अधिकारी/कर्मचारी यांच्यातील अंतर्गत दळणवळण तत्पर राहण्याच्या उद्देश्याने बीएसएनएलची ग्रुप मोबाईल सेवा उपरोक्त संदर्भ क्र. ०१ व ०२ नुसार माहे जून, २००४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. सध्या या सेवेत एकूण ४० ग्रुपमोबाईल सुरु असून, मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचेसाठी रुपये ५२५/- चा प्लॅन व इतर मोबाईलसाठी रुपये २२५/- मासिक भाडे + रुपये ७५/- ग्रुप मोबाईल सेवा आकार असा एकूण रुपये ३००/- चा प्लॅन घेण्यांत आला आहे. सदर ग्रुपमोबाईल सेवा सुरु करणेसाठी बीएसएनएल, शिर्डी यांचेकडे आवश्यक ॲक्टीव्हेशन चार्जेस वेळोवेळी अदा करण्यात आलेले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी यांचे वापरात असलेल्या दोन्ही मोबाईल्सचे मासिक संपूर्ण बिल संस्थानमार्फत अदा करण्यात येत असून, उर्वरित अधिकारी / कर्मचारी यांचे मोबाईल वापराचे येणारे मासिक बिलांपैकी रुपये ४५०/- मात्र संस्थानमार्फत अदा करण्यात येऊन, बिलाची उर्वरित रक्कम ही संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचे मासिक वेतनातून वसूल करण्यात येत आहे. तसेच सुरक्षा पर्यवेक्षक, मुंबई कार्यालयातील ड्रायव्हर यांचे मासिक बिलांपैकी रुपये ३३७/-+ रोमींग चार्जेस (मुंबई कार्यालय ड्रायव्हर) मात्र संस्थानमार्फत अदा करुन उर्वरित रक्कम त्यांचे मासिक वेतनातून वसूल करण्यात येत आहे.

**(ब)** तथापि, गर्दीचे काळात बीएसएनएल मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने, संपर्कासाठी व्यत्यय येतो. यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होतात व वरिष्ठांमध्ये विनाकारण गैरसमज निर्माण होतात.

संस्थानचे अधिकारी / कर्मचारी व सुरक्षा व्यवस्था यांचेतील सुलभ व तात्काळ संपर्कासाठी Airtel व Idea कंपनीकडे ग्रुपमोबाईल सेवेबाबत चौकशी केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे प्लॅन संस्थानला सादर केलले आहे. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| Particulars | IDEA | AIRTEL | BSNL | BSNL REVISED PLAN |
|---|---|---|---|---|
| Monthly Rental | 199/- | 199/- | 225/- | 199/- |
| Clips/CUG Charges | Free | Free | 75 | Free |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Mobile to Mobile Call | 0.40 | 0.40 | 0.60 | 0.40 |
| Mobile to Landline | 0.80 | 0.80 | 1.25 | 0.80 |
| Local Free Call | 200 Min. | 200 Min. | 60 Min. | 133 Min. / Rs.80/- |
| Free Local SMS | 199 SMS | 199 SMS | 100 SMS | 200 SMS |
| STD Calls | 1.25 | 1.25 | 2.40 | 1.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे, Airtel व Idea कंपनीचे प्लॅन संस्थान ग्रुममोबाईल सेवेसाठी निश्चितचपणे चांगली सेवा मिळेल. शिवाय गर्दीचे काळात बीएसएनएल मोबाईल नेटवर्क मिळत नसल्याने, संपर्कासाठी व्यत्यय येतो. यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होतात. Airtel व Idea कंपनीचे नेटवर्कला व्यत्यय येत नसल्याने, संस्थानची दळणवळण व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होईल. Airtel व Idea कंपनीचे नेटवर्कचा अभ्यास करता, Airtel कंपनीचे नेटवर्क Idea कंपनीचे नेटवर्कपेक्षा अधिक कार्यक्षम आहे. शिवाय ब्लॅक बेरी सारख्या जादा सुविधा Airtel कंपनीचे कार्डला उपलब्ध असल्याने, बीएसएनएल ऐवजी Airtel कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा संस्थानचे अधिकारी / कर्मचारी यांचे वापरासाठी घेणे सोईस्कर आहे.

**(क)** बीएसएनएल यांचेकडून संस्थानने घेतलेल्या ग्रुपमोबाईलची क्षमता सध्या ४० असून, आतापर्यंत एकूण ४० ग्रुपमोबाईल वापरात आहेत. संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता ग्रुमपोबाईलची क्षमता १० ने वाढवून ४० ऐवजी ५० करण्यात यावी.

वरील तपशीलाप्रमाणे विचार करता BSNL च्या ग्रुपमोबाईल सेवेऐवजी Airtel कंपनीची ग्रुपमोबाईल सेवा सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या चालू असलेल्या BSNL ची मोबाईल सेवा चांगली असल्याने तीच चालु ठेवण्यात यावी. फ्री कॉल रुपये ८०/-ऐवजी इतरांप्रमाणे प्रति महिना १९९ मिनिटाचे आऊटगोईंग कॉल करणेबाबत BSNL यांना मा.विश्‍वस्त श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांचेमार्फत विनंती करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

२४ **सत्यनारायण पुजा, अभिषेक पुजा व अतिथींच्या प्रसादाकरीता कागदी बॅग देणगीदाखल घेणेबाबत.**

श्रीसत्यनारायण व अभिषेक पुजा करणाऱ्यांना तसेच श्रींचे दर्शनाकरीता येणारे मान्यवर अतिथींना प्रसाद ठेवण्याकरीता प्लॉस्टिक पिशवी देण्यात येतात. प्लॉस्टिकच्या वापरामूळे त्याची विल्हेवाट लावणे संबधी बऱ्याचा अडचणी येतात म्हणून प्लॅस्टिकचा वापर कमी व्हावा यारीता सिध्दीविनायक मंदिर, प्रभादेवी मुंबई यांचेप्रमाणे कागदीबॅग साईभक्तांना देण्यात याव्यात असे वाटते. संस्थानला साधारण एक महिन्यास अंदाजे ८ ते १० हजार बॅग लागतात.

याबाबत मुंबई येथील श्यामराव विठ्ठल को ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड यांचे प्रतिनिधी श्री वसंत नलावडे, मुंबई हे कागदी पिशव्यांचा नमुना घेऊन चर्चेकरीता आले असता त्यांनी **४५००० कागदी बॅग (बँकेचा लोगो असलेले ) देणगी म्हणून देण्यास तयार आहेत व त्यानंतर आवश्यकतेनुसार कागदी बॅग वर्षभर मोफत पुरविण्यास तयार असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

२५ **कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.मुंबई यांचेकडून फिंगर प्रिंट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशिन्स खरेदी व इन्स्टॉलेशन करणेस मान्यता मिळणे बाबत.**

संस्थानच्या कायम कर्मचा-यांचे कामावर आगमन - निर्गमनाचे नियंत्रण पुर्वी कार्ड पंचींग सिस्टीम पध्दीतीने करण्यात येत होते. कर्मचा-यांच्या आगमन - निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी त्यावेळी प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), चौकशी व निवासस्थान कार्यालय, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा कन्याशाळा व श्री साईनाथ रुग्णालय अशा ०५ ठिकाणी इलेक्ट्रॉनीक कार्ड पंचींग मशीन्स् बसविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे कर्मचा-यांनी कार्ड पंच करतांना त्यावेळेची नोंद संगणकामध्ये केली जात होती. तथापी, ब-याच वेळा कर्मचा-यांचे आगमन - निर्गमन वेळेची नोंद तंतोतंत व अचूक होत नसल्याचे दिसून आल्याने संगणकीय फिंगर प्रिन्ट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् इन्स्टॉल करण्यात यावी. व त्याकरीता फिंगर प्रिन्ट मशीन्स् (बायोमेट्रीक) खरेदी करणेकामी नामांकीत कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यात यावे असा मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६-०८-२००५ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.४६९ पारीत करणेत आलेला होता. त्याप्रमाणे माहे ऑक्टोबर २००५ मध्ये विविध वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यास अनुसरुन फिंगर प्रिन्ट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणे संदर्भात नामांकीत कंपन्यांकडून एकूण २८ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्या निविदा मा. व्यवस्थान समितीचे दि.१८-१२-२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत येवून, दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो निर्णयासाठी मा.व्यवस्थान समितीचे दि.०४-०२-२००६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. संबंधीत कंपनीचे प्रतिनीधींना दरांसंदर्भात वाटाघाटी/चर्चा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलाविण्यात येवून, त्यांना सुधारीत दर देणेबाबत सांगण्यात आले. तसेच प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी येथे जावून तेथील फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम बाबत माहिती घेवून दि.०४-०२-२००६ रोजी उपस्थित राहीलेल्या २२ निविदा सादर कर्त्यांना बायोमेट्रीक डिव्हाईस सह डेमोन्स्ट्रेशनसाठी दि.०९-०३-२००६ रोजी उपस्थित राहणे बाबत कळविणेत आले होते. त्यापैकी १३ निविदा सादरकर्ते बायोमेट्रीक डिव्हाईस सह डेमोन्स्ट्रेशनसाठी उपस्थित राहीले होते.

उपस्थित १३ निविदा सादर कर्ते यांनी सादरीकरण केलेले डेमोन्स्ट्रेशन व बायोमेट्रीक डिव्हाईस संदर्भात दिलेल्या तपशिलाची संस्थानने निश्चित केलेल्या बायोमेट्रीक डिव्हाईसचे स्पेसीफिकेशन्स् , क्षमता, स्वॉफ्टवेअर इ.बाबींशी पडताळणी करता ०१) एम-टेक इनोव्हेशन प्रा.लि.,पुणे ०२) अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई, ०३) निर्मळ टेक्नॉलॉजीस, पुणे ०४) डॅनलॉ टेक्नॉलॉजीस इंडिया लि.,ठाणे मुंबई व ०५) गॅमा-सॉप्ट इन्फरमॅटीक्स् प्रा.लि.,मुंबई हे पाच निविदा सादर कर्ते फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम्स् (बायोमेट्रीक डिव्हाईस) मशीन्स् पुरविणेस पात्र ठरले होते. पात्र ठरलेल्या पाच निविदा सादर कर्त्यांना सुधारीत कमर्शियल दर पत्रक दि.२९-०३-२००६ अखेर सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार पाच पात्र निविदा सादर कर्त्यांनी देवू केलेल्या सुधारीत दराच्या निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेत समक्ष उघडण्यात येवून, उपस्थित निविदा सादर कर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलाविणेत आले असता त्यांनी एकूण ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स् सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणे कामी खालीलप्रमाणे अंतिम दर देवू केले होते.

| अ.नं. | निविदा सादर कर्त्यांचे नांव | निविदेतील दर (रुपये) | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | गॅमा -सॉप्ट इन्फरमॅटीक्स् प्रा.लि.,मुंबई | ११,२०,००० = ०० | **११,००,००० = ००** |
| ०२ | डॅनलॉ टेक्नॉलॉजीस इंडिया लि.,ठाणे मुंबई | ११,२६,०१५ = ०० | **१०,७५,००० = ००** |
| ०३ | निर्मळ टेक्नॉलॉजीस, पुणे | ०५,३७,७७५ = ०० | **०५,३७,७७५ = ००** |
| ०४ | अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई, | ११,०९,९२० = ०० | **०९,५१,००० = ००** |
| ०५ | एम-टेक इनोव्हेशन प्रा.लि.,पुणे | ०५,६२,७१९ = ०० | **०५,१२,७१९ = ००** |

उपरोक्तप्रमाणे संबंधीतांशी चर्चा होवून, अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचे फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् ही अद्ययावत असून त्यामध्ये फ्लॉपी लोड करण्याची सुविधा व इतर अनेक सुविधा असल्याने तसेच बायोमेट्रीक डिव्हाईस क्षमता, सॉफ्टवेअर इ.बाबी विचारात घेता, त्यांचे दर थोडयाप्रमाणात जास्त असले तरी ते स्विकारण्यात येवून त्यांना संस्थानसाठी आवश्यक व मागणी केल्याप्रमाणे ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् , संगणक, केबलींग, इन्स्टॉलेशन,चार्जेस इ.संपूर्ण खर्चासह पुरविणेकामी रुपये ९,५१,०००/- मात्रचा पुरवठा आदेश देण्यात यावा असा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०४/२००६ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.२२३ संमत झाला आहे.

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये संमत झालेल्या निर्णयास अनुसरुन अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना संस्थान कर्मचा-यांचे आगमन - निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणे कामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ५८५४/२००६ दि.०२-०५-२००६ अन्वये पुरवठा आदेश देणेत आला. त्याप्रमाणे अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी माहे जुन २००६ मध्ये संस्थान कर्मचा-यांचे आगमन - निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् ०१) प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), ०२) चौकशी व निवासस्थान कार्यालय, ०३) श्री साईबाबा हॉस्पीटल, ०४) श्री साईनाथ हॉस्पीटल, ०५) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, ०६) आय.टी.आय., ०७) मुंबई कार्यालय या ठिकाणी इन्स्टॉल करुन दिलेली आहेत. व त्याप्रमाणे कर्मचा-यांच्या आगमन - निर्गमन वेळेची नोंद सदर मशीन्स्द्वारे केली जात आहे.

तथापी, प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत) या लोकेशनवर इन्स्टॉल केलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्वर एकुण १८ विभागातील कर्मचा-यांची आगमन - निर्गमनाचे वेळी फिंगर प्रिंन्ट पंचिंग करताना मोठया प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे तेथील फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्वर कर्मचा-यांचे आगमन - निर्गमनाचे वेळी पंचीग करतांना जास्त वेळ लागतो. म्हणून सदरील लोकेशनचे फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्वरील १८ विभागापैकी मंदिर व संरक्षण विभागाकरीता आणखी एक स्वतंत्र फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्ची आवश्यकता आहे. तसेच नवीन प्रसादालय लवकरच कार्यान्वीत होत असल्यामुळे, त्याठिकाणी कर्मचा-यांचे आगमन - निर्गमन वेळेकरीता आणखी एक स्वतंत्र फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्ची आवश्यकता आहे. सदर दोन आवश्यक असलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् , संगणक, केबलींग इ.संपूर्ण खर्चासह यापुर्वी पुरविणेत आलेल्या मशीनचे किमतीमध्येच देवू शकाल काय? या बाबत अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी यापुर्वी पुरविणेत आलेल्या फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्चे किंमतीपेक्षा एकूण रुपये १३,७१४/- रक्कम कमी करुन, रुपये ०२,५८,०००/- या किंमती (Total Project Cost) मध्ये संस्थानला आवश्यक असलेले दोन नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देण्याचे मान्य केले आहे व तसा प्रस्ताव अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी दि.२१ फेब्रुवारी २००८ रोजी संस्थानला सादर केलेला आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे संरक्षण व मंदिर विभागातील कर्मचा-यांसाठी एक व नवीन प्रसादालयातील कर्मचा-यांसाठी एक असे आवश्यक असलेल्या एकूण दोन नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्, संगणक, केबलींग, सॉफ्टवेअर, इन्स्टॉलेशन चार्जेस इ.संपूर्ण खर्चासह रुपये ०२,५८,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख अठ्ठावन्न हजार) या किमतीमध्ये (Total Project Cost मध्ये ) **अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून खरेदी व इन्स्टॉलेशन करणेस तसेच**

**त्याकामी येणा-या एकूण- रुपये ०२,५८,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख अठ्ठावन्न हजार) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**२६ शिर्डी -पंढरपुर पायी दिंडी खर्चाबाबत.**

**सदरहू विषयाबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत अंतिम निर्णय घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.

**२७ श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२००८ कलाकार निश्चितीबाबत**

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ हा दि.१७/०७/२००८ ते दि.१९/०७/२००८ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे. त्यासाठी खालील कलाकारांनी व कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये कार्यक्रम व कीर्तन करणेस मिळावा म्हणून पत्र पाठविलेली आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.युगंधरा वीरकर, कीर्तनालंकार, बी-४०२ साई सावली सहनिवास, जीवदानी मार्ग, विरार(पूर्व) | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०२. | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यास बुवा, साईसदन नं.१, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ, मु.पो.डोंबीवली, | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०३. | ह.भ.प.माधवबुवा तुकारामबुवा आजेगांवकर श्री केशवकृपा, संत दासगणू महाराज नगर, कारेगांव रोड, मु.पो.ता.जि.परभणी- | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०४. | ह.भ.प. गंगाधर नरहर व्यास , साईसदन नं.१, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ, मु.पो.डोंबीवली, जि.ठाणे-४२१ २०१ | तीन दिवस कीर्तन सेवा | ३ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०५. | विदुषी सुमित्रा गुहा, सुमधुर हंसाधवानी, जी-१२१९-ए, चित्तरंजन पार्क, न्यु दिल्ली-११००१९, फोन नं.२६६७-३६८८ | शास्त्रीय संगीत | ०७ | रु.४५,०००/- |
| ०६. | प्रिती साठे, सी/२२, संस्कारनगर सोसायटी, कबीर मंदिराचे मागे, मंजलपूर, वडोदरा-३९००११, | कथक नृत्य कार्यक्रम | १० | रु. २५,०००/- |
| ०७. | श्री श्रीकांत देशपांडे, आलापिनी, १२०५/३/२ डेक्कन जिमखाना, पुणे-४११ ००४ | गायन कार्यक्रम | ०५ | रु. २५,०००/- |
| ०८. | श्री सतीष पो रेड्डी, श्री वैष्णवी इन्स्टीट्युट ऑफ म्युझीक अँड डान्स,३-४-१७५, राम मंदिर, टोबॅको बझार, सिकंदराबाद-३, | कुचीपुडी नृत्य कार्यक्रम | १० | संस्थान नियमानुसार. |
| ०९. | सौ. रेणु श्रीवास्तव, द्वारा-डॉ.ज्योती शंकर, ३ए/५, ड्रमोंड रोड, अलाहाबाद, प्रयाग-२११००१, | भजन कार्यक्रम | ०५ | संस्थान नियमानुसार. |
| १०. | श्री विजय साखरकर, दत्तनिवास चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली(पूर्व) मुंबई नं. ६६, | साई स्वर नृत्योत्सव कार्यक्रम. | १४ | रु.१३,०००/- यापुर्वी कार्यक्रम झालेला आहे. |
| ११. | डॉ.वैशाली देशमुख, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स, सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ, किले अर्क, औरंगाबाद, | गायन कार्यक्रम | ६-७ | रु. ६,०००/- मा. अध्यक्ष यांची शिफारस. |
| १२. | पद्मजा फेनानी जोगळेकर, ए-१९, रामगिरी पॅराडाईज, गोखले रोड(दक्षिण), शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०००२८ | मंगलदिप हा गायन कार्यक्रम | १० | रु.१,००,०००/- मा. श्री.अ.भि.खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस |
| १३. | श्री विक्रांत वायकोस, कलाश्री अकाडमी, सन्मती, प्लॉट नं.२६, आदीत्यनगर, उल्कानगरी, औरंगाबाद, | भरतनाट्यम् कार्यक्रम | ४० विद्यार्थी, व ५ साथीदार | रु.२०,०००/- |
| १४. | कु.तनय रेगे, द्वारा-सुधन रेगे, अ-६, शायनिंग स्टार सोसायटी, दौलतनगर, सांताक्रुज (प.),मुंबई-४०० ०५४, | गायन कार्यक्रम | ५ | संस्थान नियमानुसार. |
| १५. | श्रीमती पुर्णिमा भागवत, द्वारा श्री राजगोपाल भागवत, श्री शारदा संगीत नृत्य कला शाळा, #१५१६/३, १-मेन, १४-क्रॉस, विनोबानगर, दावनगिरी-५७७ ००६, | भरतनाट्यम् कार्यक्रम | १० | रु.१५,०००/- |
| १६. | सुरमणी पं.कमलाकर परळीकर, सरगम, विद्यानगर, परभणी-४३१ ४०१ | भक्तीसंगीत कार्यक्रम | ५ | रु.१५,०००/-, मा.श्री.अ.भि. खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस |
| १७. | श्री आलोक मिश्रा, ए-७०, न्यु अशोकनगर, न्यु दिल्ली, | भजन कार्यक्रम | ५ | रु, ५,१००/- |
| १८. | सौ.सिमा विनोद नाखवा,बी-५/२३, रुनवाल नगर, प्रताप | महाराष्ट्राचा राजा, हा | २५ | प्रवासखर्च |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सिनेमापुढे, ठाणे-(प)४००६०१ | नृत्यमय व गीतमय कार्यक्रम | | रु.२०,०००/- |
| १९. | रविराज नासेरी,डी-७०२, सिल्व्हर टॉवर, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदीवली(पु), मुंबई-१०१ | भजन/गायन कार्यक्रम | १२ | रु.८०,०००/- |
| २०. | सौ.शैलजा रत्नाकर आचार्य,सी-१९, हिरन बिल्डींग,बसव कल्याण नगर, शिवमंदिर रोड अंबरनाथ, जि.ठाणे, | स्त्री संतवाणी सांस्कृतिक कार्यक्रम. | १५ | रु.१०,०००/- |
| २१. | प्रमोद प्रभाशंकर गायकवाड, शेहनाई भवन, ३४४, कसबा पेठ, पूणे-४११ ०११, | शेहनाई व सुंद्री वादन कार्यक्रम | ७ | संस्थान नियमानुसार. |
| २२. | कु.सायली ओक, समाधान, प्लॉट नं.३, रोड नं.१३, सेक्टर-१२, न्यू पनवेल, जि.रायगड-४१० २०६ | सुगम संगीत कार्यक्रम | | मा.अध्यक्ष यांची शिफारस. |

उपरोक्तप्रमाणे अ.नं. ०१ ते ०४ यांनी उत्सवात किर्तन सेवा करण्याची व अ.नं. ०५ ते २२ यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सवात गायन/नृत्य इ. कार्यक्रम करणेची संधी मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

कार्यक्रमाचे बाबतीत मा.अध्यक्ष यांनी मान्यवर व मोठ्या कलाकारांना आमंत्रित करावे, असे वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने दि.२२/०६/२००८ रोजी मा.अध्यक्ष, मा.श्री.अ.भि. खांबेकर,व मा.श्री. सु.गो. वाबळे, विश्वस्त यांनी खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित केले असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | दिनांक/वेळ | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.माधवबुवा तुकारामबुवा आजेगांवकर श्री केशवकृपा, संत दासगणू महाराज नगर, कारेगांव रोड, मु.पो.ता.जि.परभणी- | तीन दिवस कीर्तन सेवा | १७/०७/२००८ ते १९/०७/२००८ | रु.७,५००/- |
| ०२. | श्री श्रीकांत देशपांडे, आलापिनी, १२०५/३/२ डेक्कन जिमखाना, पुणे-४११ ००४ | गायन कार्यक्रम | १७/०७/२००८ | रु. २५,०००/- |
| ०३. | सुरमणी पं.कमलाकर परळीकर, सरगम, विद्यानगर, परभणी-४३१ ४०१ | भक्तीसंगीत कार्यक्रम | १८/०७/२००८ | रु.१५,०००/-, मा. श्री.अ.भि.खांबेकर, विश्वस्त, यांची शिफारस |
| ०४. | सौ.सिमा विनोद नाखवा,बी-५/२३, रुनवाल नगर, प्रताप सिनेमापुढे, ठाणे-(प)४००६०१ मो.नं.९८२०७८४८४२/फो.नं.२५४७८६०९ | **महाराष्ट्राचा राजा**, हा नृत्यमय व गीतमय कार्यक्रम | १९/०७/२००८ | प्रवासखर्च रु.२०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००८ मध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस आहे.

| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | दिनांक/वेळ | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.माधवबुवा तुकारामबुवा आजेगांवकर श्री केशवकृपा, संत दासगणू महाराज नगर, कारेगांव रोड, मु.पो.ता.जि.परभणी- | तीन दिवस कीर्तन सेवा | १७/०७/२००८ ते १९/०७/२००८ | संस्थान नियमानुसार मानधन. |
| ०२. | सुरमणी पं.कमलाकर परळीकर, सरगम, विद्यानगर, परभणी-४३१ ४०१ | भजन संध्या कार्यक्रम | १७/०७/२००८ वेळ- रात्रौ ७.३० ते ९.०० | रु.११,०००/-, |
| ०३. | श्री श्रीकांत देशपांडे, ६६/२, अपेक्षा अपार्टमेंट, फ्लॅट नं.४, लॉ कॉलेज रोड, पुणे-४११ ००४, | भक्ती संगीत कार्यक्रम | १७/०७/२००८ वेळ-रात्रौ ९.३० ते १०.३० | रु. ११,०००/- |
| ०४. | कु.सायली ओक, समाधान, प्लॉट नं.३, रोड नं.१३, सेक्टर-१२, न्यू पनवेल, | सुगम संगीत कार्यक्रम | १८/०७/२००८ वेळ- रात्रौ ७.३० ते ९.०० | रु.२०,०००/- |
| ०५. | डॉ.वैशाली देशमुख, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स, सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ, किले अर्क, औरंगाबाद, | गायन कार्यक्रम | १८/०७/२००८ वेळ-रात्रौ ९.३० ते १०.३० | रु. ०६,०००/- |
| ०६. | श्री प्रमोद गायकवाड, शहनाई भवन, ३४४, कसबा पेठ, पूणे-११, फो.नं. २४५७५८७६ | शहनाई व सुंद्री वादन | १८/०७/२००८ वेळ-रात्रौ १०.३० ते ११.३० | रु. ०७,०००/- |
| ०७. | सौ.शैलजा रत्नाकर आचार्य,सी-१९, हिरन बिल्डींग,बसव कल्याण नगर, शिवमंदिर रोड अंबरनाथ, जि.ठाणे, | स्त्री संतवाणी सांस्कृतिक कार्यक्रम. | १९/०७/२००८ वेळ- रात्रौ ७.३० ते ९.०० | रु.११,०००/-, |
| ०८. | श्री विक्रांत वायकोस, कलाश्री अकाडमी, सन्मती, प्लॉट नं.२६, आदीत्यनगर, उल्कानगरी, औरंगाबाद,मो.नं.०९४०३१२५१०० | भरतनाट्यम् कार्यक्रम | १९/०७/२००८ वेळ-रात्रौ ९.०० ते १०.०० | रु. ११,०००/- |
| ०९. | सचिव श्री बी.आर.पोटभरे, कलारंजन थिएटर्स, कोजागिरी निवारा, कोपरगांव, | साईलीला हे धार्मिक नाटक. | २०/०७/२००८ वेळ- रात्रौ ७.३० ते | रु.११,०००/-, |

| अ.नं. | कलाकार/ किर्तनकार नांव | कार्यक्रम तपशील | दिनांक/वेळ | मानधन |
|---|---|---|---|---|
| | जि.अहमदनगर, | | १०.०० | |

(कार्यवाही-प्रशासन शाखा ,वशी-०५)

२८ **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट-२००८ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश व प्रवेशासाठी शासनाने केलेल्या प्रवेश शुल्क वाढीबाबत.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगष्ट २००८ चे सत्रापासून सुरू होणारे शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया माहे जुन २००८ पासून सुरू करावी लागणार आहे. त्याची पुर्वतयारी करणेसाठी प्रवेश प्रणालीच्या धोरणात्मक बाबींवर आवश्यक तो निर्णय मा. व्यवस्थापन समिती यांचेकडून होणे आवश्यक आहे.

**अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २००८ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश...**

**मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक -२०/०५/२००७ रोजी झालेल्या सभेत विषय नं. ३८ निर्णय क्रमांक ३९१ अन्वये उमेदवारांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेण्यात आला.** १९९६ पासून शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि. मी. त्रिज्येत येणा-या खालील गांवातील उमेदवारांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांच्या ८० % जागा राखीव ठेवून उर्वरीत २० % जागा सर्व उमेदवारांना खुल्या ठेवण्यात येतात. शिर्डीसह शिर्डी पासून १५ कि.मी. परिसरात कायम वास्तव्य असणारा उमेदवार हा त्या गांवातील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी शिक्षण घेवून व वार्षिक परिक्षेत बसून उत्तीर्ण झालेला असावा.

**शिर्डीसह शिर्डी परिसरातील १५ कि.मी.त्रिज्येत येणा-या गावांची नांवे खालीलप्रमाणे (तक्ता क्र.१)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहाता | २५ | बहादराबाद | ४९ | रांजणगांव देशमुख |
| २ | साकुरी | २६ | शहापुर | ५० | अंजनापूर |
| ३ | दहिगांव-को-हाळे | २७ | पोहेगांव खु | ५१ | बहादरपुर |
| ४ | पिंपळस | २८ | पोहेगांव बु | ५२ | मढी बु |
| ५ | को-हाळे | २९ | चांदेकसारे | ५३ | मढी खु |
| ६ | नांदुर्खी बु | ३० | घारी | ५४ | देर्डे-को-हाळे |
| ७ | नांदुखी खु | ३१ | डाउच खु | ५५ | देर्डे-चांदवड |
| ८ | डो-हाळे | ३२ | रास्तापुर | ५६ | चांदगव्हाण |
| ९ | कनकुरी | ३३ | नाथुपाटलांची वाडी | ५७ | डाउच बु |
| १० | निमगांव-को-हाळे | ३४ | एकरूखे | ५८ | हिंगणी |
| ११ | निघोज | ३५ | गणेशनगर | ५९ | मुर्शतपुर |
| १२ | सावळीविहीर खु | ३६ | रांजणगांव | ६० | कोपरगांव |
| १३ | सावळीविहीर बु | ३७ | अस्तगांव | ६१ | धारणगांव |
| १४ | सोनेवाडी | ३८ | कालेवाडी | ६२ | जेउर पाटोदा |
| १५ | पिंपळवाडी | ३९ | संवत्सर | ६३ | जेउर कुंभारी |
| १६ | रूई | ४० | कोकमठाण | ६४ | शिंगणापूर |
| १७ | केलवड | ४१ | लक्ष्मणवाडी | ६५ | रामपूर |
| १८ | खडके-वाके | ४२ | कान्हेगांव | ६६ | आदमाने वस्ती |
| १९ | काकडी | ४३ | वारी | ६७ | आडगांव |
| २० | डांगेवाडी | ४४ | देवगांव | ६८ | पिंपरी - निर्मळ |
| २१ | डांगेवाडी-कोपरगांव | ४५ | पुणतांबा | ६९ | धनगरवाडी |
| २२ | सोयेगांव | ४६ | रामपुरवाडी | ७० | शिंगवे |
| २३ | वेस | ४७ | वाकडी | ७१ | सडे |
| २४ | जवळके | ४८ | मनेगांव | ७२ | शिर्डी |

संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यासाठी विशेषबाब म्हणून विहीत केलेल्या परिक्षेत त्याना मिळालेल्या एकूण गुणात २ % वाढ करून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते मात्र ही सवलत मुलगा किंवा मुलगी यांचेसाठी, एखाद्या कर्मचा-यास त्याच्या सेवाकाळात एकदाच मिळते.

शासनाने विहीत केलेल्या आरक्षण पध्दती प्रमाणेही मागासवर्गीयांसाठीचे जागांचे आरक्षण ठेवण्यात येते. ते खालीलप्रमाणे

अ - मागासवर्गीयासाठी राखीव जागा **(तक्ता क्र. २)**

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती व बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ % |
| २ | अनुसचित जमाती (विशिष्ट भागा बाहेरील जमाती धरून) | ७% |
| ३ | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती ) | ३% |
| ४ | भटक्या जमाती (एन टी-१)( जुलै-१९९० पुर्वीच्या २८ व तत्सम ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (एनटी-२ ) ( धनगर व तत्सम जमाती ) | ३.५ % |
| ६ | भटक्य जमाती ( एनटी-३ ) (वंजारी व तत्सम जमाती ) | २ % |
| ७ | इतर मागास वर्गीयांकरीता | १९ % |
| | एकूण- | ५० % |

ब. अपंग उमेदवारांसाठी ३ % आरक्षण.

क. महिलांसाठी व्यवसाय निहाय २५ % आरक्षण.

ड. तांत्रिक विषयासह परीक्षा पास उमेदवारांना व्यवसाय निहाय २५ % आरक्षण

इ. संरक्षण सेवेतील व्यक्तीसाठी १ % जागा राखीव.

फ. सर्टिफाईड ( बोल्स्टर ) स्कुलमधील व्यक्ती १% जागा राखीव.

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये २००७ च्या सत्रामध्ये प्रवेशासाठी व्यवसाय, तसेच क्षेत्र निहाय जागांची विभागणी खालीलप्रमाणे केली होती.

**(तक्ता क्र. ३)**

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य असणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३० | ०८ |
| | | | | १७६ | ३२ | १६४ | ४४ |

१ ऑगस्ट २००८ पासून सुरु होणा-या सत्रामध्ये खालील व्यवसायांमध्ये प्रवेश द्यावयाचा आहे.

(तक्ता क्र. ४)

| अ.नं | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागांची प्रवेशासाठी क्षेत्र निहाय विभागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शिर्डी व शिर्डी पासून १५ कि.मी. परीसरात कायम वास्तव्य सणारे उमेदवार | उर्वरीत सर्व उमेदवार |
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | ११ | ०३ |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १५ | ०४ |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २२ | ०६ |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३० | ०८ |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | ०४ | ३५ | ०९ |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण | १ वर्ष | १६ | - | १३ | ०३ |
| | | | | २३२ | ३६ | २१२ | ५६ |

वरीलपैकी अ.नं. ११ कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट **(COPA)** या व्यवसायाची दुसरी तुकडी दुस-या पाळीमध्ये व अ.नं. १२ क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन ( व्हेजेटेरीयन ) या व्यवसायाच्या दोन तुकडया नव्याने सुरु करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविले आहेत. पैकी अ.नं. १२ च्या व्यवसायाच्या पहिल्या तुकडीला केंद्र शासनाची कायम मान्यता मिळणेकामी केंद्र व राज्य शासनाच्या स्थायी समितीने दि. ३०/०४/२००८ रोजी निरीक्षण घेऊन शिफारस केली आहे. तसेच अ.नं. ११ व १२ च्या प्रत्येकी एक तुकडयांसाठी राज्य शासनाची मान्यता शासन निर्णय क्रमांक- आयटीआय-२००८/(२६४/०८)व्यशि-२, दि.१७/०५/२००८ (उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई) नुसार मिळाली आहे. राज्य शासनाकडून तात्पुरती मान्यता मिळाल्यामुळे केंद्र शासनाची कायम मान्यता

मिळण्याच्या अटींच्या अधिन ठेवुन उमेदवारांना प्रवेश देण्याची कार्यवाही करता येईल. वरील पैकी अ.नं. १ ते १० च्या सर्व व्यवसायांना तसेच अ.नं. ११ वरील व्यवसायाच्या एका तुकडीला केंद्र, शासनाची कायमची मान्यता ( संलग्नता ) मिळालेली आहे.

तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या सुपरन्युमररीच्या अतिरीक्त जागा भरणेसाठी मागील दोन वर्षात प्रशिक्षण सोडून गेलेल्या उमेदवारांचे प्रमाणास अनुसरून शासनाकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावा लागतो. शासनाकडून मंजूरी मिळाले नंतर या अतिरीक्त जागा भरणेबाबत कार्यवाही करण्यात येते. या जागा भरण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळेलच असे नाही. तसेच चालू वर्षी पासून सुपरन्युमररी जागांची मर्यादा ( संख्या ) वाढण्याची शक्यता आहे. तसा बदल झाल्यास संबंधीत प्रवर्गामध्ये त्याची विभागणी करुन त्यावर प्रवेश देता येईल. मागील वर्षी पासून सुपरन्युमररी जागेवर शासनाच्या मान्यतेनंतर मा. व्यवस्थापन समितीच्या निर्देशनानुसार प्रवेश देण्याचे ठरले. त्याबाबतची माहिती माहिती पुस्तकात देण्यात आली.त्या जागांना गुणानुक्रम व आरक्षण यांचे बंधन पाळता येत नाही. त्यामुळे आता या जागांसाठी गुणानुक्रम व आरक्षण याचे बंधन असणार नाही असे स्पष्टपणे माहीती पूस्तकात नमुद करावे लागेल.

उमेदवारांना निवडपत्र व संधीपत्र पाठविणात येणार नाहीत, त्याऐवजी अर्ज स्विकतीचे वेळी प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक देण्यात येते. त्यानुसार त्या त्या प्रवेश फेरीनुसार प्रवेश देण्यात येतात.

उमेदवाराने अर्जात व्यवसायाचे नांव लिहू नये, आलेल्या अर्जांची शैक्षणिक अर्हतेनुसार गुणवत्ता यादी तयार करून, या यादीस अनुसरून व आरक्षण पध्दतीची अमंलबजावणी करून उमेदवारांच्या पसंतीनुसार व्यवसायास प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात येते.

**ब) प्रवेशासाठी शासनानी केलेल्या शुल्क वाढीबाबत...**

**मागील वर्षी पर्यंत प्रत्येक उमेदवरास प्रत्येक वर्षाकरीता शैक्षणिक शुल्क रू. १५०० /- व अनामत रक्कम रू. ५०००/- एवढी आकारण्यात येत असे.**

चालू वर्षापासून शासन निर्णय क्र. आयटीआय-२००८/ रिट/(२७/०८)/व्यशि-२ मंत्रालय विस्तर भवन, मुंबई ३२ दि. ३१ मार्च,२००८. नुसार राज्यातील सर्व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामधील प्रवेशासाठी सुधारीत प्रशिक्षण शुल्क निश्चित केलेले आहे असे मा.उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. प्राकाना/प्रशि/क-१/२००८/४६०५ दि.१२/०५/०८ नुसार कळविले आहे. त्यामध्ये संस्थेच्या दर्जानुसार व व्यवसायांच्या (ट्रेडच्या) प्रकार गटानुसार वेगवेगळी प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आलेली आहे.

**प्रपत्र-अ (तक्ता क्र. ५)**

| व्यवसाय अभ्यासक्रम | पुर्वीचे प्रशिक्षण शुल्काचे दर प्रति विद्यार्थी प्रति वर्ष | निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क प्रति विद्यार्थी प्रति वर्ष |
|---|---|---|
| शिल्प कारागीर प्रशिक्षणांतर्गत खाजगी कायम विनाअनुदानित औ.प्र.केंद्रातील व्यवसाय अभ्यास क्रमाचे प्रशिक्षण शुल्क | रु. १,५००/-व रु. २,१००/ - इलेक्ट्रॉनिक्स व संगणक व्यवसायासाठी | "अ" दर्जा प्राप्त केंद्र रु. १२,०००/-<br>"ब" दर्जा प्राप्त केंद्र रु. ११,०००/-<br>"क" दर्जा प्राप्त केंद्र रु. १०,०००/-<br>"ड" दर्जा प्राप्त केंद्र रु. ८,०००/- |

वरिल प्रपत्र "अ"मधील स्तंभ क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या दर्जानिहाय औ.प्र.केंद्रांमधिल खालील व्यवसाय गटांकरीता प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष प्रशिक्षण शुल्क लागु राहील.

**प्रपत्र-ब (तक्ता क्र. ६)**

| अ) मशिन व्यवसायासाठी (उदा. मशिनिष्ट, टर्नर, टुल ॲण्ड डायमेकर, मशिन टुल मेन्टे. इ.) | ब)इतर अभियांत्रिकी व्यवसाय गटासाठी (उदा.इलेक्ट्रीकल, यांत्रिकी, आय.टी., ऑटो मोबाईल सेक्टर इ.) | क) बिगर अभियांत्रिकी व्यवसाय गटांकरीता (उदा. ॲपरेल, रिटेल, हॉस्पिटॅलिटी सेक्टर इ.) |
|---|---|---|
| "अ" दर्जा प्राप्त केंद्र १००%<br>"ब" दर्जा प्राप्त केंद्र ९०%<br>"क" दर्जा प्राप्त केंद्र ८०%<br>"ड" दर्जा प्राप्त केंद्र ६०% | "अ" दर्जा प्राप्त केंद्र ७०%<br>"ब" दर्जा प्राप्त केंद्र ६०%<br>"क" दर्जा प्राप्त केंद्र ५०%<br>"ड" दर्जा प्राप्त केंद्र ४०% | "अ" दर्जा प्राप्त केंद्र ५०%<br>"ब" दर्जा प्राप्त केंद्र ४०%<br>"क" दर्जा प्राप्त केंद्र ३०%<br>"ड" दर्जा प्राप्त केंद्र २०% |

आपले औ.प्र. केंद्राला शासनाचा **"अ" दर्जा** प्राप्त झालेला आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व्यवसायांना खालीलप्रमाणे प्रशिक्षण शुल्क प्रतिविद्यार्थी प्रति वर्षी घेता येईल.

**तक्ता क्र. ७**

| अ. नं. | अभ्यासक्रम | आवश्यक शैक्षणिक अर्हता | कालावधी | प्रवेश क्षमता | सुपर न्युमररी जागा | एकूण जागा | प्रति वर्ष प्रती प्रशिक्षणार्थी सुधारीत प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टूल अँड डाय मेकर | इ. १० वी उत्तीर्ण | ०३ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. १२,०००/- |
| २ | टर्नर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | १४ | रु. १२,०००/- |
| ३ | मशिनष्ट ग्राईंण्डर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १२ | ०२ | १४ | रु. १२,०००/- |
| ४ | फिटर | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | इलेक्ट्रीशियन | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ६ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेन्टेनन्स | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ७ | रेफ्रिजरेशन, ॲण्ड एअर कन्डीशनिंग मेकॅनिक | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ८ | मोटार मेकॅनिक व्हेईकल | इ. १० वी उत्तीर्ण | ०२ वर्षे | १६ | ०३ | १९ | रु. ०८,४००/- |
| ९ | वेल्डर | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | २४ | ०४ | २८ | रु. ०८,४००/- |
| १० | ट्रॅक्टर मकॅनिक | इ. ८ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ३२ | ०६ | ३८ | रु. ०८,४००/- |
| ११ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामर ॲसिस्टंट (कोपा) | इ. १२ वी उत्तीर्ण | ०१ वर्ष | ४० | ०४ | ४४ | रु. ०८,४००/- |
| १२ | क्राफ्टस्मन फुड प्रॉडक्शन (व्हेज) | इ. १० वी उत्तीर्ण् | १ वर्ष | १६ | - | १६ | रु. ०६,०००/- |
| | | | | २३२ | ३६ | २६८ | |

उपरोक्त शुल्क आकारतांना खालील अटींचे पालन करणे संबंधित औ.प्र.केंद्रांच्या व्यवस्थापनास बंधनकारक राहील.

१) वरिलप्रमाणे सुधारित प्रशिक्षण शुल्क खाजगी औ.प्र.केंद्रांमधील प्रशिक्षणार्थ्यांना सन ऑगस्ट,२००८ पासून सुरु होणा-या शैक्षणिक सत्रापासून लागू राहील.

२) खाजगी औ.प्र. केंद्रातील शिक्षकीय पदांनाच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकीय पदांच्या वेतनाच्या किमान २/३ एवढे वेतन देणे आवश्यक राहील.

३) खाजगी औ.प्र.केंद्रांतील शिक्षकीय पदांना वेतन देताना औ.प्र.केंद्र व्यवस्थापनाने संबंधित शिक्षकांच्या नांवे बँकेत खाते उघडून धनादेश / धनाकर्षाव्दारे वेतन अदा करणे आवश्यक राहील.

४) शासनाने निश्चित केलेल्या वरिल प्रशिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येणार नाही याची खाजगी औ.प्र.केंद्र व्यवस्थापनाने दक्षता घ्यावी. वरिलप्रमाणे आकारण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क व त्याचा होणारा विनीयोग योग्यरित्या करण्यात येत आहे की नाही याबाबतची तपासणी संबंधित प्रादेशिक उपसंचालक कार्यालयामार्फत करण्यात येईल.

५) खाजगी औ.प्र. केंद्रांनी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेला प्राधान्य द्यावे व औ.प्र. केंद्रांची गुणवत्ता कशी वाढेल व केंद्रांचा दर्जा कसा उंचावेल या करीता सतत प्रयत्नशील रहावे.

६) खाजगी औ.प्र.केंद्रांनी केंद्रास अधिकचा महसूल मिळणेकरीता उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना व लोकसेवा केंद्रातर्गत योजना व इतर छोटे / मोठे उपक्रम राबवावे व दरवर्षी एकूण आवर्ती खर्चाच्या २५% रक्कम केंद्राकरीता मिळवुन द्यावी व त्याचा काही भाग केंद्र व्यवस्थापनाने केंद्रातील कर्मचा-यांना प्रोत्साहन म्हणून द्यावा.

७) खाजगी औ.प्र.केंद्रांनी प्रशिक्षणाच्या गुणवत्तेला अधिक प्राधान्य द्यावेत.निकालाची टक्केवारी वाढविणे, शिकाऊ उमेदवारी, रोजगार व स्वयंरोजगार विद्यार्थ्यांना मिळवुन देणे इत्यादी बाबींकरीता खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापनाने पुढाकार घ्यावा.

**वरीलप्रमाणे शासनानी मागील वर्षापेक्षा चार ते आठ पटीने शुल्क वाढीला मान्यता दिलेली असली तरी अशासकीय औ.प्र.केंद्राच्या व्यवस्थापनानी तेवढी शुल्क आकारलीच पाहीजे असे बंधन नाही. आपल्या औ.प्र.केंद्रामध्ये बहुतांश प्रवेश गुणानुक्रमे होत असतात व त्यामध्ये अल्प व अत्यल्प उत्पन्न गटातील कुटुंबांतील मुले/ मुली प्रशिक्षणासाठी येतात. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण शुल्क कमीत कमी कसे ठेवता येईल याबाबत विचार होणे व निर्णय होणे आवश्यक वाटते.**

शुल्क आकारणीबाबत वर नमुद अट क्र. १ नुसार ऑगस्ट २००७ सत्रामध्ये प्रवेश दिलेल्या २ व ३ वर्षे कालावधीच्या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांचे प्रशिक्षण पुर्ण होई पर्यंतच्या कालावधीमध्ये मागील दराने (प्रति प्रशिक्षणार्थी प्रति वर्ष रु.१५००/-) आकारावे लागतील.

औ.प्र.संस्थेची प्रवेश प्रक्रिया मा. व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या निर्णयानुसार तसेच शासनाने जारी केलेल्या प्रवेश नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येते. शासनाने प्रवेश पध्दतीत काही बदल केल्यास त्यानुसार माहिती पुस्तिकेत बदल करण्यात येतो. तसेच संस्थेमध्ये नियमित अभ्यासक्रमांबरोबरच **MS-CIT, City & Guild**, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ यांचेही अभ्यासक्रम चालतात. तसेच केंद्र शासनाच्या मॉडयुलर एम्प्लॉएबल स्किम **(MES)** या योजनेतील अभ्यासक्रमही चालविणे प्रस्तावित आहे. यांची तसेच संस्थानच्या निरनिराळया कार्यक्रमात औ.प्र.संस्थेचा सहभाग असतो. त्या दृष्टीने व शिस्तीच्या दृष्टीने प्राचार्य यांना आवश्यक वाटतील त्या विदयार्थी व पालक यांच्यासाठीच्या सूचना माहिती पुस्तकात समाविष्ठ करता येतील. तसेच सुधारित शुल्काबाबत जो निर्णय होईल त्याचीही माहिती त्यामध्ये नमुद करावी लागेल. चालू वर्षी पासून

प्रवेशाबाबत होणा-या निर्णयानंतर त्यानूसारचे आवश्यक तेवढे फेरबदल माहिती पुस्तीकेमध्ये नमुद करता येतील.

तरी वरील मुददा अ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र-ऑगष्ट २००८ चे प्रशिक्षणार्थी प्रवेश आणि मुददा ब) **प्रवेशासाठी शासनाने केलेल्या शुल्क वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

२९ **कनकुरी शिर्डी रस्त्यावरील ओव्हरहेड टँकचे सिलींग आतील व बाहेरील बाजूने प्लॅस्टर करणे बाबत.**

संस्थानचे कनकुरी शिर्डी रस्त्याजवळील शिर्डी हद्दीतील १० लाख लिटर क्षमता असलेली पाण्याची टाकी बांधण्यात आलेली आहे. कनकुरी साठवण तलावातून शुध्दीकरण केलेले पाणी या टाकीत घेणेत येवून सदर टाकीतून पाणी संस्थानचे मंदिर परिसर, नविन भक्तनिवास व धर्मशाळा या भागातील हौदात सोडले जाते. सदर टाकीचे टॉप स्लबचे काँक्रीटचे पाणी शुध्दीकरणाकरीता वापरण्यात येणाऱ्या केमीकलमुळे पोपडे येवून काँक्रीट पडल्याने १० ते १२% भागातील स्टील उघडे झालेले आहे. उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पाणी पुरवठा विभागप्रमुख यांनी ओव्हरहेड टाकीचे टॉप स्लॅबचे आतील व बाहेरील भागाचे प्लास्टर करुन मिळणेकरीता मागणी केली आहे.

सदर टाकीचे प्लास्टर करणेकरीता व उघडे पडलेल्या स्टीलचे भागातील केमीकल बॉडींग मटेरीअलचे कोटींग करीता अंदाजपत्रकानुसार एकूण रुपये १,५७,१३८.०० खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च इमारत दुरुस्ती व देखभाल करणेकामीचे बजेटमधून खर्च करता येईल. तरी **कनकुरी शिर्डी रस्त्यावरील ओव्हरहेड टँकचे प्लास्टर करणेकरीता येणाऱ्या खर्चास,तसेच सदर काम अशाप्रकारचे काम करणारे ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

३० **कनकुरी शिर्डी रस्त्यावरील ओव्हरहेड वॉटर टँक येथे पाणीपुरवठा विभागासाठी गोडाऊन शेड बांधणेबाबत**

संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकडील इलेक्ट्रीक मोटार, पाईप व इतर प्लॅबिंग मटेरीअल ठेवणेसाठी शांतीनिवास ३ रा माळा, नविन भक्तनिवास (५०० रुम ) व कनकुरी साठवण तलाव असे तिन ठिकाणी सबस्टोअर असून तेथे सदरचे मटेरीअल ठेवलेले आहे. तिन ठिकाणी मटेरीअल असल्याने कोणत्या कामाचे वेळी कोणते मटेरीअल लागते ते या तिनही ठिकाणावरुन आणावे लागते. गर्दीमध्ये काही कामे तातडीने करावी लागतात. यातून अपघात होण्याची शक्यता असते. अशाच प्रकारचा एक अपघात दि. २३/१२/२००७ रोजी घडल्याचे कळविले आहे. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नये म्हणून पाणी पुरवठा विभागासाठी संस्थानचे मध्यवती असणारे व गर्दीच्या बाहेरील कनकुरी रोड ओव्हर हेड टँकचे ठिकाणी ७० फुट x ४० फुट यामापाचे पत्राशेड बांधून मागितले आहे. शेडचे स्ट्रक्चरल स्टीलसाठी लागणारे मटेरीअल हे अलंग गुजरात येथील श्री बंन्सल यांचेकडून देणगी मिळालेल्या मटेरीअलमधून वापरता येईल असे कळविले आहे.

कनकुरी शेड ओव्हरहेड टँक येथे पाणी पुरवठा विभागाने मागणी केलेप्रमाणे ७०'x४०' या साईज शेड बांधून मिळावी अशी विनंती केली आहे. पंरतू प्रत्यक्षात पाणी पुरवठा विभागाने दाखविलेल्या जागेत (विहीरीचे उत्तर बाजूस ) ७०'x२४' या साईजमध्ये शेडचे बांधकाम करता येईल, याकरीता अंदाजपत्रकानुसार स्ट्रक्चरल स्टील वगळात रुपये ३,२४,०७८.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च इमारत दुरुस्त व देखभाल चे बजेटमधून करता येईल.

तरी पाणी पुरवठा विभागाचे प्लबींग मटेरीअलसाठी गोडावून शेड बांधणेकरीता व येणाऱ्या रुपये ३,२४,०७८.०० मात्रचे खर्चास, तसेच सदर कामासाठी वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी शिर्डी रस्त्यावरील ओव्हरहेड वॉटर टँक येथे पाणीपुरवठा विभागासाठी गोडाऊन शेड बांधणेकामी विश्वस्त मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

३१ **प्रसादालयातील गहू,डाळी व इतर किराणा मालाची घट तूटीबाबत.**

प्रसादालयामध्ये दररोज सरासरी २३,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेत आहेत. सुमारे सरासरी ५००० अन्नपाकीटे व १,३५,००० लाडूची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल, कडधान्ये मध्यवर्ती भांडारकडून प्रसादालयाचे उपभांडारमध्ये आणण्यात येत आहे. आणलेला किराणा माल साफ करुन दळण्यात येतो. सदर माल प्रथमतः डिस्टोनर मशिनद्वारे व त्यानंतर मनुष्यबळाकरवी साफ केला जातो, निवडला जातो व त्यानंतर दळण्यात येतो.

दळण, कांडण व डिस्टोनर मशिनमधून काढलेल्या मालामध्ये ब-याच प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. कांडण व डिस्टोनर मशिनमधून काढणा-या मालामध्ये साधारणतः गहू, हरबरा, वाटाणा, मुग, मठ, हरबराडाळ, तूरडाळ, मुगडाळ, अखंडधने इ. चा समावेश असतो. ही सर्व प्रक्रीया करतांना ब-याच प्रमाणात घट-तूट येते. मात्र सदर येणारी घट-तूट यापूर्वीचे कोणत्याही लेखापरिक्षकाने मुद्या उपस्थित न केल्यामुळे घट-तुट स्वतंत्रपणे खर्च दाखविण्यात येत नव्हती. यापूर्वी घट-तूट स्वतंत्र दाखविण्याची पध्दत नव्हती. येणारी घट-तुट ज्या - त्या मालाचे खर्चामध्येच दाखविण्यात येत होती. मात्र सन २००५-२००६ चे स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक मा.श्री लोंगाणी यांनी घट-तूटीचा मुद्या उपस्थित केलेला आहे. त्यामुळे दि.१५/०८/२००६ पासून प्रत्यक्ष वापरण्यात येणारा मालच खर्ची दाखविण्यात आलेला आहे. (घट तुटीमध्ये जमिनीवर सांडलेला आटा, कोंडा (चाळण) व बारीक कणीचा समावेश केलेला नाही कारण त्याची प्रत्यक्ष विक्री करण्यात येते व काही प्रमाणात पाणी पुरवठा विभागास माशांना खाद्य म्हणून दिला जातो. व त्याप्रमाणेच खर्ची टाकण्यात येतो.) त्याचा प्रयोगादाखल काही मालाची प्रत्यक्ष आलेली घट-तुट मा.व्यस्थापन समिती दिनांक २०/०५/०७ चे सभेतील निर्णय क्रं. ४०५ चे मंजुरीप्रमाणे खर्च दाखविण्यात आलेली होती. मात्र त्यावेळी शासकीय व इतर देवस्थानकडून घट-तुटची माहीती उपलब्ध नव्हती. त्यामुळे खालीलप्रमाणे १० संस्थेकडे देवस्थान यांचेकडे पत्र पाठवून त्यांचेकडील घट-तुट दाखविणेबाबतची प्रचलित पध्दतीची माहीती मागविण्यात आलेली होती.

| अ.नं. | संस्थेची नांवे |
|---|---|
| १. | मा. अधिक्षक , मध्यवर्ती कारागृह , नाशिक रोड , नाशिक |
| २. | मा.अधिक्षक , इंडीया सिक्युरिटी प्रेस , नाशिक रोड , नाशिक |
| ३. | मा.कमांडर , सी.एच.क्यु , एम.आय.आर.सी , अ.नगर |
| ४. | श्री पवार सो. , लेफनंट जन. , आर्टीलरी सेंटर , देवळाली कॅम्प , नाशिक |
| ५. | मा. अधिक्षक , मध्यवर्ती कारागृह , येरवडा , पुणे |
| ६. | मा. अधिक्षक , गजानन महाराज देवस्थान , शेगांव , बुलढाणा |
| ७. | मा. अधिक्षक , भद्रा मारुती देवस्थान , खुलताबाद , औरंगाबाद |
| ८. | मा.अध्यक्ष , सप्तश्रृंगी देवस्थान , मु.पो. वणी ता. कळवण , जि.नासिक |
| ९. | मा.अधिक्षक , वखार महामंडळ,कोपरगांव ,जि. अहमदनगर |
| १०. | मा.अधिक्षक , वखार महामंडळ , मनमाड , जि. नासिक |

वरीलपैकी ३ संस्थेकडून माहीती प्राप्त झालेली आहे. दिनांक ०१/०४/०७ ते ३१/०३/२००८ अखेर १२ महिन्यामध्ये प्रसादालयातील अन्न,धान्य , कडधान्य, व इतर किराणा मालाची प्रत्यक्ष आलेली घट-तुट व इतर संस्थेकडून प्राप्त झालेल्या माहीतीचे आधारे खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता दर्शविलेला आहे.

| अं. नं. | मालाचे नाव | एकूण खर्च माल किलो / ग्रॅम | आलेली घट किलो / ग्रॅम | प्रत्यक्ष आलेली प्रति क्विं. घट किलो / ग्रॅम | श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव, यांची प्रचलित घटतुट पध्दत | येरवडा कारागृह , पुणे यांची प्रचलित घटतुट पध्दत | मध्यवर्ती कारागृह , नासिक यांची प्रचलित घटतुट पध्दती | प्रस्तावित सरासरी घटतुट % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गहू | ९२९७७९.५०० | २५१२३.००० | २.७०२ | अंदाजे प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घटतुट टाकली जाते | ५% | साखर व वनस्पती तूप या खाद्योपयोगी वस्तूंना घट तूट नाही . | ३.००० |
| २ | तांदुळ | ४११३७०.३५० | १५८३.००० | ०.३८५ | | २% | | १.००० |
| ३ | साखर | -- | -- | -- | | | | -- |
| ४ | तुरडाळ | १०२९०२.७५० | ८८१.००० | ०.८५६ | | २% | | १.००० |
| ५ | हरबराडाळ | ५८१४४९.५०० | ९३३८.००० | १.६०६ | | २% | | २.००० |
| ६ | मुगडाळ | २६२४३.००० | १९५.००० | ०.७४३ | | २% | | १.००० |
| ७ | गुळ | १५८५५.००० | १३७.५०० | ०.८६७ | | | | १.००० |
| ८ | गोडतेल | -- | -- | -- | | | | -- |
| ९ | वनस्पती तुप | -- | -- | -- | | इतर सर्व खाद्योपयोगी व अखाद्यान्य इत्यादी वस्तूंचे बाबतीत २ % घटतुटीचे प्रमाण दाखविलेले आहे. | वस्तूंना २ % प्रति क्विंटल प्रमाणे घटतुट दाखविण्याची पध्दत | |
| १० | रवा | २६४२३.८०० | २६४.०० | ०.९९९ | | | | १.००० |
| ११ | शेंगादाणे | २६७९६.८०० | २५८.३०० | ०.९६४ | | | | १.००० |
| १२ | मीठ | -- | -- | -- | | | | -- |
| १३ | मिरची | १०९३७.५५० | ३९२.००० | ३.५८३ | | | | ४.००० |
| १४ | अखंड हळद | ७२९८.७०० | २९१.००० | ३.९८७ | | | | ४.००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | मोहरी | २३४३.३३० | ३४.५०० | १.४७२ | | | | २.००० |
| १६ | जिरे | २५१६.७४० | ४०.७०० | १.६१७ | | | | २.००० |
| १७ | मसाला | १४९०.९५० | ३०.४५० | २.०४३ | | | | २.२५० |
| १८ | धनेपावडर | ११०२२.८५० | २४१.७०० | २.१९२ | | | | २.५०० |
| १९ | खोबरेवाटी | ६६९२.५०० | ५५.५०० | ०.८२९ | | | | १.००० |
| २० | हिंग | -- | -- | -- | | | | -- |
| २१ | गावरान तुप | -- | -- | -- | | | | -- |
| २२ | काजू | -- | -- | -- | | | | -- |
| २३ | खिसमिस | -- | -- | -- | | | | -- |
| २४ | हिरवी विलायची | ३८३५.४०० | ३८.२५० | ०.९९७ | | | | १.००० |
| २५ | जिलेबी रंग | -- | -- | -- | | | | -- |
| २६ | प्ला.पिशवी८x१० | -- | -- | -- | | | | -- |
| २७ | प्ला.पिशवी५x६१/२ | -- | -- | -- | | | | -- |
| २८ | प्ला.पिशवी ४x६ | -- | -- | -- | | | | -- |
| २९ | लिक्वीड सोप | -- | -- | -- | | | | -- |
| ३० | हरबरा | ५३३७८.१०० | ५००.००० | ०.९३६ | | | | १.००० |
| ३१ | वाटाणा | ४२१६६.०७० | ४८०.८०० | ०.९९७ | | | | १.००० |
| ३२ | मुग | ५१६७८.७४५ | ५१०.००० | ०.९८६ | | | | १.००० |
| ३३ | मठ | ५९९७५.९०२ | ५९३.००० | ०.९८८ | | | | १.००० |
| ३४ | पत्रावळ | -- | -- | -- | | | | -- |
| ३५ | आमसूल | -- | -- | -- | | | | -- |
| ३६ | मेथी | १२५.५७८ | २.५४५ | २.०२६ | | | | २.२५० |
| ३७ | सुंठ | १९८.७५० | १०.१७० | ५.११६ | | | | ५.२५० |
| ३८ | मैदा | ४५०२४.३२९ | १४९.००० | ०.३३० | | | | .५०० |
| ३९ | क्लिनिंग पावडर | -- | -- | -- | | | | -- |
| ४० | भगर | २५२.५०० | ४.२०० | १.६६३ | | | | २.००० |
| ४१ | साबूदाणा | १८६८९.७७९ | १८९.००० | १.०११ | | | | १.२५० |
| ४२ | कच्चेपोहे | १०४८.०२० | १०.०० | ०.९५४ | | | | १.००० |
| ४३ | लोणचे | -- | -- | -- | | | | -- |
| ४४ | पापड | -- | -- | -- | | | | -- |
| ४५ | चिंच | -- | -- | -- | | | | -- |
| ४६ | सुतळी | -- | -- | -- | | | | -- |
| ४७ | खाता सोडा | -- | -- | -- | | | | -- |
| ४८ | ओवा | -- | -- | -- | | | | -- |
| ४९ | मिनरल वॉटर | -- | -- | -- | | | | -- |
| ५० | भाजके पोहे | ९७७.२०० | ३३.५०० | ३.४२८ | | | | ४.००० |
| ५१ | डाळया | १७०.७०० | १.८०० | १.०५४ | | | | १.२५० |
| ५२ | लिंबूसत्व | -- | -- | -- | | | | -- |
| ५३ | बडीशोप | -- | -- | -- | | | | -- |
| ५४ | सफेद तीळ | -- | -- | -- | | | | -- |
| ५५ | ज्वारी | -- | -- | -- | | ४% | | -- |
| ५६ | बाजरी | -- | -- | -- | | ५% | | -- |
| | | | | | | | | |

श्री.लोंगाणी साहेब, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांनी सन २००५-२००६ चे लेखापरिक्षण मुद्यानूसार धान्य, कडधान्य, डाळ वगैरे सर्व साहित्य निवडणे, दळणे इ. प्रक्रिया करतांना प्रत्यक्षात येणारी घट-तुट खर्ची टाकण्यात यावी असे सुचविले होते. त्यानुसार उपरोक्तप्रमाणे धान्य, कडधान्यामध्ये इतर किराणा माल यामध्ये प्रत्यक्ष आलेली घट-तुट दर्शविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थान सारखेच जास्त व्यक्तीचे भोजन बनविणा-या शासकिय संस्था, देवस्थान, यांनीही त्यांचेकडील प्रचलित पध्दती / नियमानुसार घट-तूट नावे टाकणेबाबतची कार्य-पध्दती कळविलेली आहे.

वरीलप्रमाणे घट-तुटीबाबत तुलनात्मक तक्त्यांचे अवलोकन केल्यास असे दिसून येत आहे इतरांचे तुलनेने आपलेकडील आलेली घट-तूट कमी दिसत आहे. सन २००७-२००८ मध्ये प्रत्यक्ष आलेल्या घटतुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेंणेबाबत मा. मुख्यलेंखाधिकारी , स्थानिक अंतर्गत लेखा परिक्षक यांनी सुचविलेले आहे. तसेच यापुढील घट-तुट नांवे टाकणेबाबत मार्गदर्शक तत्वे सुचविलेली आहेत.

अ) मा.श्री अभय शास्त्री, मा.श्री. ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक, व मुख्य लेखाधिकारी यांनी यापुढील घट-तुटीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

१) सन २००७ - २००८ मध्ये प्रत्यक्ष आलेली घट-तुटी इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पहाता आपलेकडील प्रस्तावित सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिण्यानंतर प्रस्तावित प्रमाणानूसार घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२)  दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजि.प्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३)  दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजि.प्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तूनिष्ठ / अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

तरी सन २००७-२००८ मध्ये आलेली प्रत्यक्ष घट-तुट नांवे टाकणेबाबत तसेच मा.श्री अभय शास्त्री, मा.ए.जी.लोंगाणी , व मुख्य लेखाधिकारी यांनी **उपरोक्तप्रमाणे घट-तुट नांवे टाकणेबाबत सुचविलेल्या (नियमावली ) कार्यपध्दतीनूसार कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**३२ एल.पी.गॅस प्लॅन्ट उभारणीकामी मुदतवाढ देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०१/२००८ चे सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये नविन श्री साई प्रसादालयाकरीता गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांना देण्यात आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार जा.नं.एसएसएस-वशि/ प्रसाद/ १३०८/०८ दि.२१/०१/२००८ रोजी गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम सुरु करणेसाठी लेटर ऑफ इंण्डेंट पाठविण्यात आलेले आहे व जा.नं.एसएसएस-वशि/प्रसाद/३१५२/०८ दि.०१/०३/२००८ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

एल.पी. गॅस प्लॅन्ट उभारणी कामाचे निवीदेतील जनरल रिक्वायरमेंट मधील अटी / शर्ती क्र.५ नुसार लेटर ऑफ इंण्डेंट मिळालेचे तारखेपासुन ५ महिण्यात गॅस प्लँन्ट उभारणीचे काम पुर्ण करणेचे आहे. एल.पी. गॅस प्लॅन्ट उभारणीकामी मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांना जा.नं.एसएसएस-वशि/ प्रसाद/१३०८/०८ ने दि.२१/०१/२००८ रोजी लेटर ऑफ इंण्डेंट देण्यात आलेले आहे. त्यानुसार दि.२०/०६/२००८ रोजी ५ महिने पुर्ण होत आहेत. मात्र मुदतीत काम होणार नाही. त्यामुळे ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. यांनी दिं. ३०/०५/०८ रोजी मुदतवाढ मिळणेकामी पत्र दिलेले आहे.

मुदतीत काम होणार नसेल तर निवीदेतील जनरल कण्डीशन ऑफ कॉन्ट्रक्टमधील ५ ड नुसार कॉन्ट्रक्टर यांना मुदतवाढ मागता येईल असे नमूद केलेले आहे. त्याकामी खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कॉन्ट्रक्टर जर मुदतीत काम पुर्ण करणार नसेल तर कॉन्ट्रक्टरने १ महिना अगोदर संस्थानला कारणासह लेखी स्वरुपात मुदतवाढ मिळणेबाबत कळवावे. सदरचे मुदतवाढीचे पत्र संस्थानला प्राप्त झालेनंतर कॉन्ट्रक्टरचे विनंतीनुसार संस्थान प्रतिनीधी कॉन्ट्रक्टरशी चर्चा करुन सदरची परिस्थीती मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयासाठी सादर करील. मा.व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय अंतीम असून कॉन्ट्रक्टरवर बंधनकारक राहील. जर मा.व्यवस्थापन समितीने कामासाठी मुदतवाढ दिली तर सदरची मुदतवाढ ही कॉन्ट्रक्टर व संस्थानमध्येच राहील. मुदतवाढ दिल्यानंतर कॉन्ट्रक्टरला कुठलीही वाढीव रक्कम दिली जाणार नाही. कॉन्ट्रक्टरला मुदतवाढ दिलेनंतर देण्यात आलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण न झालेस कॉन्ट्रक्टरवर दंडात्मक कारवाई म्हणून प्रत्येक महिण्याला मुळ टेंडर रकमेच्या १% एवढी रक्कम दंड म्हणून आकारली जाईल. याबाबत कुठलीही तक्रार उपस्थीत झ ााल्यास देण्यात आलेली वर्क ऑर्डर नियमानुसार रद्द करण्यात येईल.

मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. यांचे गॅस प्लँन्ट उभारणीचे काम मुदतीत पुर्ण होणार नसलेने मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांनी दि.३०/०५/०८ चे पत्रान्वये दि.३०/०९/२००८ पर्यंत मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे. त्याकामी खालीलप्रमाणे कारणे नमूद केलेली आहेत.

१. कोपरगाव सिव्हील कॉलेज आपण पाठविलेला नमुना ग्राहय धरत नाही. कोपरगाव सिव्हील कॉलेजला QAP बाबत माहीती दिल्यानंतरही कॉलेजचा प्रतिनीधी ४ ते ५ दिवसानंतर साईडवर येवून नमूना घेवून जातो. त्यामुळे बांधकाम क्वालिटी एश्युरन्स प्लॅन (QAP) चा रिपोर्ट मिळण्यास बराच वेळ जातो. म्हणजेच कॉलेजला पुर्व सुचना दिल्यानंतर त्यांचा प्रतिनीधी तातडीने नमूना घेण्यासाठी येत नाही.

२. तपासणीबाबत पुर्वसुचना दिल्यानंतर थर्डपार्टी एजन्सी (कन्सलटंट) यांचा प्रतिनिधी ४ ते ५ दिवसांनी येतो. त्यामध्ये वेळ वाया जातो.

३. सिव्हील कामासाठी लागणारी वाळू ही स्थानिक वाळू ठेकेदार यांचेकडून वेळेवर उपलब्ध होत नाही. वाळू वेळेवर उपलब्ध न झालेमुळे सिव्हील कामामध्ये वेळ वाया जातो.

मे ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांनी गॅस प्लँन्ट उभारणीस उशिर होण्यामागे दिलेली कारणे काही अंशी खरी आहेत. मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. यांनी ०३ महिने मुदतवाढ मागितलेली आहे. त्यामुळे गॅस प्लँन्ट उभारणीस तेवढा उशिर होणार आहे. तथापी , ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री, मुंबई यांचे मेकॅनीकल काम पुर्णत्वास येत असून दि.१३/०५/२००८ रोजी मा. व्यवस्थापन समिती सदस्य, यांनी पुणे येथे जावुन स्पार्क इंजिनीअर्स, पुणे येथे गॅस साठवण टँकची समक्ष पहाणी केलेली आहे.

तरी **मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. यांचे विनंतीनूसार एल.पी.गॅस प्लँन्ट उभारणीचे कामासाठी दिनांक २१/०९/०८ अखेर ०३ महिन्यांची मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**३३ स्टेनलेस स्टिल फॅब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट पुरवठादारांना मुदतवाढ देणे बाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०१/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.१४४ अन्वये नविन श्री साई प्रसादालयाकरिता स्टे.स्टील फॅब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदीसाठी खालीलप्रमाणे निवीदा सादरकर्त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ. नं. | पुरवठादाराचे नाव व पत्ता | पुरवठा आदेश दि ल्याची तारीख | नमुना तपासणी तारीख | ॲडव्हान्स रक्कम दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | ग्रेहाउंड इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ०६/०२/२००८ | ३०/०३/२००८ | १०/०४/२००८ |
| ०२ | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ०६/०२/२००८ | ३०/०३/२००८ | १०/०४/२००८ |
| ०३ | सुयोग इक्वीपमेंट, पुणे | ०६/०२/२००८ | ३०/०३/२००८ | १०/०४/२००८ |
| ०४ | मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया,मुंबई | ०६/०२/२००८ | ३०/०३/२००८ | १०/०४/२००८ |
| ०५ | मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे | ०६/०२/२००८ | ३०/०३/२००८ | १०/०४/२००८ |
| ०६ | स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव | ०६/०२/२००८ | ०५/०४/२००८ | २६/०५/२००८ |

स्टे.स्टील फॅब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदीसाठीच्या निविदामध्ये अटी/शर्ती क्रं.२७ मध्ये नमूद केलेले आहे की- पुरवठादार यांनी पुरवठा आदेशातील इक्वीपमेंटचा तयार केलेला सॅम्पल (नमुना फर्निचर) तपासणी करुन मान्य झाल्यानंतर एकुण रक्कमेच्या २५ टक्के रक्कम अग्रीम म्हणुन देण्यात येईल. त्यानुसार मा.व्य. समिती सदस्य पथक व अधिकारी यांनी दि.३०/०३/०८ व दि.०५/०४/०८ रोजी उपरोक्त पुरवठादारांनी तयार केलेल्या फर्निचर नमुन्यांची समक्ष तपासणी केलेली असुन त्याबाबतचा अहवाल तयार केलेला आहे. त्यानुसार दि.१०/०४/२००८ व दि.२६/०५/२००८ या दरम्यान अग्रीम रक्कम संबंधीत पुरवठाधारकांना देण्यात आलेली आहे.

वरील अ.नं.०१ ते ०५ पुरवठादारांनी पुरवठा आदेशातील एकुण इक्वीपमेंट पैकी खालीलप्रमाणे इक्वीपमेंटचा पुरवठा केलेला आहे.

| **अ. नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **पुरवठा तारीख** | **एकुण इक्वीपमेंट पैकी पुरवठा केलेल्या इक्वीपमेंटची टक्केवारी** | **इक्वीपमेंट बाकी टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ग्रेहाउंड इंडस्ट्रीज, कोल्हापुर | १३/०४/०८, १४/०४/०८, ०६/०५/०८, २१/०५/०८, ०२/०६/०८, ०७/०६/०८, १६/०६/०८ | ८४ % | १६% |
| ०२ | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ०६/०४/०८, १०/०४/०८, १२/०४/०८, १४/०४/०८, १९/०४/०८, २१/०४/०८, २६/०४/०८, ०४/०५/०८, १५/०५/०८, ०९/०६/०८ | १००% | -- |
| ०३ | सुयोग इक्वीपमेंट, पुणे | १९/०४/०८, ०६/०५/०८ | १००% | -- |
| ०४ | मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई | २९/०५/०८ | ३२% | ६८% |
| ०५ | मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे | १९/०५/०८, २६/०५/०८, ०७/०६/०८, १२/०६/०८, १८/०६/०८ | १००% | -- |
| ०६ | स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगांव | -- | नमुना तपासणी दि.०५/०४/०८ रोजी झालेली असून ॲडव्हान्स रक्कम दि.२६/०५/०८ रोजी दिलेली आहे. ते इक्वीपमेंट पुरवठा दि.३१/०८/०८ अखेर पर्यंत करणार आहेत. | |

पुरवठा आदेशाच्या तारखेपासुन ९० दिवसात इक्वीपमेंटचा पुरवठा करणेत यावा अशी पुरवठा आदेशामध्ये तरतूद आहे. त्यानुसार सर्वांची मुदत दि.०६/०५/०८ रोजी संपलेली आहे . मात्र वरील सर्व पुरवठाधारकांनी पत्राव्दारे विनंती केलेली आहे की, इक्वीपमेंट पुरवठ्याचा कालावधी हा अग्रीम रक्कम दिलेल्या तारखेपासून पुढे धरावा. कारण पुरवठाधारकांना नमुना मान्य होईपर्यंत फर्निचरचे उत्पादन करता

आलेले नाही. वरीलपैकी अ.नं. १ ते ५ पुरवठाधारकांना (सॅम्पल) नमुन्याची तपासणी झाल्यानंतर दि.१०/०४/२००८ रोजी अग्रीम रक्कम देण्यात आलेली आहे. पुरवठाधारकांचे विनंती प्रमाणे सदर मुदत दि.०९/०७/०८ रोजी पुर्ण होत आहे. व अं.नं.०६ स्वराज इंडस्ट्रीज यांना अग्रीम रक्कम दि.२६/०५/०८ रोजी दिलेली आहे. त्यानुसार त्यांची मुदत दि.२५/०८/०८ रोजी पुर्ण होणार आहे.

वरीलप्रमाणे तक्त्याचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की- सुयोग इक्वीपमेंट , पुणे यांचेकडील पुरवठा मुदतीत झालेला असून इतर ०४ कंपन्यांची आतापर्यंत एकूण पुरवठयापैकी त्यांचे समोर दर्शविल्याप्रमाणे टक्केवारीने इक्वीपमेंटचा पुरवठा केलेला आहे. त्यापैकी राजलक्ष्मी व मेटाप्रो यांनी १००% इक्वीपमेंटचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. ग्रेहाउंड यांचा पुरवठा ८४% झालेला असून मेटल, मुंबई यांचेकडील कुकर्स व इतर इक्वीपमेंट तयार आहे. दि.२४/०६/२००८ रोजी कुकर्सचे इन्स्पेक्शन केलेले आहे. त्यामुळे मेटल फेब्रीकेटर्स, मुंबई हे उर्वरीत इक्वीपमेंटचा पुरवठा दि.०९/०७/०८ अखेर पर्यंत करणार आहेत.

वरीलप्रमाणे १ ते ६ इक्वीपमेंटचे पुरवठादार यांनी पत्राव्दारे मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. मुदतवाढीबाबत केलेली मागणी वस्तूस्थितीला धरुन असल्याने त्यांचे विनंतीनुसार **इक्वीपमेंट पुरवठा करणेसाठी अग्रीम रक्कम दिल्यापासून तीन महिने मुदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यानुसार अ.नं.०१ ते ०५ यांना दिनांक ०९.०७.२००८ पर्यन्त व अ.नं.०६ स्वराज इंडस्ट्रीज यांना दिनांक २५.०८.२००८ अखेर मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**३४ फुलांचे सजावटीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत**

दिनांक १९/०६/२००८ रोजी मा.श्री विलासराव देशमुख ,मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मा.श्री शिवराज पाटील,व यु.पी.ए.अध्यक्ष यांचेसह मा.श्रीमती सोनिया गांधी, भारतीय कॉंग्रेस पक्ष हे श्रींसाईबाबांच्या दर्शनासाठी आले होते.त्यामुळे समाधी मंदिरात फुलांची सजावट करण्यात आलेली होती. मुंबई येथुन सजावट करणे बाबत .सजावटीची कोटेशन मागविण्यात आलेली आहेत.दिनांक १०/०६/२००८ रोजी ०५ कोटेशन्सचे झेरॉक्स प्राप्त झालेली आहेत. कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे.

| क्र | पार्टीचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | राजेंद्र लक्ष्मणराव हिंगणे , दादर | ६०,००० |
| ०२ | प्रविण केशवराव जाधव ,दादर | ५५,००० |
| ०३ | निवृत्ती नामदेव कोकणे,दादर | ५०,००० |
| ०४ | विनायक फ्लॉवर स्टॉल, दादर | ६०,००० |
| ०५ | अशोक फ्लॉवर स्टॉल,दादर | ३२,५०० |

उपरोक्त प्राप्त झालेल्या झेरॉक्स कोटेशन मध्ये अ.क्र ०५ **अशोक फ्लॉवर स्टॉल,दादर यांचे दर सर्वात न्युनत्तम असल्याने सदरचे काम त्यांचे कडुन करुन घेण्यात आलेले असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**३५** मुंबई कार्यालयाचे नुतनीकरण प्रस्तावित आहे. या नुतनीकरणामध्ये भाडेकरुंना या जागेमध्ये निवासस्थाने द्यावयाचे आहेत. परंतू या भाडेकरुंनी सब टेनन्ट (भाडेकरु) नेमलेले असल्याने त्या भाडेकरुस निवासस्थान देणे संस्थानवर बंधनकारक नाही. याकरिता **मुंबई कार्यालयाचे इमारतीत किती भाडेकरु स्वतः राहतात व किती भाडेकरुनी उप-भाडेकरुंना निवासस्थाने भाड्याने दिलेली आहेत याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**३६** श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी औषधे खरेदी करणे प्रस्तावित आहे. सदर **औषधे खरेदी करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांचा सल्ला घेण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**अ) नोंद घेण्याचे विषय.**

**विषय नं.०३ ०१. (अ) जमा खर्च तक्ता मे- २००८.**

**(ब) माहे मे -जुन २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे मे - २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.५६१** (A)माहे मे - २००८ मधील जमा रु १६,६७,३०,७३९.४८ आणि खर्च रुपये ७,०५,१९,२६३.०७ चा तक्ता, मे - २००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये २,६४,२९०.५० खर्चाचा तक्ता, दिनांक २३.६.२००८ अखेरीस रुपये २,७७,७२,३५,७११.०० गुंतवणूकीची परिस्थिति दर्शविणारा तक्ता, माहे मे-जुन,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा

झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ७,४१,७४,९६५.०० व रुपये ७,४०,१६,२४६.७५, देणगीचा तक्ता, माहे मे - २००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,७२,३२६.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये माहे एप्रिल-मे, २००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ५६१** (B) श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कुमकुवत रुग्णांचे बिलामध्ये माहे एप्रिल-मे, २००८ मध्ये देण्यात आलेल्या रुपये १५,०४,९२१.०० व रुपये १४,६३,०३४.०० सवलतीच्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे मे,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ५६१** (C)साईनाथ रुग्णालयात माहे मे,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रु.६६,४३,१२५/- चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. साईनाथ रुग्णालयातील गरीब रुग्णांना माहे मे,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ५६१** (D)साईनाथ रुग्णालयात माहे मे,२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ४०,६२६/- बाह्य रुग्ण रु.४१,६६८/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ६२,७००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. माहे मे,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ५६१** (E)माहे मे,२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३६३९४ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ५६१** (F)बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०७.पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ५६१** (G)माहे मे,२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४ संस्थान मालमत्तेची विमा पॉलिसी घेणेकामी आलेल्या कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६२** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक १० जुलै,२००७ ते ०९ जुलै, २००८ या कालावधीसाठी मे. न्यू इंडिया इंन्शूरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ६,६६,४०८ /- इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक **०९ जुलै, २००८** रोजी पूर्ण होत आहे. तसेच मागील वर्षापासुन श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णांलय यांचा सर्वप्रकारचा विमा स्वतंत्रपणे उतरिवण्यात येत आहे. तरी त्यापुढील दिनांक ०९ जुलै, २००९ अखेर पर्यंन्तच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची खालील प्रमाणे कंपन्यांना विनंती करण्यात आली होती :

(१) दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर ( राष्ट्रीयकृत)
(२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा अहमदनगर ( राष्ट्रीयकृत)
(३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर ( राष्ट्रीयकृत)
(४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव ( राष्ट्रीयकृत)

आजचे सभेत उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधीं बरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत येऊन, याबाबत पुन्हा चर्चा- तथा- वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात आले. प्रतिनिधींनी दिलेली दरपत्रके लागलीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला, तो खालीलप्रमाणे-

| अ.नं | कंपनीचे नाव | अंतिम देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर | ७,२९,५०१.०० |
| ०२ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी | ४,६३,७९१.०० |
| ०३ | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर | ७,२९,२९४.०० |
| ०४ | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव | १०,२०,७४०.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**विषय नं.०५** **नवीन श्रीसाईप्रसादालयाकरीता भांडी खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६३** नविन श्रीसाई प्रसादालयाकरीता स्टे.स्टील,अॅल्यूमिनीयम,लोखंडी भांडी व प्लास्टीक साहित्य खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१०.०१.२००८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.१९ वरील निर्णय क्र.१३० नुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा (दरपत्रके) मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्याकामी अंदाजे रु.८८,८५,०५०/- चे खर्चास मंजूरी आहे. त्यानुसार प्रसादालयाकडील दि.१६.०५.२००८ चे मंजूर टिपणी प्रमाणे महाराष्ट्रातील प्रमुख मोठ्या शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रामधुन जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे निवीदांची विक्री झालेली आहे.

| अ.नं. | निविदा खरेदीदाराचे नाव |
|---|---|
| १. | मिरा एन्टरप्राईजेस,मुंबई |
| २. | सोमचंद जेठालाल अॅण्ड कंपनी,मुंबई |
| ३. | मनिभद्र इम्पेक्स इंडिया,मुंबई |
| ४. | आर.एस.एन्टरप्राईजेस,मुंबई |
| ५. | भरतकुमार हस्तीमल अॅण्ड कं.,मुंबई |
| ६. | नवनितलाल अॅण्ड ब्रदर्स,नासिक |
| ७. | रत्नादिप,नासिक |
| ८. | अंबोरे ब्रदर्स,कोपरगाव |
| ९. | सोमनाथ गंगाधर रासणे,संगमनेर |
| १०. | दिपक लॅब,नांदगाव,नासिक |

वरीलप्रमाणे १ ते १० कोऱ्या निविदांची विक्री झालेली असून पैकी खालील निविदाधरकांनी मुदतीत निविदा (दरपत्रके) सादर केलेली आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांची नावे |
|---|---|
| १. | मनिभद्र इम्पेक्स इंडिया,मुंबई |
| २. | मिरा एन्टरप्राईजेस,मुंबई |
| ३. | आर.एस.एन्टरप्राईजेस,मुंबई |
| ४. | सोमनाथ गंगाधर रासणे,संगमनेर |
| ५. | रत्नादिप,नासिक |
| ६. | नवनितलाल अॅण्ड ब्रदर्स,नासिक |

आजचे सभेत नविन श्रीसाई प्रसादालयाकरीता भांडी खरेदीकामी उपरोक्त निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | मालाचे वर्णन | **मनिभद्र इम्पेक्स इंडिया,मुंबई** | | **मिरा एन्टरप्राईजेस, मुंबई** | | **आर.एस. एन्टरप्राईजस, मुंबई** | | **सोमनाथ गंगाधर रासणे संगमनेर** | | **रत्नादिप, नासिक** | | **नवनितलाल अॅण्ड ब्रदर्स, नासिक** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर प्रति किलो रु. | | दर प्रति किलो रु. | | दर प्रति किलो रु. | | दर प्रति किलो रु. | | दर प्रति किलो रु. | | दर प्रति किलो रु. | |
| **अ) स्टेनलेस स्टील-** | | मुळ | सुधारित | मुळ | सुधारित | मुळ | सुधारित | मुळ | सुधारित | मुळ | सुधारित | मुळ | सुधारित |
| ०१ | स्टेनलेसस्टील चौकोणी खणाचे ताटे 310mm x 310 mm किंवा 381 mm x254mm मागणी-२५००० | ३७०.०० | ३७०.०० | ४००.०० | अनुपस्थित | ४५०.०० | अनुपस्थित | ४४१.०० | ४३२.०० | ३४८.०० | **३२३.००** | ३२४.४८ | ३२४.४८ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | स्टे.स्टील ग्लास २००ml (व्यास ७५mm)(३") मागणी-२५००० | --- | --- | --- | अनुपस्थित | ४६०.०० | अनुपस्थित | ४८६.०० | ४७७.०० | ४४०.०० | **३३०.००** | ३३१.७६ | ३३१.७६ |
| ०३ | स्टे.स्टील गोल ताटे (व्यास 355mm) (14") मागणी-१००० | --- | --- | --- | --- | ४६०.०० | अनुपस्थित | ४४१.०० | ४३२.०० | ३५४.०० | **३२०.००** | ३२१.०० | ३२१.०० |
| ०४ | स्टे.स्टील वाटी 100 ml मागणी-४००० | --- | --- | --- | --- | ४६०.०० | अनुपस्थित | ४७३.०० | ४६४.०० | ४३१.०० | **३२९.००** | ३३०.०० | ३३०.०० |
| ०५ | स्टे.स्टील मोठे पातेले (व्यास ११६८ mm x उंची ६१०mm) (४६"x२४") मागणी-३६ | ४८५.०० | ४८५.०० | ५२०.०० | --- | ५५०.०० | अनुपस्थित | ४६४.०० | **४६४.००** | ४८८.०० | ४८८.०० | ४७५.०० | ४७५.०० |
| ०६ | स्टे.स्टील मध्यम पातेले (व्यास 1067 mm x उंची 559 mm) (42"x22") मागणी-१२ | ४८५.०० | ४८५.०० | ५३०.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४५५.०० | **४५५.००** | ४८८.०० | ४८८.०० | ४७५.०० | ४७५.०० |
| ०७ | स्टे.स्टील लहान पातेले (व्यास 610mm x उंची 406mm) (24"x16") मागणी-३० | ४६५.०० | ४६५.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४७७.०० | **४५५.००** | ४८८.०० | ४८८.०० | ४७५.०० | ४७५.०० |
| ०८ | स्टे.स्टील मोठी कढई (उथळ) (व्यास 1372 mm xउंची 381 mm) (54"x15") मागणी-१२ | ४७०.०० | ४७०.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४७३.०० | ४७३.०० | ४७६.०० | ४७६.०० | ४३८.०० | **४३८.००** |
| ०९ | स्टे.स्टील मध्यम कढई (उथळ) (व्यास 1270 mm xउंची 318 mm) (50"x12.50") मागणी-१२ | ४७०.०० | ४७०.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४७३.०० | ४७३.०० | ४७६.०० | ४७६.०० | ४३८.०० | **४३८.००** |
| १० | स्टे.स्टील लहान कढई (व्यास 915 mm xउंची 280 mm) (36"x11") मागणी-१२ | ४५५.००० | ४५५.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४६८.०० | ४६८.०० | ४७६.०० | ४७६.०० | ४३८.०० | **४३८.००** |
| ११ | स्टे.स्टील पराती (व्यास 762 mm xउंची 76 mm) (30"x3") मागणी-२४ | ४९०.०० | ४९०.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४८६.०० | ४८६.०० | ४७६.०० | **४२७.००** | ४२८.०० | ४२८.०० |
| १२ | स्टे.स्टील बादली (12 लि.) (व्यास 350 mm x उंची 290 mm) (14"x12") मागणी-२०० | --- | --- | --- | --- | २१६.०० | अनुपस्थित | १४४.०० | १५३.०० | १५१.०० | **१३८.००** | १३९.०० | १३९.०० |
| १३ | स्टे.स्टील टीप (75 लि.) (व्यास 380 mm x उंची 520 mm) (15"x21") मागणी-३६ | १८०.०० | १८०.०० | २००.०० | अनुपस्थित | २११.०० | अनुपस्थित | १३१.५० | १४८.५० | १३५.०० | १३५.०० | १२८.०० | **१२८.००** |
| १४ | स्टे.स्टील टब (20 लि.) मागणी-५० | १७५.०० | १७५.०० | २००.०० | अनुपस्थित | २१६.०० | अनुपस्थित | १४४.०० | १५३.०० | १५१.०० | १५१.०० | १४०.०० | **१४०.००** |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | स्टे.स्टील कवचे (140 mm x 140 mm) (5.5"x5.5") मागणी-३६ | --- | --- | --- | अनुपस्थित | ३००.०० | अनुपस्थित | ४१०.०० प्र.नग | **४१०.००** प्र.नग | ७००.०० प्र.नग | ७००.०० प्र.नग | १०७१.०० प्र.नग | १०७१.०० प्र.नग |
| १६ | स्टे.स्टील झारे (व्यास 330 mm) (13") मागणी-३६ | --- | --- | --- | अनुपस्थित | ४००.०० | अनुपस्थित | ३४२.०० प्र.नग | **३४२.००** प्र.नग | ५५०.०० प्र.नग | ५५०.०० प्र.नग | ८७२.०० प्र.नग | ८७२.०० प्र.नग |
| १७ | स्टे.स्टील विळी मागणी-२०० | --- | --- | --- | अनुपस्थित | --- | अनुपस्थित | १८०.०० प्र.नग | **१८०.००** प्र.नग | ३३६.०० प्र.नग | ३३६.०० प्र.नग | ३१६.०० प्र.नग | ३१६.०० प्र.नग |
| १८ | स्टे.स्टील ट्रे बर्फासाठी (610 mm x460 mm x उंची 50 mm) (24"18"x"x2") मागणी-१०० | ३२५.०० | ३२५.०० | ३७५.०० | अनुपस्थित | ३००.०० | अनुपस्थित | २२५.०० | २३४.०० | १७१.०० | **१६४.००** | १६५.०० | १६५.०० |
| १९ | स्टे.स्टील तवणी (जिलेबीची) (व्यास 914 mm, उंची 90 mm) (36"x4") मागणी-१२ | ४८५.०० | ४८५.०० | ५००.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४७४.०० | ४७४.०० | ४७६.०० | ४७६.०० | ४४०.०० | **४४०.००** |
| २० | स्टे.स्टील तवणी (जिलेबीची) (व्यास 610 mm, उंची 88 mm) (24"x4") मागणी-६ | ४६५.०० | ४६५.०० | ४९०.०० | अनुपस्थित | ५५०.०० | अनुपस्थित | ४६८.०० | ४६८.०० | ४७६.०० | ४७६.०० | ४४०.०० | **४४०.००** |
| **ब) अल्यूमिनियम/लोखंड/प्लॅस्टीक** | | मुळ दर | सुधारित दर | मुळ दर | सुधारित दर | मुळ दर | सुधारित दर | मुळ दर | सुधारित दर | मुळ दर | सुधारित दर | मुळ दर | सुधारित दर |
| ०१ | ॲल्यू.मोठे पातेले (बुलबुल ब्रँड) (व्यास 1067 mm,उंची 559 mm) (42"x22") मागणी-२४ | --- | --- | --- | --- | ३००.०० | अनुपस्थित | २२५.०० | २३४.०० प्रकाश | २४९.०० | २४९.०० | २२१.०० | **२२१.००** |
| ०२ | ॲल्यू.पराती पातेले (बुलबुल ब्रँड) (व्यास 1219 mm,उंची 152 mm) (48"x6") मागणी-६० | --- | --- | --- | --- | ३००.०० | अनुपस्थित | २२१.०० | **२२१.००** | २३८.०० | २३८.०० | २४३.०० | २४३.०० |
| ०३ | ॲल्यू.पोळपाट व लाटणे (लाकडी लाटणे) (व्यास 370 mm,उंची 60 mm) (15"x2.5") मागणी-२०० | --- | --- | --- | --- | २९०.०० | अनुपस्थित | *पोळपाट २२५.०० प्र.कि. लाटणे १ ते ३६.०० प्रति* | २२५.०० | २३८.०० प्र.नग | **२२४.००** लाकडी लाटणेसह | २३४.००पोळपाट ३०.०० लाटणे | २३४.००पोळपाट ३०.०० लाटणे |
| ०४ | लोखंडी मोठी कढई (वनपीस) (व्यास 1423 mm,उंची 407 mm) (56"x16") मागणी-१२ | --- | --- | --- | --- | ११५.०० | अनुपस्थित | ८८.२० | १०६.०० | ६४.०० | **६२.००** | ६३.०० | ६३.०० |
| ०५ | लोखंडी मध्यम कढई (वनपीस) (व्यास 1321 mm,उंची 356 mm) (24"x4") मागणी-१२ | --- | --- | --- | --- | ११५.०० | अनुपस्थित | ८५.१० | १०३.१० | ६४.०० | **६२.००** | ६३.०० | ६३.०० |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | लोखंडी तळणी कढई (वनपीस) (व्यास 914 mm.उंची 279 mm) (36"x11") मागणी-२४ | ---- | ---- | ---- | ---- | ११०.०० | अनुपस्थित | ८४.२० | १०२.०० | ६४.०० | **<u>६०.००</u>** | ६१.०० | ६१.०० |
| ०७ | प्लॅस्टिक क्रेटस् (निलकमल) (555mmx330mm x उंची 385 mm) (22"x13"x15") मागणी-२५० | ---- | ---- | ---- | ---- | ---- | अनुपस्थित | ८१०.०० प्र.नग | **<u>८०१.००</u>** प्र.नग | ८७५.०० प्र.नग | ८७५.०० प्र.नग | ८५२.०० प्र.नग | ८५२.०० प्र.नग |
| ०८ | प्लॅस्टिक क्रेटस् (चाके असलेले) (787 mmx 559 mm x उंची 406 mm) (31"22"x"x16") मागणी-५० | ---- | ---- | ---- | ---- | ---- | अनुपस्थित | २१३०.०० प्र.नग | **<u>२१२२.००</u>** प्र.नग | ३१५०.०० प्र.नग | ---- | ३२४०.०० प्र.नग | ३२४०.०० प्र.नग |

**यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त अधोरेखित न्यूनतम दर मान्य करण्यात येऊन, संबंधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.**

नविन प्रसादालयाकरिता भांडे खरेदीचे प्रस्तावामध्ये अंदाजे वजन व दर गृहीत धरुन रुपये ८८,८५,०५०/- चे खर्चास मान्यता घेणेत आलेली असून, भांडी खरेदीकामी प्रति किलो प्रमाणे दर मान्य केलेला आहे. प्रति भांड्याचे नेट वजन निश्चित नसलेने निविदेत नमूद केलेल्या मोजमापाची भांडी घेण्यात यावी व त्याकामी मंजूर प्रति किलो/प्रति नगाचे दराने येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चासही मान्यता देण्यात येत आहे. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.०६ मालवाहतुकीकरिता नविन वाहने खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्रं.५६४** दि.२४.०५.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयान्वये, संस्थानचे वाहन विभागाकडे असलेली जुनी कार्यालयीन-३, रूग्णवाहिका-०२ तसेच मालवाहतूक-०२ अशी ०७ वाहनांचा जाहीर लिलावाने विक्री करणेस तसेच एक-टाटा११०९, एक-टाटा४०७ अशी दोन मालवाहतूक वाहने व याचबरोबर एक-महिंद्रा स्कॉर्पिओ व एक-कार्डीयाक रूग्णवाहिका अशी एकुण ०४ वाहने खरेदी करणे कामी येणाऱ्या अंदाजे रू.२० लाख मात्रचे खर्चास तसेच संबंधीत वाहनांच्या कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलाविणेस मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार, जुन्या वाहनांचा जाहीर लिलाव झालेनंतर मालवाहतुकी करीता वाहने अपुरी पडणार असलेने तुर्त एक टाटा ११०९ मालवाहतुक वाहन खरेदी करणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलरकडून जा.नं.एसएसएस/वाहन/९१७७/२००८ दि.२१/०६/२००८ ने खालील प्रमाणे कोटेशन्स बोलावण्यात आले होते.

| <u>**बोलाविण्यात आलेली कोटेशन**</u> | | <u>**प्राप्त झालेली कोटेशन**</u> | |
|---|---|---|---|
| **अ)** | **एक- टाटा११०९ करीता :-** | | |
| ०१. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ०१. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |
| ०२. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ०२. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. |
| ०३. | कांचन मोटर्स, नाशिक. | ०३. | मे.शुभायन मोटर्स,प्रा.लि., अहमदनगर |
| ०४ | मे.शुभायन मोटर्स, प्रा.लि.,अहमदनगर. | | |

दि.१०/०१/२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ९७ अन्वये साईनाथ व साईबाबा हॉस्पिटल, प्रसादालय, भांडार-खरेदी विभाग, पाणीपुरवठा विभाग, लाडूप्रसाद वाहतूक, बांधकाम विभाग, बगीचा विभाग इत्यादी विभागांचे मागणीनुसार मालवाहतूकी करीता वाहने अपुरी पडत असलेने मालवाहतूकीसाठी अडचण येऊ नये या करीता टाटा४०७-०१, टाटा ACE-०१, स्वराज ८५५ ट्रॅक्टर (बाहुबली हायड्रोलिक ट्रेलरसह)-०१ अशी एकूण नवीन तीन वाहने खरेदी करणे व या कामी येणाऱ्या अंदाजे रू.१८ लाख मात्रचे खर्चास तसेच संबंधीत वाहनांच्या कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलाविणेस मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/६८७५ व ६८७६/२००८ दि.०९/०५/२००८ ने खालील प्रमाणे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स बोलावण्यात आलेली आहेत.

| <u>**बोलाविण्यात आलेली कोटेशन**</u> | | <u>**प्राप्त झालेली कोटेशन**</u> | |
|---|---|---|---|
| **ब)** | **एक-टाटा४०७ व एक-टाटा ACE करीता** | | |
| ०१. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ०१. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |
| ०२. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ०२. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. |

०३. कांचन मोटर्स, नाशिक.
०४ मे.शुभायन मोटर्स, प्रा.लि.,अहमदनगर.
०५ ए.डी.एम. मोटर्स, केडगांव, अहमदनगर.

०३. मे.शुभायन मोटर्स,प्रा.लि., अहमदनगर
०४. ए.डी.एम. मोटर्स, केडगांव, अहमदनगर

**क) एक- स्वराज ट्रॅक्टर करीता**

०१. भनसाळी ट्रॅक्टर्स, प्रा.लि.,कोपरगांव
०२. बाफना ॲटोमोबाईल्स, अहमदनगर
०३. शिंगवी ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद
०४. प्रसाद ट्रॅक्टर्स, कोकमठाण.

०१. बाफना ॲटोमोबाईल्स, अहमदनगर
०२. शिंगवी ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद
०३. प्रसाद ट्रॅक्टर्स, कोकमठाण.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली टाटा ११०९ करीता-०३, टाटा४०७ व ACE करीता-०४ तसेच स्वराज ट्रॅक्टर करीता-०३ अशी एकुण १० कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) एक-टाटा ११०९ / ४२ EX HD BS-II वाहनाकरीता कोटेशनमध्ये खालील प्रमाणे देऊ केलेले दर**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नाव | कोटेशन मध्ये वाहनाकरीता दिलेली मुळ किंमत (रू.) |
|---|---|---|
| **०१** | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **८,१७,९९०.००** |
| **०२** | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | ८,१७,५४०.०० |
| **०३** | **मे.शुभयान मोटर्स प्रा.लि., अ.नगर** | **८,१७,९९०.००** |

सदर सभेत मालवाहतुक वाहनांकरीता उपस्थितीत अधिकृत डिलर यांनी टाटा कंपनीचे वाहनांची किंमत दि.०१.०७.२००८ पासून वाढल्याने कोटेशन मधील नमुद केलेले दरामध्ये वाहन देणेस असमर्थता दर्शविली व त्यांनी सदर वाहनांकरीता खालील प्रमाणे नवीन दर दिले.

**एक-टाटा ११०९/ ४२ EX HD BS-II वाहनाकरीता देऊ केलेले नवीन दर :-**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नांव | वाहनाची मुळ किंमत (रू.) | डिस्काऊंट | वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| **०१** | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **८,४५,००१.००** | **५०,०००.००** | **७,९५,००१.००** |
| **०२** | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | अनुपस्थित | - | - |
| **०३** | **मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर** | **८,४५,००१.००** | ३७,००१.०० | ८,०८,०००.०० |

**ब) एक-टाटा ४०७ (SFC ४०७/३१EX२ High Deck) वाहनाकरीता कोटेशनमध्ये खालील प्रमाणे देऊ केलेले दर -**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नाव | कोटेशन मध्ये वाहनाकरीता दिलेली मुळ किंमत (रू.) |
|---|---|---|
| **०१** | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **५,५१,५३५.००** |
| **०२** | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | ५,७०,१३८.०० |
| **०३** | **मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर** | **५,६९,९१३.००** |
| **०४** | **ए.डी.एम. मोटर्स, केडगांव, अहमदनगर** | **-----** |

सदर सभेत मालवाहतुक वाहनांकरीता उपस्थितीत अधिकृत डिलर यांनी टाटा कंपनीचे वाहनांची किंमत दि.०१.०७.२००८ पासून वाढल्याने कोटेशन मधील नमुद केलेले दरामध्ये वाहन देणेस असमर्थता दर्शविली व त्यांनी सदर वाहनांकरीता खालील प्रमाणे नवीन दर दिले.

**एक-टाटा ४०७ (SFC ४०७/३१EX२ High Deck) वाहनाकरीता देऊ केलेले नवीन दर :-**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नांव | वाहनाची मुळ किंमत (रू.) | डिस्काऊंट | वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| **०१** | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **५,६८,५८९.००** | **३०,०००.००** | **५,३८,५८९.००** |
| **०२** | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | अनुपस्थित | - | - |
| **०३** | **मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर** | **५,६८,५८९.००** | १७,०००.०० | ५,५१,५८९.०० |

**क) एक-टाटा ACE (HT) वाहनाकरीता कोटेशनमध्ये खालील प्रमाणे देऊ केलेले दर -**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नाव | कोटेशन मध्ये वाहनाकरीता दिलेली |
|---|---|---|

| | | मुळ किंमत (रू.) |
|---|---|---|
| ०१ | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **२,६४,८३५.००** |
| ०२ | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | २,६६,०७२.०० |
| ०३ | **मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर** | ---- |
| ०४ | **ए.डी.एम. मोटर्स, केडगांव, अहमदनगर** | २,६४,८३४.८९ |

सदर सभेत मालवाहतुक वाहनांकरीता उपस्थितीत अधिकृत डिलर यांनी टाटा कंपनीचे वाहनांची किंमत दि.०१.०७.२००८ पासून वाढल्याने कोटेशन मधील नमुद केलेले दरामध्ये वाहन देणेस असमर्थता दर्शविली व त्यांनी सदर वाहनांकरीता खालील प्रमाणे नवीन दर दिले.

**एक-टाटा ACE (HT) वाहनाकरीता देऊ केलेले नवीन दर :-**

| अ.नं. | निविदाधारक कं.चे नांव | वाहनाची मुळ किंमत (रू.) | डिस्काऊंट | वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | **स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर** | **२,७४,९२९.००** | **१०,०००.००** | **२,६४,९२९.००** |
| ०२ | **स्टर्लिंग मोटर्स, नाशिक** | अनुपस्थित | - | - |
| ०३ | **ए.डी.एम. मोटर्स, केडगांव, अहमदनगर** | २,६४,५००.०० | ११,९९९.०० | २,५२,५०१.०० |

**ड) स्वराज ८५५ SX, (बाहुबली हायड्रोलिक ट्रेलरसह)करीता खालील प्रमाणे कोटेशनमध्ये दर देऊ केले होते.**

| अ. नं. | निविदाधारक कं.चे नाव | तपशिल | वाहनाची मुळ किंमत (रू.) | डिस्काऊंट (रू.) | डिस्काऊंट वजा जाता एकुण किंमत (रू.) | **चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **बाफना ॲटोमोबाईल्स, अहमदनगर** | **ट्रॅक्टर** | **६,०५,०००.००** | **७५,०००.००** | **५,३०,०००.००** | **अनुपस्थित** |
| | | **ट्रेलर** | **१,९५,०००.००** | **०७,०००.००** | **१,८८,०००.००** | |
| | | एकुण | ८,००,०००.०० | ८२,०००.०० | ७,१८,०००.०० | |
| ०२ | **शिंगवी ॲटोमोबाईल्स, औरंगाबाद** | **ट्रॅक्टर** | **६,०१,०००.००** | **८०,०००.००** | **५,२१,०००.००** | **अनुपस्थित** |
| | | **ट्रेलर** | | | | |
| | | एकुण | ६,०१,०००.०० | ८०,०००.०० | ५,२१,०००.०० | |
| ०३ | **प्रसाद ट्रॅक्टर्स, कोकमठाण.** | **ट्रॅक्टर** | **५,८६,०००.००** | **८०,०००.००** | **५,०६,०००.००** | **५,०६,०००.००** |
| | | **ट्रेलर** | **१,८५,०००.००** | **०५,०००.००** | **१,८०,०००.००** | **१,८०,०००.००** |
| | | एकुण | ७,७१,०००.०० | ८५,०००.०० | ६,८६,०००.०० | ६,८६,०००.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ,ब,क व ड तक्त्यातील अधोरेखीत निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा तसेच वाहन ताब्यात मिळाले नंतर संपुर्ण रक्कमेचा डी.डी. देण्यात यावा असें ठरले.** (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.०७ श्रीसाईनाथ रुग्णालयाकरीता कार्यालयीन फर्नीचर खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६५** श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड, कॅबीन व प्रशासकिय कार्यालय इत्यादी ठिकाणी रेकॉर्डस्, मशिनरी, इन्स्ट्रुमेंट्स, सर्जीकल साहित्य इत्यादी ठेवणेकामी कपाटे व कार्यालयीन कामासाठी टेबलची श्री साईनाथ रुग्णालयाने त्यांचे डि. पी. क्रमांक ८००१ दि.०७/०१/२००८ अन्वये कळविले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | मागणी | अंदाजे किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | कपाट साईज : 1981mm x 914mm x 483mm | ७५ नग | ७०००.०० | ५२५०००.०० |
| 2 | लोखंडी टेबल दोन्ही बाजूस ड्रावर असलेला सनमाईका टॉप साईज : 1370mm L x 675mm W x 750mm H | २५ नग | ६५००.०० | १६२५००.०० |
| | | | एकुण - | ६८७५००.०० |

उपरोक्तप्रमाणे कार्यालयीन फर्नीचर खरेदीकामीचा अंदाजे रु. ६,८७,५००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. २४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२००८ निर्णय क्र. १८० अन्वये सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी दैनिक सामना - पुणे, इंडीयन एक्सप्रेस - मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१८/०३/२००८ ते दि.०२/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम

मुदत दि.०४/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०५ बंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या -

१. M/s. Rijhumal Thakurdas Karachiwala, Ahmednagar
२. M/s. Sai Enterprises, Shrirampur
३. M/s. Seva Finvest (I) Pvt.Ltd., Nashik
४. M/s. Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune
५. M/s. Magnum Office - Aids, Mumbai

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद निविदा दि. १५/०४/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत, तसेच मे. खिरा स्टिल वर्क्स प्रा. लि, अहमदाबाद यांचे कोटेशन हे दि. ०७/०४/२००८ रोजी संस्थानचे प्रशासन शाखेकडे उघडलेल्या स्थितीत प्राप्त झालेले आहे. मे. खिरा स्टिल वर्क्स प्रा. लि, अहमदाबाद यांनी पावती क्र. २५१६५ दि. २७/०६/२००८ अन्वये संस्थानची निविदा विकत घेतली होती, परंतु त्यांनी कोटेशनसोबत संस्थानची निविदा व १ टक्का अनामत रक्कम देखील दिलेली नाही. सदरचे कोटेशन तुलनात्मक दरांसाठी फक्त विचारात घेतलेले आहे.

उपरोक्त प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये मे. आर.टी.कराचीवाला-अहमदनगर, मे. गोदरेज ॲन्ड बॉयसी कं.-पुणे व मे. सेवा फाईनवेस्ट, नाशिक यांनी फक्त गोदरेज कंपनीच्या फर्नीचरचे दर दिलेले आहेत, तर मे. मॅग्नम ऑफीस, पुणे यांनी त्यांचे स्वतःचे दर दिलेले आहेत व मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांनी गोदरेज व आणखी एका दुसऱ्या कंपनीचे दर दिलेले आहेत.

त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | एकुण खर्च रु. |
|---|---|---|
| १ | मे. मॅग्नम ऑफीस, पुणे | रु. ६,४६,८७५/-(स्वतःचे) |
| २ | मे. आर. टी. कराचीवाला, अहमदनगर | रु. ११, २४,०१६.२५(गोदरेज कंपनी) |
| ३ | मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | रु. ११,०१,५६२.५०(गोदरेज कंपनी)<br>रु. ६,६९,३७५/-(दुसरी कंपनी) |
| ४ | मे. गोदरेज ॲन्ड बॉयसी कं.- पुणे | रु. १०,२५,१००/-(गोदरेज कंपनी) |
| ५ | मे. सेवा फाईनवेस्ट, नाशिक | रु. ११,३६,३२५/-(गोदरेज कंपनी) |
| ६ | मे. खिरा स्टिल वर्क्स प्रा. लि, अहमदाबाद | रु. १५,०७,५७९.५०(स्वतःचे) |

सदरहू निविदाधारकांना फर्नीचरचा नमुना घेऊन आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांची चर्चा/वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नाव** | **निविदेमधील दर रु** | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. मॅग्नम ऑफीस, पुणे | रु. ६,४६,८७५/-(स्वतःचे) | अनुपस्थित |
| ०२ | मे. आर. टी. कराचीवाला, अहमदनगर | रु. ११, २४,०१६.२५(गोदरेज कंपनी) | १२,८०,७५०.०० |
| ०३ | मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | रु. ११,०१,५६२.५०(गोदरेज कंपनी)<br>रु. ६,६९,३७५/-(दुसरी कंपनी) | १२,६३,२५०.००<br>-- |
| ०४ | मे. गोदरेज ॲन्ड बॉयसी कं.- पुणे | रु. १०,२५,१००/-(गोदरेज कंपनी) | अनुपस्थित |
| ०५ | मे. सेवा फाईनवेस्ट, नाशिक | रु. ११,३६,३२५/-(गोदरेज कंपनी) | १२,८८,३००.०० |
| ०६ | मे. खिरा स्टिल वर्क्स प्रा. लि, अहमदाबाद | रु. ५,०७,५७९.५०(स्वतःचे) | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.साई एंटरप्रायजेस,श्रीरामपूर यांची निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०८** **श्रीसाईबाबा रुग्णालयात न्युरो ओ.टी. साठी मशिनरी /उपकरणे, फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.०९** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी सन २००८-२००९ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६७** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २००८-२००९ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामीचा अंदाजे रु. ११,२३,९१,६५५/- चे खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेतील मंजुरीनुसार वार्षिक औषधे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र देखील पाठविण्यात यावे, असे ठरले होते.

त्यानुसार उपरोक्त वार्षिक औषधे खरेदीकामी दैनिक टाईम्स ऑफ इंडिया - मुंबई आवृत्ती, दैनिक सकाळ - पुणे (टुडे) आवृत्ती, लोकसत्ता- मुंबई आवृत्ती, लोकमत -औरंगाबाद (शहर) आवृत्ती, दैनिक सामना - मुंबई आवृत्ती, दैनिक पुढारी - कोल्हापूर आवृत्ती इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात

प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दि.२३/०४/२००८ ते दि. १३/०५/२००८ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेले होते. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५/०५/२००८ अखेर ठेवण्यात आलेली होती. तसेच एकुण २१३ कंपन्याना इकडील पत्र क्र.५८१८ दि. १७/०४/२००८ अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करणेबाबत कळविण्यात आले होते.

शिर्डी येथील कार्यालयात १७५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तर मुंबई येथील कार्यालयात १२५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण २६२ निविदांची विक्री झालेली होती व १७६ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्या दि.२५/०४/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे . त्यातील M/s.Nero Fire Services, Aurangabad ही निविदा बांधकाम विभागाची असल्यामुळे ती त्यांना देण्यात आलेली आहे तर उर्वरीत १७५ निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात जीवनदायी योजने अतंर्गत बायपास, अॅन्जीओप्लास्टी इत्यादी शस्त्रक्रिया होत असतात. यापूर्वी जीवनदायीचे योजनेची उपसंचालक (Deputy Director) - नाशिक यांचेकडून मंजुरी प्राप्त झाल्यानंतर शस्त्रक्रिया करण्यात येत होत्या. परंतू महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाशल्य चिकीत्सक यांना माहे - एप्रिल २००८ पासून अधिकार प्रदान केलेले आहे तसेच महाराष्ट्र शासनाने दि.०२/०४/२००८ च्या निर्णयान्वये दारिद्रय रेषेखालील रुग्णांसाठी पात्रतेची अट शिथिल केलेली असून (पिवळे रेशनकार्ड नसल्यास किंवा दारिद्रय रेषेचा दाखला नसल्यास) तहसीलदाराचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला रु.२०,०००/- चे आतील असल्यास जीवनदायी योजनेस सदर रुग्ण पात्र समजण्यात येईल. त्यामुळे रुग्णांच्या संख्येत गत वर्षापेक्षा तीन पट वाढ होण्याची शक्यता आहे. तेंव्हा कार्डीयाक व कॅथलॅब विभागातील शस्त्रक्रियेचे व शस्त्रक्रियेनंतरचे उपचारासाठी लागणारी औषधे / सर्जीकल साहित्य इत्यादीमध्ये वाढ सुचवावी लागणार आहे. कारण वार्षीक मागणी ही एप्रिल - २००८ पुर्वी निश्चित करण्यात आलेली होती.

तरी कार्डीयाक, कॅथलॅब व वार्डमधील शस्त्रक्रियेनंतर उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी लागणारे औषधे सर्जीकल साहित्य इत्यादीमध्ये वाढ सुचविण्यास व उपरोक्त निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आलेले होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त मागणी करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या व्यतिरिक्त जर जादा औषधांची गरज भासल्यास मुळ मागणीच्या २५ % इतकी औषधे मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीने खरेदी करावीत. तसेच औषधे खरेदीकामी नामांकित कंपन्यांची शिफारस करण्यात यावी. पुरवठा आदेश देण्यापूर्वी सर्वश्री मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, श्री.पांडूरंग गमाजी अभंग,श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांच्या समितीचे मार्गदर्शन घेऊन त्यानंतर पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१०** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील मालमत्तेची विमा पॉलिसी घेणेकामी आलेल्या कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.५६८** (अ) दरवर्षी श्री साईबाबा सस्थानच्या दोन्ही हॉस्पिटलांच्या मालकीच्या चल-अचल मालमत्तेचा विमा उतरविण्यात येतो, मागील वर्षी युनायटेड इंडिया इन्सुरन्स कं. लि. कोपरगांव, यांचेकडुन दि. १० जुलै २००७ ते ९ जुलै २००८ या कालावधीसाठी दोन्ही हॉस्पिटलांच्या मालमत्तेचा विमा उतरविण्यासाठी स्पर्धात्म दर पध्दतीनुसार प्रिमीयम स्वरुपात रु. १,६३,७४०/- इतकी प्रिमीयम रक्कम अदा करुन सर्व चल-अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ चे कलम ३ नुसार सर्व हॉस्पिटल कर्मचा-यांचा सामुहिक विमा उतरविण्यात आला होता. या विम्याची मुदत दि. ९ जुलै २००८ रोजी संपत आहे. तरी पुढील दि. ९ जुलै २००९ अखेर पर्यंतच्या एका वर्षासाठी मा.व्य.समितीचे आजचे सभे समोर प्रस्तावीत करण्यात येत आहे.

ब) यासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना पॉलिसी साठी आवश्यक असलेली सर्व माहितीसह, पत्र देवुन या कंपन्यांच्या प्रतीनीधिंना आजचे सभेसमोर अंतीम दर पत्रक सादर करणेसाठी उपस्थित राहण्याची विंनती करण्यात आली आहे. या राष्ट्रीयकृत विमा कंपन्या खालील प्रमाणे:-

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१ | दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपुर |
| ०२ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा शिर्डी |
| ०३ | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी शाखा, संगमनेर |
| ०४ | नॅशनल इन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव |

आजचे सभेत उपरोक्त कंपन्यांचे उपस्थित प्रतिनिधीं बरोबर समक्ष चर्चा करुन या कंपन्यांना त्यांची अंतीम दरपत्रके बंद पाकिटात सादर करणेस सांगणेत येऊन, याबाबत पुन्हा चर्चा- तथा-

वाटाघाटी करणेत येणार नाहीत, असे स्पष्ट करुन, या कंपन्यांना सारासार विचार करुन न्यूनतम दर नमुद करण्यास सुचित करण्यात आले. प्रतिनिधींनी दिलेली दरपत्रके लागलीच मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला, तो खालीलप्रमाणे-

| अ.नं | कंपनीचे नाव | अंतिम देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर | २,३१,४१४.०० |
| ०२ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा शिर्डी | १,४१,०००.०० |
| ०३ | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर | २,३६,८०४.०० |
| ०४ | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव | २,६१,७२९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरले.(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**विषय नं.११ ग्रंथालय (लायब्ररी) सुरु करणेकामी Books व Journals खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत**

**निर्णय क्र.५६९** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ग्रंथालय (लायब्ररी) सुरु करणेकामीचा अंदाजे रु.२५,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि. २८/०७/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समिती सभेच्या मंजुरी अन्वये ग्रंथालयासाठी लागणाऱ्या Books व Jouranls करीता इकडील पत्र क्र. ६११३ दि. २६/०४/२००८ अन्वये एकुण १७ पुरवठा धारकांकडून दि. २०/०५/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन १० कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Name of Suppliers |
|---|---|
| 1 | Vikas Medical Book House, Mumbai |
| 2 | Ahuja Book Company Pvt. Ltd., New Delhi |
| 3 | Creative Books & Periodicals Pvt. Ltd., Mumbai |
| 4 | K.M. Varghese Co., Mumbai |
| 5 | Jaypee Brothers Medical Publishers (P) Ltd.,, Mumbai |
| 6 | B.I. Publications Pvt. Ltd., Mumbai |
| 7 | International Book House Pvt., Mumbai |
| 8 | नाव नसलेले बंद कोटेशन |
| 9 | Researcho Periodicals Organisation, New Delhi (प्रशासनशाखेकडून टपालात उघडून आलेले) |
| 10 | Researcho Book Centre, New Delhi (प्रशासनशाखेकडून टपालात उघडून आलेले) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१२ कॅथलॅब विभागासाठी ३D Angiographic Image system & Injection system for Catheterization Laboratory खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.५७०** श्री साईबाबा रुग्णालयात दैनंदिन Angiography, Angioplasty करणेसाठी विविध प्रकारचे Contrast लागतात. सदर Contrast हे महागडी असतात. त्यांची अंदाजे किंमत रु.१,०००/- पासून १,६००/- पर्यंत असते. त्यामुळे सदर Contrast चा कमीत कमी वापर व्हावा व आर्थिक खर्च कमी व्हावा यासाठी डॉ. धर्माधिकारी व डॉ. बजाज, कार्डीओलॉजीस्ट यांनी उपरोक्त सिस्टीमची मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे सिस्टीम खरेदीकामीचा अंदाजे रु.२७,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२४/०२/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०२/२००८ निर्णय क्र. १७५ अन्वये सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी दैनिक सामना - पुणे, इंडीयन एक्सप्रेस - मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१८/०३/२००८ ते दि.०२/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ व मुंबई कार्यालयात ०७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०४/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०२ बंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या -

01..M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai
02.M/s. Schiller Healthcare (I) Pvt.Ltd., Mumbai

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे सदर खरेदीकामी दि. १२/०४/२००८ चे टिपणीन्वये जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन फेर निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदरचे मंजुरी अन्वये उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - पुणे, लोकमत - औरंगाबाद, गुजराथ समाचार - अहमदाबाद या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०८/०५/२००८ ते दि.२२/०५/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२४/०५/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ११ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ६५९२ दि. ०६/०५/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली आहे, ती खालीलप्रमाणे-

01.M/s. Pulmotronics, Mumbai

उपरोक्तप्रमाणे दोन्ही जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ३ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदा त्या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांना दाखवून त्यांचा अभिप्राय घेऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१३ Laparoscopic Instrument Vessel Sealing System, Harmonic Scalpel Set खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.५७१** श्रीसाईबाबा रुग्णालयातील जनरल शस्त्रक्रिया गृहामध्ये ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपीक शस्त्रक्रिया करणेसाठी सदर विभागाने त्यांचे डि.पी.क्र.६३१२ दि.०५/१२/२००७ अन्वये उपरोक्त इन्स्ट्रुमेंट / उपकरणे यांची मागणी केलेली आहे. तसेच विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया ह्या Electricity न वापरता Ultra Sonic Energy वापरुन करता येतात. त्यामुळे सर्जरी करते वेळी हे उपकरण रक्तांच्या पेशींचे कमीत कमी नुकसान करते. त्यासाठी त्यांनी Laparascopic Instruments, Haromonic Scalpel व Vessel Sealing System Set ची मागणी केलेली होती.

त्यानुसार उपरोक्त इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीचा व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३५,४१,८७५/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.१६/०३/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी निर्णय क्र. २३२ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात १७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण १५ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ५७२७ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१ | M/s.Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai |
| ०२ | M/s.Genesi s Healthcare, Mumbai |
| ०३ | M/s.Creative Surgicals Mfg.Co., Mumbai |
| ०४ | M/s. Esbee Dynamed Pvt.Ltd., Mumbai |
| ०५ | M/s. Bio-Medicon, Mumbai |

उपरोक्त ५ निविदांव्यतिरिक्त मे.स्पदंन एंटरप्राईजेस,नाशिक व कार्डिओटेक,पुणे यांच्या दोन निविदा जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या होत्या, परंतू त्या यादीमध्ये समाविष्ट करावयाच्या राहिल्याने त्या देखील आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या अशा एकूण ७ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदा त्या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांना दाखवून त्यांचा अभिप्राय घेऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१४ श्रीसाईनाथ रुग्णालयात लेजर सर्जरी इक्वीपमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.५७२** श्री साईनाथ रुग्णालयातील नाक, कान, घसा या विभागात सध्या सर्वसाधारण प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. इतर मोठ-मोठ्या नामांकित रुग्णालयात नाक, कान, घसा या लेजर सर्जरीज केल्या जातात, अशा या अत्याधुनिक लेजर सर्जरीमुळे रुग्णांची सर्जरी करणे अतिशय सोपे झालेले आहे. यामुळे रुग्णांस त्रास कमी होतो व वेळही कमी लागतो तसेच रक्त कमी जाते. अतिशय अवघड

शस्त्रक्रिया या लेजर पध्दतीने केल्या जातात, व शस्त्रक्रिया यशस्वितेचे प्रमाण देखील जास्त असते. तेंव्हा श्री साईनाथ रुग्णालयात लेजर शस्त्रक्रिया करावयाचा प्रस्ताव आहे.

लेजर सर्जरी इक्विपमेंटने नाक, कान, घसा या विकारावर खालील शस्त्रक्रिया केल्या जातात.

| | |
|---|---|
| 01 | Ear Surgery for Polyp, Vascular Tumors, Otosclerosis. |
| 02 | Nasal Surgery - Endoscopic Assisted Laser DCR, Turbinectomy, Polyp, Removal Choanal atresia. |
| 03 | Throat Surgery Tonsil, Mucosal Tumors, Leucoplakiya etc. |
| 04 | Laryngeal surgery Vocal cord Polyps, Vocal Nodules, Vocal Cord Paralysis. |

त्यानुसार श्री साईनाथ रुग्णायातील नाक, कान, घसा या विभागासाठी लेजर सर्जरी इक्विपमेंट खरेदी कामी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.१६/०३/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी निर्णय क्र. २३४ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ०७ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ५७२८ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| 01 | M/s. Lancer Medical Technical Pvt.Ltd., Ahmedabad |
| 02 | M/s. Shailteo, Mumbai |
| 03 | M/s. Biolitec India Pvt.Ltd., Vadodara , Baroda |
| 04 | M/s. Advanced Clinical Research (P) Ltd., Bangalore |

तरी उपरोक्तप्रमाणे जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ४ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदा त्या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांना दाखवून त्यांचा अभिप्राय घेऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१५** **गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र.५७३** दि.१७ जुन २००८ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **तपशील** | **मुदतपूर्तीचा दिनांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | आंध्रा बँक शिर्डी (नित्यप्रसादालय) | ०६/०६/२००८ | ६१,११,१८२.०० |
| २ | बँक ऑफ बरोडा, नाशिक (Forex) | १५/०६/२००८ | १,१०,३८,१२९.०० |
| ३ | आंध्रा बँक, शिर्डी | १५/०६/२००८ | २,२०,७६,२६०.०० |
| ४ | बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | १६/०६/२००८ | २,२०,८२,३०६.०० |
| ५ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | १६/०६/२००८ | १,१०,३८,१२९.०० |
| ६ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १७/०६/२००८ | २,२०,८२,३०६.०० |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १७/६/२००८ | २,२०,८२,३०६.०० |
| | माहे जुन २००८ अखेर बचत खाती गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण -** | **१६,६५,१०,६१८.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. १७.००** कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होती. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-०६ व २००६-०७ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले होते :-

| | |
|---|---|
| ०१. युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०२. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०३. आंध्र बँक, शिर्डी | ०४. स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव |
| ०५. बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | ०६. बँक ऑफ बरोडा, नासिक |
| ०७. बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ०८. विजया बँक, शिर्डी |

यापुर्वी गुंतवणुक केलेल्या रकमांच्या मुदती अनुक्रमे दि.१५-१६-१७/६/२००८ रोजी पूर्ण होत असल्याने व या कालावधीत व्यवस्थापन समितीची सभा नसल्या कारणाने उपलब्ध रक्कम रु.१७

कोटीची गुंतवणूक करणेकामी मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने वरीलप्रमाणे सेवा देणा-या राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागविण्यात आले होते. त्यानुसार बँक बरोडा, कोपरगांव, बँक ऑफ बरोडा, नासिक व विजया बँक, शिर्डी यांनी १ वर्षाकरीता ९.१५ % इतका सर्वात जास्त व्याजदर देऊ केल्याने मा.अध्यक्षसाो यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे गुंतवणूक करण्यात आलेली आहे.

**( अ )** वरील अ.नं. १ अन्वये आंध्र बँक, शिर्डी यांचेकडे एकूण रु.५५ लाख इतकी रक्कम तीन वर्षासाठी गुंतविण्यात आली होती. त्याची मुदत दि.६/६/२००८ रोजी पूर्ण झालेली होती. नित्यप्रसादालय या योजनेंतर्गत सदरची रक्कम ही त्यांचेकडेच गुंतवावी लागणार असल्याने व्याजदराचे तपशीलात दर्शविल्याप्रमाणे आंध्रबँक, शिर्डी यांनी ३ वर्षाकरीता ९ % इतका व्याजदर देऊ केलेला असल्याने मुदतीनंतर मिळणारी रक्कम रु.६१,११,१८२/- आंध्र बँक, शिर्डी यांचेकडे ३ वर्षासाठी पुनर्गुंतवणूक करण्यात आलेली आहे.

**( ब )** उर्वरित रक्कम रु.१६.५० कोटीची गुंतवणूक ही समप्रमाणात, बँक ऑफ बरोडा, कोपरगांव, बँक ऑफ बरोडा, नासिक व विजया बँक, शिर्डी यांचेकडे प्रत्येकी रुपये ५.५० कोटी मात्र १ वर्षाकरीता ९.१५ % या व्याजदराने करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त **"अ"** व **"ब"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या गुंतवणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**विषय नं.१६ भक्तांचे निवासी खोल्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष स्वरुपाच्या देणगी योजनेबाबत.**

**निर्णय क्र.५७४** भक्तांचे निवासी खोल्यांसाठी विशेष स्वरुपाची देणगी योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेसाठी देणगी स्वीकारतांना एका भक्ताकडून रु.४ लाख अथवा प्रत्येक भक्तांकडून प्रत्येकी १ लाखाचे पटीत भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकामासाठी देणगी स्विकारण्यात यावी, असे ठरले होते.

या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या देणगीदारांचे नांव (Name Plate) खोल्यांना देण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्यासाठी नव्यानेच श्री साईबाबा धर्मशाळेशेजारी व्दारावती नावाने भक्त निवासस्थान प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. या इमारतीमध्ये एकूण ३२० खोल्या असल्याचे बांधकाम विभागाकडून सांगण्यात आलेले आहे.

पैकी नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) साठी जमा झालेल्या देणगीदार भक्तांची नावे देऊन झाल्यानंतर उर्वरीत प्रतिक्षा यादीत असलेल्या भक्तांचे नांवे देण्यासाठी एकूण ४३ खोल्या वजा जाता या इमारतीमध्ये एकूण २७७ खोल्या उरलेल्या आहेत.

त्याअनुंषगाने, दि.३१ मे २००८ अखेर विषयांकीत योजनेअंतर्गत (रोख स्वरुपात, चेक/डी.डी.व्दारे, परदेशी चलनाव्दारे, क्रेडीटकार्डव्दारे व मुंबई कार्यालयात जमा झालेली एकत्रित मिळून) साधारणतः रक्कम रुपये १०,९७,५०,९७९.८७ मात्र प्राप्त झालेली आहे.

उपरोक्तप्रमाणे एकूण प्राप्त झालेली रक्कम भागीले ४ लाख (प्रती खोलीसाठी) याप्रमाणे एकूण २७५ खोल्यांसाठीची देणगी पूर्ण झालेली असून, आता फक्त २ खोल्यांसाठी देणगी रक्कम स्विकारता येईल. परंतु, या प्रकल्पांतर्गत देणगी देणाऱ्या देणगीदाराचा ओघ पाहता आज अखेरपर्यंत चेक/डीडी (In Transit) आणि रोख स्वरुपात प्राप्त होणाऱ्या देणगीदारांसाठी उर्वरीत खोल्या पूर्ण होतील. या योजनेअंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त रक्कम जमा झाल्यास अडचणी येतील.

दिनांक ३१ मे, २००८ अखेर जमा झालेल्या रकमेसंदर्भातील देणगीदार भक्तांच्या नावांची यादी पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे पाठविण्यात येत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, सदर योजनेअंतर्गत प्राप्त होणारी देणगी दि.१० जून, २००८ रोजीपासून स्थगीत करण्यात आलेली आहे. याची नोंद घेणेसाठीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदर योजने अंतर्गत प्राप्त होणारी देणगी स्वीकारणे स्थगित करण्याऐवजी संस्थानच्या भविष्य काळातील नियोजित प्रकल्पांसाठी एका खोलीसाठी रुपये ५ लाखाप्रमाणे देणगी स्वीकारणेत यावी. यामध्ये किमान रुपये १ लाखची टप्प्याटप्प्याने देणगी घेण्यात यावी. सदर देणगी दिलेल्या साईभक्तांची प्रतिक्षा यादी तयार करुन वेळोवेळी पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे कळविण्यात यावी. देणगीदार साईभक्तांच्या नेमप्लेट बांधकाम विभागामार्फत तयार करुन वेळोवेळी पूर्ण होणाऱ्या भक्तनिवास इमारतीच्या खोल्यांना लावण्यात याव्यात. यासाठी येणाऱ्या सर्व आवश्यक खर्चास बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकातुन खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

रुपये ५ लाख देणगी देणाऱ्या भक्तांसाठी वर्षातुन १२ दिवस संस्थानच्या सोयीनुसार निवासाची व्यवस्था करण्यात यावी,असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१७ शैक्षणिक संकुलासाठी क्रिडांगण तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.५७५** संस्थानचे शैक्षणिक सुंकलाकरीता स.नं. १०७ चे वाहन विभागाचे पूर्वकडील मैदान वापरणेत येत होते. परंतू सदर ठिकाणी साईआश्रम प्रकल्प सुरु करणेत आल्याने शैक्षणिक संकुलाकरीता क्रिडांगण तयार

करणे आवश्यक आहे. सदरचे क्रिडांगण स.नं. १०७/१,२ व १०९ मधील अधिकारी निवासस्थानचे पुर्वेकडील जागेत तयार करता येईल.

सदर क्रिडांगणामध्ये खालीलप्रमाणे विविध खेळांचे समावेश करणेबाबत शैक्षणीक संकुलाकडील क्रिडा शिक्षकांनी कळविले आहे.

| | |
|---|---|
| ०१ | रनिंग करीता २०० मीटरचा ट्रॅक |
| ०२ | व्हालीबॉल करीता १८ मी. x ९ मीटरचे ०२ ग्राउंड |
| ०३ | बास्केट बॉल करीता ३० मी x २० मीटरचे ग्राउंड |
| ०४ | कबड्डी करता २४ मी x २० मीटरचे ग्रांउड |
| ०५ | खो - खो करीता २९ मी x १६ मी. चे ग्राउंड |
| ०६ | उंच - उड्डी करीता ३ मी.x७ मी. चा खड्डा |
| ०७ | क्रिकेट |

उपरोक्तप्रमाणे सुविधांचा क्रिडांगणामध्ये समावेश करुन ५,२३२.०० चौ. मी. जागेत क्रिडांगण तयार करणेकामी ग्राउंडचे लेव्हलींग करणे, मुरुम व पोयटा टाकणे, आवश्यक तेथे लाल माती टाकणे बांधकाम करणे इ. कामे करावी लागणार आहेत. याकामी अंदाजे रुपये मात्र ७,१५,३३४.०० खर्च अपेक्षीत आहे. याकरीता संस्थान आर्किटेक्ट श्री. निकम पा. श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल.

तरी याकामी स.नं. १०७/१,२ व १०९ मध्ये शैक्षणिक संकुलाकरीता क्रिडांगण तयार करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ७,१५,३३४.०० मात्रचे खर्चास तसेच आर्किटेक्ट मे. निकम पाटील, श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेऊन निवीदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच क्रिडांगणास चेनलिंक जाळीचे फेन्सींग व गेट करण्यात यावे,याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१८** **शिर्डी बस स्थानक विकसित करणे बाबत**

**निर्णय क्र.५७६** **(अ)**श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या माध्यमातून व आर्थिक सहाय्यातून अद्ययावत सेवा-सुविधायुक्त असे बसस्थानक उभारणेबाबतचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ या दोन्ही संस्थांच्या विविध निर्णयान्वये विचाराधीन आहे तसेच सदरहू प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे.

या अनुषंगाने विस्तृत निर्णय घेणेकामी दिनांक ०८ डिसेंबर, २००७ रोजी मा.व्यवस्थापन समिती व मरामापम यांची संयुक्त सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदरहू सभेतील निर्णयाबाबत मरामापमच्या दिनांक १९ डिसेंबर, २००७ रोजीचे सभेत संस्थान निर्णयाच्या पृष्टयर्थ जो ठराव पारित करण्यात आला, त्यामध्ये असणाऱ्या तफावतीबाबत पुन्हा एकदा दिनांक ०१ एप्रिल, २००८ रोजी विधानभवन, मुंबई येथे संस्थानचे मा.अध्यक्ष, मा.व्यवस्थापन समिती सदस्य, कार्यकारी अधिकारी, वास्तुशास्त्रज्ञ तसेच मरामापम यांचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मुख्य स्थापत्य अभियंता, कार्यकारी अभियंता आदि उपस्थित होते. सदरहू बैठकीत शिर्डी येथील नियोजित बसस्थानकाचे बांधकामाविषयी चर्चा करण्यात येऊन सुधारीत निर्णय घेण्यात आला.

**(ब)** सदरहू बैठकीतील सुधारीत निर्णयाची माहिती मरामापम यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक राप/स्थाअ/ कामे/२३७६, दिनांक २० मे, २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेली आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

**(ब-१) महामंडळास विनामुल्य बांधून मिळणारे क्षेत्र**

| | | |
|---|---|---|
| ०१. | तळमजला | बसस्थानक जोता क्षेत्रफळ १४७० चौरसमीटर |
| ०२. | पहिला मजला | क्षेत्रफळ ३६ चौ.मी. (जिना व लिफ्ट) |
| ०३. | दुसरा मजला | क्षेत्रफळ ३६ चौ.मी. (जिना व लिफ्ट) |
| ०४. | तिसरा मजला | जोता क्षेत्रफळ १२५८ चौ.मी. ज्यामध्ये चालक वाहक विश्रांतीगृह व अधिकारी विश्रांतीगृह याचा समावेश आहे. |

**महामंडळास बांधकाम करुन मिळणारे एकूण जोता क्षेत्रफळ : २८०० चौरस मीटर**

**(ब-२) संस्थानला स्वखर्चाने बांधून वापरण्यासाठी देण्यात येणारे क्षेत्र :**

| | | |
|---|---|---|
| ०१. | तळमजला | जोता क्षेत्रफळ १२२ चौ.मी. ज्यामध्ये माहितीकेंद्र, इतर सुविधा व दुकान यांचा समावेश आहे. |
| ०२. | पहिला मजला | साईभक्तांसाठी डॉर्मेटरी जोता क्षेत्रफळ १२१६ चौरस मीटर |
| ०३. | दुसरा मजला | साईभक्तांसाठी डॉर्मेटरी जोता क्षेत्रफळ १२१६ चौरस मीटर |
| **संस्थानला वापरणेस मिळणारे एकूण क्षेत्रफळ** | | **२५५४ चौरस मीटर** |

**महामंडळ व संस्थान मिळून असणारे एकूण बांधकाम क्षेत्रफळ : ५३५४ चौरस मीटर**

**(ब-३)** सदरहू पत्रात संस्थानचे वास्तुशास्त्रज्ञ यांनी सादर केलेल्या नकाशास तात्विक मंजुरी देण्यात आली आहे. तथापि शिर्डी येथे तिसऱ्या मजल्यास बांधकाम परवानगी न मिळाल्यास प्रस्तावित बांधकामातील दुसऱ्या मजल्यावरील सर्व क्षेत्र (सुमारे १२५० चौमी) महामंडळास चालक/वाहक विश्रांतीगृह व अधिकारी विश्रांतीगृह यांच्यासाठी वापरण्यात येईल व त्याबदल्यात संस्थानला कोणतेही अतिरिक्त क्षेत्र मिळणार नाही, असे नमूद करण्यात आलेले आहे.

महामंडळाने पारित केलेल्या निर्णयानुसार मरामापम व संस्थानला मिळणारे क्षेत्रफळ हे अंदाजित असून त्यामध्ये प्रत्यक्ष नगररचना कार्यालयाकडून मंजूर होणाऱ्या बांधकाम आराखडयानुसार क्षेत्रफळात थोडाफार फरक पडू शकतो, असे मत आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्यानुसार, संस्थान निधीतून शिर्डी येथे अद्ययावत बसस्थानक उभारणेबाबत संस्थान आर्किटेक्ट मे.काब्रे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी तयार केलेल्या सुधारीत बांधकाम आराखडयानुसार बांधकाम करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च येईल असे कळविले आहे:

**BLOCK ESTIMATE FOR S.T. STAND DEVELOPMENT PROJECT AT SHIRDI.**

| Sr.No. | Particulars | Total Cost (Rs.) |
|---|---|---|
| **(A)** | Bus station - S.T. Premises.<br>Ground floor : 1472.30 sqm.x @ Rs. 11000/sqm.<br>First floor : 40.56 sqm.x @ Rs. 11000/sqm.<br>Second floor : 40.56 sqm.x @ Rs. 2311000/sqm.<br>Third floor : 1244.40 sqm.x @ Rs. 11000/sqm. | <br>16195300.00<br>446160.00<br>446160.00<br>13688400.00 |
| | **Total : 2797.82 sqm.** | **30776020.00** |
| **(B)** | **Shri Saibaba Sansthan Trust** **ऱ Premises.**<br>Ground floor : 122.60 sqm. x @ Rs. 11000/sqm.<br>First floor :1209.14 sqm. x @ Rs 11000/sqm.<br>Second floor : 1214.44 sqm. x @ Rs. 11000/sqm. | <br>1348600.00<br>13300540.00<br>13358840.00 |
| | **Total :2546.18 sqm.** | **28007980.00** |
| | Total built up area (A+B ) = **5344.00sqm.**<br>Total construction cost (A+B ) | **58784000.00** |
| **(C)** | **Site Development cost** | |
| 1 | Panpoi | 125000.00 |
| 2 | Pavement 7000.00 sqm. @ Rs. 1000/ sqm. | 7000000.00 |
| 3 | Compound wall 1225.00 rgm. @ Rs. 1000/rgm. | 1347500.00 |
| 4 | H.p. Culvert near Entrance 900 mm dia. Pipes | 125000.00 |
| 5 | Drainage & under ground water tank | 625000.00 |
| 6 | Development charges | 415000.00 |
| 7 | Electrification & Transformer | 5878400.00 |
| 8 | Garden landscape & parking | 250000.00 |
| 9 | Demolition of Existing bus stand | 500000.00 |
| | **Total** | **16265900.00** |
| | Total cost -(A+B)+C = 58784000 + 16265900 | 75049900.00 |
| | **Total Approximate cost of the project :** | **75049900.00** |

उपरोक्त खर्चात आर्किटेक्ट फीचा समावेश नाही. आर्किटेक्ट फीसाठी २ टक्के प्रमाणे अंदाजे रुपये १५,००,९९८/- मात्र इतक्या खर्चासह सदरहू प्रकल्पास एकूण अंदाजे रक्कम रुपये ७,६५,५०,८९८/- मात्र इतका खर्च येईल.

सदरहू नियोजित बसस्थानक प्रकल्प बांधकामाची थोडक्यात माहिती व वैशिष्टये खालील प्रमाणे :

| Sr.No | Description | Specifications |
|---|---|---|
| 01 | STRUCTURE | R.C.C. frame structure |
| 02 | BRICK WORK | a) 23 cm. thk. walls.,<br>b) 10 cm. thk.walls. |
| 03 | INTERNAL TREATMENT | a)Ceiling - 12 mm thk. neeru finish plaster.<br>b)Walls - 20 mm thk. neeru finish plaster. |
| 04 | EXTERNAL TREATMENT | Sandface plaster with decorative Renovo plaster. |
| 05 | FLOORING | Bus parking area - Trimix concrete flooring.<br>Shops -Vitrified tiles with granite stone step.<br>Kitchen & Canteen - Kotah stone flooring.<br>S.T. bus platform - Granite stone flooring in pattern.<br>Stairs, passages - Granite stone flooring<br>Dormitories & Rooms - Vitrified tiles.<br>Toilets -Endura tiles.<br>Window grill -Granite stone. |
| 06 | SKIRTING | Shops - Vitrified tiles. |

| | | |
|---|---|---|
| | | Kitchen & Canteen - Kotah stone.<br>Stairs & passages - Granite stones.<br>Dormitories Rooms - Vitrified tiles.<br>Toilets -Endura tiles. |
| 07 | DADO | a) Toilets -Decorative glazed tiles upto lintel level.<br>b) Stairs and passages -Granite tiles dado upto 2.4 mtr. hight.<br>c) Dormitories and rooms -Ceramic tiles dado upto 1.5 mtr. hight |
| 08 | TERRACES | (Roof terrace and first floor terrace )<br>B.B. Coba waterproofing and China mosaic flooring. |
| 09 | TOILETS | a) B.B. coba waterproofing for toilet sunk.<br>b) Special type waterproofing treatment for toilet walls. |
| 10 | DOORS - FRAMES | a) T.W. frames - Rooms, dormitories.<br>b) Granite door frames-toilets. |
| 11 | DOORS -SHUTTERS | a) Waterproof flush doors - Rooms, dormitories.<br>b) Wooden door shutter with ply insert - toilets. |
| 12 | WINDOW | Anodised Aluminium windows 3/4 track with M. S.grill and S.S.mesh shutter. |
| 13 | PAINTING | a) Ceiling & Internal walls -Oil bound distemper.<br>b) Oil painting for doors. |
| 14 | PLUMBING & SANITARY ITEMS | 1) W.C. pan - Rooms -Wall hung European type pan with flush valve/ Common toilet - Indian type Orrisa pan.<br>2) G.I. pipe line heavy grade.<br>3) Brass C.P. bib stop tap.<br>4) Soil/vent/waste pipe - U. P.V.C.<br>5) Rain water pipe - U. P.V.C.<br>6) R.C.C. pipes for G.F. drainage.<br>7)Septic tank - Capacity 100 users, 1 No.<br>8) Underground tank - Capacity 50000 lit.,2 Nos.<br>9) Overhead water tank - Capacity 50000 lit., 2 Nos.<br>10) Overhead water tank - For Fire, Capacity 50000 lit., 1 No. |
| 15 | ELECTRIFICATION WITH TRANSFORMER | Concealed - 10 % of total cost |

आर्किटेक्ट मे. काब्रे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २० जून, २००६ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे अद्ययावत व परिपूर्ण असे बसस्थानकाच्या बांधकामासाठी अंदाजित रक्कम रुपये ७.५१ कोटी मात्र इतका खर्च येईल, असे कळविलेले आहे. या बदल्यात संस्थानला अंदाजे २५५० चौरस मीटर बांधकाम करुन मिळणार आहे. यामध्ये खालील सुविधांचा समावेश आहे :

| **अ.नं.** | **तपशील** | **साईज (मीटरमध्ये)** | **संख्या** |
|---|---|---|---|
| **(अ)** | **तळमजला** | | |
| ०१ | माहिती सुविधा केंद्र | ८.२७ X ६.२६ | ०१ |
| ०२ | दुकानगाळा | ६.२३ X ६.२३ | ०१ |
| ०३ | जीना व लिफ्ट | नकाशाप्रमाणे | ०१ |
| **(ब)** | **पहिला मजला** | | |
| ०१ | डॉरमेटरी हॉल | ८.२० X ८.७७ | ०४ |
| ०२ | डॉरमेटरी हॉल | ८.२० X ८.१८ | ०१ |
| ०३ | डॉरमेटरी हॉल | ५.१५ X ६.२६ | ०३ |
| ०४ | ॲटॅच्ड रुम्स | ३.०० X ४.१३ | ०८ |
| ०५ | कॉमन टॉयलेटस् | नकाशाप्रमाणे | ०३ |
| ०६ | जीना व लिफ्ट | नकाशाप्रमाणे | ०१ |
| **(क)** | **दुसरा मजला** | | |
| ०१ | डॉरमेटरी हॉल | ८.२० X ८.७७ | ०४ |
| ०२ | डॉरमेटरी हॉल | ८.२० X ८.१८ | ०१ |
| ०३ | डॉरमेटरी हॉल | ५.१५ X ६.२६ | ०३ |
| ०४ | ॲटॅच्ड रुम्स | ३.०० X ४.१३ | ०८ |
| ०५ | कॉमन टॉयलेटस् | नकाशाप्रमाणे | ०३ |
| ०६ | जीना व लिफ्ट | नकाशाप्रमाणे | ०१ |

वरीलप्रमाणे संस्थानला पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर मिळणाऱ्या एकूण १६ डॉरमेटरी हॉल्स व १६ ॲडॅच्ड रुम्समध्ये एकूण २६० बेडस्‌ची व्यवस्था होऊ शकेल.

सदरहू प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे, सदर प्रकल्प व्यवस्थापन हे प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडे सोपविता येईल. याबाबत त्यांचेशी चर्चा करुन सदरहू सेवेसाठी कुठले ही अतिरिक्त शुल्क न आकारणेबाबत त्यांना विनंती करता येईल.

**(ड)** तरी उपरोक्तप्रमाणे संस्थान निधीतून श्री क्षेत्र शिर्डी येथे सुधारीत बांधकाम आराखडयानुसार अद्ययावत बसस्थानकाचे बांधकाम करणेस व त्यासाठी येणाऱ्या येणारे अंदाजित रक्कम रुपये ७.६६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन दि.०१.०४.२००८ रोजीचे मुंबई येथील दोन्ही संस्थांच्या संयुक्त बैठकीत मान्य झालेप्रमाणे सुधारित बांधकाम आराखडयास म.रा.मा. परीवहन महामंडळ यांचे मुख्य स्थापत्य अभियंता यांनी दि.२१.०६.२००८ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदरहू सुधारीत बांधकाम आराखडयास मान्यता देणेत आली. तसेच सदरहू सुधारीत बांधकाम आराखडयानुसार शिर्डी येथील बसस्थानक इमारतीचे बांधकामासाठी येणारे अंदाजित रक्कम रु.७.६६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली. याकामी बांधकाम परवानगी, निविदा मागविणे इत्यादी अनुषंगीक कामांची कार्यवाही विहीत पध्दतीने करण्यात यावी.

या प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक हे मा.अध्यक्ष महोदय यांचे सूचनेनुसार सुरुवातीपासून काम पहात आहेत. त्यांची पूर्वीचेच अटी व शर्तीवर कामाच्या किमतीचे २% इतक्या आर्किटेक्ट फीवर नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली. वरील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सदरहू प्रकल्प हा मोठया स्वरुपाचा असल्याने याचे प्रकल्प व्यवस्थापन (Project Management Consultancy) हे प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी उपरोक्त निर्धारित फी मध्येच स्विकारणेबाबत त्यांना विनंती करणेत यावी. त्यांनी सदरहू विनंती मान्य न केल्यास याकामी स्वतंत्र व्यवस्थापन सल्लागार नेमणेकामी मा.व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१९** **शिर्डी साई ट्रस्ट यांनी चेन्नई येथे संस्थानचे माहिती केंद्र उभारणेकरीता देऊ केलेल्या जागेबाबत**

**निर्णय क्र.५७७** **(अ)**शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी यांनी मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील दिनांक ०९ जून, २००८ रोजीचे पत्रान्वये, चेन्नई येथे संस्थानचे माहिती सुविधा केंद्र उभारणेसाठी जागा देऊ इच्छित असलेबाबत कळविले आहे. त्यांनी देऊ केलेल्या जागेची पहाणी मा.व्यवस्थापन समितीच्या काही सन्माननीय सदस्यांनी व कार्यकारी अधिकारी यांनी केलेली आहे. सदरहू पत्रात त्यांनी खालीलप्रमाणे काही बाबी नमूद केलेल्या आहेत :

०१. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देऊ केलेली जागा ही शिर्डी साई ट्रस्ट यांच्या मालकीची असून, भविष्यात त्यांचे ट्रस्टच्या मालकीचीच राहील.

०२. चेन्नई माहिती सुविधा केंद्रासाठी ट्रस्टने देऊ केलेली अंदाजे ८५० स्क्वेअर फुटची कार्यालयीन जागा मुख्य रस्त्याच्या सन्मुख असून, सदरहू जागेस स्वतंत्ररित्या वाहनतळ व स्वच्छतागृहाची सोय आहे.

०३. या पत्राच्या तारखेपासून अथवा समझोत्याचा करारनामा होईल त्या दिवसापासून १० वर्षाच्या कालावधीसाठी संस्थानला देऊ केलेल्या जागेस कोणत्याही प्रकारचे भाडे अथवा भाडयापोटी अनामत रक्कम द्यावी लागणार नाही.

०४. संस्थानने या ठिकाणी नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्याचे वेतन, देण्यात येणाऱ्या जागेचा वीज, देखभाल इत्यादी खर्च करणे आवश्यक राहील.

सदरहू प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी विनंती शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी यांनी केली आहे.

**(ब)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी देश-विदेशातून मोठया प्रमाणावर साईभक्त येत असतात. या भक्तांमध्ये तामीळनाडू या राज्यातून येणाऱ्या भक्तांची संख्या बऱ्याच मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे चेन्नई सारख्या मोठया महानगरामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे अधिकृत माहिती सुविधा केंद्र असणे अत्यंत आवश्यक आहे. या माहिती केंद्रातून संस्थानच्या दैनंदिन पूजा-अर्चा आदि कार्यक्रमाविषयी, संस्थानमार्फत भक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविधी सेवा-सुविधा, देणगी इत्यादीबाबत माहिती उपलब्ध करुन देता येईल. संस्थानने यापूर्वी याच धर्तीवर आंध्रप्रदेशातील सिकंदराबाद येथे व नवि दिल्ली येथे माहिती सुविधा केंद्र सुरु केलेले आहे. चेन्नई येथील माहिती सुविधा सुरु करणेसाठी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नईचे सहकार्य ही घेता येईल. तसेच यामध्ये विशेष बाब अशी आहे की, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांच्या आर्थिक सहकार्यातून श्री क्षेत्र शिर्डी येथे भक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी अंदाजे १०० कोटी रुपये खर्चाचा अद्ययावत व परिपूर्ण असा साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, चेन्नई (तामीळनाडू) येथे संस्थानचे माहिती सुविधा केंद्र उभारणेबाबत शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी प्रस्तावित व देऊ केलेली अंदाजे ८५० स्क्वेअर फुटची जागा स्वीकारणेस हरकत नाही. तसेच त्यांनी पत्रात नमूद केलेल्या अटी शर्ती या सर्वसाधारण स्वरुपाच्या व योग्य असून स्वीकाराह आहेत, असे मत आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता मिळालेस, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेबरोबर समझोता करारनामा / भाडेपट्टयाचा करारनामा करता येईल.

**(क)** तरी उपरोक्त परिच्छेदात विवेचन केल्यानुसार, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देऊ केलेली चेन्नई येथील अंदाजे ८५० स्क्वेअर फुट जागा संस्थानचे माहिती व सुविधा केंद्र सुरु करणेसाठी सुरुवातीस १० वर्षाचे कालावधीसाठी स्वीकारणेबाबत, याकामी करावयाच्या कायदेशीर बाबींच्या पुर्ततेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी आणि सदरहू जागा स्वीकारणेबाबत निर्णय झाल्यास याकामी करावयाचा करारनामा चेन्नई येथे करणे आवश्यक असल्याने त्यासाठी मा.कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२०** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील गायनिक विभागाकरीता लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदी बाबत**

**निर्णय क्र.५७८** श्री साईबाबा रुग्णालयातील गायनिक विभागात लॅप्रोस्कोपीक सर्जन डॉ. कुलदीप वाघ हे गायनिकचे शस्त्रक्रिया करत असतात. सदरची इन्स्ट्रुमेंट आपल्याकडे नाहीत ती नविनच खरेदी करावयाची आहे. त्यासाठी त्यांनी खालील लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंटची मागणी डी. पी. क्रमांक ६३४८ दि.२२/०२/२००८ अन्वये केलेली आहे.

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1 | Hysteroscope 5mm 30⁰ (Karl Storz) | 1 |
| 2 | Operating & Diagnostic Sheath | 1 |
| 3 | Resectoscope (Laproscopic) | 1 |
| 4 | Endometrial Resection Operating Channel | 1 |
| 5 | TL BandApplicator | 1 |
| 6 | Knot Pusher | 1 |

वरील इन्स्ट्रुमेंट हि Karl Storz या जर्मन कंपनीची उत्कृष्ट दर्जाचे आहे. ती गायनिक व युरोलॉजी दोन्ही विभागासाठी वापरता येऊ शकतात. सदर कंपनीचे महाराष्ट्रातील अधिकृत विक्रेते मे.चिमको बायोमेडीकल, मुंबई यांना फॅक्स करुन अंदाजे खर्चासाठी दर मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मे.चिमको बायोमेडीकल,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.QT-MH-१८०-४ दि.२७ मार्च २००८ अन्वये उपरोक्त इन्स्ट्रुमेंटकामी अंदाजे रु.५,५६,०११/- इतका खर्च येईल असे कळविले आहे.

तरी वरील प्रमाणे लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट हि विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,५६,०११/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२१** **आय.पी.डी व ओ.पी.डी फाईल छपाईबाबत.**

**निर्णय क्र.५७९** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांचे रेकॉर्ड सुस्थितीत जतन करुन ठेवणेकामी

**१)** अंतररुग्ण विभागाकरिता (आय.पी.डी) १४" x २२" साईज असलेली (कार्डशीट रंग हिरवा ९.७ वजन)

**२)** बाहय रुग्णांकरिता (ओ.पी.डी.) ११ १/२" x २० " साईज असलेल्या (कार्डशीट रंग निळा ९.७ वजन) फाईल छपाई करुन घेण्यात आल्या होत्या.पेशंटची वाढती संख्या पाहता सदर फाईल्स छपाई करणे गरजेचे वाटू लागले आहे.

उपरोक्तपैकी ओ.पी.डी. फाईल्स त्याच नमून्याप्रमाणे छपाई करणेबाबत तर आय.पी.डी फाईल्सचा कागद पातळ असल्याने, यापुढील रुग्णांकरिता नवीन आय.पी.डी फाईल छपाई करतांना यापेक्षा सरस व जाड कागद असलेल्या फाईल बनवून घेणेबाबत मा.उप वैदयकीय संचालक यांनी सूचना दिल्या आहेत.

**अ)** आय.पी.डी. फाईल सध्या कार्डशीट कलर ९.७ वजन या पेपरची आहे,त्याऐवजी (कार्डशीट कलर ११.५ वजन) या पेपरवर १०,००० नग फाईल्स छपाई करावी लागणार आहे.

**ब)** ओ.पी.डी. फाईल्स करिता कार्डशीट कलर ९.७ वजन, हया पेपरवर १५,००० नग फाईल्स छपाई करावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे आय.पी.डी व ओ. पी.डी च्या फाईल्स छपाईकामी अंदाजे रु. १,२५,००० पर्यंत खर्च अपेक्षीत असुन त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागणी करुन छपाई करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२२** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील Orthopedic Operation Theater विभागासाठी बॉईल्स मशिन खरेदी बाबत**

**निर्णय क्र.५८०** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ. जपे व डॉ. खुराना यांनी दि.२५/०४/२००८ चे पत्रान्वये आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर शेजारी एक मायनर ओ. टी. तयार करावयाची आहे व त्यासाठी त्यांनी एक नग बॉईल्स मशिनची मागणी केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | नग | प्रति नग अंदाजे किंमत | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Boyles Machine Wihtout Ventilator | 01 | 3,00,000.00 | 3,00,000.00 |
| | | | एकूण खर्च- | 3,00,000.00 |

श्रीसाईबाबा रुग्णालयातील नविन न्यूरो आय.सी.सी.यु. विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी/उपकरणे खरेदीमध्ये उपरोक्त बॉईल्स मशिनची देखील मागणी केलेली आहे. त्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेतील मान्यतेनुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे खरेदीतील चर्चा / वाटाघाटीनंतरचे मंजुर दरानुसार उपरोक्त प्रमाणे मंजूर दरानुसार आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी एक नग बॉईल्स मशिन खरेदी करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२३ श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालविणे बाबत.**

**निर्णय क्र.५८१** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/११/२००६ निर्णय क्रमांक ८७८(८) अन्वये श्री. मुथ्था यांचे ऐवजी संस्थानने दुकान चालवणे बाबत निर्णय झालेला होता. त्यानुसार दि.१४/१२/२००६ पासून दुकान चालू करणेत आले होते व मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०२/२००७ चे सभेत निर्णय क्रमांक १४७अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी येथील मेडीकल स्टोअर्स त्वरीत बंद करण्यात येऊन ते भाडेतत्वावर बाहेरील व्यक्ती / संस्थेस देण्यात यावे, असे ठरले आहे. त्यामुळे सदरचे औषध दुकान बंद करण्यात आलेले आहे.

श्री.राजेंद्र खिवराज मुथ्था -पुणे यांनी त्यांचे दि. ०१/०४/२००७ चे पत्रान्वये पुन्हा संस्थानकडे पुर्वीच्याच अटी व शर्ती मध्ये थोडासा बदल करुन पुन्हा दुकान चालविणेस मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. सदर अर्ज निर्णयार्थ मा. उपसमिती / मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. सदर अर्जावर अदयाप सभेमध्ये निर्णय झालेला नाही.

सध्या रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्ण, हृदयविकाराचे रुग्ण व इतर गंभीर आजाराचे रुग्ण सतत येत असतात, अशा प्रकारचे रुग्ण रात्रीच्या वेळेस रुग्णालयात दाखल झालेनंतर त्यांचेवर उपचार करण्यासाठी लागणारी तातडीची औषधे / सर्जीकल साहित्य लिहून दिल्यानंतर ती रुग्णांना रात्रीच्या वेळेस उपलब्ध होत नाहीत, कारण शिर्डीमधील इतर खाजगी दुकाने बंद असतात. अशा परिस्थितीत रुग्णांच्या उपचाराची खुपच गैरसोय होते. अशा प्रकारची रुग्णांची होणारी गैरसोय टाळणेसाठी रुग्णालयाचे आवारात २४ तास दुकान चालु असणे खुपच गरजेचे आहे.

रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालवणेस देणेबाबत दि.१४.०५.२००८ रोजीचे उपसमिती सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावेळेस औषध दुकान चालवण्याची नियमावली व कार्यपध्दतीचा अभ्यास करुन प्रस्ताव येत्या सभेपुढे ठेवावा असे ठरले आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे नियमावली मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केली होती.

**-: नियमावली :-**

०१.निविदाधारकास कराराचा कालवधी कंत्राट दिल्यापासून किंवा ज्या दिवसापासून औषध दुकान प्रत्यक्षात कार्यान्वित होईल तेंव्हापासून कराराची अमंलबजावणी केली जाईल.

०२.ज्या निविदाधारकास ज्या व्यक्तीच्या नावावर निविदा भरावयाची आहे ते स्वतः डी.फार्म किंवा बी.फार्म ही शैक्षणिक अर्हता असणे बंधनकारक असून त्याचे फार्मसी कौन्सील ऑफ महाराष्ट्र यांचेकडे रजिष्ट्रेशन झालेले पाहिजे. तसेच निविदासोबत सदर रजिष्ट्रेशनच्या सत्यप्रती फोटो कॉपीसह जोडणे बंधनकारक राहील.

०३.औषधी दुकान हे आपणास कमाल ६० महिने चालवयास द्यावयाचे असून त्यासाठी आपणास संस्थानकडे विहीत नमुन्यात सब रजिष्टार राहाता यांचेकडे Leave and Licence Agreement स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या कराराचा कालावधी ६० महिने धरला जाईल. त्या काळातील प्रत्येक वर्षानंतर आपले कार्य क्षमतेवर पुढील कालावधीसाठी नुतनीकरण व दरमहाचे भाडे ५ टक्के दरवर्षी वाढविण्यात येईल. रुग्णालयातर्फे दुकानासाठी ५ सेल्फ व पुरेसे कांऊटर मिळेल. इतर साहित्य कंत्राटदाराने स्वतः ठेवावयाचे आहे. सब रजिष्टार राहाता यांचेकडे लागणारे स्टॅम्प आपणास विकत घ्यावे लागतील.

०४. ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांचा करार संपुष्टात आलेनंतर पुढील कालावधीसाठी त्यांनाच दुकान चालवयास देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. करार संपुष्टात येणेपुर्वी जर दुकान चालविणेस निविदाधारकाने असमर्थता दाखवली तर आपले संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येऊन भविष्यात आपणास निविदा भरण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

०५. रुग्णांच्या / संस्थानच्या दृष्टीने आपणास औषध दुकान हे २४ तास औषधे विक्रीसाठी उघडे ठेवावे लागेल.

०६. औषध दुकानात औषधांची विक्री करणे, नोंदी घेणे, खरेदी करणेकामी आपणास शैक्षणिक पात्रता असलेला (फार्मासिस्ट - डी.फार्म किंवा बी. फार्म ) कर्मचारी ठेवणे आपणावर बंधनकारक राहील. या व्यतिरिक्त कर्मचा-याने औषधांची विक्री केल्याचे संस्थान अगर अन्न व औषध प्रशासन यांचे प्रतिनिधीच्या भेटीच्या वेळी निदर्शनास आलेवर होणा-या कार्यवाहीची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील.

०७. निविदा धारकास रुग्णालयातील डॉक्टर, रुग्णांस जी औषधे प्रिस्क्रीपशनवर लिहून देतील ती औषधे आपणास दुकानात उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहील.

०८. निविदाधारकाने औषधे विक्रीकामी अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र शासन यांनी ज्या काही विहीत अटी व शर्ती घालवून दिलेल्या आहे त्या पाळणे बंधनकारक राहील व याबाबत. अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र शासन यांचेकडून कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यास निविदाधारक पुर्णपुणे जबाबदार राहील.

०९.निविदाधारकास औषधांची विक्री करणेकामी अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या नियमाप्रमाणे विक्री करावी लागेल व प्रत्येक ग्राहकाने बीलाची मागणी केल्यास ते देणे बंधनकारक राहील. यापेक्षा जादा दराने औषधांची विक्री केलेली आढळलेस होणाऱ्या कारवाईस आपण पात्र राहाल.

१०. संस्थानचे वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णांना वापरण्यासाठी काही औषधे उपलब्ध करुन देणेबाबत आपणास सांगितले तर आपणास विक्रीसाठी उपलब्ध ठेवावे लागेल. परंतू त्याचा काही कालावधीनंतर वापर झाला नाही व ती मुदतबाह्य झाली तर त्याची कोणतीही जबाबदारी संबंधीत वैद्यकीय अधिकारी अथवा संस्थानवर राहणार नाही.

११. अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र शासन यांच्या प्रतिनिधीने दुकानात येऊन औषधांची तपासणी केली तर त्याचे होणा-या परीणामास निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहील.

१२. संस्थानमार्फत निविदाधारकास औषध दुकान चालविणेसाठी आवश्यक ती जागा (हॉल), फर्निचर, वीज, पाणी इत्यादी पुरविले जाईल मात्र विजेच्या वापरासाठी लागणारा आकार मिटरप्रमाणे वीज आकार निविदाधारकास दरमहा संस्थानमध्ये रोखीने भरणे बंधनकारक राहील. दुकान चालविणेकामी अन्न व औषधे प्रशासन यांचेकडून लागणारा परवाना निविदाधारकास मिळवावा लागेल.

१३. निविदाधारकाने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची कोणत्याही प्रकारची जबाबदारी (वेतन, भविष्य निर्वाहनिधी, रजा/ सुट्या , राहण्याची , जेवणाची सोय इत्यादी ) संस्थानवर राहणार नाही.

१४. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल, त्या निविदाधारकास संस्थानकडे दुकान चालविण्याची हमी म्हणून सुरक्षा रक्कम तीन मासिक भाड्या इतकी होणारी रक्कम संस्थानमध्ये अनामत म्हणून भरावी लागेल. याशिवाय दरमहा ठरलेले भाडे हे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत संस्थानकडे डी.डी. अथवा रोखीने भरणे बंधनकारक राहील. वरील अनामत रक्कम करार संपल्यानंतर परत देण्याविषयी विचार होऊ शकेल.

१५.संस्थानकडे ठेवणेत आलेल्या सुरक्षा / अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१६. कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी सन १९५२ च्या कायद्यानुसार करावी लागणारी सर्व पुर्तता त्याविषयी कागदपत्रे अद्यावत ठेवणे याची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकावर राहील.

१७. निविदाधारकांने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे नियमानुसार संबंधीत कॉन्ट्रॅक्टर लेबर (रेग्युलेशन ॲण्ड ॲबॅलिशन) ॲक्ट १९७० नुसार हजेरी रजिष्टर, वेतन पत्रके, आयकर कपात इत्यादी अनुशंगिक कागदपत्रे विहीत नमुन्यात ठेवणे, तसेच सदरचे कायद्यानुसार त्याची पुर्तता करणे ही पुर्णपणे जबाबदारी निविदाधारकावर राहील.

१८. निविदाधारकाने नियुक्त केलेले कर्मचारी कामावर असतांना त्यांनी स्वच्छ गणवेश घालणे, छायाचित्रासह ओळखपत्र लावणे आवश्यक राहील. कर्मचा-यांना गणवेश, ओळखपत्र पुरविणे हे निविदाधारकाची जबाबदारी राहील.

१९. संस्थानचे पुर्व परवानगी शिवाय आपणास रुग्णालय परिसरात आपली वाहने, जाहिरातीचे फलक इत्यादी लावता येणार नाही.

२०. आपणास औषध दुकान वरील कालावधीसाठी चालविण्यास देण्यात येईल. परंतू आपलेकडून कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन / गैरकारभार /समाधानकारण सेवा न मिळाल्यास आपणास तीन महिन्याची पुर्व नोटीस देऊन आपला करार रद्दबातल करण्यात येईल. तसेच आपणास काही कारणास्तव दुकान चालवयाचे नसल्यास आपणास संस्थानला तीन महिने अगोदर पत्र देऊन तसे कळवावे लागेल.

२१. संस्थानचे रुग्णालयासाठी वेळोवेळी लागणारे औषधे ज्या होलसेल दराने आपण खरेदी केलेली आहेत त्याच दराने जेंव्हा आवश्यक असतील तेंव्हा संस्थानला पुरवठा करावे लागतील.

२२. औषध दुकानात नामांकित कंपनीचे औषधे उपलब्ध आहेत किंवा नाही. तसेच कोणकोणती औषधे ठेवावी व त्याची खरेदी व विक्री काय दराने होते, यावर नियंत्रण ठेवणेकामी एक समिती तयार करण्यात येऊन त्यामध्ये वैद्यकीय संचालक १, उपवैद्यकीय संचालक १, कार्डीओलॉजिस्ट १, कार्डीॲक सर्जन १, जनरल सर्जन १, फिजिशियन १, मटेरियल / स्टोअर मॅनेजर दोघांपैकी १ याचा समावेश असावा. सदर समिती केंव्हाही आपले दुकानात येऊन आपलेकडे उपलब्ध असलेली औषधे उच्च प्रतीची / नामांकित कंपनीची आहेत किंवा कसे ? याबाबत तपासणी करुन जर ती त्यांना उच्च प्रतीची / नामांकित कंपनीची आढळली नाही तर ती आपणास आपले स्वखर्चाने त्वरीत बदलावे लागतील तसेच तेथुनपुढे ती स्टोअरमध्ये ठेवता येणार नाही .अन्न व औषधे प्रशासन महाराष्ट्र राज्य यांचे औषधे दुकानासंबधी सर्व नियम व अटी आपणास बंधनकारक राहील. सदर समितीची ज्या-ज्या वेळेस मिटींग होईल त्यास आपला प्रतिनिधी हजर राहणे व त्यात केलेल्या सुचनांचे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील राहील.

२३. निविदाधारकास प्रत्येक औषधे ही एम.आर.पी. पेक्षा जास्त किंमतीने विक्री करता येणार नाही. सर्व प्रकारचे सर्जीकल साहित्य, सलाईन, महागडी इंजेक्शन ही त्यांनी खरेदीच्या किंमतीवर --- टक्के नफा ठेऊन विक्री करावी लागेल.

२४. संस्थानचे धोरणानुसार २० टक्के रुग्णांना मोफत इलाज केला जाईल व किमान १५ टक्के रुग्णांना इलाज हा कमी खर्चात केला जाईल. संस्थानचे कायम स्वरुपी कर्मचा-यांना केलेल्या उपचाराची जबाबदारी संस्थानवर राहिल.

२५. रुग्णालयात होणाऱ्या ह्दयशस्त्रक्रिया, अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टी इत्यादीसाठी लागणारी औषधे ही संस्थानतर्फे पुरवण्यात येतील.

२६. उपरोक्त शर्ती-अटी पैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी-शर्तीचा भंग झाल्यास निविदाधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा होणेस पात्र राहील. संस्थानचे झालेली नुकसानाची नुकसान भरपाई निविदाधारकाकडून वसूली करण्यात येईल.

२७. उपरोक्त शर्ती-अटी पैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी-शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी -शर्ती विहीत करणे याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालविणेकामी तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता देण्यात आली.याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२४ डायलेसिस विभागामध्ये डायलेसिस चेअर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५८२** श्रीसाईबाबा रुग्णालयात दि.१३/०८/२००६ पासून डायलेसीस विभाग कार्यान्वीत करणेत आलेला आहे. सदर विभागात दोन डायलेसीस मशिन कार्यान्वीत आहेत. रुग्णालयात रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे डायलेसीस विभागाने आणखी एक डायलेसीस मशिनची मागणी केलेली होती.

दि.२०/१२/२००७ रोजी श्री. ललीत एस. राथूर, दुबई हे साईभक्त शिरडी येथे साई दर्शनासाठी आले असता त्यांनी सात ते आठ लाखापर्यंत देणगी देणेबाबत इच्छा व्यक्त केलेली होती. तेंव्हा त्यांचेकडून दि.१९/०४/२००८ रोजी एक डायलेसीस मशिन देणगी स्वरुपात घेण्यात आलेले आहे.

सदर मशिनकरीता एक डायलेसीस चेअरची आवश्यकता आहे. सदर डायलेसीस चेअर करीता डायलेसीस विभागाने त्यांचे डि.पी.क्रमांक ३७५ दि. २८/०५/२००८ अन्वये मागणी केलेली आहे. यापूर्वी सन २००६ मध्ये २ नग डायलेसीस चेअर मे. जनक हेल्थ केअर, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उपरोक्त चेअर खरेदीकामी अंदाजे रु. १,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे १ नग डायलेसीस चेअर कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२५ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकिय बीलाच्या परताव्याबाबत.**

**निर्णय क्र.५८३** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

**त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.राहुल वामन गलांडे | करंदीकर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, नाशिक | १५४४६.०० | १२३५६.०० |
| २ | श्री.श्रावण माधव चौधरी | श्री. साईनाथ रुग्णालय | २८९.०० | २८९.०० |
| ३ | श्री.संजय बाबुराव कुलकर्णी | श्री साईबाबा रुग्णालय | ४३४८.०० | ४३४८.०० |
| ४ | सौ.वैशाली वसंतराव सुर्वे | श्री साईबाबा रुग्णालय | १५०१.०० | १५०१.०० |
| ५ | श्री.किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | ६५६.०० | ६५६.०० |
| ६ | श्री.प्रमोद वसंतराव कुलकर्णी | श्री साईनाथ रुग्णालय | ९३३.०० | ९३३.०० |
| ७ | श्री.दत्तात्रय सोपान जगताप | श्री साईबाबा रुग्णालय | ७७९.०० | ७७९.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री.मंगेश जगन्नाथ जोशी | श्री साईबाबा रुग्णालय | २५१३.०० | २५१३.०० |
| ९ | श्री.राजाराम रोंगाजी नाचनेकर | श्री. साईनाथ रुग्णालय | १६४६.०० | १६४६.०० |
| १० | श्री.प्रल्हाद गगाधर शेळके | श्री. साईनाथ रुग्णालय | १५३०.०० | १५३०.०० |
| ११ | श्री.नितीन सोपानराव शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय | १९५०.०० | १९५०.०० |
| १२ | डॉ.पुनम बाबासाहेब गवळी | डॉ.वाघुरडे | २३७६०.०० | १६८०.०० |
| | | **अॅडव्हान्स वजा जाता-** | २२०८०.०० | |
| | | **शिल्लक रक्कम-** | १६८०.०० | |
| १३ | श्री.नवनाथ बहिरु चौधरी | श्री साईनाथ रुग्णालय | ४८५.०० | ४८५.०० |
| १४. | श्री.रमेश सिताराम बोधक | प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी | ६०२१.०० | ६०२१.०० |
| १५ | श्री. विक्रम दामोधर पाटील | श्री साईबाबा रुग्णालय | ८५५.०० | ८५५.०० |
| १६ | डॉ. व्ही.बी. बाकलीवाल | श्री साईनाथ रुग्णालय | २८५.०० | २८५.०० |
| १७ | सौ.जयश्री शरद शेळके | श्री साईबाबा रुग्णालय | २१९०.०० | २१९०.०० |
| १८ | श्री. बोऱ्हाडे कानिफनाथ बाबूराव | श्री साईबाबा रुग्णालय | ८३१.०० | ८३१.०० |
| १९ | डॉ.आशा श्रीराम पेंडसे | श्री. साईनाथ रुग्णालय, शिर्डी | १५७३.०० | १५७३.०० |
| २० | सतिष गंगाधर बकरे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ८७.०० | ८७.०० |
| २१ | कु.कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३२२४.०० | ३२२४.०० |
| २२ | डॉ.यशोधन अरुण पितांबरे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | १४९३.०० | १४९३.०० |
| २३ | श्री.गुरुप्रसाद अरुण कापरे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३३२८.०० | ३३२८.०० |
| २४ | श्री.दत्तात्रय सोपान जगताप | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ६८.०० | ६८.०० |
| २५ | श्री.आर.एस.साबळे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २१३४.०० | २१३४.०० |
| २६ | श्री.अशोक उत्तमचंद तोडरवाल | श्री. साईनाथ रुग्णालय , शिर्डी | २७३२.०० | २७३२.०० |
| २७ | सौ.मदिना एन.शेख | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २३४९.०० | २३४९.०० |
| २८ | श्री.अनंत मनोहर लाड | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३४२.०० | ३४२.०० |
| २९ | डॉ.एन.एस.म्हस्के | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ११४३.०० | ११४३.०० |
| ३० | श्री.सुजय आनंदराव बाबर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ४७९६.०० | ४७९६.०० |
| ३१ | श्री.श्रावण माधव चौधरी | श्री. साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ८९४.०० | ८९४.०० |
| ३२ | श्री.युवराज राजाराम सोनवणे | श्री. साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ६२५.०० | ६२५.०० |
| ३३ | श्री.अविनाश विनायक कुलकर्णी | श्री. साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ५८.०० | ५८.०० |
| | | **एकूण रक्कम रु.** | **९०८६५.००** | **६५६९४.००** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२६ इंजेक्शन ए.एच.एफ. खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५८४** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात ज्या रुग्णांना जखम / इजा झाल्यावर रक्तस्त्राव होतो व असा रक्तस्त्राव न थांबलेस रुग्णाचे जिवितास धोका होऊ शकतो. अशा रुग्णांना उपरोक्त इंजेक्शन तातडीने देणे अत्यंत गरजेचे असते असे रुग्ण आपल्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाल्यानंतर त्यांना तातडीने उपरोक्त इंजेक्शन देणेकामी आपल्याकडे उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारच्या रुग्णांना लागणारे इंजेक्शन हे दिल्ली येथील मे. हेमोफीलीक फेडरेशन (इंडिया), दिल्ली या संस्थेकडे उपलब्ध असतात. सदर संस्थेच्या पुणे व नाशिक येथे देखील शाखा आहेत व त्याच्या पुणे येथील शाखेकडे दर देण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी आमचे दिल्ली येथील मुख्य कार्यालयाकडून आपणास दर मिळतील असे कळविले होते.

त्यानुसार इकडील पत्र क्रमांक ६०७६ अन्वये मे. हेमोफीलीक फेडरेशन (इंडिया), दिल्ली यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि. ०८/०५/२००८ चे फॅक्स पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per Unit | Rate Per Vial | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Anti Hemophelic Factor F-VIII | 10 | 7.00 | 2261.00 (323 IU) | 22610.00 |
| 2 | Anti Hemophelic Factor F-IX | 05 | 12.00 | 6000.00 (500 IU) | 30000.00 |
| | | | | Total Amt. in Rs. | 52610.00 |

तरी वरीलप्रमाणे Inj.A.H.F. मे. हेमोफीलीक फेडरेशन (इंडिया), दिल्ली यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु. ५२,६१०/- चे खर्चास मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२७ श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील काही विभागातील डॉक्टरांचा इन्सेन्टीव्ह सुधारित करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८५** सदरहू मागे घेण्यात आला. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२८ श्रीसाईबाबा रुग्णालयातील युरोलॉजि विभागासाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५८६** श्री साईबाबा रुग्णालयात डॉ. राजन पाटणी, मानद युरोलॉजिस्ट म्हणून हजर झालेले आहे. यापुर्वी ते संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात महिन्यातून दोन वेळा मानद डॉक्टर म्हणून सेवा देत होते. तसेच डॉ.राकेश

पराशर हे पूर्णवेळ युरोलॉजिस्ट म्हणून दि.१९/११/२००७ पासून हजर झालेले होते, ते सध्या संस्थान सेवेत नाहीत.

श्रीसाईबाबा रुग्णालयात डॉ. राजन पाटणी महिन्यातून दोन वेळा भेटी देणार असून ते युरोलॉजी संबंधी सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया रुग्णालयात करणार आहेत. त्यासाठी त्यांनी सुरवातीस रु.६०,३१,०००/- इतक्या रक्कमेची इन्स्ट्रुमेंटची मागणी केली होती व सदरचा प्रस्ताव दि.३१/०३/२००७ चे मा.वैद्यकिय समिती सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, यावर चर्चा होऊन तो अमान्य करण्यात आला होता.

त्यानंतर डॉ. राजन पाटणी यांनी रु.६०,३१,०००/- ऐवजी काही इन्स्ट्रुमेंटची मागणी कमी करुन यादी प्रमाणे इन्स्ट्रुमेंटची फेर मागणी केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रु.२०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे इन्स्ट्रुमेंट ही सध्या दैनंदीन शस्त्रक्रियेंसाठी आवश्यक आहेत. श्री साईबाबा रुग्णालयात सदरचा विभाग हा नव्यानेच सुरु होत असल्याने या विभागात युरोलॉजीची इन्स्ट्रुमेंट नाहीत व ती सर्व नवीन खरेदी करावी लागणार आहेत. उपरोक्तप्रमाणे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामीचा प्रस्ताव दि. २१/११/२००७ रोजीचे टिपणीन्वये मा. कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, त्यावर मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी तज्ञ समितीचा अभिप्राय घेऊन घेऊन सादर करावा, असे आदेश दिलेले होते.

तज्ञ समितीतील सदस्यामध्ये युरोलॉजीस्ट विषयातील तज्ञ सल्लागार नसल्यामुळे पुणे येथील नामांकित युरोलॉजीस्ट डॉ. किरपेकर यांचा उपरोक्त इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी तज्ञ सल्ला घेण्यात आलेला असून त्यांनी काही इन्स्ट्रुमेंट रद्द करुन काही इन्स्ट्रुमेंटची संख्या वाढवलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे यादी सुधारित केली आहे.

| REQUIREMENT OF UROLOGY DEPARTMENT | | | |
|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Description** | **Qtv.** | **App. Cost.** |
| A | **URS - Richard Wolf Germany** | 1 | |
| 1 | E Line Operating URS 8 to 9.8 F | 1 | |
| 2 | E Line Operating URS 1 to 6.5 F | 1 | |
| 3 | Telescope Adaptor for Storz Cable | 1 | |
| 4 | Triprosy stone removal forceps (Indian) | 1 | |
| 5 | Lithoclast System Indian | 1 | |
| 6 | Conecting Bridge For URS | 1 | |
| | | **Total-** | **675000.00** |
| B | **For URS** | | |
| 1 | Rousch uretric dialator set | 1 | |
| 2 | Knottingham One Step Dialator (Rousch / Cook / Bard) 6 to 12F | 1 | |
| 3 | Knottingham One Step Dialator (Reusch / Cook / Bard) 6 to 14F | 1 | |
| | | **Total-** | **20000.00** |
| C | **For Lower Tract - Karl Storz** | | |
| 1 | Hopkins Telescope $0^0$ | 1 | |
| 2 | HopkinsTelescope $30^0$ | 2 | |
| 3 | Telescope Camera DX | 1 | |
| 4 | Cytoscope Sheath 17.5 Fr | 1 | |
| 5 | Cytoscope Sheath 22.5Fr | 1 | |
| 6 | Cytoscope Sheath 25.5 Fr | 1 | |
| 7 | Telescope Bridge Single channel | 1 | |
| 8 | Telescope Bridge Double channel | 1 | |
| 9 | Resetoscope Set with all essential parts (Non Rotatable) | 1 | |
| 10 | Non Portable | 1 | |
| 11 | Obturator | 1 | |
| 12 | Visual Obturator | 1 | |
| 13 | Working Element Double | 1 | |
| 14 | Stone Crushing Forceps | 1 | |
| 15 | Urethrotome with Obturator | 1 | |
| 16 | Supplementary Sheath | 1 | |
| 17 | OTIS Urethrotome | 1 | |
| 18 | Cold Knife | 4 | |
| 19 | Visualising Bridge for Urethrotome | 1 | |
| 20 | Rigid Biopsy Forceps | 1 | |
| 21 | Rigid meatotomy Scissors | 1 | |
| 22 | Fiber Optic Cable | 2 | |
| 23 | Light Source Double Bulb - 250 Watt | 1 | |
| 24 | Extra Loop For Turs | 1 | |
| 25 | Tommey Syringe 50 CC (Indian) | 2 | |
| 26 | Urethral Metal Dialator (Indian) | 2 | |
| 27 | Suprapublic Trocar Puncture Set (Indian) | 1 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Total - | 1206000.00 |
| D | **Urology Disposable** | | |
| 1 | D.J. Stent 6Fr. 26 Cm. Indian / Imported) | 10 | |
| 2 | D.J. Stent 5Fr. 24 Cm. Indian / Imported) | 10 | |
| 3 | Straight Guide Wire .025F | 10 | |
| 4 | Radio Focus(Terumo) Guide Wire .038 F | 10 | |
| 5 | Terumo Guide Wire .035 F | 10 | |
| 6 | Terumo Guide Wire .032 F | 10 | |
| 7 | Terumo Guide Wire .025 F | 10 | |
| 8 | Zebra Guide Wire .035 F | 10 | |
| 9 | Irrlqation Evaquatar (Indian / Imported) | 10 | |
| | | **Total-** | **99000.00** |
| | **Total of all Items -** | | **2000000.00** |

तरी उपरोक्त यादीतील इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खेरदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२९ स्कुलबस खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.५८७** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे चालू शैक्षणिक वर्षात ज्यु.केजी वर्गाकरिता २५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. नवीन प्रवेश घेतलेल्या १८५ विद्यार्थ्यांच्या पालकांनी स्कुलबसची मागणी केलेली असून त्याकरिता प्राचार्या, श्री साईबाबा इं. मि. स्कुल यांनी ५७ सिटची आर.टी.ओ. परवाना असलेली चार नवीन स्कुल बसेसची मागणी केलेली आहे.

तथापि, टाटा कंपनीची बॉडी बांधणी केलेल्या बसची आसन क्षमता जास्तीत जास्त ५२ सिटची आहे. त्यानुसार, नवीन एक टाटा स्टार स्कुलबस खरेदी केल्यास येणारा भांडवल गुंतवणुकीसह खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे:-

**५२ सिट असलेली एक बसची अंदाजे खरेदी किंमतः- रू.१६,००,०००/-**

**अ)** निश्चित खर्च (०१ वर्षासाठी):-

| **अ.नं.** | **तपशिल** | **रक्कम (रू.)** |
|---|---|---|
| ०१ | भांडवलावरील व्याज ८% प्रमाणे- | १,२८,०००.०० |
| ०२ | घसारा २०% प्रमाणे:- | ३,२०,०००.०० |
| ०३ | टॅक्स प्रति सिट रू.५००/- प्रमाणे- | २६,०००.०० |
| ०४ | विमा खर्च:- | ४२,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **५,१६,०००.००** |

**ब)** उपयोगिता खर्च (०१ वर्षासाठी):-

| **अ.नं** | **तपशिल** | **रक्कम (रू.)** |
|---|---|---|
| ०१ | इंधन वंगण खर्च:- अंदाजे दररोज ३० कि.मी. प्रवास डिझेल दर रू.३८/-, प्रति लिटर ३.५० कि.मी. ॲव्हरेज व २४० शाळेचे दिवस | ७८,१७१.०० |
| ०२ | अंदाजे दुरूस्ती व देखभाल खर्च:- | ५,०००.०० |
| ०३ | कायम चालक पगार प्रति महा रू.७,०००/- प्रमाणे १२ महिण्याकरिता | ८४,०००.०० |
| ०४ | कायम मदतनीस पगार प्रति महा रू.५,५००/- प्रमाणे १२ महिण्याकरिता | ६६,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **२,३३,१७१.००** |

**"अ" आणि "ब" मिळून वार्षिक खर्च:- रू.७,४९,१७१/-**

नवीन एक बस खरेदी केल्यास वार्षिक अंदाजे रू.७,४९,१७१/- मात्र संस्थानचा संभाव्य खर्च येणार आहे.

तसेच रू.३,०५०/- वेतनश्रेणीचे ०४ वाहनचालक व रू.२,५५०/- वेतन श्रेणीचे ०४ मदतनीस अशी पदे निर्माण करावी लागतील.

तरी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे मागणीनुसार, टाटा कंपनीच्या नवीन चार स्कुल बसेस खरेदी व याकामी येणाऱ्या अंदाजे रू. ६४ लाख मात्रचे खर्चास तसेच ०४ वाहन चालक, ०४ मदतनीसांची पदे निर्माण करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.३० श्रीसाईलीला गुजराथी भाषिक अंकाचे कामकाजाचे नियोजनास व तत्संबधीत येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.५८८** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्र.५११ नुसार गुजराथी भाषिक भक्तांकरीता श्री साईलीला मासिकाची गुजराथी आवृत्ती श्री जयसिंह ब निंबाळकर गुजराथी भाषिक तज्ज्ञ यांचे मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध करणेस मान्यता मिळालेली असून, गुजराथी

साईलीला मासिकाचे छपाईकामाची जबाबदारी श्री जयसिंह ब. निंबाळकर यांचेवर सोपविण्यात येऊन, यासाठी त्यांना मानधन व शिर्डी येथे राहाण्याची व जेवणाची मोफत सोय, बडोदा ते शिर्डी येथे येणे - जाण्याचे प्रवास भाडे खर्च देणेबाबत ठरले आहे. तसेच श्री जयसिंह ब. निंबाळकर यांचेवर गुजराथी साईलीला कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी टाकली असल्याने साईलीला प्रकाशित करणेसंबंधी कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी दि.०८.०५.२००८ रोजी प्रत्यक्ष शिर्डी येथे येऊन मा.कार्यकारी अधिकारी यांचे सोबत झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी दि.१७.०५.२००८ रोजीचे पत्राद्वारे श्री साईलीला गुजराथी सुरु करण्यासाठीचे नियोजन व येणारा अपेक्षित खर्च तसेच तत्संबंधीत लागणा-या प्रतिपूर्तीसाठी आवश्यक गोष्टींची खालील तपशिलाप्रमाणे माहिती सादर केली आहे.

**अ) श्री साईलीला अंकाची रुपरेषा/छपाई**

०१) श्रीसाईलीला द्वैमासिक राहिल.

०२) श्रीसाईलीला अंकांची छपाई बडोदे येथे श्री निबांळकरांच्या मार्गदर्शनाखाली करुन घेणे

०३)श्रीसाईलीला मासिकाच्या छपाईकामी आवश्यक असणारी संगणकीय (D.T.P.) अक्षर जुळवणीचे काम श्री निंबाळकरांनी बडोदे येथे करुन घ्यावे. अथवा कॉम्प्युटर ऑप्रेटरची नेमणूक करावी व त्याला D.T.P. चे काम नसतांना उर्वरित वेळेत ऑफिसची इतर कामे करावीत, त्यासाठी त्यांनी कॉम्प्युटर खरेदी करणेबाबत प्रस्ताव सुचित केला आहे.

०४) श्री साईलीला मासिकाचे सर्व पाने दोन रंगात व मुख पृष्ठाची चार पाने चार रंगात करुन वरती लॅमिनेशन करावे.

०५) श्रीसाईलीला मासिकाकरीता आतिल पानांचा पेपर सुपरप्रिंट ८० जीएसएमचा वापरावा, मुखपृष्ठासाठी १७० जीएसएमचा इंडियन आर्ट पेपर वापरावा

०६) श्रीसाईलीला मासिकाचे छपाई करीता बडोदे येथील कमीत कमी तीन प्रिंटरचे कोटेशन मागवावेत.

०७) श्रीसाईलीला अंक छपाई करुन ते पाकीटात टाकून त्यावर पत्त्यांचे लेबल लावून पोस्टाद्वारे पाठविण्याची सर्वस्वी जबाबदारी प्रेसधारकाची राहिल त्याप्रमाणे प्रेसधारकाकडून कोटेशन मागवावे.

०८) कोटेशन ३०००-५००० व १०००० कॉपीज करीता मागणी करावी.

०९) पहिल्या गुजराथी साईलीलाची पाने १२ + ४ असावी

१०) गुजराथी साईलीलेच्या पहिल्या अंकात मा. अध्यक्ष साहेब व गुजराथ व महाराष्ट्रातील मा. मुख्यमंत्री यांचे मेसेजेस विषयी उल्लेखांचा समावेश असावा.

**ब) गुजराथी संपादकीय कार्यालय :-**

१) गुजराथी संपादकीय कार्यालय बडोदे येथे सुरु करावयाचे झाल्यास, त्याकरीता ऑफिससाठी कमीत कमी १०० ते २०० स्के.फू ट जागा असावी, त्याचे भाडे रु.१००० ते २००० पर्यंत अपेक्षित आहे, ऑफिससाठी टेबल, खुर्च्या , पंखे, टेलिफोन वगैरेची आवश्यकता असल्याने सदरची सोय उपलब्ध करुन देणे आहे.

**क) कर्मचारी नेमणूक :-**

१)ऑफिस स्टॉफची नेमणूक करावी लागेल. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ चे सभेतील विषय नं.३५ व निर्णय क्र.५११ तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०२.२००८ चे सभेतील विषय नं.२४ व निर्णय क्र.१९१ नुसार मा. जयसिंह ब.निंबाळकर यांचेवर गुजराथी साईलीला कार्यकारी संपादक म्हणून सर्वस्वी जबाबदारी टाकणेबाबत ठरले असून, संपादक म्हणून प्रतीमहा रु.७०००/- व उपसंपादक पदासाठी रु.५५००-१७५-९००० व कॉम्प्युटर ऑप्रेटर प्रतिमहा वेतन रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० व कार्यालयीन शिपाई रु.२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० या वेतनश्रेणीत कर्मचारी नेमणूक करणेबाबत ठरले आहे.

उपसंपादक या पदाऐवजी सहाय्यक लिपीक म्हणून तात्पुरत्या स्वरुपात श्री निंबाळकर यांनी शिफारस केलेले श्री. अनिल भोजानी यांना सुरुवातीस प्रतिमहा रु.३५००/- एकत्रित मानधनावर ६ महिन्यांसाठी नेमणूक करावी. तदनंतर अंकांचा खप, त्यास साईभक्तांचा मिळणारा प्रतिसाद व कामाचे स्वरुप आदिबाबी विचारात घेता त्यांचे एकत्रित मानधन रु.५०००/- करणेबाबत विचार करता येईल असे ठरले आहे. श्री निंबाळकर यांनी त्यांचे वरील संदर्भिय पत्रात उपसंपादकाची नेमणूक सहा महिन्यानंतर करणेविषयी सुचित केले आहे.

**ड) साईलीला संबंधीत किरकोळ खर्चाकरीता मागणी** :-

श्री. निंबाळकर यांनी गुजराथी साईलीलासंबंधी किरकोळ खर्चाकरीता परवानगी मागीतली आहे तथापी त्यांनी रकमेचा मात्र उल्लेख केलेला नाही. खर्चासंबंधी त्यांना प्रत्यक्ष विचारुनच निश्चित ठरविता येईल.

**इ) स्टेशनरी** :-

गुजराथी साईलीला संपादकीय कार्यालयासाठी लागणारी आवश्यक ती स्टेशनरी संस्थानने पुरवावी अथवा बडोदे ऑफिसने छापून किंवा बाहेरुन विकत घेण्याविषयी परवानगी मागीतली आहे.

**ई) सभासद वर्गणी व तत्संबंधी कार्यवाही पूर्तता** :-

१) श्री निंबाळकर यांनी साईलीला सभासद वर्गणी विषयीचे चेक किंवा ड्राफ्ट,फॉर्मस, कलेक्शन करुन शिर्डी येथे पाठवावेत.

२) सभासदांकडून आलेल्या फॉर्मची कॉम्प्युटर लेबल करुन शिर्डीहून बडोद्याला पाठवावीत.

३) सभासदांची वर्गणी व फॉर्म घेण्याचे काम शिर्डी येथील ऑफिसात **श्री अनिल भोजानी** यांनी करावे.त्यासाठी त्यांनी तीन वर्षाचे, पाच वर्षाचे व दहा वर्षाचे रेकॉर्ड ठेवावे. वर्ष संपल्यानंतर सभासदांना रिमांयडर पाठवावे बडोदे येथून आलेले गुजराथीतून लिहिलेल्या फॉर्मचे मराठी अथवा इंग्रजी मध्ये रुपांतर करुन त्याची नोंदणी करावी. शिर्डी संस्थानची माहिती गोळा करुन त्याचे गुजराथीत रुपांतर करुन बडोदे येथे पाठविण्याचे करावे. याकरीता श्री भोजानी यांना सभासदांची वर्गणी व फॉर्म घेण्याकरीता शिर्डीतील **जुन्या कॅन्टीनजवळील स्वागत कक्षाचे काऊंटरवर** बसण्याची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.साईलीला द्वैमासिक सभासदाची वर्गणी श्री निंबाळकरांनी खालील तपशिलाप्रमाणे आकारणेबाबत सुचित केले आहे.

अ) तीन वर्षाकरीता रुपये ३५०/-

ब) पाच वर्षाकरीता रुपये ५५०/-

क) दहा वर्षाकरीता रुपये १,०००/-

ड) परदेशासाठी दहा वर्षाकरीता १०० डॉलर्स

उपरोक्तप्रमाणे वर्गणीबाबत मात्र याआगोदर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०२.२००८ चे सभेतील विषय नं.२३ निर्णय १९१ नुसार श्री. निंबाळकर यांचे मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे वर्गणी आकारणेबाबत निर्णय समंत झाला आहे.

अ) वार्षिक वर्गणी रुपये १५०/-

ब) पाच वर्षाकरीता रुपये ७००/- व दहा वर्षाकरीता रुपये १४००/-

क) परदेशी भक्तांसाठी पाच वर्षासाठी रुपये ६,७००/- म्हणजे १७० डॉलर्स व दहा वर्षाकरीता रुपये ७,४००/- म्हणजे १८० डॉलर्स ठेवणेस मान्यता देण्यात आली आहे.

**फ) जाहिरात :-**

१) गुजराथ राज्यातील मोठ्या शहरातून व छोट्या गावातून अंदाजे चाळीस गावात हॅन्डबील (जाहिरात पत्रक) २,००,००० छापून वाटणेत यावेत त्यासाठी अंदाजे खर्च रुपये २०,०००/- अपेक्षित आहे.

२) गुजराथमधील मोठमोठ्या मंदिरात १०० पोस्टर्स लावावेत (डिजिटल छपाई) त्यासाठी अंदाजे खर्च रुपये २०,०००/- अपेक्षित आहे.

३) सर्व मुख्य वर्तमानपत्रातून ह्यासंबंधी माहिती द्यावी

४) वेबसाईट तयार करावी

उपरोक्तप्रमाणे अवलोकन करता खालील तपशिलाप्रमाणे अपेक्षित खर्च श्री. निंबाळकर यांनी श्री साईलीला पहिल्या १०,००० अंकांसाठी येणारा खर्च वरील संदर्भिय पत्रात नमुद केलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | अपेक्षित एकूण खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१ | एका अंकाची किंमत रु.७.५०पैसे प्रमाणे | ७५,०००/- |
| ०२ | पाकिटे | १०,०००/- |
| ०३ | २००० अंक पोस्टाने पाठविण्याचा खर्च प्रती अंक रु.७.०० प्रमाणे | १४,०००/- |
| ०४ | अंक कुरिअरने पाठविण्याचा खर्च | ६,०००/- |
| ०५ | पोस्टर व हॅन्डबील कुरिअर खर्च अंदाजे | ५,०००/- |
| ०६ | सभासदांची नांवे व पत्ते यांचे स्टीकर तयार करण्याचा खर्च | ५,०००/- |
| ०७ | जाहिरात पत्रक छपाई अधिक डिजिटल पोस्टर्स छपाई खर्च | ४०,०००/- |
| | अपेक्षित एकूण खर्च रुपये | १,५५०००/- |

तरी वरील प्रमाणे...

अ) गुजराथी साईलीला अंकाचे छपाईबाबत कार्यवाहीस

ब) बडोदे येथे कार्यालयासाठी भाड्याने जागा घेऊन आवश्यक सुविधा करुन देणेस,

क) तात्पुरते कर्मचारी नेमणूकीस व आकृतीबंधात कायमस्वरुपी पदे निर्माण करणेस,

ड) किरकोळ खर्चासाठी मान्यतेस,

इ) स्टेशनरी छपाईस अथवा विकत घेणेस

ई) मासिकाची वर्गणी मान्य करुन त्यानुसार कार्यवाहीस

फ) प्रसिद्धीपूर्वी जाहिराती, पोस्टर्स, इत्यादींसाठी रुपये १,५५,०००/- मात्र चे खर्चास

तसेच बडोदे येथून छपाईस, प्रकाशनासाठी आवश्यक नोंदणी करणेस मान्यता देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.३१ श्रीसाई दैनंदिनी सर्वसाधारण, डिलक्स, सुपरडिलक्स स्वरुपात व दिनदर्शिका -२००९ छपाईबाबत.**

**निर्णय क्र.५८९** सन २००८ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका २००८ छपाईकामी निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून मुदतीत दाखल झालेल्या कोटेशन्स धारकांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष बोलावून वाटाघाटीत दर निश्चित करुन खालीलप्रमाणे छपाई करुन घेण्यात आलेली आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **साई दैनंदिनी २००८ नग** | **श्री साईबाबा दिनदर्शिका २००८ सिक्स सिटर नग** | **श्री साईबाबा दिनदर्शिका २००८ सिंगल शिट नग** |
|---|---|---|---|---|
| ०१ | छपाई कर्त्याचे नांव | महाराष्ट्र सह. मुद्रणालय, पुणे | मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई | मे. कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ०२ | एकूण छपाई संख्या | **९०,०००** | **१,००,०००** | **२,००,०००** |
| ०३ | विक्री - **अ) मुळ किंमतीने** | ६७५३४ | ९६६६१ | १९६७२८ |
| | **ब) पोस्टाने** | ८९२ | १५०९ | ३२९ |
| | **क) सवलतीचे दराने रु.२५/- प्रमाणे** | ५५४७ | - | - |
| ०४ | सप्रेम भेट मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष,विश्वस्त, स.पाहुणे इ. | ४५३२ | १८०९ | २८१० |
| ०५ | शिल्लक ( शिर्डी + मुंबई ) | ११४९५ | २१ | १३३ |
| ०६ | एकूण छपाई नग | ९०,००० | १,००,००० | २,००,००० |
| ०७ | प्रती नगास छपाई दर (रुपये ) | ५०/- | ८.४० | ४.७५ |
| ०८ | एकूण छपाई खर्च | ४५,००,०००/- | ८,४०,०००/- | ९,५०,०००/- |
| ०९ | विक्रीद्वारे जमा रक्कम | ३५,५९,९७५/- | ९,८१,७००/- | ९,८५,२८५/- |

मागिल वर्षाप्रमाणे सन २००९ साठी नेहमीप्रमाणे सर्वसाधारण श्री साई दैनंदिनी तसेच चालू वर्षी नव्याने डिलक्स व सुपर डिलक्स दैनंदिनी याप्रमाणे तीन प्रकारात विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याचे प्रयोजन आहे. तसेच यासोबत मागिल वर्षाप्रमाणे श्री साईबाबा दिनदर्शिका सिक्स शिटर तसेच सिंगल सिटर (खालील बाजूस प्रतिमहा तारखेचे १२ शिटस् ) छपाई करुन भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन द्याव्या लागतील त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | अंदाजे छपाई दर रुपये | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २००९ (सर्वसाधारण) | ७५,००० | ६०/- | ४५,००,०००/- |
| ०२ | श्री साई दैनंदिनी २००९ (डिलक्स कॉपी) | २५,००० | १००/- | २५,००,०००/- |
| ०३ | श्री साई दैनंदिनी २००९ (सुपर डिलक्स कॉपी ) | २५,००० | १२५/- | ३१,२५,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००९ सिक्स सिटर | १,००,००० | १५/- | १५,००,०००/- |
| ०५ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००९ सिंगल सीट नग (खालील बाजूस प्रतिमहा तारखेचे १२ शिटस्) | २,००,००० | ०७/- | १४,००,०००/- |
| | | | एकूण अंदाजे खर्च | **१,३०,२५,०००/-** |

उपरोक्तनुसार नेहमीप्रमाणे श्री साई दैनंदिनी सर्वसाधारण व डिलक्स कॉपी, सुपर डिलक्स कॉपी या प्रकारात तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका सिक्स शिटर व श्री साईबाबा दिनदर्शिका सिंगल सिटर २००९ छपाई करुन घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्याकामीच्या निविदा तयार करुन विक्री करुन स्पर्धात्मक दर व नमुने मागवून श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिकांचे छपाईचे काम करुन घ्यावे असे नम्र मत आहे. तरी वर दर्शविलेप्रमाणे श्री साई दैनंदिनी सर्वसाधारण व डिलक्स कॉपी, सुपर डिलक्स कॉपी या प्रकारात तसेच श्री साईबाबा दिनदर्शिका सिक्स शिटर व श्री साईबाबा दिनदर्शिका सिंगल सिटर छपाईकामी येणा-या एकूण रुपये १,३०,२५,०००/- मात्र अंदाजे अपेक्षित खर्चास व जाहिरातीव्दारे निविदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.३२ साठा संपत आलेल्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेएबाबत.**

**निर्णय क्र.५९०** संस्थान प्रकाशित पुस्तकांचा साठा भांडार विभागात सध्या अल्प प्रमाणात साधारणतः २ ते ३ महिने पुरेल एवढाच शिल्लक आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.२४६ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तकांचे विक्रीत वाढ होऊन श्री साईबाबाचे जीवन व कार्याचा प्रचार-प्रसार जगभर व्हावा या करीता सर्व भक्तांना/खरेदीदारांना विक्री किंमतीवर २०% सुट

देण्यात यावी असे ठरले आहे. त्यामुळे पुस्तके विक्रीचा खप मोठया प्रमाणात वाढला असल्याने पुस्तके उपलब्धतेअभावी भक्तांची गैरसोय निर्माण होऊ नये यासाठी खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे साठा संपत आलेल्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणे गरजेचे आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत पंजाबीत भाषांतरीत केलेले श्री साईसत्चरित्र प्रकाशित करणेबाबत मान्यता मिळालेनुसार छपाई करुन घेणे आहे.

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | शिल्लक दि.१८.६.०८ | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाईची संख्या | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सदगुरु साईनाथ सगुणो. आरती | मराठी | - | ०३.०२.०७ | १,२५,००० | १.६८ | २,५०,००० | ३.०० | ७,५०,०००/- |
| ०२ | श्री साई तेलगू पुजाविधी आरती | तेलगू | - | २०.०७.२००० | १,००,००० | ५.०० | ५०,००० | ७.०० | ३,५०,०००/- |
| ०३ | श्री साई स्तवन मंजरी | हिन्दी | १४०० | १३.१२.०४ | २५.००० | १.९५ | २०,००० | ३.०० | ६०,०००/- |
| ०४ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | - | १३.१२.०४ | १०.००० | १.८० | १०,००० | ३.०० | ३०,०००/- |
| ०५ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | ४२०० | २९.०४.०६ | १०,००० | ४.०० | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०६ | मुलांचे साईबाबा | गुजराथी | ४२० | १८.०४.२००० | १०,००० | ४.०० | ५,००० | ७.०० | ३५,०००/- |
| ०७ | मुलांचे साईबाबा | तेलगू | १४४०० | ३०.१०.०४ | ५०,००० | ३.९० | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा चित्रावली | मराठी/ इंग्रजी | ५०० | ३१.०१.०७ | १०,००० | ५.६० | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०९ | गुरुपाठाचे अभंग | मराठी | ३५० | ०२.०२.०४ | ५,००० | ३.१० | ५,००० | ५.०० | २५,०००/- |
| १० | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | १९८१ | ६.०२.०७ | १०,००० | ६६.९० | १०,००० | ७५.०० | ७,५०,०००/- |
| ११ | श्री साई स्तवन मंजरी | कन्नड | २८०० | १८.०४.२००० | २५,००० | १.८० | ५,००० | ३.०० | १५,०००/- |
| १२ | श्री साईसत् चरित्र प्रथम आवृत्ती | पंजाबी | | नवीन छपाई | - | - | ५,००० | १००.०० | ५,००,०००/- |
| | | | | | | | | **एकूण रु.** | २७,२५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे दर्शविल्यानुसार पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेकामी अंदाजे एकूण रूपये २७,२५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे पुस्तकांचे छपाईसाठी निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस तसेच छपाईकामी अंदाजे एकूण २७,२५,०००/-मात्र चे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३३** **प्रभात डेअरी प्रा.लि., निर्मलनगर, पो-टिळकनगर यांना प्रसादालय परिसरात स्टॉलसाठी जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.५९१** प्रभात डेअरी प्रा. लि. निर्मळ नगर, यांचे दि ०२/०७/२००८ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर पत्रात त्यांनी ' संस्थानच्या पसादालयासमोर संस्थानने स्थानिक दूध उत्पादनांच्या उद्योगांना त्यांचा स्टॅाल ठेवण्याची परवानगी दिलेली असून, त्यानुसार संस्थान नोकरांची पतपेढी, गोदावरी दूध संघ निझर्णेश्वर डेअरी राजहंस दूध संघ इ. स्टॅाल सुरु आहेत. संस्थेचे स्टॅाल जेथे असे नमूद केले ओ त्याचप्रमाणे प्रभात डेअरी बाबतही त्यांनी त्यांचे अर्जात माहिती नमूद केली आहे.

प्रभात डेअरी प्रा.लि. राहाता तालुक्यातील रांजणखोल येथील एक महत्वाकांक्षी दूग्ध प्रकल्प असून राज्यातील खाजगी क्षेत्रातील आय.एस. ओ ९००१-२००० हे गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीय मानांकन मिळविणारा पहिलाच प्रकल्प आहे. येथे तयार होणा-या दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या गुणवत्तेची विशष काळजी घेतली आहे. पिशवीबंद दूध , साजूक ॲगमार्क ग्रेड तुप, स्टरलाईज्ड सुगंधी दूध, लस्सी, श्रीखंड, पेढे ताक, दही, पनीर फु्ट ज्युस व लोकप्रिय ड्रिकींग वॉटर असे सुमारे पंधरा उत्पादने राज्यात लोकप्रिय आहेत. शिर्डी पासून हा उद्योग जवळच असल्या कारणाने ताजी उत्पादने अत्यंत अल्प दरात साईभक्तांना उपल्बध होऊ शकतील. साईबाबांच्या पवन भूमीतील भूमीपुत्राचाच हा स्थानिक प्रकल्प आहे अशी माहिती अर्जात दिलेली आहे. शिर्डी सारख्या आंतरराष्ट्रीय स्तराच्या देवस्थानामध्ये या उद्योगाला जागा मिळाल्यास साईभक्तांचे सेवा करण्याची संधी मिळेल. सदरचा स्टॅालवर आम्ही २४ तास अविरत सेवा देण्यास बांधील आहोत. अशा आशयाची इच्छा - मागणी त्यांनी प्रस्तुतचे अर्जात संस्थानकडे केलेली आहे.

इतर स्थानिक दूध संघाना संधी दिलेली आहे तसेच या उद्योगालाही स्टॅाल ठेवण्याची संधी दयावी संस्थानचे नियमानुसार आवश्यक त्या सर्व पूर्तता करण्यास तयार आहोत. अशी त्यांनी पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

मा व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर संस्थानचे प्रसादालय परिसरात सहकारी संस्था, व पतपेढी व यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने १ वर्ष मुदत पावेतो देण्यात आलेले आहे. याबाबत त्यांचेकडून एका स्टॅालसाठी डिपॅाझीट रुपये १०,०००/- मासिक परवाना फी रुपये ५००/- पासून ते रुपये २,०००/- पावेतो आकारणेत

आलेली आहे. तसेच मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बिल वेगळे आकारणी करण्यात येऊन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर सदर स्टॉल देण्यात आलेले आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे -

**संस्थानचे प्रसादालय परिसरात Leave and Licence तत्वावर दिलेले स्टॉल बाबत माहिती तक्ता**

| अ.क्रं. | **सुविधेचे नांव** | मासिक भाडे रुपये | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०४) | प्रवरा फळे व भाजिपाला उत्पादक प्रक्रीया संस्था लि., (बेदाणा विक्री कामी) (डिपॉझिट रु.१०,०००.००) | २०००.०० (स्टॉल) | प्रसादालय परिसरात - एक स्टॉल |
| ०५) | **श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती संघ, श्रीरामपूर** (दुग्धजन्य पदार्थ विक्री) (डिपॉझिट रु.१०,०००.००) | २०००.०० (स्टॉल) | प्रसादालय परिसरात - एक स्टॉल |
| ६) | **संगमनेर तालुका दूधसंघ, अमृतनगर घुलेवाडी, संगमनेर** (दुग्धजन्य पदार्थ विक्री) (डिपॉझिट रु.१०,०००.००) | २०००.०० (स्टॉल) | प्रसादालय परिसरात - एक स्टॉल |
| ७) | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अहमदनगर, शिरडी बसस्थानक. (एस.टी.चे तिकीट ॲडव्हॉन्स बुकींग कामी) | ५००.०० (स्टॉल) | प्रसादालय परिसरात - एक स्टॉल |

सध्या प्रसादालय परिसरात विविध सहकारी संस्थेस व पतपेढीस स्टॉलकामी जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्यात आलेली आहे. सदरचे स्टॉल सहकारी संस्थेचे असून, त्यांचे शेजारी फळ विक्रेते यांचे स्टॉल आहे. व तसेच त्याच परिसरात विविध विभागाचे कार्यालय, चौकशी व निवासस्थान विभाग, प्रसादालय, विद्यत विभाग, खरेदी विभाग, भांडार विभाग, कॅन्टीन विभाग असे विभाग असून सदर परिसरात साई भक्तांची गर्दी / वर्दळ मोठ्या प्रमाणात चालू असते. त्यामुळे सद्यपरिस्थितीत त्यांना स्टॉल कामी जागा देणे योग्य ठरणार नाही. यापूर्वी सुध्दा संस्थान संरक्षण विभागाने त्या ठिकाणी सदर परिसरात सद्यपरिस्थितीत स्टॉल कामी कोणालाही परवानगी देऊ नये असे कळविले आहे. व त्या ठिकाणी नेहमीच भक्तांची गर्दी होत असल्याने ये-जा कामी अडचण निर्माण होते. संस्थानला भक्तांचे सोईसाठी मोकळया जागेची आवश्यकता आहे.

त्यामुळे सद्यपरिस्थितीत त्यांना प्रसादालयाच्या परिसरात स्टॉल साठी जागा देता येणार नाही. त्यांचा जागा मागणीबाबतचा अर्ज अमान्य करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता तो मान्य करण्यात आला. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.३४** **संगमनेर तालुका सह.दूध उत्पादक व प्रक्रिया संघ,घुलेवाडी पोष्ट संगमनेर यांचा भक्तनिवासस्थान इमारतीत गाळा मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.५९२** संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया सघ, घुलेवाडी, पो. संगमनेर याचें दिनांक २१/०६/२००८ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर पत्रात त्यांनी " संघास नोव्हेंबर २००६ पासून संस्थानचे प्रसादालयाचे आवारात राजहंस दूध, दुग्धजन्य पदार्थ व राजहंस ॲक्वा ड्रिकींग वॉटर विक्री करणेबाबत स्टॉल उभारण्यास परवानगी दिलेली आहे. आता संगमनेर दूध संघास ५०० रुमचे कार्यक्षेत्रात राजहंस दूध, दुग्धजन्य पदार्थ व राजहंस ॲक्वा ड्रिकींग वॉटर ची विक्री करणेकरिता स्टॉलची उभारणी करून साईभक्तांची सेवा करणेची इच्छा आहे. संस्थानमार्फत ५०० रुम मधील या गाळयामध्ये आमचे संघास राजहंस दूध, दुग्धजन्य पदार्थ, राजहंस ॲक्वा, ड्रिकींग वाॅटरची विक्री करणेची इच्छा आहे. सदर गाळयाबाबत संस्थानच्या अटी व शर्ती संघास मान्य राहतील. तरी संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व पक्रिया सघास ५०० रुमे कार्यक्षेत्रात राजहंस दूध, दुग्धजन्य पदार्थ व राजहस ॲक्वा, पॅकेज्ड वॉटरची विक्री करणेकरिता लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळा मिळावा. " अशी त्यांनी पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

मा व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम काही गाळे शासकीय उपक्रम, सहकारी संस्था व खाजगी तसेच पतपेढी व इतर यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने व १ वर्ष मुदत पावेतो देण्यात आलेले आहे. याबाबत त्यांचेकडून डिपॉझीट रुपये १०,०००/- पासून रुपये ५०,०००/- ते रुपये ३,१८,०००/- पर्यत घेऊन लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर मासिक परवाना फी रुपये ६०५/- रुपये-पासून ८८७/ ते रुपये ४५००/- पावेतो आकारणेत आलेली आहे. लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळे देण्यात आलेले आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

संस्थानचे ५०० रुम परिसरात दिलेले गाळे बाबत माहिती तक्ता

| अ.नं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | **साई संस्थान एम्प्लॉईज केडीट को ऑप सोसा, शिर्डी प्रसाद नॉव्हेल्टी** | | |
| | अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.१ | ९७६/- | भक्तनिवास डी ब्लॉक नं.३ - गाळा |
| | ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.२ | ९७६/- | भक्तनिवास डी ब्लॉक नं.२ - गाळा |
| | क) प्रसाद स्टोअर नं.१ | ९७६/- | भक्तनिवास डी ब्लॉक नं.४ - गाळा |
| २) | एस.टी.डी.बुथ श्री.जगधने **(डिपॉझीट रु, ३,१८,०००/-)** | १७३१/- | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | जनरल स्टोअर्स-<br>श्री.नंदू कोळपकर, शिरडी<br>**(डिपॉझीट रु. १,२५,०००/-)** | **४२५९/-** | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं. ०६ |
| ४) | श्री. अजय अनिल बोरावके,<br>गुरुकृपा सेल्स, कोपरगांव<br>साईगंगा ( मिनरल वॉटर )<br>**(डिपॉझीट १०,०००/- )** | २४२०/- | नविन भक्तनिवास डी विंग गाळा नं ०८ |
| ५) | प्रवरा फळे व भाजीपाला<br>उत्पादक प्रकीया संस्था लि.,लोणी.<br>**(डिपॉझीट १०,०००/- )** | **२०००/-** | नविन भक्तनिवासस्थान ए विंग गाळा |
| ६) | श्री. प्रविण अशोक शिंदे<br>राहणार शिर्डी, ता राहाता<br>जिल्हा अहमदनगर Top N Town Ice Cream<br>**(डिपॉझीट रुपये १,००,०००/-)** | **२०००/-** | नविन भक्तनिवासस्थान ए विंग गाळा |
| ७) | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहा री दूध व्याव. संध, लि.बाभळेश्वर ता - राहाता दूग्धजन्य पदार्थ विक्री<br>**(डिपॉझीट ५०,०००/- )** | ४,५००/- | नविन भक्तनिवासस्थान मध्ये गाळा |

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रकिया संघ मर्यादित,मु. घुलेवाडी,पो संगमनेर यांना ५०० रुम्स कार्यक्षेत्रात संघामार्फत उत्पादीत केले जाणारे राजहंस दूध ,दुग्धजन्य पदार्थ व राजहंस ॲक्वा, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर विक्री करुन भाविकांना सुविधा देणेचा मानस आहे.

यापूर्वी नविन भक्तनिवास परिसरातील गाळे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेले आहेत. गाळयाबाबत उपरोक्त माहिती तक्त्यानुसार लायसेन्स फी आकारणेत आलेली आहे. तसेच डिपॉझीट रक्कम कमीत कमी रुपये १०,०००/- व जास्तीत जास्त रुपये ३, १८,०००/- आकारणेत आलेली आहे. लायसेन्स फी कमीत कमी रुपये ९७६/-व जास्तीत जास्त ४,५००/-अशी आकारणेत मा.व्यवस्थापन समितीचे ठरावाप्रमाणे / निर्णयाप्रमाणे आकारणेत आलेली आहे.

श्री साईभक्तांना मिळणा-या सुविधा विचार करता या संस्थेस श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम इमारतीतील लिलावासाठी विचारधीन असलेल्या व उपलब्ध असलेल्या गाळयापैकी एक गाळा संस्थानचे सोईने लिव्ह ॲड लायसेन्सी तत्वावर देता येईल. इतर गाळे धारकांकडून आकारले जाणारे मासिक परवाना फी विचारात घेऊन व सद्यपरिस्थिती विचारात घेता, त्यांचे कडून एका गाळयास डिपॉझीट रुपये ५०,०००/- ( अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र ) मासिक परवाना लायसेन्सी फी रुपये ६०००/- ( अक्षरी रुपये सहा हजार मात्र ) आकारून तसेच विद्युत बील मीटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारुन देता येईल. सदरचा गाळा सदर संस्थेने ताब्यात घेतलेपासून ११ महिने साठी लिव्ह ॲड लायसेन्स तत्वावर देता येईल सदरचे गाळयात त्यांना फक्त संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रकिया संघ मर्यादित यांची उत्पादने राजहंस दूध, दूग्धजन्य पदार्थ, राजहंस ॲक्वा,पॅक्जेड ड्रिक्रींग वॉटर ची विक्री करण्यास परवानगी देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३५** **शिर्डी नगर पंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कराबाबत.**

**निर्णय क्र.५९३** शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यात येऊ नये, अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्रमांक एसएसएस/वशी ०२/१३२१०/२००४ दिनांक ३१/१२/२००४ चे पत्राने करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगरपंचायत यांनी दिनांक ११/०७/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रती वर्षी मिळणा-या रक्कमेएवढी रक्कम त्यांना मिळावी. सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९० /- एवढी रक्कम त्यांना मिळाली तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २० % वाढ करण्यात यावी, ५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी. अश आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनांस त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. उपरोक्त प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ व दिनांक १८/०९/२००५ चे सभेत विषय क्रमांक ५० निर्णय क्रमाक ४३८ झालेला आहे. प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अशंदानाबाबत प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांना द्यावयाचे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले आहे.

उपरोक्त ठरावांस अनुसरून दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास तत्वता मान्यता देण्यात आली आहे. शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणार साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारु नये. याकरिता शिरडी नगरपंचायत

यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये ३९,६१,९९०/- पुर्णांकित रक्कम रुपये ४०,००,०००/- (अक्षरी रुपये-चाळीस लाख मात्र ) प्रती तीन महिन्यास रुपये- १०,००,०००/- ( अक्षरी रुपये दहा लाख मात्र ) याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगरपंचायतीस देण्यात यावी, असे मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यांत आली. सदरहू विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यास दिनांक ०५/११/२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ६५१ (०६) मान्यता देण्यात आली आहे. ' शिर्डी नगरपंचायतीस संस्थान निर्णय क्रा ४३८ दि ०६/०८/०५व सल्लागार समितीचे ०१/१०/२००५ चे ठरावाची माहिती दि २१/१०/२००५ ने ) पाठविलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी अधिनियम - २००४ चे कलम २१(२) (सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची परवानगी घेणे जरुरीचे आहे.

त्याप्रमाणे संस्थानने जा.क्रं. १३०५४ दिनांक ०९/११/२००५ ने शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केलेले आहे. शिर्डी नगरपंचायत ,शिर्डी यांनी भक्तांकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण कर आकारु नये यासाठी भक्तांचे सेवेसाठी रक्कम रुपये ४०,००,०००/-( चाळीस लाख मात्र ) प्रतिवर्षी देणेबाबत मान्यता मिळणेस सदर पत्राने विनंती केलेली आहे. अद्याप सदर परवानगी मिळालेली नाही. त्याबाबत संस्थानचे अध्यक्ष मा. श्री._ससाणे साहेब तसेच नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष मा. श्री. कैलास कोते प्रयत्नशील आहेत. शासनाकडून परवानगी प्राप्त होणेवर आहे **दरम्यानचे काळात मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावाप्रमाणे नगरपंचायत शिर्डी यांना खालीलप्रमाणे रक्कम अदा केली आहे.**

| अ. नं | माहे | अदाई रक्कम रुपये | मा.व्य.मंडळाची मिटींग दिनांक / विषय नं / निर्णय क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर- २००५ डिसेंबर-२००५,जानेवारी-२००६ | १०,००,०००-०० | दि.४/२/२००६ / आ.वे.वि.नं. २३ / निर्णय क्र. ९८ |
| २ | फेब्रुवारी-२००६, मार्च-२००६, एप्रिल- २००६ | १०,००,०००-०० | दि.३/६/२००६ / आ.वे.वि.नं. ३३ / निर्णय क्र. ४०८ |
| ३ | मे-२००६, जुन-२००६, जुलै -२००६ | १०,००,०००-०० | दि.१४/१०/२००६ / वि.नं. ४४ / निर्णय क्र.८२७ |
| ४ | ऑगस्ट-२००६,सप्टेंबर-२००६ ऑक्टोंबर-२००६ | १०,००,०००-०० | दि.६/१/२००७/ आ.वे.वि.नं. ३८ / निर्णय क्र. १०६ |
| ५ | नोव्हेंबर -२००६, डिसेंबर २००६,जानेवारी २००७ | १०,००,०००-०० | दि.६/१/२००७/ आ.वे.वि.नं. ३८ / निर्णय क्र. १०६ |
| ६ | फेब्रुवारी -२००७ ते मार्च -२००७ पावेतो | ३६,६६,६६६-०० | दि.१०/१/२००८/आ.वे. वि.नं. २२ / निर्णय क्र. १३३ |
| | **एकूण रुपये -** | **८६,६६,६६६-००** | |

शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी आता दि २९/०५/२००८ रोजीचे जा.क्रं. ९६ चे पत्र इकडेस पाठविले आहे. त्यामध्ये संस्थानचे दि. ३१/१२/२००४ अन्वये विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर ( नाके ) बंद करणेबाबत नगरपंचायत सूचीत करण्यात आलेले होते. त्यानुसार या कार्यालयाने नोव्हेंबर २००५ पासून विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर ( नाके ) बंद केलेले आहे. त्यानुसार या कार्यालयास संस्थानकडून रुपये रुपये ८६,६६,६६६ /- इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे असे इकडेस कळविले आहे.

नगरपचांयत कार्यालयाने माहे नोव्हेंबर -२००५ पासून विशेष स्वच्छता कर/ आरोग्य रक्षण कर (नाके) बंद केलेले आहे त्यापोटी या कार्यालयास पुढीलप्रमाणे रकमा प्राप्त होणे आवश्यक असल्याचेही नगरपंचायतीने या पत्रात नमूद केले असून आरोग्य रक्षण कर बंद केला त्यापोटी खालीलप्रमाणे रक्कम प्राप्त हाणे आवश्यक असल्याने सदर रक्कम मिळणेस विनंती केलेली आहे.

| अ.न | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | माहे नोव्हेंबर २००५ ते मार्च २००६ अखेर ( रुपये ४०,००,०००/- दरवर्षी प्रमाणे | **१६,६६,६६६/-** |
| ०२. | माहे एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेर (रु.४०,००,०००/- या रकमेवर दरवर्षी १० % वाढ याप्रमाणे रु ४४,००,०००/-) | **४४,००,०००/-** |
| ०३. | माहे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर (रु.४४,००,०००/-या रकमेवर दरवर्षी १० % वाढ याप्रमाणे रु ४८,४०,०००/-) | **४८,४०,०००/-** |
| | **एकूण रुपये** | **१,०९,०६,६६६/-** |

नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ अखेर एकूण रुपये १,०९,०६,६६६/- अक्षरी ( रुपये एक कोटी नऊ लाख सहा हजार सहाशे सहासष्ट मात्र ) येणे आवश्यक होते. परंतु मार्च २००८ अखेर वरीलप्रमाणे ८६,६६,६६६/- अक्षरी ( रुपये शहयाऐंशी लाख सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट मात्र ) प्राप्त झालेले आहे. उर्वरित रक्कम रुपये २२,४०,०००/- अक्षरी ( रुपये बावीस लाख चाळीस हजार मात्र ) त्यांना संस्थानकडून येणे बाकी आहे. तरी नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ अखरे विशेष स्वच्छता कर / आरोग्य रक्षण कर ( नाके ) पोटी येणे असलेली उर्वरित रक्कम रुपये २२,४०,०००/- मिळणेस नगरपंचायत शिर्डी यांनी दि २९/०५/२००८ रोजी चे पत्राने विनंती केली आहे.

शिर्डी नगपंचायतीने मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी १० % वाढ हिशोबात धरून केलेली असून त्याची खालीलप्रमाणे हिशोब केला असलेचे दिसून येते.

| अ.न | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| | माहे नोव्हेंबर २००५ ते मार्च २००६ अखेर ( रुपये ४०,००,०००/- १२ महिने करिता ) ( प्रति महिना ३,३३,३३३/- प्रमाणे X०५ महिनेचे ) | **१६,६६,६६६/-** |
| ०२ | माहे एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेर (रु.४०,००,०००/- या रकमेवर दरवर्षी १० % वाढ ) याप्रमाणे रु ४४,००,०००/-) ( १२ महिने चे ) | **४४,००,०००/-** |
| ०३ | माहे एप्रिल २००७ ते मार्च २००८ अखेर (रु.४४,००,०००/-या रकमेवर दरवर्षी १० % वाढ -याप्रमाणे रु ४८,४०,०००/-) ( १२ महिनेचे ) | **४८,४०,०००/-** |
| | **एकूण रुपये** | **१,०९,०६,६६६/-** |

वरील प्रमाणे नोव्हे २००५ ते मार्च २००८ अखेर एकूण ०१,०९,०६,६६६/- येणे आवश्यक होते. परंतु शिर्डी नगरपंचायत शिर्डी कार्यालयास मार्च २००८ अखेर वरील प्रमाणे रुपये ८६,६६,६६६/- प्राप्त झालेले आहे उर्वरित रक्कम रुपये २२,४०,०००/- संस्थानकडून येणे बाकी आहे. असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा.सल्लागार समितीचे व व्यवस्थापन मंडळाचे निर्णयाचा विचार केल्यास**

मा. सल्लागार परिषदेचे दि ०१/१०/२००५ रोजीचे सभेतील विषय नं ०६ पथकर नाका बंद करणे बाबत - मा सल्लागार परिषदेचे दि ०१/१०/२००५ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या सभेत शिर्डी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारु नये याकरिता शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४०,००,०००/- प्रतिवर्षी देण्यात यावें. सदरची रक्कम प्रति तीन महिन्यास रुपये १० लाख प्रमाणे आगाऊ शिर्डी नगरपंचायतीस देण्यात यवी असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले.सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.

तदनंतर दिनांक ०५/११/२००५ रोजी संस्थानचे मा. व्यवस्थापनसमितीचे सभेत झालेल्या मिटींगमध्ये विषय नं ०२ निर्णय क्रमांक ६५१-अन्वये सल्लागार समितीचे उपरोक्त शिफारस विचारांत घेता, शिर्डी नगरपंचायतीने भक्तांकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण कर आकारु नये यासाठी प्रतिवर्षी रुपये ४०,००,०००/- अनुदान प्रति ३ महिन्याचे रुपये १० लाख याप्रमाणे द्यावेत असे सर्वानुमे ठरले. याकामी श्री साईबबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम ( e) (c) अन्वये शासनाची पूर्व परवानगी घ्यावी असेही ठरले आहे.

मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावांस अनुसरून संस्थानने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे जा.क्रं. १३०५४/२००५ दि ०९/११/२००५ चे पत्राने शिर्डी नंगरपंचायत यांना रक्कम रुपये ४०,००,०००/- ( रुपये चाळीस लाख मात्र ) प्रति वर्षी देण्यात मान्यता मागितलेली आहे.

शिर्डी नगरपंचायत यांचे दि ११/०७/२००५ चे पत्रात प्रतिवर्षी रुपये ४५,६६,९९० व त्यामध्ये २० टक्के वाढ असा प्रस्ताव होता परंतु उपरोक्त सर्व बाबीचा म्हणजे मा. जिल्हाधिकारी साो यांचे समवेत झालेले सल्लागार समितीचे ठराव, दिनांक ०१/१०/२००५, त्या अनुषंगाने मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक०५/११/२००५ रोजीचे ठराव संस्थानने शासनाकडे रक्कम मंजूरीसाठी पाठविलेला प्रस्ताव संस्थान व नगरपंचायत यामध्ये प्रतिवर्षी रुपये ४०,००,०००/- अक्षरी रुपये चाळीस लाख अदाई बाबतचा उल्लेख आलेला आहे. यामध्ये १० टक्के वाढीव रक्कम प्रतिवर्षी देणेबाबत उल्लेख आहेला नाही. त्याचप्रमाणे १० % वाढीव रकमेची मागणी नगरपंचायतीने प्रथम केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे रक्कम मागणी करतांना नोव्हेंबर २००५ ते मार्च-२००५- ०५ महिने या वर्षासाठी रुपये ४० लाख प्रमाणे रुपये १६,६६,६६६ /- व त्यानंतर रुपये ४० लाखावर १० % वाढ अशा हिशोबाने रक्कम कळविलेली आहे.

नगरपंचायत शिर्डी यांना यापुर्वी नोव्हेंबर २००५ ते जानेवारी २००७ पावेतो रक्कम अदा करतांना १) मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांची शिफारस २) मा.विधी व न्याय विभाग यांचेकडे रक्कम अदायी साठी पाठविलेला प्रस्ताव व त्यांचेकडून प्रलंबीत असलेली मंजूरी या बाबी विचारांत घेऊन मा.व्यवस्थापन मंडळाचे वेळोवेळी झालेले ठरावा प्रमाणे शासनाचे मंजूरीस अधिन राहून रक्कम अदा केलेली आहे. कर वसूली थांबविणेत आलेल्या आदेशाची माहिती पाठविणेस शासनाने नगरपंचायतीस कळवीले होते सदर माहिती प्राप्त होई पावेतो नगरपंचायतीस कर देवू नये असे शासनाने दि. १४/०३/२००७ च्या पत्राने कळविलेले होते. त्याबाबत विचार होऊन मध्यंतरी नगरपंचायतीस कर अदाई केली नव्हती परंतू त्यानंतर फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ ची रक्कम (रु. ३६,६६,६६६/-) अदा करणेत आले. शासनाने नगरपंचायतीस रक्कम अदा करतांना मान्यता न दिलेस नगरपंचायतीस देय असलेल्या घरपट्टीतून / मालमत्ता करातून रक्कम वसूल करावी अशा अटीवर मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णया प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

नगरपंचायत शिर्डी यांनी आता उपरोक्तप्रमाणे अदा केलेले रक्कमे मध्ये वरील प्रमाणे १०% वाढ करुन नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ पावेतो २२,४०,०००/- ( अक्षरी रु. बावीस लाख चाळीस हजार मात्र) मिळणेबाबत मागणी केलेली आहे. तरी त्याप्रमाणे हिशोब मान्य करुन रक्कम शासनाचे मान्यतेस आधीन राहून नगरपंचायतीस स्वच्छता कर, आरोग्य प्रदुषणकर अदा करावा लागेल.

मा.विधी व न्याय विभागाकडे नगरपंचायतीस प्रतिवर्षी ४० लाख रुपये स्वच्छता कर आरोग्य प्रदुषन कर अदा करणेबाबत मंजूरी मिळणेसाठी संस्थानचा प्रस्ताव सादर आहे. त्याबाबत विधी व न्याय विभागाने विभागीय आयुक्त यांचेकडे कर वसूली थांबविणेबाबतचे आदेशाची प्रतीची मागणी केलेली आहे. याबाबत कराचे संदर्भात लागू केलेला उपविधी रद्द करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत करीता प्रधान सचिव, नगर विकास मंत्रालय मुंबई याबाबत उचीत आदेश देणेस विभागीय आयुक्त नासीक यांनी विनंती केलेली आहे. अशा परिस्थीतीत संस्थानचा नगरपंचायतीस प्रतिवर्षी रु. ४० लाख अदा करणेचा प्रस्तावावरील मंजूरी प्रलंबीत आहे. अशा परिस्थीतीत नगरपंचायतीचे सद्याचे मागणी प्रमाणे पहील्या वर्षात ४० लाख व त्यानंतर सदर रक्कमेत प्रतिवर्षी १०% वाढ करुन नगरपंचायतीस रक्कम अदाई बाबत प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास पाठविणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, पूर्वी डिसेंबर २००७ पर्यन्त दिलेल्या रकमेनंतर जानेवारी २००८ पासून दर तिन महिन्याचे १० लाख याप्रमाणे नगरपालिकेच्या मागणीनुसार रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत नगरपंचायतीस यापूर्वी आदा केलेली रक्कम व त्यांनी मागणी केलेली रक्कम यावर सविस्तर चर्चा होऊन, नोव्हेंबर,२००५ ते ऑक्टोबर,२००६ या कालावधीसाठी ४० लाख रकमेवर प्रथम वर्ष असल्यामुळे १०% वाढ न देता त्यानंतरचे नोव्हेंबर,२००६ ते ऑक्टोंबर,२००७ या कालावधीसाठी १०% वाढ विचारात घेऊन, रक्कम रुपये ४४ लाख देय होतात. तदनंतर नोव्हेंबर, २००७ ते जुन,२००८ या कालवधीसाठी १०% वाढ विचारात घेता,रक्कम रुपये ३२,२६,६६५/- देय होतात. (नोव्हेंबर,२००७ ते मार्च,२००८ पावेतो रुपये २०,१६,६६६/-+ एप्रिल,२००८ ते जुन,२००८ पावेतो रुपये १२,०९,९९९/-)

उपरोक्त प्रमाणे रुपये ४०,००,०००/- +४४,००,०००/- + २०,१६,६६६/- +१२,२६,६६५/- = १,१६,२६,६६५/-देय असलेल्या एकुण रक्कम जुन,२००८ अखेर रुपये १,०६,६६,६६६/- नगरपालिकेस आदा करणेत आलेली असून उर्वरित रक्कम रुपये ९,५९,९९९/- नगरपंचायत शिर्डी यांना शासन मान्यतेस अधिन राहून आदा करणेस मान्यता देण्यात आली. याबाबत रक्कम आदा करुन शासन मान्यतेसाठी १०% वाढीसह आदा केलेल्या रकमेस मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव पाठविणेत यावा, असें ठरले.

तसेच नगरपंचायत शिर्डी यांनी याबाबत आर्थिक वर्षाचा मेळ घालून रक्कम ठरविणेत यावी अशी समक्ष विनंती केलेली आहे. यावरही चर्चा होऊन सन २००७-२००८ या कालावधीसाठी देणेत आलेली (एप्रिल,२००७ ते ऑक्टोंबर,२००७ या सात महिन्यांबाबत रक्कम रुपये २५,६६,६६७/- + नोव्हेंबर,२००७ ते मार्च,२००८ या पांच महिन्यांबाबत रक्कम रुपये २०,१६,६६६/- रुपये ४५,८३,३३३/- हिशोबी धरुन) या रकमेवार शासन मान्यतेस अधिन राहून पुढील सन २००८-०९ या वर्षासाठी १०% वाढ देण्यात यावी व तेथून पुढेही दरवर्षी मागील आदा केलेले रकमेवर १०% वाढ देणेत यावी,असें ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३६** **श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप सोसायटी यांचे मार्फत चालवित असलेल्या क्लोकरुम/मोबाईल व्यवस्थेकामी संस्थानचे साईनाथछाया इमारतीत देण्यात आलेल्या गाळयाबाबत.**

**निर्णय क्र.५९४** श्री साईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिरडी, ता राहाता जिल्हा अहमदनगर यांचे दि २१/०१/२००८ चे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी संस्था संस्थानचे परवानगीने संस्थान परिसरात साईप्रसाद इमारत नं.१ , सुलभ शौचालय इमारतीत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीत व स्वागतकक्ष येथे साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरुम व्यवस्था चालवित असून संस्था संस्थानचे नियमाप्रमाणे सदर क्लोकरुमचे दरमहा जागा भाडे संस्थानकडे भरणा करत आहे असे पत्रात नमूद केले आहे

संस्थानचे सूचनेनुसार साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सोसायटीने संस्थानचे साईनाथ छाया इमारतीत क्लोकरुम व्यवस्था सुरु केली आहे. त्यामुळे बस स्टॉप कडून पायी येणा-या साईभक्तांची फार मोठी सोय झाली आहे. साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर क्लोकरुम व्यवस्था संस्थेमार्फत नियमित चालविण्याबाबत आदेश व्हावा. अशी विनंती पतपेढीने केलेली आहे . संस्था आपले नियमाप्रमाणे जागा भाडे भरण्यास तयार आहे. श्रीसाईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिरडी, यांना श्री साईभक्तांचे सामान /लगेज सुरक्षित ठेवणे कामी क्लोकरुम चालविर्णिसं ( साभनि, सुलभ शौचालय, चौकशी कार्यालय शेजारी ) देण्यात आलेले आहे. याबाबत त्यांचेकडून

तीनही ठिकाणचे ( क्लोकरुमची एकत्रित मासिक परवाना फी रुपये २३४०/- आकारणी करण्यात येत आहे. ) तसेच एस.टी स्टॅन्ड समोरील स्वागत कक्ष येथील क्लोकरुम साठी मासिक परवाना फी रुपये ४००/- आकारून व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारून सदर क्लोकरुन लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार परवानगी देणेत आलेले आहे.

संस्थानचे साईनाथ छाया इमारतीत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार बँकेस लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर गाळा दिलेला आहे. त्यांचेकडून खालीलप्रमाणे मासिक परवाना फी आकारणी करण्यात येत आहे.

| अक्रं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१) | युनियन बँक ऑफ इंडीया, शाखा- शिरडी<br>क्षेत्र - ३६४. ४६ चौ. मी. ( ३३.८७ स्क्वे .मीटर ) | ७,५००/- | साईनाथछाया इमारत ग्रांऊड फलोअर A TM on line purpose कामी |
| ०२) | स्टेट बॅंक ऑफ इंडीया,ब्रॅंच शिरडी<br>क्षेत्र - १६२.८८ चौ.मी. | २५,०००/- | साईनाथ छाया इमारत- पहिला माळा साईभक्तांना व संस्थानला बॅकींग सेवा पुरविणे बाबत. |

श्री साईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिरडी यांना १) साईनाथ छाया इमारत येथील क्लोकरुम कामी दिलेल्या ०३ गाळयाचे एकूण क्षेत्र ३६२.८९ चौ. फुट इतक्या आकाराचे असून २) मोबाईल ठेवणेकामी दिलेल्या २ गाळयाचे एकूण क्षेत्र २९४.३२ चौ. फुट इतक्या आकाराचे आहे.

श्री साईसंस्थान एमप्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि. शिरडी यांना क्लोकरुम कामी व मोबाईल कामी दिलेल्या एकूण ०५ गाळयाचे एकत्रित क्षेत्रफळ - ६५७.२१ चौ. फुट आहे . सदरचे गाळे संस्थानचे चौकशी व निवासस्थान विभागाकडून साईभक्तांचे सोई व सेवेसाठी दि १७/१२/२००७ रोजी साईभक्तांची होणारी मोठया प्रमाणावरील गर्दी विचारात घेता, त्यांना सुविधा पुरविणे कामी दिलेले आहे. तसेच मंदीर परिसरात लगेज /सामान / मोबाईल आणण्यास मनाई केले असेलेमुळे साईनाथ छाया इमारतीत साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोबाईल व सामान ठेवणेकामी सुविधा पुरविणे गरजेचे असलेने त्या बाबत विचार करता, साईभक्तांचे सोईसाठी सोसायटीस ०५ गाळे दिलेले आहेत. सध्या त्या ठिकाणी साईभक्तांचे मोबाईल व सामान ठेवणेसाठी क्लोकरुम ची व्यवस्था सोसायटी मार्फत करण्यात आलेली आहे व सदर व्यवस्था सध्या चालू आहे. बँकेस दिलेल्या जागेचे हिशोबाने प्रस्तुत जागेचे क्षेत्र विचारात घेऊन तसेच सोसायटीस संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी दिलेल्या क्लोकरुम ची मासिक परवाना फी विचारात घेता, व प्रस्तुत संस्था ही सहकारी संस्था असलेने त्यांचेकडून क्लोकरुम व मोबाईल ठेवणे कामी वापरात दिलेल्या गाळयाची एकत्रित मासिक परवाना फी रुपये ५०००/- आकारणी करता येईल. तसेच प्रत्येक गाळयचे मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारता येईल. व त्याचप्रमाणे यापूर्वीचा मासिक आकार याच दराने त्यांचेकडून वसूल करता येईल. एस.टी. स्टॅण्ड कडून येणारे साईभक्त यांचे सोईसाठी व सेवेसाठी क्लोकरु मची तसेच मोबाईल ठेवणेकामी भक्तांची व्यवस्था होणेकामी व त्यांची गरज लक्षात घेता, साईनाथ छाया या ठिकाणचे गाळे उपयुक्तता विचारात घेऊन तसेच सोसायटी यांचेकडून अशा सुविधा भक्तांन्रा पुरविल्या जातात या बाबी विचारात घेता, सदर साईनाथ छाया इमारतीत लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर क्लोकरुम व मोबाईल ठेवणेकामी दिलेल्या एकूण ०५ गाळयाची एकत्रित मासिक परवाना फी रुपये ५०००/- आकारून व प्रत्येक गाळयाचे मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महिनेसाठी देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.३७ श्रीसाईसच्चरित्र पारायण सोहळा आयोजन करणे बाबत**

**निर्णय क्र.५९५** सन २००८-०९ या सालात श्री साई सच्चरित पारायण सोहळा वर्ष १४ हा नेहमीचे प्रथेप्रमाणे श्रावण शुध्द १ ते श्रावण शुध्द ८ शके १९३०, म्हणजे शनिवार, दि.०२/०८/२००८ ते रविवार, दि.१०/०८/२००८ अखेर साजरा करण्यात येणार असून त्यासाठी नाट्य रसिक संच, शिर्डीच्यावतीने व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे सौजन्याने साजरा करावयाचा असून श्री आप्पासाहेब खं.कोते, अध्यक्ष, नाट्य रसिक संच, शिर्डी यांनी दि.३०/०६/२००८ रोजीचे पत्राने संस्थानमार्फत पुढीलप्रमाणे सहकार्य मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

०१) मंडप व मंडप डेकोरेशन
०२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी-जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
०३) मिरवणूक खर्च रथ, बँड इ.
०४) पत्रिका, हॅंडबील, बॅनर इ. छपाई
०५) श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

तसेच नाट्य रसिक संच, शिर्डी हे ०१) वाचक नोंदणी बॅज, ०२) कर्तृत्ववान महिला सत्कार व हळदी-कुंकू समारंभ खर्च, ०३) मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्त मान्यवर व जेष्ठ नागरीक सत्कार इ. चा खर्च करणार आहे.

दरवर्षी श्रावण मासात श्री साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन मंदिर परिसरात करण्यात येते. या पारायण सोहळयामध्ये स्थानिक गांवकरी, स्त्री-पुरुष, तसेच बाहेरील गांवचे साईभक्त मोठ्या संख्येने पारायण सोहळयात सहभागी होत असतात.

पारायण सोहळयाचे स्वरुप सर्वसाधारणपणे सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण, दुपारी ४.०० ते ५.०० प्रवचन व रात्रौ ७.३० ते ९.३० कीर्तन कार्यक्रम असे असते. याशिवाय हळदी-कुंकू, सरस्वती पूजन कार्यक्रम, कर्तृत्ववान महिला सत्कार, जेष्ठ नागरिकांचा सत्कार, श्रींच्या ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा , कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा असे असते. यात पारायणात भाग घेणा-यांची नांव नोंदणी करणे, प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी फोनवरुन संपर्क साधुन त्यांची तारीख, वार इ.निश्चीत करुन त्यांना पत्र पाठविणे, त्यानुसार निमंत्रण पत्रिका तयार करणे, छपाई करुन घेणे, इ. कामे करावी लागतात. त्यासाठी साधारणपणे १ ते २ महिन्याचा कालावधी आवश्यक असतो.

सन २००७ मध्ये झालेल्या पारायण सोहळयास दि.२८/०७/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आ.वेळचा विषय क्र.५० व निर्णय क्र.६४५ अन्वये रु. ७,००,०००/- खचार्ची मान्यता मिळालेली होती. तथापि प्रत्यक्षात रु. ४,०२,०६६/-मात्रचे झालेल्या खर्चास दि.०८/१२/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८२९ अन्वये कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे पत्राप्रमाणे यावर्षीचा पारायण सोहळा संस्थानमार्फत नऊ दिवस साजरा करावा लागेल. याकामी साधारणपणे खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **अंदाजीत खर्च** |
|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | रु. ०१,२५,०००.०० |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | रु. ०१,५०,०००.०० |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | रु. ००,५०,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | रु. ००,७५,०००.०० |
| ०६. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | रु. ०२,००,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **रु. ०६,५०,०००.००** |

तरी पारायण सोहळा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रु. ६,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईसच्चरित्र पारायण सोहळा संस्थानमार्फत आयोजित करण्यात यावा तसेच शिर्डी ग्रामस्थ व नाट्य रसिकसंच शिर्डी यांचे सहकार्य घ्यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.३८ शिर्डी -पंढरपुर पायी दिंडी खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.५९६** श्री भानुदास बयाजी पा.गोंदकर, उपाध्यक्ष, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांचे दि.१५/०६/२००८ रोजीचे पत्रात, श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर पायी आषाढी वारी यावर्षी सोमवार, दि.१४/०७/२००८ रोजी येणा-या आषाढी एकादशी वारीसाठीचे नियोजन केले आहे. सदरचा दिंडी सोहळा दि.२९/०६/२००८ रोजी शिर्डी येथुन निघणार असून दि.१४/०७/२००८ रोजी आषाढी एकादशी दिवशी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. (दि.२९/०६/२००८ ते दि.१५/०७/२००८ अखेर १५ दिवस) या सोहळयातील भाविकांच्या सोईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे वतीने खालील प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा केलेली आहे.

०१.पालखी सोहळयासाठी पिण्याचे पाण्यासाठी टँकर व्यवस्था,

०२.भाविकांचे आरोग्याचे दृष्टीने दिंडीसोबत फिरत्या दवाखान्याची व्यवस्था.

०३.लाईटसाठी - जनरेटर व वहानांची व्यवस्था.

०४.श्री क्षेत्र पंढरपुर येथे भाविकांना निवासाची व भोजनाची चार दिवसांची व्यवस्था इ.

सदरचे पत्रावर मा.अध्यक्ष यांचा श्री मोरेसाहेब चर्चा करावी असा शेरा आहे.

पायी दिंडी सोहळयाची प्रथा सन २००७-२००८ पासुन सुरु झालेली असून दि.२९/०६/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. ४८/निर्णय क्र. ५०३ अन्वये सदरच्या दिंडी सोहळयास शिधा तसेच त्या अनुषंगिक पिण्याचे पाण्यासाठी टँकर, निवासव्यवस्था इ.चेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली होती, तसेच सदरची दिंडी ही श्री साईबाबा संस्थानची आहे असे समजण्यात येऊ नये, याऐवजी शिर्डी ग्रामस्थांचे वतीने श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपूर पालखी असा उल्लेख करण्यात यावा, असे सांगितले. मागीलवर्षी म्हणजे २००७-०८ या साली गेलेल्या पायी दिंडी सोहळयासाठी संस्थानमार्फत साधारणपणे रु.०२,४४,८५६.६५ इतका खर्च

आलेला असून दि.०८/१२/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.४४/ निर्णय क्र.८२८ अन्वये त्यास कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

तथापि पायी दिंडीचे आयोजकांनीच उपरोक्त व्यवस्था करावयाची असते व तशी ती व्यवस्था त्यांनी अगोदरच केलेली असते, त्याप्रमाणेच त्यांचे नियोजन असते. तसेच पायी दिंडीमध्ये जे पदयात्री सहभागी होत असतात त्यांचेकडूनही आयोजक पैसे घेत असतात. काही ठिकाणी काही भक्तही पायी दिंडी सोहळ्यातील भाविकांची मुक्कामाची व भोजनाची व्यवस्था करीत असतात. इतर ठिकाणाहुन ज्या पायी दिंडी निघतात त्यांचा खर्च ते स्वतः आयोजकच करीत असतात. यापुर्वीही अशाप्रकारच्या पायी दिंड्या शिर्डी परिसरातून निघालेल्या आहेत, आजतागायत अशाप्रकारे कोणीही उपरोक्तप्रमाणे मागणी केलेली नाही. सन २००७-२००८ मध्ये संस्थानमार्फत श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी यांस मदत केलेली आहे, त्यांनी यावर्षी परत उपरोक्तप्रमाणे व्यवस्था करणेस विनंती केलेली आहे. यावर्षी परत मागिल वर्षाप्रमाणे मदत केलेस दरवर्षी व्यवस्था करावी लागेल व नविन प्रथा सुरु होईल. तसेच शिर्डी परिसरातील इतर ठिकाणाहून निघणा-या पायी दिंड्याही अशाप्रकारची मागणी करतील व एकाला मदत केलेस इतरांना मदत नाकारता येणार नाही.

दि.२८/०६/२००८ रोजीचे उपसमितीचे सभेपुढे सदरचा विषय सादर करण्यात आला होता, त्यात मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयासाठी ठेवणेबाबत सांगितले आहे. संस्थानचे अधिनियमात अशाप्रकारे खर्च करणेबाबत कुठलीही तरतूद नाही.

आजचे सभेत श्री.भानुदास बयाजी पा.गोंदकर, उपाध्यक्ष, व काही सदस्य, श्रीसाईबाबा पालखी सोहळा समिती, शिर्डी हे उपस्थित होते. त्यांनी श्रीक्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर पायी दिंडी सोहळ्यास मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

**विषय नं.३९ संजीवनी प्रि-कॅडेट ट्रेनिंग कोर्स प्रशिक्षण संस्थेसाठी शिधा स्वरुपात मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.५९७** सदरहू विषय स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.४० पोलिस कर्मचारी/अधिकारी व इतर बाहेरील अधिकारी यांना तात्पुरत्या दिलेल्या संस्थानचे निवासस्थानाबाबत.**

**निर्णय क्र.५९८** शिर्डी पोलीस स्टेशनला सेवेत असलेल्या काही पोलीस कर्मचारी / अधिकारी यांना लायसेन्सी तत्वावर तात्पुरते वापरासाठी संस्थान निवासस्थाने देण्यात आलेले आहे. निवासस्थानाचा सेवा आकार, विद्युत आकार,शासनाकडून मिळणारी एच.आर.ए.रक्कम इत्यादी संस्थानला वेळेवर भरणेबाबत त्यांचेकडून करारनामे करुन घेतलेले आहेत. तथापि काही पोलीस कर्मचारी वेळेवर सदर रक्कमा भरत नाहीत. त्यांना शासनाकडून घरभाडे पोटी मिळणारी (एच.आर.ए.) रक्कम ते करारनाम्यानुसार संस्थानला जमा करत नाही त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | कर्मचारी / अधिकाऱ्यांचे नांव व पदनांम | निवासस्थानाचे नांव व क्रमांक | मासिक सेवा आकार | येणे रक्कमेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री पी.बी.ढवळे,<br>पोलीस कॉन्स्टेबल | साईध्यान नं.०२/२३ | सेवाआकार :- जून-०८<br>विद्युत आकार :-<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ११५.००<br>००<br>भरत नाही |
| ०२. | श्री बाळासो.एम.यादव<br>पोलीस कॉन्स्टेबल | साईध्यान नं.०२/३७ | सेवाआकार :-एप्रिल ते जून -०८<br>विद्युत आकार :-फेब्रु -मार्च<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ३४५.००<br>३५२.००<br>भरत नाही |
| ०३. | श्री एच.एम.पाटील<br>पोलीस उपनिरिक्षक,<br>नागपुर | साईध्यान नं.०२/३९ | सेवाआकार :-फेब्रु ते जून-०८<br>विद्युत आकार :-डिसे-०७ते मार्च-०८<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ५७५.००<br>९५७.००<br>भरत नाही |
| ०४. | श्रीबी.जी.यशोद (उपविभागीय पोलीस अधिकारी ) | साईचिंतन नं.०१/०१ | सेवाआकार :-एप्रिल ते जून--०८<br>विद्युत आकार :-<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए.<br>स्वत : राहत नाहीत. | ४५०.००<br>०००.००<br>भरत नाही |
| ०५ | श्री एस.आर.गोसावी<br>मुख्याधिकारी,शिर्डी | साईस्मरण नं.०३/०३ | सेवाआकार :-एप्रिल ते जून-०८<br>विद्युत आकार :- मार्च<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ४५०.००<br>८३७.००<br>भरत नाही |
| ०६. | डॉ.वाय.व्ही.माने<br>तहसिलदार | साईस्मरण नं.०३/०५ | सेवाआकार :- मे - जून-०८<br>विद्युत आकार :- मार्च<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ३००.००<br>१०८७.००<br>भरतात |
| ०७ | श्री रामचंद्र बोरुडे<br>पोलीस कॉन्स्टेबल | साईध्यान नं.०१/२८ | सेवाआकार :-<br>विद्युत आकार :-<br>घरभाडे भत्ता :- एच आर.ए. | ००<br>००<br>भरत नाही |

काही पोलिस कर्मचारी/अधिकारी यांची शिर्डी येथून निरनिराळ्या ठिकाणी बदली झाल्यानंतरही ते निवासस्थानाचा ताबा सोडत नाही. त्या निवासस्थानचा ताबा संस्थानला न देता इतर कर्मचाऱ्यांना

परस्पर देतात व सदरहू पोलीस कर्मचारी हा अनाधिकृतपणे संस्थान निवासस्थानात वास्तव्य करीत असतो हे गैरवर्तन आहे. संस्थानचे विविध कर्मचारी अधिकारी डॉक्टर्स यांना निवासस्थाने नाहीत. संस्थानला निवासस्थानाची अत्यंत आवश्यकता आहे.

उपरोक्त शासकिय निमशासकिय कर्मचारी व पोलीस कर्मचाऱ्यांना शासनाकडून घरभाडे भत्ता मिळतो परंतु ते ती रक्कम संस्थानकडे जमा करीत नसून निवासस्थानाचा सेवाआकार, विद्युत आकार वेळेवर भरत नाहीत असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी निवासस्थानाची आवश्यकता असल्याने तसेच संस्थानमार्फत पोलिस कर्मचाऱ्यांना स्वतंत्र निवासस्थाने बांधून देण्यात आलेले असल्याने त्यांना देण्यात आलेले संस्थान निवासस्थाने त्वरीत खाली करुन घेण्यात यावीत.उपविभागीय पोलिस अधिकारी श्री.यशोद यांना दिलेल्या निवासस्थानात ते स्वतः रहात नसल्याचे समजते सबब त्यांचे निवासस्थान खाली करुन घ्यावे. तसेच फक्त पोलिस इन्स्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी व तहसिलदार, राहाता यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. मात्र त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानमध्ये जमा करुन घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.४१** **श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील कर्मचारी नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.५९९** श्री साईबाबा संस्थानचे हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी या पदावर नोकरी मिळणे बाबत डॉ. अमित काकड, डॉ. स्मिता काळे यांनी अर्ज केलेले होते. संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांनी समक्ष मुलाखती घेतलेल्या असून त्यांना संस्थानचे हॉस्पीटलकडे नेमणूका देणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

मा.विश्वस्त डॉ. गोंदकर, डॉ.पी.एल.तिवारी यांनी कामावर घेण्यास शिफारस केलेली आहे. त्यानुसार खालील वैद्यकिय अधिकारी यांच्या हॉस्पीटलकडे रिक्त जागी आवश्यकतेनुसार तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. काकड अमित आर. अकोले. | एम.बी.बी.एस. डि.सी.एच. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९४१५ /२००८ दि. २७/०६/२००८ श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी -बालरोग विभाग | आर.एम.ओ एकत्रित वेतन **प्रतिमहा रु. १८०००/-** |
| ०२. | डॉ. काळे स्मिता बी. अहमदनगर | एम.बी.बी.एस. डि.एन.बी. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/९५३६/२००८ दि. ३०/०६/२००८ श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी.-नेत्ररोग विभाग | आर.एम.ओ एकत्रित **वेतन प्रतिमहा रु. १८०००/-** |

उपरोक्त आर.एम.ओ. यांच्या करण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे बालरोग तज्ञ या पदावर सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलकडे काम करत असलेले वैद्यकिय प्रशासक, डॉ.संजय पटवर्धन यांची नेमणूक करण्यात यावी. तसेच, श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे नेमणूक करण्यात आलेल्या नेत्ररोग तज्ञांना साईनाथ रुग्णालयाकडे रुग्ण तपासणी व शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

**विषय न.४२** **श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील कर्मचारी नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.६००** मा. सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल कर्मचारी/वैद्यकिय अधिकारी यांचे वेतनश्रेणीनिहाय आकृतीबंधास मान्यता मिळाण्याचे अधिन राहून श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे वैद्यकिय अधिकारी /पॅरामेडीकल व इतर कर्मचारी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदर कर्मचारी /वैद्यकिय अधिकारी यांचे नेमणूकाची मुदत तसेच मुदतवाढ खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे तारखेस संपत आहे. आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेली आहे. संबंधीत कर्मचारी/ वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात आलेल्या नेमणूकीचे/ मुदतवाढीचे कालावधीमध्ये त्यांचे काम वर्तणूकीबाबत व हुकूमाप्रमाणे कामे करतात किंवा कसे ,त्यांना मुदतवाढ द्यावी अगर कसे / त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवाव्यात अगर कसे याबाबत अहवाल मागविण्यात आला होता. वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल व वैद्यकीय अधिक्षीका ,श्री साईनाथ रुग्णालय यांनी संबंधीताच्याबाबत खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे गोपनीय अहवाल या कार्यालयास पाठविण्यात आलेला आहे.

| अ.नं. अ) | नांव व पदनाम | नेमणूक दिनांक | वाढीव कालावधी संम्पुष्ठात येत असलेची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.विद्युतकुमार सिन्हा हदयविकार शस्त्रक्रिया तज्ञ | २९/०६/२००६ | २८/०६/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधान कारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे, तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात त्यांचे बाबततीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | झाल्यास **एक वर्ष** मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ०२ | डॉ.रेठे प्रकाश सताप्पा वरिष्ठ भूलतज्ञ | ०५/०६/२००६ | ०४/०६/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधान कारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे, तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात त्यांचे बाबततीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची झाल्यास **एक वर्ष** मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| **अ.नं. ब)** | **नांव व पदनाम** | **नेमणूक दिनांक** | **०१ वर्ष कालावधी संम्पुष्ठात येत असलेची तारीख** | **शेरा** |
| ०१. | डॉ.शांता छगन हंडाळ वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) | ०५/०६/२००७ | ०४/०६/२००८ | यांची नेमणूक श्री साईबाबा हॉस्पीटलकडे झाली असून त्या प्रत्यक्ष काम साईनाथ रुग्णालयात करतात त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. मुदतवाढ देणेस हरकत नाही. दि.१९/०५/२००८ ते दि.०४/०६/२००८ अखेर १७ दिवस हक्काच्या रजेवर होत्या . दि. ०५/०६/२००८ पासून आद्याप पावेतो कामावर गैरहजर आहेत. |
| ०२. | डॉ. आत्माराम लक्ष्मण धुळगंड, वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ-स्त्रीरोग ) | ०६/०७/२००७ | ०५/०७/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधान कारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे, तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात त्यांचे बाबततीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची झाल्यास **एक वर्ष** मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ३. | डॉ. संजय नंदकिशोर शुक्ला फिजीशियन | २४/०७/२००७ | २३/०७/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधान कारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे, तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात त्यांचे बाबततीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची झाल्यास **सहा महिने** मुदतवाढ देणेस हरकत नाही. |
| ४. | श्री राजेंद्र बारकू ठोसर, एम.आर.आय.टेक्निशियन | १९/०५/२००७ | १८/०५/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधान कारक असून त्यांचे वर्तणूकीवर विभाग प्रमुख यांनी असमाधान व्यक्त केले आहे. तसेच ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात त्यांचे बाबततीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची झाल्यास **सहा महिने** मुदतवाढ देणेस हरकत नाही. |

वैद्यकिय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका, यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन

**अ)** **अ- ०१ ते ०२** वरील वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांची मुदतवाढ त्यांचा कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेच्या लगत तारखेपासून त्यांना नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या अटी-शर्तीस अनुसरुन पुढे एक वर्ष वाढविण्यास **ब)ब - ०१** डॉ.शांता हंडाळ हया दि. ०५/०६/२००८ पासून विनापरवानगी कामावर गैरहजर असल्याने त्यांना कामावर हजर होणे बाबत पत्र देवून तरी ही त्या हजर न झाल्यास नियमाप्रमाणे रक्कम भरण्यास कळवून त्यांचे नांव आस्थापनेवरुन कमी करणेस तसेच, **ब-०२** वैद्यकिय अधिकारी यांना नेमणूकी संदर्भात देण्यात आलेल्या आदेशातील अटी-शर्ती नुसार त्यांना उपरोक्त त्यांचे मुदतवाढ कालावधी संपुष्ठात येत असलेल्या तारखेच्या लगत तारखेपासून पुढे ०१ वर्ष व ब-०३ व ०४ यांची सहा महिने मुदत वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४३ अनुकंपा तत्वावर नेमणूक देणेबाबत.**

**निर्णय क्र.६०१** संस्थान सेवेत असतांना मयत झालेले कर्मचारी यांचे वारसदार (नातेवाईक) यांनी संस्थान सेवेत घेणेबाबत अर्ज केले आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. नं. | दिवंगत कर्मचा-यांचे नाव | मृत्यूची तारीख | वारस अर्जदाराचे नांव व नाते | जन्मतारीख व वय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.बाबासाहेब कारभारी गोंदकर, मदतनीस, चौकशी व निवासस्थान | ०९/०५/२००८ | श्रीमती रंजना बाबासाहेब गोंदकर (पत्नी) | ०१/०६/१९७० ३८ वर्षे | इ. ३ री |
| ०२ | श्री ठमाजी दादा बनकर मदतनीस, श्री सा.भ.नि. | ०६/०६/२००८ | श्री सुनिल ठमाजी बनकर | २३/११/१९८५ २२ वर्षे ०५ म | इ.०९ वी पास |
| ०३. | श्री.सुदाम देवराम कणसे मुकादम,बांधकाम विभाग | ०४/०४/२००८ | श्री.परसराम सुदाम कणसे (मुलगा) | ३०/०५/१९९१ १७ वर्षे | इ. ९ वी पास |

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त तपशिलात नमूद केलेले अ.नं.०१ दिवंगत श्री.बाबासाहेब कारभारी गोंदकर यांची पत्नी नामे श्रीमती रंजना बाबासाहेब गोंदकर व अ.नं.०३ दिवंगत श्री ठमाजी दादा बनकर यांचा मुलगा नामे सुनिल ठमाजी बनकर हे हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ पदावर नेमणूक देता येईल व अ.नं.०४ दिवंगत श्री.सुदाम देवराम कणसे यांचा मुलगा नामे श्री.परसराम सुदाम कणसे हा सद्या अज्ञान (वय वर्षे-१७ महिना-०१) असल्याने त्याचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नेमणूक देता येईल. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४४ दैनंदिन प्रशासकीय कामासाठी सहाय्यक कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४५ मौजे येसगाव,ता.कोपरगाव येथील श्रीसाईबाबा संस्थानचे वतीने बांधण्यात आलेल्या साईभक्तनिवासाची व्यवस्था व देखभालीचे कामकाज श्रीमती लक्ष्मीबाई सेवाभावी संस्था यांचेकडे सोपविणेबाबत.**

**निर्णय क्र.६०३** मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे, उपाध्यक्ष यांचेकडील पीए६/ ९९ / १०८४ दि.२/५/२००८ रोजीचे पत्रात नमुद केले आहे की, मौजे येसगांव, ता.कोपरगाव येथे संस्थानच्या वतीने बांधण्यात आलेल्या भक्तनिवासाची व्यवस्था व देखभाल करणेसाठी श्रीमती लक्ष्मीबाई सेवाभावी संस्था, येसगाव या संस्थेने विनंती अर्ज केलेला आहे.

त्यांनी व्यवस्था व देखभाल करणेसाठी संस्थानचा एक कर्मचारी, विजबिल, दुरुस्ती, पाण्याची व्यवस्था, सतरंज्या, साऊंड सिस्टीमसाठी लागणारा खर्च, एक साईबाबांची मुर्ती व फोटो दिल्यास दररोज सकाळ, संध्याकाळ आरती करण्यास तयार आहेत.

तसेच साईबाबा संस्थानचे वतीने गांवोगावी काही ठिकाणी पालखी रोडलगत भक्त निवासाचे काम बांधून पूर्ण झालेले आहे, तर काही ठिकाणी काम चालू आहे अशा प्रत्येक भक्तनिवासाची व्यवस्था व देखभाल करणेसाठी संस्थानने उपाय योजना केल्या पाहिजे असे मला वाटते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने देखभालीची जबाबदारी त्या गावातील ग्रामपंचायत अथवा सेवाभावी संस्थेकडे सोपविली पाहिजे व त्यांना वार्षिक निधीची उपलब्धता करुन दिली पाहिजे असे नमूद केले आहे. त्यामध्ये सदर ग्रामपंचायतीने अथवा सेवाभावी संस्थेने विजबिल, पाणी, देखभाल व दुरूस्ती, कर्मचारी नेमुन साईबाबांची सकाळ-संध्याकाळ आरती केली पाहिजे, असे नमूद केलेले आहे.

संस्थानचे पांगरी येथे असलेल्या पालखी थांब्याचे जागेची साफसफाई करणे, झाडांची देखभाल करणे, झाडांना पाणी घालणे आदी कामासाठी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/८२२/२००७ दि.११/०४/२००७ अन्वये पाणीपुरवठा विभागास बी.व्ही.जी.इंडिया लिमिटेड, लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचे मार्फत दि.०१/०४/२००७ पासून प्रतिमाह दररोज एक अकुशल कर्मचारी देण्यात आलेला आहे.

येसगाव येथील भक्तनिवासाची व्यवस्था व देखभाल करणे तसेच इतर ठिकाणचे उदा.सिन्नर एम.आय.डी.सी., माळेगाव व पांढूर्ली येथील पालखी थांब्याचे काम प्रगतीपथावर आहे. तेथील देखभालीसाठी कर्मचारी व वार्षिक निधी देणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, याकामी ग्रामपंचायत, येसगाव यांचे लेखी पत्र घेण्यात येऊन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय न.४६** **तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.६०४** शासन पत्र क्र. तिक्षेवि १००७/प्र.क.२७२/०७/नवि/१८ मंत्रालय मुंबई, दि.०३/१०/०७. अन्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचा हिस्सा रुपये २४,९१,१३९.०० व शिर्डी संस्थानचा हिस्सा रुपये २४,९१,१३९.०० अशी रक्कम कळविली आहे. मात्र शिर्डी नगरपंचायतीने, नगरपंचायत व संस्थान अशी दोन्ही हिस्स्याची एकूण रक्कम रुपये ४९,८२,२७८.०० (एकोणपन्नास लाख,ब्याऐंशी हजार, दोनशे आठयाहत्तर मात्र) शिर्डी नगर पंचायतीस मिळावी, अशी विनंती केलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०४/२००८ रोजीचे सभेत सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली आहे. व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजीचे सभेत सदरचा प्रस्ताव छाननी समितीचे पुढे ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तथापी, शासनाने त्यांचे दि.१७ जानेवारी २००८ चे शुध्दीपत्रकाअन्वये एकूण १,२०,३५,९३७/- किंमतीच्या आराखडयाला मान्यता दिली असून त्यानुसार नगरपंचायतीचा हिस्सा रुपये ३०,०८,९८५/- व श्री साईबाबा संस्थानचा हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- कळविला आहे.

त्यास अनुसरुन शिर्डी नगरपंचायत यांनी दि.०२/०४/२००८ चे पत्रान्वये, शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान अशी दोन्ही हिस्स्याची रक्कम रुपये ६०,१७,९६९/- व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च रुपये ५९,५८,२८०/- अशी एकूण रक्कम रुपये १,१९,७६,२४८/- (एक कोटी,एकोनाविस लाख, शहात्तर हजार, दोनशे आठ्ठेचाळीस मात्र.) संस्थानकडुन अनुदान म्हणून नगरपंचायतीस मिळणेस विनंती केली आहे.

इकडील जा.नं.एसएसएस,वशी-३/७४१७/०८,दि.२१/०५/२००८ चे पत्रान्वये तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणाऱ्या खर्चास शासनाची मंजुरी आहे काय? याबाबत मुख्याधिकारी नगरपंचायत शिर्डी यांना पत्र दिले होते. त्यांनी त्यांचे दि.२८/०५/२००८ चे पत्रान्वये, शासनाचे मंजुरीनुसार नगरपंचायत हिस्सा व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च नगरपंचायतीस खर्च करणे आवश्यक आहे. मात्र सदरची रक्कम नगरपंचायतीकडे उपलब्ध नसल्याने संस्थान हिस्सा, नगरपंचायत हिस्सा व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च असे एकूण रुपये १,१९,७६,२४८/- (एक कोटी,एकोनाविस लाख, शहात्तर हजार, दोनशे आठ्ठेचाळीस मात्र.) संस्थानकडुन अनुदान म्हणून नगरपंचायतीस मिळणेस विनंती केली आहे.

तद्‌नंतर चारी नं.१२ कामाच्या तांत्रीक मंजुरीची रक्कम वाढल्याने शिर्डी नगरपंचायत यांनी पुनश्च दि.२३/०६/२००८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

| अ.नं | कामाचे नांव | शासनाने मान्यता दिलेल्या कामाची किंमत | तांत्रिक मंजुरीनुसार कामाची किंमत |
|---|---|---|---|
| १ | हॉटेल गोरडीया समोरील १२ मी रुंदी रस्त्यास पदविे उभारणे. | ३६३०७१.०० | ५६७३५५.०० |
| २ | बन रस्ता (साईगणेश बंधारा ते बिरोबा मंदिर ) पदविे उभारणे. | १४८२४३४.०० | १००६४१७.०० |
| ३ | बिरेगांव नाला रस्ता (साईगणेश बंधारा ते लुटे वस्ती ) पदविे उभारणे. | १४८२४३४.०० | १२०२१३१.०० |
| ४ | नाला रस्त्याकरीता पदविे उभारणे. | ७६४५४२.०० | ८४८४७६.०० |
| ५ | चारी क्र.१२ साठी कॉक्रीट डक्ट बांधकाम करुन बंदीस्त करणे. | २२४३१८८.०० | ७३७९३०८.०० |
| ६ | शिर्डी बन रस्ता साईगणेश बंधारा ते बिरोबा मंदिरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | २८५०१३४.०० | ३४२७३९६.०० |
| ७ | बिरेगांव नाला रस्ता (साईगणेश बंधारा ते लुटे वस्तीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | २८५०१३४.०० | ५५३७०२४.०० |
| | | **१२०३५९३७.००** | **१९९६८१०७.००** |

शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान अशी दोन्ही हिस्स्याची रक्कम रुपये ६०,१७,९६९/- व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च रुपये ७९,३२,१७०/- अशी एकूण रक्कम **रुपये १,३९,५०,१३९/-** (एक कोटी,एकोनचाळीस लाख, पन्नास हजार, एकशे एकोणचाळीस मात्र.) संस्थानकडुन अनुदान म्हणून नगरपंचायतीस देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन शासनाने त्यांचे दि.१७ जानेवारी २००८ चे शुध्दीपत्रकाअन्वये एकूण १,२०,३५,९३७/- किंमतीच्या आराखडयाला मान्यता दिली असून त्यानुसार नगरपंचायतीचा हिस्सा रुपये ३०,०८,९८५/- व श्रीसाईबाबा संस्थानचा हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- कळविला आहे. त्यापैकी श्री साईबाबा संस्थानचा हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.४७** **पासेस बंद असताना काकड आरतीचे व्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.६०५** मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचे निर्देनुसार गर्दीच्या व सलग सुट्ट्यांच्या काळात सर्व साईभक्तांना दर्शनाचा व आरतीचा लाभ मिळावा व मंदिरात होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण रहावे या उद्देशाने जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे दर्शन व आरती पासेस बंद ठेवण्यात येतात. या कालावधीत महत्वाच्या,

अतिमहत्वाच्या व्यक्ती तसेच मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार ठरावित अतिथींची फक्त दर्शन/आरती व्यवस्था करण्यात येते.

तथापि बऱ्याच वेळेला दर्शन/आरती पास बंदच्या काळात मा.विश्वस्तांच्या पाहूण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात होते. यावर नियंत्रण आणण्यासाठी बंदच्या काळात एका मा.विश्वस्तांच्या किती पाहुण्यांची दर्शन/आरती व्यवस्था करण्यासाठी संख्या निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सारासार विचार करुन गर्दीचे प्रमाण लक्षात घेऊन सर्वांनी तारतम्य पाळावे असें ठरलें. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१ नोंद घेण्याचे विषय.**

**(अ) मासिक लिलाव विक्री अहवाल जून- २००८.**

**निर्णय क्र.६०६ (०१)** माहे जून- २००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,९२,१३५.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**(ब) माहे जुन-२००८ मध्ये आलेल्या अनुदान मागणी अर्जाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ६०६ (०२)** साईनाथ रुग्णालयात माहे जून- २००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रु.६४,२६,४०७/- चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ वाहन क्रं.एम.एच.-१७ /एक्स - ४ ( महिंद्रा स्कॉर्पिओ ) चे दुरुस्ती खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.६०७** दि.०३.०७.२००८ रोजी वाहन विभागातील वाहने धुण्याकरिता कार वॉशर या पॉईंटवर सकाळी ०७.०० ते १५.०० या वेळेत कंत्राटी मदतनिस, श्री.मच्छिंद्र रघुनाथ निर्मळ यांची डयुटी लावण्या त आली होती.

साधारणतः सकाळी ०७.३० वाजता डयुटीवर आलेनंतर श्री.निर्मळ यांनी गाडी धुणेकरिता एम.एच.- १७/ एक्स-४ (महिंद्रा स्कॉर्पिओ) वाहनाची चावी ऑफिस कि बोर्ड मधून घेऊन शेडमध्ये पार्किंग केलेली गाडी चालू केली, त्यांचेकडून ब्रेक ऐवजी ॲक्सेलेटर पॅडल दाबले गेले त्यामुळे गाडी वेगाने निघुन पुढील बाजूस उभ्या सुमो शबवाहिकेच्या मागील साईड कॉर्नरला घासली व गाडी जोरात वर्कशॉप शेडचे पोलला आदळली. त्यामुळे गाडीची पुढील काच फुटली तसेच बंपर, पुढील शो, हेड लाईट, साईड फेंडर, टायर यांचे नुकसान झालेले आहे.

सदर अपघातग्रस्त स्कॉर्पिओ दुरुस्तीचे कामाकरिता महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे. या कामी अंदाजे रु.८०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर वाहनाचे अपघात नुकसान भरपाई करीता विमाधारक कंपनी दि.न्यु इंडिया ॲश्यूरन्स, कं.लि. यांचेकडे विमा क्लेम करण्यात आलेला आहे.

तरी अपघातग्रस्त स्कॉर्पिओ वाहनाचे दुरुस्तीचे काम महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलर जितेंद्र मोटर्स, नाशिक यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस संस्थानकडे असलेल्या पेट्रोल वाहनांची जाहीर विक्री करण्यात यावी,असें ठरले.

(कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३ नवीन स्कार्पिओ वाहन खरेदी करणे कामी प्राप्त झालेली कोटेशन उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.६०८** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ साईनिवास अतिथीगृहातील खोल्यांबाबत.**

**निर्णय क्र.६०९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५ गानसाम्राज्ञी लता मंगेशकर यांचे आवाजात श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी.चे संग्रह निर्मिती करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१०** श्री तरुा पवार ,ए ॲण्ड आर मॅनेजर, टाईम्स म्युझिक , टाईम्स ऑफ इंडिया बिल्डींग फोर्ट, मुंबई यांचे दि.२६.०६.२००८ च्या इमेल पत्रानुसार गायिका श्रीमती लता मंगेशकर यांचे आवाजात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरती संग्रह ऑडीओ सी.डी. तयार करणेसाठी मान्यता दर्शविली असून, टाईम्स म्युझिककडून ३०,००० ऑडीओ सी.डी. तयार करुन खरेदी करणेसाठी प्रती नग रु.१५०/- दराने रुपये ४५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख) मात्र रकमेची करारनामा करुन आगाऊ मागणी केली आहे. सदरच्या ऑडिओ सी.डीतील आरत्या संस्थानमध्ये कायमस्वरुपी वापरता येतील. तसेच त्यानंतरही संस्थानला सवलतीच्या दराने सी.डी. पुरवठा करणेत येईल, असे कळविले आहे.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय इमेल पत्रान्वये श्री. तरुन पवार यांनी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे आवाजातील श्री साई मंदिरातील आरत्या ऑडीओ सी.डी. तयार करणेसाठी संस्थानची संमती कळविणेस विनंती केलेली आहे. श्रीमती लता मंगेशकर ह्यांचे पुढील महिन्यात गुडघ्यांचे ऑपरेशन नियोजित असल्याने तत्पूर्वी सी.डी. तयार करणेबाबत सुचविले आहे. सदर ऑडीओ सी.डी. निर्मितीकामी संबंधीत टाईम्स म्युझिक, मुंबई यांचेशी दि.०२.०७.२००८ रोजी दुरध्वनीद्वारा चर्चा केली असता, त्यांनी त्यांचेशी कराव्या लागणा-या शर्ती व अटी खालील प्रमाणे.

१) टाईम्स म्युझिक बरोबर सी.डी. निर्मितीविषयी विहित नमुन्यात करारनामा करुन घ्यावा लागेल. करारनामा केल्यानंतर प्रत्येक सी.डी.वर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रेझेंटस" असे नमुद केले जाईल. त्यामधील कंटेन्टला संस्थान जबाबदार राहील.

०२) ३०,००० सी.डी. प्रती नग रु.१५०/- प्रमाणे पुरविणेत येतील.

०३)३०००० नगांचे प्रथम निर्मितीनंतरच्या ऑडीओ सी.डी रुपये १९५/-एमआरपी वर टाईम्स म्युझिकच्या नियमानुसार ३० ते ३५% रुपये डिस्काउंट देऊन सी.डी. पुरविणेत येतील.

४) सी.डीचे जाहिरात, मार्केटिंग लॉचिंग, रेकार्डीग टाईम्स म्युझिक कंपनी, मुंबई करणार आहे.

५) मागणीनुसार टाईम्स म्युझीक कंपनी मार्केटमध्ये इतरांनाही सीडी विक्री करील.

६) सदर सी.डी. संस्थानला कायमस्वरुपी मंदिर परिसरात वाजवता येईल.

तरी वरीलप्रमाणे टाईम्स म्युझिक कंपनी, मुंबई यांचेकडून श्रीमती लता मंगेशकर यांचे आवाजात श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी ३०,००० नग प्रती नग रु.१५०/- नुसार रुपये ४५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख) मात्र एकूण खर्चास व त्यांच्या शर्ती व अटी सहीत विहित नमुन्यात करारनामा टाईम्स म्युझिक कंपनी, मुंबई यांचे बरोबर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विश्वस्त श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.कार्यकारी अधिकारी यांनी श्रीमती लता मंगेशकर यांचेशी समक्ष चर्चा करुन याबाबत आपला अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **श्री साईबाबा दिनदर्शिका -२००९ मोठी साईज (खाजगी दिनदर्शिका) छपाई बाबत.**

**निर्णय क्र.६११** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं. ८ निर्णय क्र.२७ अन्वये मान्यतेनुसार मे साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून मागिल वर्षी २००८ ची श्री साई दिनदर्शिका (कॅलेंडर) मोठी साईज २५,००० नग प्रती नग रु. रु.१५९/- प्रमाणे छपाई करुन भक्तांना रु.१६५/- प्रती नग प्रमाने उपलब्ध करुन देण्यात आली होती. मे साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांनी मागिल वर्षाचे दिनदर्शिकेसाठी चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, डिझाईनचा वापर करुन दिनदर्शिका सुबक आकर्षक असे तयार केले होते, साईग्रेस फाऊन्डेशन यांनी त्यांचे दि.२१.०६.२००८ चे पत्रानुसार मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही सन २००९ ची श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पेजेस (मोठी साईज) चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, उत्कृष्ट डिझाईन, आकारबद्ध, चांगल्या प्रकारचा उच्च दर्जाचा कागद वापरुन छपाई करुन देणार असलेबाबत कळविले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**दिनदर्शिका २००९ (८ पेजेस ) मोठी साईज २२"x ३५"**

| अ.नं. | तपशिल | छपाई दर रुपये | एकूण खर्च रुपये | प्रस्तावित विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| **अ)** | २५,००० (पंचविस हजार) नग छपाई केल्यास | १७७/- | ४४,२५,०००/- | १८५/- |
| **ब)** | ३०,००० (तीस हजार) नग छपाई केल्यास | १६८/- | ५०,४०,०००/- | १७५/- |

उपरोक्तप्रमाणे **"अ"** नुसार २५,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १७७/- प्रमाणे एकूण रुपये ४४,२५,०००/- इतका खर्च व **"ब"** नुसार ३०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १६८/- प्रमाणे एकूण रुपये ५०,४०,०००/- याप्रमाणे खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे **"अ" किवा "ब"** बाबत विचार होऊन श्री साईबाबा दिनदर्शिका २००९ (आठ पेजेस) मोठी साईज साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करणेत आला.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **पुस्तकांचे विक्री किमतीत वाढ करुन छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१२** मा व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ सभेतील विषय नं.२७ निर्णय क्र.७०५ नुसार श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार -प्रचार देशभर व्हावा याकरीता संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो यांची विक्री खाजगी बुकस्टॉल विक्रेते, एसटी स्टॅन्ड व रेल्वे स्टेशनवरील बुक स्टॉल विक्रेत्यांनी मागणी केल्यास त्यांना १५ ते २० % डिस्काऊन्ट रेटने विक्रीसाठी देण्यात यावी असे ठरलेनुसार जा.नं.एसएसएस/वशी-प्रकाशने/२९३९ दि.०६.११.२००६ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटोंचे कमीतकमी २५ व त्यापेक्षा जास्त प्रती खरेदी दारास विक्री किंमतीवर १५ % सवलतीने दराने आदेश पारित करण्यात येऊन सदर आदेशाची अमलबजावणी दि.०६.११.२००६ पासून ते ३१.०५.२००८ अखेर करण्यात आली. तदनंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ चे सभेतील विषय नं.३७ निर्णय क्र.२४६ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तकांची विक्रीत वाढ होऊन श्री साईबाबाचे जीवन व कार्याचा प्रचार-प्रसार जगभर व्हावा याकरीता संस्थान प्रकाशित पुस्तके एक किंवा त्योपेक्षा अधिक पुस्तके खरेदीदारांना २०% सवलतीचे दराने विक्रीस उपलब्ध केल्यापासून पुस्तकांचे विक्रीचे खपात लक्षणीय वाढ झालेली आहे. यात बुकस्टॉलवर प्रत्यक्ष व टपालाद्वारे मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे सवलतीचे २०% दरामुळे पुस्तकांच्या विक्री किंमत छपाई किंमतीपेक्षा कमी दराने विक्री होत आहे. तेंव्हा सदरच्या सवलतीच्या दरामुळे पुस्तकांचा वाढलेला खप विचारात घेता त्यामध्ये तोटा होत असल्याचे निदर्शनास आल्याने व संस्थानचे हिताचे दृष्टीने पुस्तके ना नफा ना तोटा या धर्तिवर विक्री करणेस झाल्यास विक्री किंमतीत बदल करणे आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समितीची सभा दि.१६.०३.२००८ निर्णय क्र.३७ नुसार सर्व पुस्तकांच्या किंमतीवर ०१ जून ०८ पासून २०% सुट देण्यात येत आहे. त्यामुळे खरेदी किंमत वसुल न होता तोटा होत आहे. सबब विक्री किंमतीत खालीलप्रमाणे सुधारणा केल्यास संस्थानचा होणार तोटा टाळता येईल.

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | येणे बाकी संख्या | छपाई दर | सध्याची छपील विक्री किंमत | २०% सुट ने विक्री किंमत | तोटा | प्रस्तावित सुधारित विक्री किंमत | २०% सुट ने विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री साईसत्चरित्र तेलगू | १८३००० | २८.८७ | ३५.०० | २८.०० | ०.८७ | ४०.०० | ३२.०० |
| २ | श्री साईसत्चरित्र हिंदी | १४५००० | २५.३५ | ३०.०० | २४.०० | १.३५ | ३५.०० | २८.०० |
| ३ | श्री साईसत्चरित्र तामिळ | २०००० | ३२.९० | ४०.०० | ३२.०० | ०.९० | ४५.०० | ३६.०० |
| ४ | श्री साईसत्चरित्र बंगाली | ५००० | २९.२४ | ३५.०० | २८.०० | १.२४ | ४०.०० | ३२.०० |
| ५ | श्री साईलिलामृत गुजराथी | ५००० | १३.९५ | १६.०० | १३.०० | ०.९५ | २०.०० | १६.०० |

सध्याचे विक्री किंमतीवर २०% सुट दिल्याने होणारा तोटा कॉलम ०७ मध्ये दर्शविलेला आहे. त्यामुळे प्रस्तावित सुधारित किंमत कॉलम ८ प्रमाणे केल्यास येणारी विक्री किंमत कॉलम ९ मध्ये दर्शविलेली आहे. त्यामुळे तोटा न होता पूर्वीप्रमाणेच थोडा फायदा होईल तरी सुधारित किंमंत पुस्तकावर प्रिंट करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) व मे.स्पार्क ऑल सिक्युरीटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे, सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस / करारास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.६१३** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून ते दि.३१-१०-२००८ अखेर पर्यंत १ वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.१७-०८-२००७ पासून ते दि.१६-०८-२००८ अखेर पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी व मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची श्री साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवा निवृत्त (माजी) सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-०८-२००७ पासून ते दि.१०-०८-२००८ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडीया लि., पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड, नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर व मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.,मुंबई सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे

ठेकेदारीची/कराराची मुदत दि.३१-१०-२००८ अखेर संपत आहे. तसेच मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात), महाद्वार सिक्युरिटी कॉन्टॅक्टर यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत दि.१०-०८-२००८ अखेर व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे, श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत दि.१६-०८-२००८ अखेर संपत आहे.

त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दीस देऊन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" प्राप्त झालेनंतर त्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून, तुलनात्मक तक्ता तयार करुन, निविदा सादर करणारे ठेकेदारांना चर्चा वाटाघाटीकरीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेबाबत कळविणे, निर्णय झालेनंतर नविन ठेकेदारांना वर्क ऑर्डर्स देणे,अनुषंगिक कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे इत्यादि कार्यवाहीस सुमारे तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लिमिटेड.,नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर, मे. सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत माहे-ऑक्टोंबर-२००८ अखेर तसेच मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात), महाद्वार सिक्युरिटी कॉन्टॅक्टर व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे , श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत माहे-ऑगस्ट-२००८ मध्ये म्हणजे वेगवेगळया महिन्यात संपत आहे. प्रशासकीय कामकाजाचे सोयीनुसार यापुढे नविन सर्व लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची नेमणूक एकाच वेळेस करणे योग्य ठरेल. त्याकामी एकाच वेळी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन पुढील कार्यवाही करता येईल.असे मत आहे.

तरी माहे-नोव्हेंबर-२००८ पासून नविन नेमणूक करावयाचे सर्व लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे नेमणूकीची कार्यवाही एकाच वेळी करणेकामी, तसेच कामाची गैरसोय होऊ नये याकरीता, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे, श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर व मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात), महाद्वार सिक्युरिटी कॉन्टॅक्टर यांचे ठेकेदारीची/कराराची मुदत इतर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे मुदतीपर्यंत म्हणजे अनुक्रमे दि.१७-०८-२००८ व दि.११-०८-२००८ पासून ते दि.३१-१०-२००८ अखेर पर्यंत (सुमारे अडीच महिने) सध्याचे कंत्राटासंबंधातील करारातील अटी व शर्ती, दरपत्रक यास अधीन राहून मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **श्रीसाईबाबा संस्थानच्या रक्तपेढीस राज्य शासनाचा पुरस्कार प्रदान.**

**निर्णय क्र.६१४** दिनांक १४.०६.२००८ रोजी जागतिक रक्तदाता दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवेमार्फत, श्री साईबाबा संस्थानच्या, श्री साईनाथ रक्तपेढीस २००८ साठी ग्रामिण भागातून एक हजारहून जास्त रक्तदात्यांना रक्तदान करण्यास प्रोत्साहित केल्या बद्दल तसेच रक्तदानाची चळवळ अखंडपणे चालू ठेवण्यास सहकार्य या समाजोपयोगी कार्याबद्दल प्रशस्तीपत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृह, मुंबई येथे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य मंत्री मा.सौ. विमलताई मुंदडा यांच्या हस्ते श्री साईनाथ रक्तपेढीचे प्रतिनिधी म्हणून हजर असलेले श्री.सुनिल कर्जुले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी स्विकारला.

सन २००६ व २००७ या वर्षात रक्ताच्या जमा झालेल्या पिशव्यांमध्ये ऐच्छिक रक्तदात्यांचे प्रमाण श्री साईनाथ रक्तपेढीचे जास्त होते. सन २००६ या वर्षात ४२०० ऐच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर सन २००७ मध्ये ते ७३०० होते. हे प्रमाण दिवसेंदिवस ग्रामिण भागामध्ये वाढविण्याचे काम श्रीसाईनाथ रक्तपेढीमार्फत चालू आहे. ग्रामिण भागामध्ये एवढया प्रमाणात ऐच्छिक रक्तदाते तयार करणे व त्यांना वारंवार रक्तदानाकरीता उस्फुर्त करणे या सारखे कार्य करणे ग्रामीण भागामध्ये असाधारण बाब असताना ते काम श्रीसाईनाथ रक्तपेढीने साध्य केले आहे. तसेच गुरुवार व रविवार या दिवशी श्री साईमंदिर व आसपासच्या परिसरात रक्तदान शिबीरे घेऊन ऐच्छिक रक्तदानाने रक्त गोळा केले जाते. यामध्ये रक्तदाता स्वतःहून रक्त देण्यास तयार झाल्यामुळे रक्तामुळे प्रसारीत होणाऱ्या रोगांचे प्रमाणे कमी असते. तसेच, अहमदनगर, नासिक, औरंगाबाद या पुर्ण जिल्यातही अल्प दरात श्रीसाईनाथ रक्तपेढीमार्फत रक्त पुरविले जाते, त्याची नोंद घेणेत आली. (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका/ वैद्यकिय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या बिलात देण्यात येणाऱ्या सवलतींची नियमावली बनविणेबाबत.**

**निर्णय क्र.६१५** सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांना अभ्यासासाठी पाठविणेत यावा. त्यावर त्यांचे अभिप्राय मागविणेत यावेत व नंतर सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **जादा वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६१६** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.राजेश रमणलाल वाकडे | श्री. साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ८८७२.०० | ८८७२.०० |
| २ | सौ.विद्या रतन चौधरी | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २९६२.०० | २९६२.०० |
| ३ | श्री.के.यु.तुपे | सुजाता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक | १९६८३.०० | १९६८३.०० |
| ४ | सौ.गिता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | २८८८.०० | २८८८.०० |
| ५ | श्री.बबन गंगाधर भडांगे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | १३४.०० | १३४.०० |
| ६ | श्री.भाऊसाहेब भागवत गायकवाड | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | १५४०.०० | १५४०.०० |
| ७ | श्री.राधाकृष्णन पी. | प्रमिला हॉस्पिटल,कळवा | १६६९९.०० | १३३५९.०० |
| ८ | श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | १०२१.०० | १०२१.०० |
| ९ | सौ.कांचन बाळासाहेब जाधव | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २२५.०० | २२५.०० |
| १० | सौ.वैशाली वसंतराव सुर्वे | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ११२९.०० | ११२९.०० |
| ११ | श्री किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | १२५६.०० | १२५६.०० |
| १२ | डॉ.पुनम बाबासाहेब गवळी | डॉ.वाघुरडे, हैद्राबाद | ९९००.०० | ७९२०.०० |
| १३ | श्री.रमेश सिताराम बोधक | प्रवरा हॉस्पिटल,शिर्डी | १२०९२.०० | ४४८९.०० |
| | | ॲड.रक्कम वजा - | ७६०३.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु. | ४४८९.०० | |
| १४ | श्री.राहूल वामन गलांडे | रंदीकर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, नाशिक | ७०५०.०० | ५६४०.०० |
| १५ | श्री.विक्रम दानोधर पाटील | डॉ.प्रदिप पवार व डॉ.गायकवाड | १८४७.०० | १४७८.०० |
| १६ | श्री.संजय बाळासाहेब गायकवाड | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २२५२.०० | २२५२.०० |
| १७ | श्री.सजंय आसाराम शिंदे | जोर्वेकर हॉस्पिटल,कोपरगांव | २१३०.०० | १९१७.०० |
| १८ | श्रीमती सीमा सोन्याबापू नरोडे | डॉ.अजय गर्जे , कोपरगांव | ३५४६.०० | २८३७.०० |
| १९ | सौ.संगिता प्रभाकर वाबळे | मैड हॉस्पिटल,राहाता | १३७३८.०० | १००००.०० |
| | | एकूण रक्कम रु. | १२१०५६.०० | ८९६०२.०० |

तसेच येथूनपुढे संस्थान कर्मचाऱ्यांची रुपये ५०००/- पेक्षा अधिक खर्चाची बिले आदा करणेकामी असलेली सन १९९९ चे वैद्यकीय देखभाल नियमावलीस राज्य शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **संस्थान सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना विभागीय चहा, कॉफी व दुध विनामुल्य देणे व येणारा खर्च कर्मचारी कल्याण निधीमधून वर्ग करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१७** संस्थान सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना डयुटीवर असतांना संबंधीत विभागाचे मागणी प्रमाणे व आवश्यकतेनुसार कॅन्टीन विभागामार्फत विनामुल्य चहा, कॉफी व दुध पुरविण्यात येते. या कामी सर्व विभागांनी प्रशासनाची पुर्व मंजुरी घेतलेली आहे. सध्या संस्थान प्रशासनाचे मंजूरीनुसार ३५ विभागामध्ये त्यांचे मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार दरमहा सुमारे चहा-८४,५०० कप, कॉफी-६०० कप व दुध-२५०० कप कॅन्टीन विभागामार्फत पुरविले जाते. त्यानुसार प्रत्येक महिन्याचे शेवटी सर्व विभागांना मोफत पुरविण्यात आलेल्या चहा, कॉफी व दुध यांचा हिशोब करुन, प्रशासन शाखेची मंजूरी घेऊन, सदरची रक्कम लेखाशाखेमार्फत प्रसादालय खाते व अन्नदान खाते वर जमा-नावे करणेसाठी लेखाशाखेकडे मंजूरीची प्रत पाठविली जाते. याकामी सुमारे दरमहा रुपये १ लाख १० हजार पर्यंत खर्च होतो. परंतु वैधानिक लेखा परिक्षक यांनी सदरचा खर्च प्रसादालय व अन्नदान खातेवर न टाकता, लेबर वेल्फेअर फंड (कर्मचारी कल्याण निधी) या खातेवर जमा-नावे टाकावा असे सुचविले आहे.

तरी संस्थान सेवेत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना डयुटीवर असतांना संबंधीत विभागांचे मागणी व आवश्यकतेनुसार सध्याचे प्रचलीत पध्दतीप्रमाणे प्रत्येक शिफ्टमध्ये दोन वेळेस कॅन्टीन विभागामार्फत विनामुल्य चहा, कॉफी व दुध पुरविणेस, व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदरचा खर्च प्रसादालय व अन्नदान खातेवर जमा- नावे न टाकता, लेबर वेल्फेअर खर्च

(कर्मचारी कल्याण खर्च) या खातेवर नावे टाकणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्रींच्या मुर्तीवर सोन्याच्या छत्रीस आधार म्हणून असलेला गोल लाकडी ठोकळया ऐवजी योग्य त्या आकारमानाचा जाड सोन्याचा पत्रा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.६१८** हैद्राबाद येथील साईभक्त श्री.आदिनारायण रेड्डी यांनी श्रींच्या मुर्तीवरील सोन्याचे छत्र तयार करुन दिले आहे. सदर छत्रीचा पत्रा पातळ असल्याने छत्र स्थिर राहाण्यासाठी आधार म्हणून एक वर्तूळाकार लाकडी ठोकळा खालच्या बाजूने बसविण्यात आलेला आहे.

श्री.मुकेश एम.पटेल, मुंबई यांनी सदर छत्रीच्या खालच्या बाजूस असलेल्या उपरोक्त लाकडी ठोकळया ऐवजी योगय त्या आकारमानाचा पुर्णपणे भरीव असलेला सोन्याचा अंदाजे १ किलो वजनाचा पत्रा देणगी देण्याची इच्छा प्रर्दशित केली आहे.

सोन्याच्या छत्रास आधारासाठी लाकडी ठोकळया ऐवजी सोन्याचा जाड पत्रा असने योग्य वाटते. श्री.मुकेश एम.पटेल, मुंबई यांच्याकडून उपरोक्तप्रमाणे देणगी स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन,बुंदी किचन या ठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी येणाऱ्या खर्चाचे एस्टीमेटबाबत.**

**निर्णय क्र.६१९** श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किंचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी दिनांक १६-०३-२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.२२३ अन्वये मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येउन त्यांना संस्थान जा.क्र.एसएसएस - विद्युत - ४५१३/२००८ दिनांक :- २७-०३-२००८ अन्वये रक्कम रु. ३,०१,०००.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांनी या कामाचे इस्टिमेट पाठविले असून त्याचा विभागवार तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | बुंदी किचन | रु. ४१,४७,३९३.०० |
| ०२) | लाडू किचन एरीया | रु. ५४,७७,७४९.०० |
| ०३) | स्टिम राईस, मेन किचन | रु. ६५,१८,५६५.०० |
| ०४) | पुरी किचन | रु. २३,२८,८२०.०० |
| ०५) | चपाती किचन | रु. ५६,४०,०९२.०० |
| | एकूण | रु. २,४१,१२,६१९.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य किचन, बुंदी किचन, चपाती किचन याठिकाणी वायुवीजनची व्यवस्था करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २,४१,१२,६१९.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास व या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **शिर्डी येथील संस्थानने बांधलेल्या नविन जि.प.शाळेचे हस्तांतरण जि.प.अ.नगर यांचेकडे करणेकामी करावयाचे वाढीव कामांबाबत.**

**निर्णय क्र.६२०** शिर्डी येथील सर्व्हे क्र.०६(आरक्षण क्र.०८) या जागेत संस्थानमार्फत जिल्हा परिषद शाळेचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अ.नगर व मा. गटशिक्षणाधिकारी, राहाता यांनी सदर शाळेची उर्वरीत राहिलेली कामे करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. याकामी दि.२५/०५/२००८ रोजी शिर्डी येथे संस्थानचे सभागृहात शिर्डी येथील नविन जिल्हा परिषद शाळा, जिल्हा परिषद अ.नगर यांना हस्तांतरीत करणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अ.नगर व मा. आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत शिर्डी येथे संस्थानचे सभागृहात बैठक झ ाली. सदर बैठकीत नविन जिल्हा परिषद शाळा हस्तांतरणाचे दृष्टीने राहिलेली कामे करणेबाबत चर्चा करण्यात आली. त्यापैकी खात्यामार्फत होणारी कामे करण्यात येत आहेत, पैकी मोठ्या स्वरुपाचे कामे खालीलप्रमाणे आहेत व त्यासाठी येणारा खर्चाचा तपशिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Barbed wire Fencing over existing compound wall | 300.00 | Rmt | 148.00 | 46,620.00 |
| 02 | Providing & Fixing white | 75.00 | Sq.m | 590.00 | 46,463.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Glazed tiles for Existing bathrooms | | | | |
| 03 | Stage | -- | -- | -- | 43,370.00 |
| | | | | **एकूण रक्कम** | **1,36,453.00** |

तरी उपरोक्तकामी येणारे खर्चास व काम इकडील विभागामार्फत निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद यांचे मागणीनुसार वरीलपैकी क्र.०१ मधिल काटेरी तारेच्या कुंपणाऐवजी तीन फुट उंचीची चेनलीक जाळी बसविण्यात यावी, तसेच बाथरुम बरोबरच संडासमध्येही ग्लेझड् टाईल्स बसविण्यात याव्यात व स्टेजवर पत्रा शेड करण्यात यावे,असें ठरलें. याप्रमाणे कामांसाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.१६**
**निर्णय क्र.६२१**

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २००८ साठी साईभक्तांचे सोईसाठी मंडप व्यवस्था व भाडोत्री गाद्या घेणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानमार्फत सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.१७ जुलै,२००८ ते दि.१९ जुलै,२००८ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव संस्थानमार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर,नवीन भक्तनिवासस्थान परिसर,धर्मशाळा परिसर,प्रसादालय परिसर व साईनगर परिसर यासर्व ठिकाणी साईभक्तांचे सोईसाठी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळयाचे दिवसांत उत्सव असल्याने मंडपामध्ये पावसाचे पाणी गळणार नाही याकरीता पत्र्याचे मंडप बांधणे संयुक्तीक होईल. तरी याकामी मंदिर परिसरातील मंडपाकरीता पत्र्याचे छत व सुशोभित कापड तसेच उर्वरीत ठिकाणचे मंडपाकरीता प्लॅस्टीक ताडपत्री व सुशोभित कापड व बिछायतीसह खालीलप्रमाणे मंडप उभारणी करणे आवश्यक आहे. तसेच भक्तांचे अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी भाडोत्री गाद्या घेणे आवश्यक आहेत.

**<u>(अ) मंडप / उभारणी व्यवस्था खालीलप्रमाणे करता येईल.</u>**

०१. समाधी मंदिर परिसरातील मंडप (छताकरीता पन्हाळी पत्रे) एकुण ४२,२८० चौ.फुट.

०२. प्रसादालय परिसर,साईउद्यान,मंगल कार्यालय व पालखी ठिकाणचे मंडप (छताकरीता प्लॅस्टीक ताडपत्री) एकुण ३६,४५० चौ.फुट.

०३. साईनगर,भक्तनिवासस्थान (५०० रुम) व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लॅस्टीक ताडपत्री) एकुण ३०,९०० चौ.फुट.

०४. साईनगर मैदारानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेजव्यवस्था.

वरीलप्रमाणे मंडप उभारणी करणेस एकूण रु.१५.६० लक्ष खर्च अपेक्षित आहे. व अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडुन कोटेशन / दरपत्रक मागविणेस तसेच उत्सवनिमित्ताने करण्याचे येणारे डेकारेशनकरीता आवश्यक बांबू गोल्टे मंजुर दर असलेले सप्लायर श्री.एस.के.वडतेले,राहाता यांचेकडून भाडेतत्वावर घेणेस रु.३०,०००/- मात्र व मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेस येणारे रु.१०,०००/- मात्रचे खर्चास असे एकूण रु.१६ लक्ष इतक्या खर्चाचा तपशील मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.२८ जून,२००८ रोजीचे सभेत ठेवण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन याकामी कोटेशन्स मागवून दि.०३/०७/२००८ रोजी स्थानिक विश्वस्त समिती समक्ष उघडण्यात यावे असे ठरले आहे. मंडपाचे व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी खालील मंडप ठेकेदार यांनी विहीत मुदतीत कोरे कोटेशन फॉर्म घेतलेले होते.

०१. झुराळे मंडप डेकोरेटर्स,निमगांव खैरी.
०२. सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,राहाता.
०३. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,संक्रापुर.
०४. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,अहमदनगर.
०५. गणेश मंडप डेकोरेटर्स,कोपरगांव.
०६. जाधव मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, कोपरगांव.
०७. शुभम टेन्ट हाऊस,निमगांव खैरी.
०८. समर्थ टेन्ट हाऊस,खैरी निमगांव.
०९. शर्मा मंडप,वैजापूर.

उपरोक्तपैकी दि.३० जून,२००८ रोजी कार्यालयीन वेळेत खालील पाच मंडप ठेकेदार यांनी सिलबंद कोटेशन्स सादर केले होते.

०१. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स,निमगांव खैरी.
०२. सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,राहाता.
०३. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,संक्रापूर.
०४. शुभम टेन्ट हाऊस,निमगांव खैरी.
०५. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स,अहमदनगर.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन मा.व्यवस्थापन समितीचे उपस्थित सदस्यांसमवेत दि.०३/०७/२००८ रोजी उघडण्यात आहे. ठेकेदारांनी दिलेले दर व त्यांचेशी चर्चा वाटाघाटीचे दिलेले दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | मंडप ठेकेदाराचे नांव. | समाधी मंदिर परिसर मंडप (छताकरीता पन्हाळी पत्रे) ४२२८० चौ.फुट. | | प्रसादालय परिसर साईउद्यान,मंगल कार्यालय व पालखी ठिकाणचे मंडप (छताकरीता प्लॅस्टीक ताडपत्री) ३६४५० चौ.फुट. | | साईनगर,भक्तनिवास (५०० रुम व इतर परिसरातील मंडप (छताकरीता प्लॅस्टीक ताडपत्रीसह) २१००० चौ.फुट. | | चर्चा तथा वाटाघाटीनंतर ची एकूण रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील दर प्र.चौ.फुट प्रति दिवस प्रमाणे. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर. | कोटेशनमधील दर प्र.चौ.फुट प्रति दिवस प्रमाणे. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर. | कोटेशनमधील दर प्र.चौ.फुट प्रति दिवस प्रमाणे. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर. | |
| ०१ | झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमंगाव | ६.७५ | ५.५ | ४.०० | ३.५० | ४.०० | ३.२५ | १२८५०९५.०० |
| ०२ | सावता मंडप ॲण्ड डेकोरेटर्स,राहाता. | ५.७५ | ५.५० | ३.७५ | ३.०० | ४.४० | २.७५ | ११९८९२०.०० |
| ०३ | रोशनी मंडप डेकोरेटर्स,संक्रापूर | ७.५० | ५.५ | ४.२५ | ३.०० | ३.७५ | २.७५ | ११९८९२०.०० |
| ०४ | कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, अहमदनगर | ६.२५ | ४.५० | ४.५० | ३.२५ | ४.५० | ३.२५ | ११३०९१७.५० |
| ०५ | शुभम टेन्ट हाऊस, खैरी निमंगाव. | १०.०० | १०.०० | ४.०० | ४.०० | ४.०० | ४.०० | १९५७८००.०० |

उपरोक्त प्रमाणे व चर्चावाटाघाटीनंतर, समाधी मंदिर परिसरासाठी कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दर निम्नत्तम आहेत. तसेच प्रसादालय,साईउद्यान,मंगलकार्यालय व पालखी ठिकाणचे मंडप (छतास प्लॅस्टीक ताडपत्री असलेले) व साईनगर,भक्तनिवास (५०० रुम) इ.मंडपासाठी सावता मंडप ॲण्ड डेकोरेटर्स,राहाता व रोशनी मंडप लाईट डेकोरेटर्स,राहूरी यांचे दर निम्नत्तम असल्याने काम वेळेत पुर्ण होण्याचे दृष्टीने सदरची कामे दोन्ही ठेकेदारांना समप्रमाणात विभागून देण्यात यावे. तसेच पावसाचे दिवस असल्याने कलाकाराचे कार्यक्रम समाधी मंदिरातील स्टेजवर घेण्यात यावेत व साईनगर येथे स्टेज व प्रेक्षकांचे बैठक व्यवस्थेचा मंडप उभारणी करु नये असे ठरले.

**(ब)** भक्तांचे निवासासाठी वाढीव सुविधांच्या ठिकाणी गाद्यांची आवश्यकता असल्याने उपस्थित सर्व मंडपधारकांशी भाडोत्री गाद्यांचे दराबाबत मा.स्थानिक उपसमिती सदस्यांनी चर्चा केली. त्यामध्ये सावता मंडप ॲण्ड डेकोरेटर्स,राहाता यांनी सर्वात कमी दराने म्हणजे प्रति गादीस दैनंदीन रु.५/- प्रमाणे ४००० गाद्या भाडोत्री ( आणणे नेणे खर्चासह ) पुरविण्यास तयार असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांचेकडून गरजेनुसार भाडोत्री गाद्या घेण्यात याव्यात असे ठरले.

गुरुपोर्णिमा उत्सवामध्ये दि.१६/०७/२००८ ते दि.२०/०७/२००८ या ५ दिवस कालावधीसाठी ४००० गाद्या भाडोत्री घेण्यास रु.१,००,०००/- येईल व ज्या दराने गाद्या भाडोत्री घेण्यात येतील त्याच दराने भक्तांकडून गाद्यांचा सेवाआकार घेण्यात येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे स्थानिक सदस्यांसमोर ठरल्याप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी भक्तांचे वाढीव गर्दीचा विचार करता समाधी मंदीर परिसरातील मंडप तीन दिवसांऐवजी पांच दिवसांकरिता ठेवण्यात यावेत. याकामी श्री.खरपुडे यांना मंदिर परिसरातील पांच दिवसांचे मंडपाकरिता रुपये ९,५१,३००.०० खर्चाचे व सर्वश्री सावता मंडप, राहाता आणि रोशनी मंडप, संक्रापुर यांना प्रसादालय व इतर सर्व ठिकाणचे रु.५,०१,३००/- खर्चाचे मंडप विभागून उभारणी करण्यास मान्यता असावी. तसेच भक्तांचे वाढीव गर्दीमुळे जादा मंडप उभारणी करणे आवश्यक झाल्यास मंजूर दराने मंडप उभारणी करणेस व आवश्यकता भासल्यास मंडपांचा कालावधी वाढविणेस येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास तसेच भक्तांचे अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी ठिकाणी दि.१६/०७/२००८ ते २०/०७/२००८ या कालावधीत गरजेनुसार आवश्यक तेवढया गाद्या प्रतिगादीस दैनंदीन रु.५/- याप्रमाणे भाडोत्री घेण्यास व त्याच दराने भक्तांकडून सेवाआकार घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **नवीन श्री साई प्रसादालय बायोगॅस सयंत्र उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.६२२** दि.२८/०७/२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र. ५१७ अन्वये विषयांकित प्रकल्पासाठी मेडा यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व त्यापोटी त्यांना अदा करावयाचे

फीसाठी येणारे योग्य त्या खर्चास व त्यांचे सल्ल्याने उपरोक्त कामासाठी फेरनिविदा मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. याबाबत MEDA यांना इकडील जा.क्र. ११७३० दि. २८/०७/२००७ अन्वये विषयांकीत कामाबाबत नकाशे अंदाजपत्रक व निविदा तयार करणेस कळविण्यात आले होते. त्यानुसार MEDA यांनी त्यांचे जा.क्र. ६७५१ दि. २७/०९/२००७ रोजी खालील प्रमाणे कामे महाऊर्जा कार्यालयाकडून करण्यात येतील असे कळविले आहे.

अ) निविदा पुस्तीका तयार करणे व सयंत्रसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे. उपरोक्त बाबीसाठी महाउर्जाच्या अटी व शर्ती सल्लागार फी खालील प्रमाणे

- याबाबत महाऊर्जाची सल्लागार फी १,००,०००/- असणार आहे. यापैकी ५०% रक्कम रुपये ५०,०००/- उपरोक्त बाबी मान्य होताच महाऊर्जेस अदा करावेत. उर्ववरीत ५०% रक्कम रुपये ५०,०००/- प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित झाल्यानंतर अदा करावेत.
- उत्पादक निवडण्याची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान यांची राहील.
- आपणास आवश्यकतेनुसार प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येईल.

त्यानुसार इकडील जा.क्र. १९६६७/२००७ दि. १२/१२/२००७ चे पत्रान्वये निविदा तयार करणेबाबत MEDA यांना पत्र देण्यात आले होते. त्याबाबत MEDA यांनी करारनाम्याचा मसुदा त्यांचे कार्यालयाकडे पाठवावा असे कळविले होते. याबाबत MEDA यांना अशा विशिष्ट कामाचे करारनाम्याचा मसुदा इकडील कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे आपणच करारनाम्याचा मसुदा तयार करुन इकडील कार्यालयाकडे पाठवावा अशी विनंती केली होती. त्यानुसार MEDA यांनी त्यांचे दि. ०७/०४/२००८ रोजीचे पत्रान्वये करारनामा मसुदा पाठविला त्याची तपासणी करुन इकडील कार्यालयाचे जा.क्र. ८६१० दि. १२.०६.२००८ चे पत्रान्वये MEDA यांचेकडून तांत्रिक सल्ला सेवेअंतर्गत अपेक्षित असलेल्या सेवा कळविण्यात आल्या व त्यासोबत करारनाम्याचा सुधारित मसुदा पाठविणेत येऊन त्यांची सहमती कळविणेविषयी विनंती करणेत आली. तथापी याबाबत MEDA यांनी दि. २०.०६.२००८ रोजीचे पत्रानुसार संस्थानने कळविलेल्या अटी व शर्तीनुसार करारनामा करणेत येऊ शकत नाही, असे कळविले आहे.

दरम्यान विषयांकित कामाबाबत मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी दि. २०/०५/२००८ रोजी MEDA चे व्यवस्थापक श्री हेमंत कुलकर्णी यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की मी एकटा आहे. माझ्याकडे हाताखाली सर्व्हे करण्यासाठी एकही माणूस नाही. जर विषयांकित काम करावयाचे असेल तर आम्ही out source करुन दुसऱ्या एजन्सीची मदत घेणार व त्यासाठी एक लाखाची रक्कम वाढवावी लागेल. त्यानंतर मा. विश्वस्त उर्मिला जाधव यांनी त्याच दिवशी श्री ताकवाले साहेब (माजी कुलगुरु शिवाजी युनिर्व्हसिटी) यांचेशी सोलरच्या तांत्रिक सल्लामसलत करण्यासाठी श्री. अमृत जगताप यांचे समवेत पुणे येथे गेले असता त्यांनी सांगितले की, पुणे विद्यापीठ अपारंपारीक ऊर्जेच्या कामासाठी सक्षम आहे व आमचे तर्फे प्रकल्प केल्यास श्री राजीव गांधी फौन्डेशन तर्फे बरेच अनुदान मिळते (MEDA तर्फे बायोगॅस केल्यास अनुदान मिळत नाही.) अशी माहिती मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी दिली आहे.

उपरोक्त प्रकल्पाबाबत दि. २३/०५/२००८ रोजी पुणे विद्यापीठ यांचा फॅक्स आला असून विषयांकित कामाच्या सल्लासेवेसाठी त्यांनी रुपये ७५,०००/- मात्र इतक्या रकमेत काम करण्याची तयारी दर्शविली आहे. यामध्ये तांत्रिक सल्ला, सविस्तर प्रकल्प अहवाल व एस्टीमेट करणेचा समावेश असून त्यासाठी शिर्डी येथे ४ ते ५ वेळा भेट देणेचा समावेश आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार MEDA यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तथापी MEDA यांनी संस्थानने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार काररनामा करणेत येऊ शकत नाही असे कळविले आहे. त्यामुळे MEDA यांची नियुक्ती रद्द करुन पुणे विद्यापीठ यांची बायोगॅस सयंत्र उभारणेकामी सल्लागार म्हणून नियुक्ती करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन श्रीसाईप्रसादालय बायोगॅस सयंत्र उभारणेचे काम वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट,मांजरी बु।। जि.पुणे यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **वाढीव शिर्डी पाणीपुरवठा योजना संस्थानचे स.नं. १४८ मधील भक्तनिवास (द्वारावती) परिसरातील रस्त्याखालून ४०० मि.मि. व्यासाची पाईपलाईन टाकणेबाबत.**

**निर्णय क्र.६२३** संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक चार मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून चौथा मजला बांधकाम, रस्ता, पाणीपुरवठा, इलेक्ट्रीक पॅनेल्स, पॅनेल रुम व ड्रेनेजचे काम प्रगतीपथावर आहे.

उपअभियंता,महाराष्ट्र जिवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांनी भक्तनिवास (व्दारावती) इमारती समोरील प्रस्तावीत कॉंक्रीट रस्त्याखालून ४०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकणेसाठी दिनांक ०५.०६.२००८ चे पत्रान्वये परवानगी मागितलेली आहे. या रस्त्याची रूंदी ९.००मी. असून सदर रस्त्याखालून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी रस्त्याचे दूतर्फा ३०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. तसेच दक्षिण बाजुने फुटपाथखालून धर्मशाळा व रुग्णालयाची ड्रेनेजलाईन गेलेली आहे. त्यामुळे या रस्त्याखालून ४०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकणे संयुक्तीक होणार नाही असे उपअभियंता,महाराष्ट्र जिवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांना दि.१४/६/२००८ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

त्यानंतर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांनी शिर्डी नगरपंचायतच्या नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष व इ.पदाधिका-यांसमवेत २०० रूम-द्वारावती परीसराची पाहणी करुन संस्थानचे गार्डनमधून पुर्व पश्चिम फुटपाथचे बाजूने उपरोक्त ४०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकणेबाबत चर्चा केली व आता मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी पत्र क्र.१०३ दि.२७/६/२००८ अन्वये गार्डनमधून पाईपलाईन टाकणेसाठी परवानगी मागितलेली आहे तसेच पाईपलाईन टाकलेनंतर बगीचाचे नुकसान होणार नाही व लॅान पुर्ववत करून देता येइल असे कळविले आहे.

तरी मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे गार्डनमधून पाईपलाईन टाकणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **शिरडी नगरपंचायत शिरडी विशेष स्वच्छता कर/ आरोग्य कर (पथकर) जानेवारी- २००८ ते जुन- २००८ ची रक्कम अदा होणेबाबत.**

**निर्णय क्र.६२४** शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यात येऊ नये, अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्रमांक एसएसएस/वशी ०२/१३२१०/२००४ दिनांक ३१/१२ /२००४ चे पत्राने करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगरपंचायत यांनी दिनांक ११/०७/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रती वर्षी मिळणा-या रक्कमेएवढी रक्कम त्यांना मिळावी. सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९० /- एवढी रक्कम त्यांना मिळाली तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २० % वाढ करण्यात यावी, ५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी. अश आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनांस त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. उपरोक्त प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ व दिनांक १८/०९/२००५ चे सभेत विषय क्रमांक ५० निर्णय क्रमाक ४३८ झालेला आहे. प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अशंदानाबाबत प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांना द्यावयाचे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले आहे.

उपरोक्त ठरावांस अनुसरून दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास तत्वता मान्यता देण्यात आली आहे. शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणार साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारु नये. याकरिता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये ३९,६१,९९०/- पुर्णांकित रक्कम रुपये ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये-चाळीस लाख मात्र ) प्रती तीन महिन्यास रुपये- १०,००,०००/- ( अक्षरी रुपये दहा लाख मात्र ) याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगरपंचायतीस देण्यात यावी, असे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यांत आली. सदरहू विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यास दिनांक ०५/११/२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ६५१ (०६) मान्यता देण्यात आली आहे. ' शिर्डी नगरपंचायतीस संस्थान निर्णय क्रा ४३८ दि ०६/०८/०५व सल्लागार समितीचे ०१/१०/२००५ चे ठरावाची माहिती दि २१/१०/२००५ ने ) पाठविलेली आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी अधिनियम - २००४ चे कलम २१(२) (सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची परवानगी घेणे जरुरीचे आहे.

त्याप्रमाणे संस्थानने जा.क्रं. १३०५४ दिनांक ०९/११/२००५ ने शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केलेले आहे. शिर्डी नगरपंचायत ,शिर्डी यांनी भक्तांकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण कर आकारु नये यासाठी भक्तांचे सेवेसाठी रक्कम रुपये ४०,००,०००/-( चाळीस लाख मात्र ) प्रतिवर्षी देणेबाबत मान्यता मिळणेस सदर पत्राने विनंती केलेली आहे.

अद्याप सदर परवानगी मिळालेली नाही. त्याबाबत संस्थानचे अध्यक्ष मा. श्री. ससाणे साहेब तसेच नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष मा. श्री. कैलास कोते प्रयत्नशील आहेत. शासनाकडून परवानगी प्राप्त होणेवर आहे.

**दरम्यानचे काळात मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावाप्रमाणे नगरपंचायत शिर्डी यांना खालीलप्रमाणे रक्कम अदा केली आहे.**

| अ. नं | माहे | अदाई रक्कम रुपये | मा.व्य.मंडळाची मिटींग दिनांक / विषय नं / निर्णय क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर- २००५ डिसेंबर-२००५,जानेवारी-२००६ | १०,००,०००-०० | दि.४/२/२००६ / आ.वे.वि.नं. २३ / निर्णय क्र. ९८ |
| २ | फेब्रुवारी-२००६, मार्च-२००६, एप्रिल- २००६ | १०,००,०००-०० | दि.३/६/२००६ / आ.वे.वि.नं. ३३ / निर्णय क्र. ४०८ |
| ३ | मे-२००६, जुन-२००६, जुलै -२००६ | १०,००,०००-०० | दि.१४/१०/२००६ / वि.नं. ४४ / निर्णय क्र.८२७ |
| ४ | ऑगस्ट-२००६,सप्टेंबर-२००६ ऑक्टोंबर-२००६ | १०,००,०००-०० | दि.६/१/२००७/ आ.वे.वि.नं. ३८ / निर्णय क्र. १०६ |
| ५ | नोव्हेंबर -२००६, डिसेंबर २००६,जानेवारी २००७ | १०,००,०००-०० | दि.६/१/२००७/ आ.वे.वि.नं. ३८ / निर्णय क्र. १०६ |
| ६ | फेब्रुवारी -२००७ ते मार्च,एप्रिल ,मे, जुन, जुलै, ऑगष्ट,सप्टेंबर, अक्टोंबर, नोव्हेंबर,डिसेंबर-२००७ पावेतो | ३६,६६,६६६-०० | दि.१०/१/२००८/आ.वे. वि.नं. २२ / निर्णय क्र. १३३ |
| | **एकूण रुपये -** | **८६,६६,६६६-००** | |

नगरपचांयत कार्यालयाने माहे-२००६ पासून विशेष स्वच्छता कर/आरोग्य रक्षण कर (नाके) बंद केलेले आहे त्यापोटी या कार्यालयास पुढीलप्रमाणे रकमा प्राप्त होणे आवश्यक असल्याचेही नगरपंचायतीने आता दि.११/०७/२००८ व दिनांक ०५.०७.२००८चे पत्रात नमूद केले असून आरोग्य रक्षण कर बंद केला त्यापोटी खालीलप्रमाणे रक्कम प्राप्त हाणे आवश्यक असल्याने सदर रक्कम मिळणेस विनंती केलेली आहे.

१) माहे नोव्हेंबर २००५ ते ऑक्टोबर २००६ अखेर
( रुपये ४०,००,०००/- दरवर्षी प्रमाणे ) — **रुपये ४०,००,०००/-**
२) माहे नोव्हें. २००६ ते ऑक्टोबर २००७ — **रुपये ४०,००,०००/-**
३) माहे नोव्हेंबर २००७ ते डिसेंबर २००७ — **रुपये ०६,६६,६६६/-**
४) माहे जानेवारी २००८ ते मार्च २००८ — रुपये १०,००,०००/-
५) माहे एप्रिल २००८ ते जुन २००८ — रुपये १०,००,०००/-

-----------------------

**रुपये १,०६,६६,६६६/-**

---------------------

नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ अखेर एकूण रुपये **१,०६,६६,६६६/-**अक्षरी ( रुपये एक कोटी सहा लाख सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट मात्र ) येणे आवश्यक होते. परंतु मार्च २००८ अखेर वरीलप्रमाणे ८६,६६,६६६/- अक्षरी ( रुपये शहयाऐंशी लाख सहासष्ट हजार सहाशे सहासष्ट मात्र ) प्राप्त झालेले आहे. उर्वरित रक्कम रुपये २०,००,०००/- अक्षरी (रुपये वीस लाख चाळीस हजार मात्र) त्यांना संस्थानकडून येणे बाकी आहे. तरी नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ अखरे विशेष स्वच्छता कर / आरोग्य रक्षण कर ( नाके ) पोटी येणे असलेली उर्वरित रक्कम रुपये २०,००,०००/- ( अक्षरी रुपये वीस लाख चाळीस हजार मात्र ) मिळणेस नगरपंचायत शिर्डी यांनी दि.११/०७/२००८ व दिनांक ०५.०७.२००८ रोजी चे पत्राने विनंती केली आहे. सदरचे नविन मागणी बाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे विचारार्थ विषय अलहिदा सादर होत आहे.

नगरपंचायत शिर्डी यांना यापुर्वी नोव्हेंबर २००५ ते जानेवारी २००७ पावेतो रक्कम अदा करतांना १) मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांची शिफारस २) मा.विधी व न्याय विभाग यांचेकडे रक्कम अदायी साठी पाठविलेला प्रस्ताव व त्यांचेकडून प्रलंबीत असलेली मंजूरी या बाबी विचारांत घेऊन मा.व्यवस्थापन मंडळाचे वेळोवेळी झालेले ठरावा प्रमाणे शासनाचे मंजूरीस अधिन राहून रक्कम अदा केलेली आहे. कर वसूली थांबविणेत आलेल्या आदेशाची माहिती पाठविणेस शासनाने नगरपंचायतीस कळवीले होते सदर माहिती प्राप्त होई पावेतो नगरपंचायतीस कर देवू नये असे शासनाने दि. १४/०३/२००७ च्या पत्राने कळविलेले होते. त्याबाबत विचार होऊन मध्यंतरी नगरपंचायतीस कर अदाई केली नव्हती परंतू त्यानंतर फेब्रुवारी २००७ ते डिसेंबर २००७ ची रक्कम (रु. ३६,६६,६६६/-) अदा करणेत आले. शासनाने नगरपंचायतीस रक्कम अदा करतांना मान्यता न दिलेस नगरपंचायतीस देय असलेल्या घरपट्टीतून / मालमत्ता करातून रक्कम वसूल करावी अशा अटीवर मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णया प्रमाणे रक्कम अदा केलेली आहे.

नगरपंचायत शिर्डी यांनी आता उपरोक्तप्रमाणे अदा केलेले रक्कमे मध्ये वरील प्रमाणे १०% वाढ करुन नोव्हेंबर २००५ ते मार्च २००८ पावेतो २२,४०,०००/- ( अक्षरी रु. बावीस लाख चाळीस हजार मात्र) मिळणेबाबत मागणी केलेली आहे.सदरचे प्रकरण चालू असतांनाच आता तुर्त पुर्वी

प्रमाणे ( वार्षीक ४० लाख ) रक्कम अदाई करावी माहे जानेवारी २००८ ते मार्च २००८ पावेतो १०,००,०००/- व एप्रिल २००८ ते जुन २००८ पावेतोचे रु. १०,००,०००/- असे एकुण २०,००,०००/- ( अक्षरी रु. वीस लाख मात्र ) अदा व्हावेत असे उपनगराध्यक्ष श्री अभय शेळके यांनी दुरध्वनीवर सांगीतले आहे. मा.हुजूर यांचेशी समक्ष चर्चा साठी येत आहेत.

मा.विधी व न्याय विभागाकडे नगरपंचायतीस प्रतिवर्षी ४० लाख रुपये स्वच्छता कर आरोग्य प्रदुषन कर अदा करणेबाबत मंजूरी मिळणेसाठी संस्थानचा प्रस्ताव सादर आहे. त्याबाबत विधी व न्याय विभागाने विभागीय आयुक्त यांचेकडे कर वसूली थांबविणेबाबतचे आदेशाची प्रतीची मागणी केलेली आहे. याबाबत कराचे संदर्भात लागू केलेला उपविधी रद्द करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत करीता प्रधान सचिव नगर विकास मंत्रालय मुंबई याबाबत उचीत आदेश देणेस विभागीय आयुक्त नासीक यांनी विनंती केलेली आहे. अशा परिस्थीतीत संस्थानचा नगरपंचायतीस प्रतिवर्षी रु. ४० लाख अदा करणेचा प्रस्तावावरील मंजूरी प्रलंबीत आहे. तरी उपरोक्त परिस्थीतीत नगरपंचायतीचे तोंडी व त्यानंतर जा.क्र.४७४/ दि.०५/०७/२००८ मागणी केली आहे. शासन निर्णयास अधिन राहून जानेवारी २००८ ते जुन २००८ पावेतो रक्कम रु. २० लाख मात्र नगरपंचायत शिर्डी यांना आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०.** **माहे १ ऑगस्ट २००८ अखेर उपलब्ध रकमांच्या गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ६२५** माहे १ ऑगस्ट २००८ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | बँकेचे नाव | मुदतपुर्तीची दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | आंध्र बँक, शिर्डी | ११/०७/,२००८ | ४३,७४,९२६.०० |
| २ | आंध्र बँक, शिर्डी | १५/०७/,२००८ | १,०३,८२,६९६.०० |
| ३ | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/,२००८ | १,००,३२,६६५.०० |
| ४ | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/,२००८ | १,४४,१२,०७६.०० |
| ५ | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/,२००८ | ३,९९,७२,०६५.०० |
| ६ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २१/०७/,२००८ | १,८४,७१,५९०.०० |
| ७ | स्टेट बँक ऑफ इंडीया, कोपरगाव | २०/०७/,२००८ | ६१,११,९६५.०० |
| ८ | स्टेट बँक ऑफ इंडीया, राहाता | १९/०७/,२००८ | ६१,११,९६५.०० |
| ९ | स्टेट बँक ऑफ इंडीया, श्रीरामपूर | २०/०७/,२००८ | १,८३,३५,८९५.०० |
| १० | स्टेट बँक ऑफ इंडीया, श्रीरामपूर | २१/०७/,२००८ | ६१,११,९६५.०० |
| ११ | आंध्र बँक, शिर्डी | २५/०७/,२००८ | २,६४,३३,४४७.०० |
| १२ | युनियन बँक ऑफ इंडीया, राहाता | ०१/०८/,२००८ | ३,५८,६८,५४०.०० |
| १३ | आरबीआय बाँडवर माहे ऑगस्ट-०८ मध्ये मिळणारे व्याज - | | ४,११,००,०००.०० |
| १४ | बचत खाती गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम - | | ५,००,००,०००.०० |
| | एकूण - | | २८,७७,१९,७९५.०० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. २८.७७ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-०६ व २००६-०७ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०२. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बँक, शिर्डी
०४. स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव
०५. बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६. बँक ऑफ बरोडा, नासिक
०७. बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८. विजया बँक, शिर्डी

यावर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ०८ प्रमाणे सेवा देणाऱ्या बँकांकडे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करताना दूरध्वनीवरुन विचारणा करुन सुधारित वाढीव व्याजदर घ्यावेत व जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांकडे समप्रमाणात विभागून टप्प्याटप्प्याने रक्कम गुंतविण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१.** **सिकंदराबाद येथे साईभक्तांसाठी गेस्ट हाऊस उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.६२६** एस. राधास्वामी फऊंडेशन सिकंदराबाद यांचे कडून वा.एम.सी.ए. कॉम्प्लेक्स, एस पी. रोड, सिकंदराबाद येथील दोन बांधीव जागा (फ्लॅट्स) २०० चौ. फुट जागा तळमजल्यावर व ३००० चौ. फुट जागा दुसऱ्या मजल्यावर दि.२४ जानेवारी २००७ रोजी संस्थानला भाडेपट्टयाने मिळाली आहे. साईभक्तांना मार्गदर्शनासाठी तळमजल्यावर असलेल्या २०० चौ. फुट जागेत साईबाबांचे जिवनावर आधारीत असलेली माहिती मिळावी म्हणून माहिती केंद्र, संस्थानने प्रकाशीत केलेले पुस्तक विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहेत. हैद्राबाद येथील साईभक्त श्री. बी. विजयकुमार यांनी माहिती केंद्रासाठी आवश्यक असणारे फर्निचर व इतर अनुषंगीक कामे देणगी दाखल करुन दिली आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.०२.२००७ रोजीचे सभेत निर्णय क. २४२ अन्वये उपरोक्त दोन्ही जागांवर माहिती तथा सुविधा केंद्र तयार करणेबाबत संबंधीत विभागांनी उचित कार्यवाही करावी असे ठरले आहे. त्यानुसार दुसऱ्या मजल्यावर असलेल्या ३००० चौ. फुट जागेत साईभक्तांसाठी गेस्ट हाऊस उभारता येईल. त्यात खालील बार्बीचा समावेश करता येईल.

| | |
|---|---|
| १) एक व्ही.आय.पी. रुम, टॉयलेट बाथरुमसह | २) केअर टेकर रुम किचनसह |
| ३) डॉरमेटोरी १२ बेडचे | ४) लेडीज व जेंडस्साठी सेपरेट टॉयलेट इ. |
| ५) स्टोअर रुम | |

वरीलप्रमाणे सिकंदराबाद येथे गेस्ट हाऊस बनविणेकामी अंदाजे रुपये २० लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे. सिकंदराबाद येथे गेस्ट हाऊस उभारणेसाठी आर्किटेक्ट यांचेकडून विस्तृत प्लॅन व एस्टिमेट घेता येईल. तसेच बांधकाम करणेसाठी सिकंदराबाद येथील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन तेथील ठेकेदारांकडून निविदा मागवून काम पुर्ण करुन घेता येईल.

तरी साईभक्तांच्या सुविधेसाठी सिकंदराबाद येथे गेस्ट हाऊस उभारणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रुपये २० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

तसेच सदर कामासाठी सिकंदराबाद येथील स्थानिक आर्किटेक्टची सेवा घेण्यात यावी असे ठरले. याकामी योग्य त्या मानधनावर आर्किटेक्ट नेमणूक करण्याची अधिकारी मा.कार्यकारी अधिकारी यांनीा प्रदान करण्यात आले. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२.** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी प्रवेशाबाबत.**

**निर्णय क्र.६२७.** इ. ११ वी च्या वर्गाचे सन २००८-२००९ च्या प्रवेशाचे नियोजना संदर्भात मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी बुधवार दि. १८ जुन २००८रोजी एम.जी. विद्यालय, प्रवरानगर येथे सभा घेऊन मार्गदर्शन केले. या सभेत केलेंल्या मार्गदर्शनपर सुचनांनुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या इ. ११ वी प्रवेशाचे नियोजन करण्यात आले. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे प्रवेशअर्ज स्विकारले आहेत. प्राप्त झ ाालेंल्या प्रवेश अर्जाच्या कला, विज्ञान शाखांच्या गुणवत्ता याद्या आरक्षण विचारात घेवून तयार केलेल्या आहेत. आरक्षणानुसार प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | आरक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शे. प्रमाण | इ.११ वी कला क्षमता | इ.११ वी वानिज्य क्षमता | इ.११ वी विज्ञान क्षमता |
| १ | व्यवस्थापन कोटा | २० | ३२ | ३२ | ३२ |
| २ | सर्वसाधारण (OPEN) | ४८ | ६२ | ६२ | ६२ |
| ३ | अनु. जाती (SC) | १३ | १६ | १६ | १६ |
| ४ | अ. जमाती (ST) | ०७ | ०९ | ०९ | ०९ |
| ५ | इतर मागास वर्ग (OBC) | १९ | २४ | २४ | २४ |
| ६ | विषेश मागास प्रवर्ग (SBC) | ०२ | ०३ | ०३ | ०३ |
| ७ | विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) | ११ | १४ | १४ | १४ |
| | | एकूण | १६० | १६० | १६० |

आरक्षण व गुणवत्तेनुसार कला, विज्ञान व वाणिज्य शाखांच्या गुणवत्ता याद्या तयार करण्यात आलेल्या प्रवेश याद्या मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे निदेशानुसार जाहिर करण्यात आलेल्या आहेत. व्यवस्थापन कोटयातील २० टक्के प्रवेश (कला शाखा ३२ प्रवेश, विज्ञान शाखा ३२ प्रवेश, वाणिज्य शाखा ३२ प्रवेश असे एकुण ९६ प्रवेश) मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय व मा.विश्वस्तांचे लेखी शिफारशीनुसार देता येतील. या बाबत प्रत्येक शाखेसाठी प्रत्येकी २ या प्रमाणे प्रत्येकी एकूण ६ प्रवेश मा.

अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय व मा.विश्वस्तांचे लेखी शिफारशीनुसार देता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास तसेच, संस्थानचे शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याला प्राधान्याने प्रवेश देणेत यावा, व आवश्यकतेनुसार तुकडी वाढविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्राचार्या कन्या विद्या मंदिर)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. श्री.एस.सी.वाखुरे, कंत्राटी पध्दतीने कंन्सलटंट व श्री.चंद्रकान्त ज. रणशूर कंत्राटी पध्दतीने सल्लागार यांचे मुदतवाढीबाबत**

**निर्णय क्र. ६२८. अ)**श्री. चंद्रभान सिताराम वाखुरे यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५५०/२००५ दि.२३/०९/२००५ अन्वये प्रशासन शाखा विधी विभाग (वर्शी-०२) कडे कंत्राटी पध्दतीने कन्सल्टंट या पदावर दरमहा रु.७०००/-या एकत्रित मानधनावर सहा महिने (दि.२१/१०/२००५ते२०/०४/२००६ अखेर)कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी त्यांची नेमणूकीची मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी -१/१३३३/२००७ दि. ३०/०५/२००७ अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि. २०/०४/२००८ अखेर संपुष्ठात आलेली आहे.

**ब)**श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/८२७८/ दि. ०४/०८/२००५ अन्वये रेव्हेन्यु व भूसंपादन कामासाठी कंत्राटी पध्दतीने सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती.ते दि.१२/०५/२००५ रोजी कामावर हजर झाले असून त्यांच्या नेमणूकीची मुदत संपुष्ठात आल्यानंतर त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०८२८/२००७ दि.१०/०७/२००७ अन्वये दि. १२/०५/२००७ पासून पुढे वाढविण्यात आलेली मुदत दि.११/०५/२००८ रोजी संपुष्ठात आलेली आहे.

उपरोक्त श्री. सिताराम चंद्रभान वाखुरे यांना माहितीचा अधिकार नियमाबाबत कायदेशीर माहिती असून त्यांच्या सेवा उपयुक्त ठरु शकतात असे अभिप्राय संबंधीत प्रशासकिय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

तसेच श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर हे भूसंपादन विषयक कामे योग्य रितीने करत असून भूसंपादन कक्षाकडे चालू असलेल्या **०६** प्रकरणे चालू असून पुढील भूसंपादन विषयक कामे करण्याच्या दृष्टीने भूसंपादन क्षेत्रातील तज्ञ सल्लागार व्यक्तीची आवश्यकता आहे. असे अभिप्राय बांधकाम विभाग प्रमुख यांनी दिलेले आहेत.

उपरोक्त बाबत संबंधीत प्रशासकिय अधिकारी / विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेऊन श्री.सिताराम चंद्रभान वाखुरे यांना ०६ महिने व श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर यांना एक वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. डॉ.वंदना सचिदेवा, ज्यु.रेडीओलॉजीस्ट यांचे मासिक फिक्स इंन्सेटिव्हबाबत.**

**निर्णय क्र. ६२९.** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजी विभागासाठी नियोजित कर्मचारी आकृतीबंधात एक रेडीओलॉजीस्ट दोन ज्यु. रेडीओलॉजीस्ट अशी पदे आहेत. सध्या एक रेडीओलॉजीस्ट व एक असोशिएट कन्सलटन्ट (ज्यु. रेडीओलॉजीस्ट) यांना वेतना व्यतिरीक्त प्रति महा रु.२०,०००/- मोबदला देण्याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत ठराव क्र.७७७ दि.१९.०८.२००६ व दि.१४.११.२००६ झालेला आहे. सदर मोबदल्यात वाढ होणेबाबत रेडीओलॉजीस्ट यांनी अर्ज केला आहे. दि.१.१०.२००७ पासून डॉ.वंदना सचिदेवा यांची ज्यु. रेडीओलॉजीस्ट म्हणून रु.२५,०००/- मासिक वेतनावर नियुक्ती झाली आहे. त्यांनी मासिक वेतनाव्यतिरिक्त कामावर रुजु झालेपासुन प्रतिमहा रु.१५,०००/- मोबदला मिळण्याबाबत दि.२९.११.२००७ रोजी अर्ज केला आहे. त्यांना मुलाखतीच्या वेळेस रु.१५,०००/- मोबदला देण्याचे ठरविले होते व त्यांनी ते मान्य केले होते.

तरी मासिक वेतन रु.२५,०००/- अधिक प्रतिमहा फिक्स मोबदला रु.१५,०००/- असे एकूण प्रतिमहा रु.४०,०००/- वेतन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२५ श्री.रावसाहेब गंगाराम पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नं.१२८ येथील क्षेत्र ० हेक्टर ५६।। आर जमीन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६३०** व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४३२ अन्वये श्री.बाबासाहेब डांगे, रा.कनकुरी,ता.राहाता यांची जमीन रुपये १ लाख प्रती आर-गुंठा या दराने खरेदी केलेली आहे. त्याच दराने श्री.रावसाहेब गंगाराम पवार,रा.कनकुरी,ता.राहाता यांची जमीन विहिरीसह खरेदी करण्यात यावी,असें ठरलें होते.

आजचे सभेत श्री.रावसाहेब गंगाराम पवार हे उपस्थित होते. त्यांनी त्यांची गट नं.१२८ मधील क्षेत्र ० हेक्टर ५६।। आर जमीन विहिरीसह एकत्रित रुपये ७०,६२,५००/- या किंमतीस देणार असलेबाबत सांगितले. यावर सभेने त्यांना या जमीनची विहिरीसह अंतिम रक्कम रुपये ६५,००,०००/- (अक्षरी रुपये पासष्ट लाख मात्र) देऊ केली, ती त्यांनी मान्य केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रावसाहेब गंगाराम पवार,रा.कनकुरी यांची गट नं.१२८ मधील क्षेत्र ० हेक्टर ५६।। आर जमीन विहिरीसह रुपये ६५ लाख या किंमतीस खरेदी करण्यात यावी. तसेच सदरहू खरेदीकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी आवश्यक त्या कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात असें ठरले (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २६. कंत्राटी कामगारांमधील संस्थान सेवेत नियमित नेमणूका दिलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन देणेबाबत.**

**निर्णय क्र. ६३१** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२५ अन्वये सन-१९९१ ते २००० पर्यंत कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या १०३७ अकुशल व १७८ कुशल अशा एकुण-१२१५ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी नियमित कामावर असणारे व आजमितीस सलग कामावर हजर असणाऱ्या, कोर्ट केसेस व अन्य चौकशी चालु असलेले वगळून इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित नेमणूका देण्यासाठी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, कामगार कायदे सल्लागार यांचे सल्ल्याने कायदेशीर पुर्तता करुन प्रस्ताव शासनाचे मान्यतेस सादर करणेत यावा असे ठरले होते. तसेच सदर निर्णयान्वये मान्य करणेत आलेल्या नियमावलीमध्ये अ) १०३७ अकुशल कंत्राटी कामगारांना त्यांचे सेवाजेष्ठतेस अनुसरुन खालीलप्रमाणे प्रतिमहिना एकत्रीत मानधन देणेत यावे असे प्रस्तावीत करणेत आले होते.

सन १९९१- रुपये ४०००/-, सन १९९२- रुपये ३९००/-, सन १९९३- रुपये ३८००/-,
सन १९९४- रुपये ३७००/-, सन १९९५-रुपये ३६००/-, सन १९९६-रुपये ३५००/-,
सन १९९७- रुपये ३४००/-, सन १९९८-रुपये ३३००/-, सन १९९९-रुपये ३२००/- व
सन २०००-रुपये ३१००/-

ब) त्याचप्रमाणे १७८ कुशल कंत्राटी कामगारांना पदनिहाय लागु असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे अनुज्ञेय वेतनश्रेणीतील मुळवेतन व इतर भत्ते यासह होणाऱ्या एकुण वेतनाचे रक्कमे एवढे दरमहा एकत्रीत मानधन देणेत यावे असे प्रस्तावीत करणेत आले होते. त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे कंत्राटी कामगार नियमित नेमणूका देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३७४/२००६ दि.२५-०४-२००६ अन्वये सादर करणेत आलेला आहे.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५२२ अन्वये कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत प्रस्तावास शासनाकडून अद्याप मान्यता मिळालेली नसल्याने, नियमावलीस अधीन राहून संस्थानने कंत्राटी कामगारांना संबंधीत वर्षात सलग दोन महिने दिलेला ब्रेक किंवा १-१ महिना असे दोन महिने दिलेला ब्रेकच्या कालावधीस जोडून आणखी एक महिना अपरिहार्य कारणामुळे गैरहजर राहीलेला कालावधी धरुन, असा एकुण सलग तीन महिने सेवाखंडीत कालावधी शिथील करुन, सदरचे कालावधीत जे कंत्राटी कामगार कामावर आहे व त्यापैकी आजमितीस सलग हजर असणाऱ्या अशा सर्व कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका दरमहा रुपये २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रीत मानधनावर देण्यात याव्यात. त्याकामी ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा सल्ला घेऊन, त्रिसदस्य समितीने अंतीम निर्णय घ्यावा असे ठरले होते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६-०१-२००७ निर्णय क्र.०२, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०-०५-२००७ निर्णय क्र.३९४ व मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८-०७-२००७ निर्णय क्र.५७७ अन्वये सन-१९९१ ते डिसेंबर-२००० पर्यंत या कालावधीत जे कंत्राटी कर्मचारी नियमित कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर हजर असणाऱ्या अनुक्रमे ९९७, ५४ व ०१ अशा एकुण १०५२ रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये २,०००/-(अक्षरी रुपये दोन हजार) मात्र एकत्रीत वेतनावर नियमित नेमणूका देऊन, संस्थान सेवेत घेणेत आलेले आहे.

संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करीत असलेल्या १०५२ कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये २,०००/- एकत्रीत वेतनावर संस्थान सेवेत घेऊन नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. परंतू सध्याचे महागाईचे परिस्थितीत दरमहा रुपये २,०००/- हे अतिशय कमी वेतन असल्याने त्यांना उदरनिर्वाह करणे अतिशय कठीण होत आहे. त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांकडून वेतन वाढवून मिळणेबाबत संस्थान प्रशासनाकडे वारंवार मागणी करणेत येत असल्याने त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणेत आलेला आहे/येत आहे.

कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणे, तसेच वेतनवाढीबाबत मागणी संदर्भात अधिक माहिती जाणून घेणेकरीता व चर्चा करणेकरीता विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४००० ३२ यांचेकडील सासंवि/२००६/४३२(९१) का.१६ दि.३१ मार्च २००८ रोजीचे पत्रान्वये दि.०४-०४-२०००८ रोजी मा.प्रधान सचिव व वरिष्ठ विधी

सल्लागार, मुंबई यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उपरोक्त प्रस्तावाचे मान्यतेबाबत तपशिलवार चर्चा होऊन, सध्याचे महागाईचे परिस्थितीत दरमहा रुपये २,०००/- हे अतिशय कमी वेतन संबंधीत कर्मचाऱ्यांना मिळत असल्याने त्यांना उदरनिर्वाह करणे अतिशय कठीण होत आहे हे मान्य करण्यात येऊन वरीलपैकी कुशल कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ५,५००/- व अकुशल कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ४,५००/-एकत्रीत वेतन देणेबाबत चर्चा झालेली होती. त्यावेळी मा.अध्यक्ष श्री.ससाणे सो. व मा.विश्वस्त आमदार श्री.विखे सो. हेही उपस्थित होते.

त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/५४२४/२००८ दि.११-०४-२००८ रोजीचे पत्रान्वये कुशल कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ५,५००/- व अकुशल कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ४,५००/- एकत्रीत वेतन/मानधन देणेबाबत मान्यता मिळाणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्याची नोंद घेऊन, त्यास मान्यता देणेत आली आहे.याकामी शासनाकडे पाठपुरावा करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २७. मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ६३२** मा.विश्वस्तांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या.

०१ श्री साईबाबा संस्थान मार्फत प्रसादालयात भक्तांना सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. शिर्डीत श्रीसाईंचे दर्शनासाठी येणारे काही भक्त प्रसादालयात भक्तांना जेवनासाठी अन्नदानासाठी देणगी देतात अशा भक्तांकडून येथून पुढे उत्सवात रु.३ लाख व इतर दिवशी रु.२ लाख स्विकारणेत यावेत. (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

०२. संस्थानचे धर्मशाळा परिसरात भक्तांसाठी बगीचा तयार करणेत आलेला आहे. या बगीचामध्ये भक्तांसाठी संडास, बाथरुम व पाण्याची सुविधा नसल्याने अडचण निर्माण होते याकरिता याठिकाणी संडास, बाथरुम व पाण्याची सुविधा करण्यात यावी. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०३. शिर्डी येथे संस्थानने खरेदी केलेल्या शेती महामंडळाचे जागेवर अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांना बांधकामासाठी परवानगी देणेत आलेली आहे. या जागेवर बांधण्यात यावयाच्या इमारतीतील खोल्यांचे वाटपाबाबत मा.उपसमितीने नियमावली तयार करावी. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०४. समाधी मंदिरात रोजंदारीवर पुजारी नेमण्यात आलेले आहेत या पुजाऱ्यांची शैक्षणिक पात्रता व त्यांना कोणाच्या शिफारशीने रोजंदारीवर नेमणूक देण्यात आलेली आहे याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी )

०५. संस्थानची शववाहिनी दुरुस्तीसाठी शिवशक्ती इंजिनिअरींग, बाभळेश्वर यांचेकडे दुरुस्तीसाठी पाठविणेत आलेली आहे. बरेच कालावधी होऊनही ती अद्याप संस्थानचे ताब्यात मिळालेली नसल्याने शिवशक्ती इंजिनिअरिंग,बाभळेश्वर यांचेवर कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

०६. नविन प्रसादालय इमारती शेजारील संस्थानने खरेदी केलेल्या शेती महामंडळाचे जमीनीचे तुकड्याचे मध्ये खाजगी शेतकऱ्यांच्या शेत जमीनी आहेत. अशा जमीनी संस्थान विकासकामासाठी खरेदी करणेकामी संबंधित जमीनमालकांशी चर्चा/वाटाघाटी करुन रेडी रेकनरच्या दरापेक्षा १० टक्के अधिक दराने खरेदी करण्याचे अधिकारी सर्वश्री विश्वस्त मा.पांडूरंग गमाजी अभंग, मा.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.अशोक भिमाशंकर खांबेकर व सौ.सुमित्रा कैलास कोते यांना प्रदान करण्यात आले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०७. श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे सध्या आर.एम.ओ म्हणून काम करत असलेले डॉ.गायकवाड व डॉ.धुळगंड यांनी श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे काम करणेबाबत विनंती केली होती, त्यानुसार कार्यालयीन आदेशने त्यांची नेमणूक श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे करण्यात आलेली आहे. परंतू वैद्यकीय संचालक यांनी त्यांना श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे रुजू होण्यास सोडलेले नाही तरी त्यांना साईनाथ रुग्णालयाकडे हजर होणेकामी सोडण्यात येऊन त्यांचे जागी नव्याने आर.एम.ओ ची नेमणूक करण्यात यावी.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग )

०८. शैक्षणिक संकुल, रुग्णालय या विभागातील रिक्त असलेल्या पदांवर पात्र कर्मचाऱ्यांच्या नेमणूका होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. या पदावर नेमणूक देतांना स्थानिक पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे असे ठरले.

वरील निर्णय क्र ५५९ ते ६३२ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)